# सर्वसंग्राहक गीता

[ गीतातत्त्वज्ञान विवेचन, मूळ श्लोक, सरलार्थ टीपा, गीताध्यायसंगति यांसह ]

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय ........ वा. वा.
दा.क्र. 6438

6438

लेखक

श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी

बी. ए. ( ऑनर्स )

' लोकशाहीचा अर्थव्यवहार ' व ' वैभवाचें अर्थशास्त्र '
या ग्रंथांचे कर्ते

किंमत २ रुपये

IRBK-0106434

IRBK-0106434

विक्रेते

मे. नेर्लेकर बुकसेलर्स, बुधवार चौक, पुणें २.

# सर्वसंग्राहक गीता

[ गीतातत्त्वज्ञान विवेचन, मूळ श्लोक, सरलार्थ,
टीपा, गीताध्यायसंगति यांसह ]

राजी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
३०१४८
अनुक्रम
विभाग ५-५
क्रमांक २२१८
नों. दि.
वाचनालय शाखा

लेखक

श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी,
बी. ए. (ऑनर्स)

'लोकशाहीचा अर्थव्यवहार' व 'वैभवाचें अर्थशास्त्र'
या ग्रंथांचें कर्ते

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ६.४.३.४... नों. दि ...........
वि. ....५.१.५१. क्र. ....................

किंमत २ रुपये

IRBK-0106434

विक्रेते

मे. नेर्लेकर बुकसेलर्स, बुधवार चौक, पुणें २.

## आ शी र्वा द

आपला हा आर्यधर्म उर्फ सनातनधर्म अत्यंत प्राचीन काळचा असून त्याचे मुख्य ग्रंथ म्हणजे श्रुति उर्फ वेद; नंतर स्मृति, त्यानंतर पुराणें असा क्रम आहे. भगवान श्रीगोपालकृष्णांनीं अर्जुनाला जो उपदेश केला तो फार महत्त्वाचा असून महर्षि व्यासांनीं तो महाभारत ग्रंथांत ग्रथित केला आहे, व तें महाभारत पुराणांत मोडलें जातें, व त्याच उपदेशाला " श्रीमद्भवत्गीता " हें नांव दिलें गेलें आहे. महाभारतांत जीं पांच रत्नें गोविलीं आहेत त्यांतच श्रीमद्भगवत्गीता हें पहिलें रत्न आहे. ह्याच गीतेला प्राचीन काळच्या एका कविश्रेष्ठानें " गीतार्णव " असें नांव देऊन एक मोठी ओवीबद्ध विस्तृत टीका केली आहे. त्याचप्रमाणें ह्या गीतामहार्णवांत हजारों लोकांनीं आपापल्या बुद्धिमत्तेप्रमाणें बुड्या मारल्या आहेत. तद्वतच श्री. रा. रा. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी ह्यांनीं 'सर्वसंग्राहकगीता' हा ग्रंथ लिहून बुडी मारली आहे. ह्या बुडीमध्यें त्यांनीं तेहतीस रत्नें शोधून काढलीं आहेत. तीं विचारणीय असून वाचनीय आहेत. वाचक वर्गानें तीं अवश्य वाचून पहावींत. या गीतेमध्यें अनेक विषय आलेले आहेत परन्तु बहुतेक टीकाकारांनीं, सर्वसंग्राहक दृष्टीनें लक्ष दिलेलें नाहीं. ज्यानें त्यानें आपापल्या मताप्रमाणें टीका केली आहे. या गीतेच्या श्लोकांचा अर्थहि त्यांनीं सुव्यवस्थित असाच लाविला आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनीं " कर्मयोगशास्त्र " उर्फ " गीतारहस्य " हा जो ग्रंथ लिहिला आहे, त्यासारखेंच हें छोटेखानी गीतारहस्य आलें आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. ह्या ग्रंथाचे अंतरंग छोटीशी तेहतीस प्रकरणें लिहून सुन्दर मालाच बनविली आहे. तसेंच बहिरंगहि सर्व धर्मांच्या लोकांचें चित्र देऊन फार सुन्दर "संग्राहकता" दर्शविली आहे. एकंदर विचारान्ती पहातां हा ग्रंथ मननीय आणि वाचनीय असाच झाला असून संग्राह्यहि झाला आहे. **या ग्रंथास संकेश्वर मठाचे श्रीशंकराचार्य गुरुस्वामी यांचाही आशीर्वाद आहे.**

दिनाङ्क १६-३-५७]. योगी चिदानन्द स्वामी (गोगटे तपस्वी)

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. आवृत्ति पहिली (१९५७).

प्रकाशक : सौ. नीला कुलकर्णी, ४३१/५७, पुरंदरे बाग, पुणें २.

मुद्रक : य. वि. लेले, अशोक प्रिंटिंग प्रेस, ५७०, शनवार, पुणें २.

: समर्पण :

मातृपितृतुल्य ती. सौ. इंदिराबाई नातू
व ती. डॉ. मोरेश्वर नारायण
ऊर्फ आबासाहेब नातू
या उभयतांस प्रेमादर-
पूर्वक अर्पण.

卐

# अनुक्रमणिका


पान

१ स्फूर्तिदात्री गीता १

२ टीकाकारांच्या ठिकाणीं गीतेच्या सर्वसंग्राहक दृष्टिकोनाचा अभाव २

३ गीता व बायबल ३

४ गीत व मुसलमान बांधव ४

५ सर्वसंग्राहक म्हणजे काय ? ४

६, ७ ग्रंथ—कालनिर्णय ५

८ गीतापूर्वकालीन परिस्थिति : यज्ञसंस्थेचें हिडीसस्वरूप—उपनिषदांचा संन्यासाकडे ओढा —चार्वाकमत— बौद्धमताचा प्रादुर्भाव सांख्य, योग, भक्ति, पिशाचपूजा इ. ६ ते ८

९ गीतेपुढील कार्य ९

१० गीतेंतील सर्वसंग्राहक तत्त्वज्ञान:—तात्त्विक शिकवण, व्यावहारिक शिकवण १०ते१३

११ गीतापूर्वकालीन मतांचा गीतेंत अंतर्भाव:—गीतेंतील यज्ञयोग, गीता व उपनिषदें, चार्वाकदर्शन, गीता हें सेश्वर सांख्यदर्शन, गीतेंतील समाधियोग, भक्तियोग, मोक्षद्वार सर्वांना खुलें, भूत-पिशाच—पूजकांबद्दल सहानुभूति, सूत्ररूपानें तत्त्वज्ञान १४ते२६

१२ निरनिराळे टीकाकार २७

१३ सर्वसंग्राहक ग्रंथाचा धर्म २८

१४ गीतादर्श २८

१५ व्यापक गीताधर्म २९

१६ शास्त्रप्रामाण्य २९

१७ बुद्धिप्रामाण्य २९

१८, १९ व २० मनुष्यस्वभाव व गीता ३०

२१ नव्या व्याख्या ३१

२२ ईश्वरविषयक रूढकल्पना ३२,३३

२३ पुनर्जन्म ३४,३५

२४ ईश्वर म्हणजे काय ? ३६

२५ बुद्धिग्राही कल्पना ३७

२६ विषमतेचा कार्यकारणभाव ३८

२७ आक्षेपखंडन ४१

२८ मोक्ष ४३

२९ एक कुशंका ४४

३० कांहीं लोकभ्रम ४५

३१ जाणीवयुक्त परमेश्वर ४८

३२ परमेश्वराचा निर्माता ४९

३३ सामाजिक संदेश ५१

अथ ध्यानम् ५३

श्रीमद्भगवद्गीताप्रशस्तिः ५४

अध्याय पहिला ५६

अध्याय दुसरा ६४

अध्याय तिसरा ८०

अध्याय चौथा ९०

अध्याय पांचवा १००

अध्याय सहावा १०८

अध्याय सातवा ११९

अध्याय आठवा १२५

अध्याय नववा १३१

अध्याय दहावा १४०

अध्याय अकरावा १४८

अध्याय बारावा १६०

अध्याय तेरावा १६४

अध्याय चौदावा १७१

अध्याय पंधरावा १७७

अध्याय सोळावा १८२

अध्याय सतरावा १८७

अध्याय अठरावा १९२

आचार्यकुल पुणें || श्री || सोमवासरः ४।१।५७

# अथ प्रस्तावः

श्रीमद्भिः श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी बी. ए. महोदयैः 'सर्वसंग्राहक-गीताख्यः' प्रबंधो लिखितः। स मया यावच्छक्यं अवलोकितः वाचितश्च। एतावत्कालपर्यन्तं भिन्नभिन्नप्रस्थानैः आचार्यवर्यैः स वेदानुसारितया व्याख्यातः। तानि तानि व्याख्यानानि समभ्यस्य उपरिनिर्दिष्टमहोदयैः जीवन-विषयं लक्ष्यीकृत्य सर्वेषां पुरतः स्वविचारोपन्यासः कृतः। ग्रंथारंभे एव-'चिन्तां प्रकृतसिद्ध्यर्थां उपोद्घातं प्रचक्षते' इति न्यायानुसारतः एभिः महोदयैः उपोद्घातः विरचितः। सर्वत्रसमन्वयदृष्टिं अनुसृत्य विमर्शः विहितः। सांसारिकाणां इयमेव पद्धतिः ग्रंथस्य भावार्थाकलनाय समीचीना इति मे मतिः। परमपूज्यानां आचार्याणां के के सिद्धान्ताः के के वा पूर्वपक्षाः ते ते जिज्ञासुभिः परंपरया सांप्रदायानुसारतः गुरूपदेशेनैव अध्येतव्याः भवन्ति। तत्र महान्कालः अपेक्ष्यते। परंतु कलिकाले तत् अशक्यप्रायं भवति प्रापंचिकानाम्। जीवनार्थकलहे को वा ग्रंथः शांतिदायकः यथार्थत्वेन स्यात् अल्पेनैव कालेन इति जिज्ञासा जागर्ति वारंवारं प्रापंचिकानां मनसि। सा जिज्ञासा पूर्णा भवेत् संक्षेपतः अनेन उपोद्घातवाचनेन सार्थगीतावाचनेन इति मे मतिः। इति कथयित्वा विरमति भवदीयः

गो. न. पंढरपुरेशास्त्री

# गीतोद्यानाकडे

‘ जिवंतपणा ’ ‘ चैतन्य ’ यांवरच हें जग आधारलेलें आहे. तेव्हां ज्यांत ह्या चैतन्याचा अंश अधिक ती गोष्ट प्रामुख्यानें जगाच्यापुढें येणार यांत मुळींच संशय नाहीं. कोणतीहि व्यक्ति असो, तत्त्व असो आपल्यांतील चैतन्याच्या कमीजास्त अंशानें, तें जगावर ताबा चालवूं शकतें. ज्या काळांत ह्या गोष्टी समाजाच्या पुढें आलेल्या असतात, त्या काळीं तर त्यांचें महत्त्व असतेंच, किंबहुना त्याहूनहि अधिक त्यांच्यानंतरच्या काळांत, त्यांचें खरेंखुरें स्वरूप दिग्दर्शनास येतें, व अशा रीतीनें त्यांच्या महत्त्वामापनांत भरच पडते. पण चिरकाल त्या गोष्टी आपलें स्वत्व कायम राखतील असें होत नाहीं. काळाच्या फेऱ्यांत त्यांना गंज चढतो व नव्या नव्या गोष्टी आपल्या प्रभावानें समाजावर हुकमत चालवूं लागतात. ह्या सामान्य नियमांस एक प्रमुख अपवाद म्हणजे ‘ गीता ’ ग्रन्थ हा होय. ह्या भगवंतांनीं गाइलेल्या गाण्याची माधुरी आपल्या पूर्वजांनीं मुक्तकंठानें चाखली आहे, आतां आपण चाखीत आहोंत, भविष्यकाळींहि लोक चाखणारच.

विशेष नवलाईची गोष्ट म्हणजे ह्या पुष्पाचा सुगंध दशदिशांना दरवळून राहिला आहे. आपले पाश्चात्य बांधव देखील ह्याचा आस्वाद घेण्याकरितां धांवून येत आहेत ते आपलाहि हक्क यावर सांगूं लागले आहेत. हंबोल्ट म्हणतो त्याप्रमाणें “ It is perhaps the deepest and loftiest thing, the world has to show.” (गीता हें जगांतील अत्युच्च तत्त्वज्ञान होय.) अर्थात हिंदवासीयांना हा अत्युत्तम **ज्ञानसंग्रह** झाला असल्यास नवल नाहीं. (It has become the sum of all wisdom to the cultured Indian. Garbe.) **गीताधर्म** म्हणजे **विश्वधर्म** आहे असें म्हटल्यास तें अतिशयोक्तिपूर्ण मुळींच ठरणार नाहीं.

अशा ह्या गीताग्रन्थावर असंख्य विद्वानांनीं आपल्या प्रतिभेच्या जोरावर उत्कृष्ट ग्रन्थ लिहिले आहेत, आणि पदोपदीं त्यांत भरच पडत आहे. पण गीता हा एक मोठा रत्नाकर आहे. त्यांत बुडी मारली कीं, रत्नच हाताला लागतें. आणि रत्नाचा स्वार्थ कोणाला बरें सुटला आहे ? मीही रत्न हाताला लागतें कीं नाहीं याचा बुडी मारून प्रयत्न करीत आहे.

हा ग्रंथ लिहितांना गीतेवर आतांपर्यंत लिहिल्या गेलेल्या सर्व लहान-मोठ्या ग्रंथांचा मला उपयोग झालेला आहे. आतांपर्यंत प्रकाशांत आलेल्या सर्व ग्रंथाचें सारच या छोटेखानी ग्रंथांत आणण्याचा प्रयत्न केला आहे. हा एकटा ग्रंथ वाचला तरी गीतेविषयीं सर्व कांहीं वाचल्याचें श्रेय सामान्य तसेंच जिज्ञासू अभ्यासकांस लाभावें, असा उद्देश आहे. तो कितपत साध्य झाला, हें अर्थात गुणग्राही वाचकांनीं ठरवावयाचें आहे.

सांप्रत 'विज्ञान' हें अति प्रगतावस्थेंत आहे. त्यामुळें बुद्धिप्रामाण्यवादी आधुनिक विद्वान कोणत्याही कल्पना बुद्धीच्या निकषावर घासूनपुसून पाहिल्याशिवाय मानण्यास तयार होत नाहींत. बुद्धिप्रामाण्यवाद भारतीय विचारवंतांस नवा नाहीं. अगदीं वेदकाळांतलि ऋषि–मुनि देखील 'ईश्वर' 'देव' आदि कल्पना काव्यमय भाषेंत मांडतात. ख्रिस्ती किंवा इस्लाम धर्मांप्रमाणें या कल्पनास साचेबंद स्वरूप देऊन 'विज्ञाना' च्या प्रकाशांत त्यास मंदत्व प्राप्त होईल, अशा प्रकारचा दुराग्रह त्यांच्या कल्पनेंत नाहीं. ह्या कल्पना वेद व गीता, या ग्रंथाधारें 'विज्ञानास' पटेल ह्या स्वरूपांत मांडता येणें शक्य आहे हें दाखविण्याचाहि येथें प्रयत्न केला आहे. यावर विद्वानांनीं आपलीं मतें मांडावीत अशी अपेक्षा आहे. योग आला तर यावर सविस्तर लिहिण्याचा बिचार आहे.

माझ्या कांहीं मित्रांबरोबर गीतेवर चर्चा चालू असतांना, पुणें येथील खुन्यामुरलीधराचे देवळांत आचार्यकुलाचे श्री. पंढरपुरेशास्त्री फार उत्कृष्ट प्रवचनें करतात, असें मला सांगण्यांत आलें. मी जिज्ञासेनें सहज त्यांच्याकडे गेलों. त्यांच्याशीं चर्चा केली. त्यांचें प्रवचनहि ऐकलें. गीतेचा इतका सर्वांगीण अभ्यास केल्याचें उदाहरण क्वचितच असेल. गीतेंतील एकएका शब्दावर, श्रीशंकराचार्य, श्रीज्ञानेश्वर श्रीतुकाराम आदि महर्षींच्या विचारांचा आधार घेऊन व महाभारतादि सर्व पुराणग्रंथांतील वचनें उध्दृत करून तासन्तास उत्कृष्ट प्रवचनें देणें ही कांहीं साधीसुधी गोष्ट नाहीं. पण ती ते उत्कृष्टपणें करूं शकतात. मला सहज वाटलें, इतर विद्वद्वर्यांकडे प्रस्तावनेकरितां जाण्यापेक्षा यांनाच विनंति करावी. त्याप्रमाणें मी त्यांच्याकडे गेलों. त्यांनीं मला स्पष्टच सांगितलें कीं, ग्रंथ योग्य वाटला तर लिहीन, नाहींतर नाहीं. आनंदाची

गोष्ट ही कीं, ग्रंथ वाचल्यावर प्रस्तावना लिहिण्याचें त्यांनीं आनंदानें कबूल केलें. त्यांनीं संस्कृतांत छोटेखानी प्रस्तावना लिहून दिली, त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

गीताश्लोकांचें भाषांतर करतांना सामान्य जिज्ञासू वाचकांस मूळ श्लोकांकडे लक्ष न देतांहि गीतोपदेश सहजासहजीं समजावा ही दृष्टि ठेविली आहे. जरूर तेथें अर्थ स्पष्ट होण्याकरितां टीपाहि दिल्या आहेत. 'ईश्वर' 'पुनर्जन्म' 'मोक्ष' याविषयीं मी ज्या नवीन कल्पना मांडल्या आहेत, त्या थोडासा व्यापक दृष्टीनें विचार केला असतां गीताकारांसाहि ग्राह्य वाटतात, हे श्लोकांचा अर्थ देतांना स्पष्ट केलें आहे. असें करतांना बुद्धीची कसरत करण्याचा बिलकूल प्रयत्न केलेला नाहीं. श्लोकांचाच सरळ अर्थ लावीत असतां ह्या नवीन कल्पना सहजासहजीं त्यांतूनच निघूं शकतात, हा अनुभव प्रत्येक सहृदय जिज्ञासूस येईल अशी खात्री वाटते.

या ग्रंथाची किंमत शालेय पुस्तकाप्रमाणें अगदींच माफक ठेविली आहे. कमी प्राप्तीच्या लोकांसही हा ग्रंथ संग्रही बाळगता यावा हा उद्देश आहे.

( प्रत्येक पानावर गीताध्यायांचा आंकडा देण्याचें मुद्रणदोषांमुळें राहून गेलें. याबद्दल वाचकांची क्षमा मागतों.)

पुणें,
१४-३-५७

श्री. द. कुलकर्णी

अनुक्रम 309,74
विभाग आ. वा
क्रमांक 2 3 2 5
नों. दि.

॥ श्री ॥

# सर्वसंग्राहक गीता

" सर्व शास्त्रमयी गीता सर्वदेवमयो हरिः । "

—श्री. व्यास

१. **स्फूर्तिदात्री गीताः**—'गीता', 'हरिगीता', 'भगवद्गीता' हीं नांवें उच्चारल्याबरोबर प्रत्येक हिंदूचें अंतःकरण जसें भक्तिरसानें ओथंबून जातें; त्याचप्रमाणें इतरधर्मियांचींहि मस्तकें हीं नांवें ऐकल्याबरोबर आदरानें विनम्र होतात. गीता हा ग्रंथ त्याच्या जन्मापासून सर्वांना स्फूर्ति देत आलेला आहे आणि जगांतील धार्मिक ग्रंथांतील हा मेरूमणि जगाच्या अंतापर्यंत स्फूर्ति देत राहणार यांत संदेह नाहीं.

ही गीतगंगा आपल्या बाजूस असलेल्या सर्वांना जीवन देत अविरतपणें वाहात आहे. पुढें जसजसें तिचें पात्र वाढत जातें, तसतसा तिच्या जीवनाचा सांठा ' दिल्यानें वाढतें ' या न्यायानें उत्तरोत्तर वाढतच जातो, पण कमी होत नाहीं. ह्या गीतापुष्पाचें असंख्य भ्रमरांनीं मधुपान केलेलें आहे, पण त्यामुळें हें दिव्य पुष्प कोमेजून न जातां दिसंदीस नवतेजानें फुलून दिसतें, आणि जणूं दुसऱ्या नवतरुणांना मधुपानाचें आमंत्रण देतें. एकदां गोडी लागल्यावर कितीहि ह्या अवीट रसाचें आकंठ पान केलें तरी समाधानच होत नाहीं आणि त्यायोगें आजन्म आनंद देणारा हा सुखाचा ठेवा हातीं लागल्याचें मात्र भरपूर समाधान मिळतें.

गीता हें एक खरोखरच पृथ्वीवरील नंदनवन आहे. ह्या रमणीय उद्यानांतील ' कर्मयोग ' हा अशोकवृक्ष असून, तो सर्वांचा शोक तावडतोब हरण करतो. पण पृथ्वीवरील नंदनवन कशाला, गीता ही स्वतःच रसा-पृथ्वी-आहे. पृथ्वीच्या पोटांत अनंत रस असले तरी पृथ्वी जशी एक, तशी

गीतेंत सर्व तत्वज्ञानें असलीं, तरी त्यांचा समन्वय साधून एकचएक तत्त्वज्ञान गीतेचा प्रतिपाद्य विषय आहे, म्हणून तीहि एकच आहे; आणि याकारणा-करतांच गीता ग्रंथ सर्वसंग्राहक या यथार्थ पदवीस प्राप्त झाला आहे. हें स्वरूप जाणूनच श्रीव्यासांनीं गीतेला 'सर्व शास्त्रमयी' असें म्हटलें आहे. 'गीता सुगीता कर्तव्या किमन्यैः शास्त्रविस्तरैः' 'एकल्या गीतेचें पुरें अध्ययन केलें म्हणजे बस्स आहे; बाकीच्या शास्त्राचा फोलकट पसारा काय करावयाचा?' हें गीतामहात्म्यांतील सुभाषित या स्वरूपाला अनुलक्षूनच आहे.

**२. टीकाकारांच्या ठिकाणीं गीतेच्या सर्वसंग्राहक दृष्टि-कोनाचा अभावः**—ह्या पृथ्वीच्या पोटांतील निरनिराळे रस नानाविध वृक्षवल्लींचीं बीजें ओढून काढित असतात. एकाच जमिनीच्या तुकड्यांत चिंच, आंबा, ऊस, आवळा, मिरची यांच्या बिया टाकल्या असतां, त्या बिया त्या जमिनींतून निरनिराळे रस ओढून घेऊन फलादिकांच्या रूपानें व्यक्त दशेला आणतात. त्याप्रमाणेंच गीतारूपी पृथ्वीमधून अनंत संस्कार-युक्त अंतःकरणें अनंत रस ओढून काढून जगाला देत असतात.

प्राचीन काळचे विविध मतांचे टीकाकार व भाष्यकार, तसेंच आधुनिक दृष्टीनें गीतेवर लेख लिहिणारे अनेक विद्वान्, हे वरील विधानाची सत्यता पटवून देणारे आहेत. पण ह्या सर्वांची सर्वांत मोठी चूक—घोड-चूक म्हणा हवें तर—म्हणजे स्वमतांबद्दल दुराग्रह. ह्यांच्या ठिकाणीं गीताकारांची परमतांबद्दलची सहिष्णुवृत्ति नाहीं, सर्वसंग्राहक दृष्टिकोन नाहीं.

एकाच ग्रंथाविषयीं निरनिराळ्या विद्वानांचीं निरनिराळीं मतें पाहिलीं म्हणजे मोठी गंमत वाटते. हा गीताग्रंथ हजारों विद्वानांमध्यें मतभेद निर्माण करून, शेवटीं सर्वांनाच आपल्या दिव्यतेजानें आपल्याकडे आकर्षण करून घेतो, हें पाहून कौतुक वाटतें व त्याविषयींचा आपला आदर द्विगुणित होतो.

**३. गीता बायबलपूर्व म्हणून गीतेचाच बायबलवर पगडा असण्याचा संभवः**—त्या कालीं प्रचलित असलेलीं निरनिराळीं हिंदवी

तत्त्वज्ञानें गीतेंत आल्यानें, त्या त्या तत्त्वज्ञानाच्या अभिनिवेशानें त्यानुरूप तत्त्वज्ञान गीतेंत पाहावें, यांत फारसें नवल नाहीं. पण गीतेचा प्रसार पाश्चात्य राष्ट्रांत झाल्यावर, तेथील विद्वानांनीं पुढें येऊन आमचेंच तत्त्वज्ञान गीतेंत प्रतिपादन केलें आहे, असें ठासून सांगण्यास जेव्हां सुरवात केली तेव्हां मात्र आपली मति गुंग झाल्याशिवाय राहात नाहीं. अशा पाद्री लोकांत डॉ. लोरिनसर हे प्रमुख होत.

त्यांनीं आपल्या गीतेच्या जर्मन भाषांतराच्या शेवटीं, गीता आणि 'नवा करार' ( New Testament ) यामध्यें असणाऱ्या विलक्षण शब्दसादृश्यांचीं सुमारें शंभराहून अधिक स्थळें दाखविलीं आहेत.[1] उदा०—

( 1 )He-dwelleth in me and I in him. ( John V 57 )
तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति । (६.३०)

( 2 ) Son, be of good cheer, thy sins will be forgiven then. ( Math. IX 2 )
अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः। ( १८. ६६. )

( 3 ) Whatever is not of faith, is sin. ( Rom. XIV 23.)
अश्रद्धया हुतं दत्तं...असदित्युच्यते । ( १७.२८ )

( 4 ) I am Alpha and Omega, the beginning and the ending. ( Rev. I 8 )
अहमादिश्च मध्यं च भूतानामन्त एव च । १०. २० )

आणखी कांहीं पंडित[2] यापुढेंही जावून श्रीकृष्णचरित्र, ख्रिस्तचरित्रावर आधारलेलें आहे, अशीं वस्तुस्थितीचा विपर्यास करणारीं विधानें ठोकून देतात. पण या बिचाऱ्यांच्या हें लक्षांत येत नाहीं कीं, समजा उद्यां गीता जर बायबलपूर्व आहे, असें निश्चित ठरलें तर आपणांस नाक मुठींत धरावें लागेल. गीता बायबलपूर्व आहे याबद्दल विद्वानांत

( 1 ) 'Nothing can be inferred from theory of resemblances.' ( M. William : Ancient Wisdom )
( 2 ) Mr. Kennedy and Grierstone etc.

आतां दुमत नाहीं. आतां तर (Philology) तुलनात्मक भाषाशास्त्राच्या सहाय्यानें, बायबल बव्हंशीं हिंदी धर्मग्रंथावर आधारलेलें असावें असें म्हणण्यापर्यंत कित्येक पाश्चात्त्यांचीच मजल गेली आहे.[1] कांहीं असो, गीतेंत ख्रिस्ती धर्माचींहि मूलतत्त्वें सांपडत असल्यानें आपल्या 'गीता **सर्वसंग्राहक**' आहे या म्हणण्यास पुष्टीच मिळते.

**४. गीता आणि मुसलमान बांधवः**—स्वातंत्र्यपूर्व काळांत भारतांत हिंदु-मुस्लीम ऐक्यास जे तडे गेले त्याचेंच पाकिस्तान हें दृश्य फळ आहे. अद्यापहि हें ऐक्य सहिष्णुतेवर आधारलेलें आहे असें म्हणतां येत नाहीं. पाकिस्तानांतून प्रत्यही हिंदूंचे जे थवेच्या थवे भारतांत आश्रयास येत आहेत, ते आपल्या पाकिस्तानी बांधवांच्या परधर्म असहिष्णुतेचा पुकाराच करीत आहेत. भारतांतील कांहीं मुसलमान बांधव आणखीहि ह्या आगींत तेल ओतण्याचाच प्रयत्न करीत असतांना अधूनमधून दिसत आहेत. अशा परिस्थितींत त्यांना व त्याचप्रमाणें हिंदु-बांधवांना देखील, गीता ३००-४०० वर्षांपूर्वींच पैगंबरभक्तांना आकर्षण करूं शकली, ही एक अद्भूतरम्य कथा वाटेल यांत शंका नाहीं. अकबर बादशाहाच्या दरबारांतील सुप्रसिद्ध संस्कृत पंडीत अबु-फजल यानें ७४५ श्लोकीं भगवद्गीतेचें पार्शियन भाषांतर केलेलें आहे. त्या भाषांतराच्या प्रस्तावनेंत त्यानें गीतेची मुक्तकंठानें स्तुति केलेली आहे.

**५. 'सर्वसंग्राहक' म्हणजे काय?**—हिंदुधर्मापासून अगदीं भिन्न असलेल्या व निराळ्या वातावरणांत वाढलेल्या ह्या दोन धर्मांतील पंडितांस हा ग्रंथ नुसता आदरणीय नव्हे तर पुष्कळ बाबतींत प्रमाणभूत वाटतो, तर हिंदूंना तो किती पूज्य व प्रमाणभूत वाटत असेल याची नुसती कल्पनाच केलेली बरी. गीतेंतील तत्त्वज्ञान '**सर्वसंग्राहक**' असलेंच पाहिजे, अशी खात्री होण्यास हा बाह्य पुरावा कोणालाहि पुरेसा वाटेल यांत शंका नाहीं. पण अभ्यासकांचें व जिज्ञासूंचें तेवढ्यानें समाधान होणार नाहीं हें उघड आहे. पुन्हां गीतेंतील तत्त्वज्ञान सर्व संग्राहक आहे याचा अर्थ, ह्या ग्रंथांत भूतलांवरील सर्वधर्मांचीं सर्व तत्त्वें सांपडतात असा केव्हांच

(१) गीतारहस्य पान ५८१ पहा.

होणें शक्य नाहीं. गीतेंत, गीतापूर्वकालीन तत्त्वज्ञानांचा उत्कृष्ट मिलाफ आहे, हाच याचा सरळ अर्थ आहे. त्याकरितां गीतेंतील तत्त्वज्ञान काय आहे व त्यांत निरनिराळ्या दर्शनांचा अंतर्भाव कसा सुंदर रीतीनें केला आहे हें आपण पाहूं.

६. **ग्रंथ-कालनिर्णयाची जरूरी :**—तत्पूर्वीं गीता कोणत्या कालखंडांत पडते याचा ओझरता उल्लेख करणें अवश्य आहे. कोणत्याहि महान् ग्रंथाला विशिष्ट कालाची पार्श्वभूमी असते. ती जर आपण निश्चित करू शकलों नाहीं, तर तो ग्रंथ ओसाड अरण्यांतील मृगजळांप्रमाणें आपणांस भासेल; कारण कोणत्या परिस्थितीचें हें प्रतिबिंब आहे, हें निदान ठोकळ मानानें तरी समजल्याशिवाय त्याविषयीं वाटणारा आपला आदर चिरकालीन व गोडी अवीट असूं शकणार नाहीं.

७. **गीता-कालनिर्णय :**—गीता खिस्तपूर्वी निदान तीन शतकें तरी, आहे ह्या स्वरूपांत असली पाहिजे, याविषयीं विद्वानांचें एकमत दिसतें. पण गीतेंत पुष्कळ ठिकाणीं पाणिनीपूर्व शब्दप्रयोग आढळतात, त्यावरून गीता पाणिनीपूर्व असावी असें म्हणण्यास आपणांस आधार सांपडतो. पाणिनी खिस्तशकापूर्वी पांचव्या शतकांत होऊन गेला. पुन्हां बौद्ध-धर्माचा गीतेंत उल्लेखही आढळत नाहीं आणि सांख्य व योग फारच असंदिग्ध स्वरूपांत वापरले आहेत. यावरून गीता उपनिषत्कालानंतरच्या व बुद्ध उदयापूर्वीच्या काळांत प्रतिपादिली हें अनुमान निघतें. गीता खिस्तशकापूर्वी ७०० ते ६०० च्या दरम्यान प्रतिपादिली असें साधारणपणें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. गुप्तांच्या काळीं म्हणजे इसवी सना-नंतरच्या दुसऱ्या तिसऱ्या शतकांत महाभारत, पुराणें इत्यादि ग्रंथांचें पुनर्लेखन झालें, असा पुरावा उपलब्ध आहे. त्यावरून हल्लीं ज्या स्वरूपांत गीता आपणांस दिसते, तें स्वरूप या ग्रंथास या काळीं प्राप्त झालें असें जरी मानलें, तरी या ग्रंथांत जीं मूलभूत तत्त्वें प्रतिपादिलीं आहेत तीं बुद्धपूर्वकाळातील आहेत, यांत संदेह दिसत नाहीं.

८. **गीतापूर्वकालीन परिस्थिति :**—अशी कोणती परिस्थिति कारणीभूत झाली कीं, त्यामुळें गीतातत्त्वज्ञानाची आवश्यकता उत्पन्न झाली,

हेंहि आपणांस पाहिलें पाहिजे. कारण पाया भरभक्कम असल्याशिवाय, उभारलेली इमारत मजबूत व उठावदार असूं शकत नाहीं.

(अ) **यज्ञसंस्थेचें हिडीस स्वरूपः**—फार प्राचीन काळीं म्हणजे ऋग्वेदाच्या प्रारंभींच्या कालांत निसर्गाच्या निरनिराळ्या स्वरूपांना दिव्य-शक्ति मानून त्यांची पूजा, आपले पूर्वज करीत. पुढें त्यावेळच्या आर्यांमध्यें मोठा धार्मिक स्वरूपाचा लढा होऊन, त्यांच्यामध्यें दोन तट पडले. त्यापैकीं एक पक्ष आपल्या मूळस्थानापासून पूर्वेकडे म्हणजे हिंदुस्थानाकडे वळला. ह्या पक्षानें त्यांच्या दुसऱ्या पक्षाला—इराणी बांधवांना—असूर हें नांव देऊन, त्यांच्यामध्यें प्रचलीत असलेल्या देव-भक्तीच्या प्रथेला यज्ञाचें[1] नवें स्वरूप दिलें. पुढें वेदकाळाच्या शेवटच्या पर्वांत ह्या यज्ञसंस्थेला इतकें हिडीस स्वरूप प्राप्त झालें कीं, यज्ञाच्या बारीक सारीक गोष्टींना अवास्तव महत्व चढलें व एकंदरींत प्रकार फारच गुंता-गुंतीचा होऊन बसला. हत्याकांडाला ऊतच आला होता नुसता. किरकोळ गोष्टींवरून अध्वर्यु पुरोहितांमध्यें वाद उत्पन्न होऊन ते विकोपास जाऊं लागले. आणखी यज्ञाच्या त्या एकंदर दीर्घ, त्रासदायक व खर्चिक प्रकारानें यज्ञ रिकामपणाचा व श्रीमंतांचा हक्क झाला. ही परिस्थिति अर्थातच फार दिवस टिकणें शक्य नव्हतें. त्यावेळच्या कांहीं पंडितांना वाटलें कीं, हें कांहीं आत्म्याचें खरें स्वरूप जाणण्याचें साधन नव्हे; म्हणून त्यांनीं उपनिषदांच्या द्वारें आपलें तत्त्वज्ञान प्रसृत करण्यास सुरवात केली.

(ब) **उपनिषदांचा संन्यासाकडे ओढाः**—उपनिषत्कालीं ह्या द्रव्यमय यज्ञास मानसिक स्वरूप दिलें गेलें व अशा रीतीनें ब्रह्माच्या खऱ्या स्वरूप-चिंतनांत तत्त्ववेत्ते कृतकृत्य मानूं लागले.[2] ब्रह्माच्या किंवा आत्म्याच्या चिंतनाला निवांत स्थळ हवें व संसाराची उपाधि नको; त्यामुळें लोकांची प्रवृत्ति संसार सोडून अरण्यांत जाऊन राहण्याकडे वाढली. जो तो उठल्या सुटल्या संन्यास घेऊं लागला. ब्राह्मण, क्षत्रिय, आदिकरून

---

१ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् । ऋ. १०-९०-१६ किंवा, यज्ञेन यज्ञमव यज्ञियः सन्यज्ञस्ते वज्रमहिहत्य आवत् । ऋ. ३-३२-१२.
२ आत्मा वारे श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्य । बृ. २-२

सर्वांनाच हा प्रकार संन्यासाकडे नेऊं लागला[1] व अशा रीतीनें आत्यंतिक टोंकाला गेला. संन्यास हें जीवित-ध्येय होऊन बसलें. त्यांच्या तत्त्वाप्रमाणें ब्रह्मज्ञान झाल्यावर आत्मा हा अकर्ता होतो; त्यानें कांहीं केलें काय आणि न केलें काय सारखेंच. ह्या संन्यास प्रकारांवरही जोराचे आघात होऊं लागले. सामञ्फलसूत्तामध्यें आत्म्याचें अकर्तृत्व तार्किक दृष्ट्या आत्यंतिक टोंकाला नेलें आहे. भर दिवसा दरोडा घातला, खून पाडले किंवा वाटेल तसें अनृत बोललें तरी त्या आत्म्याला त्याचें कांहींच नाहीं, कारण तो अकर्ता[2] ही विचारसरणी त्यांत गोंवली आहे.

(क) **चार्वाकमतः**—ह्या परिस्थितींत अगदीं स्वतंत्र विचाराचे लोक पुढें येणें अपरिहार्य होतें. चार्वाकादि पंडितांनीं, यज्ञांत आपल्या बापाला मारल्यानें मोक्ष कसा मिळणार ? असा यज्ञसंस्थेस स्पष्ट सवाल टाकून, त्यांतील फोलपणा जगाच्या निदर्शनास आणला. ज्ञानवाद्यांनाहि संन्यास व ब्रह्म ही जीविताची इतिकर्तव्यता नसून, जगणें, इहलोकीचीं ऐश्वर्यें भोगणें हेंच खरें आयुष्य–ध्येय आहे; नाहींतर हीं ऐश्वर्यें आहेत तरी कशाला ? असें सांगून टाकलें. देव, देव म्हणून मागें उपाधि लावून न घेतां, ऋण काढा, काय वाटेल तें करा, पण मजा मारा, कारण उद्यां एकदां मेल्यावर पुन्हां जन्म कोठला ? व पुन्हां हीं ऐश्वर्यें तरी कोठून उपभोगायला मिळणार ? अशा तऱ्हेचें ग्रीस देशाच्या एपिक्युअर तत्वज्ञां-प्रमाणें यांचें 'खाना, पीना और मजा मारना' हें तत्त्वज्ञान होतें. हे लोक वाक्‌पांडित्यांत फारच तरबेज होते. त्यांनीं सामान्य जनांचीं अंतःकरणें आपल्या प्रभावी वक्तृत्वानें काबीज करण्यास सुरवात केली होती. ह्यांची तुलना ग्रीस देशांतील सोफिस्टांशींच करतां येईल.

---

(1) 'A burning sun and a hot wind drove not only ब्राह्मण s' but also the क्षत्रिय's to asceticism. ...Thomson.

(2) '...to him who causes grief or torment...to him who kills-a living man...breaks into houses, speaks lies : to him thus acting, there is no grief...were he to go along the south bank of the Ganges, striking & slaying, mutilating and having men mutilated...there would be no guilt.
(Belvalkar : Vedanta Philosophy P. 85)

(ड) **बौद्धमताचा प्रादुर्भावः**—दुसराहि एक पंथ आपलें अस्तित्व जाणवूं लागला होता. हा पंथ पुढें मोठ्या प्रमाणांत प्रसार पावलेल्या बौद्धधर्माचें बीजरूप होता. ह्या विचाराच्या लोकांनीं पाहिलें कीं, संन्यास हा चांगला खरा, पण ह्यांतील आत्मनात्म विचाराच्या योगानें हा सामान्य लोकांच्या आवाक्याबाहेरचा आहे. तेव्हां यज्ञयागाच्या किंवा आत्मनात्मविचाराच्या भानगडींत न पडतां, सांसारिक दुःखाचें अस्तित्व, त्याचें कारण, त्याचा निरोध किंवा निवारण करण्याची आवश्यकता व तें समूळ नाहींसें करण्याचें साधन जें वैराग्य[1] त्याचाच आपण अवलंब केला पाहिजे; अशी त्यांची विचारसरणी होती. हा पंथ सामान्य लोकांना अर्थातच आकर्षक वाटत होता. बुद्धाचा उदय मात्र अद्याप झालेला दिसत नाहीं व त्यामुळें या तत्वाची पद्धतशीर मांडणीहि त्यावेळीं कोणी केली नव्हती. गीताकार कांहीं कांहीं वेळेला आपली उच्च भूमिका विसरून यज्ञवाद्यांचा (गी. २-४१, ४५) किंवा निरीश्वर चार्वाकानुयायांचा (गी. १६-८, २०) स्पष्ट शब्दांत धिःक्कार करितात, तसा बौद्धमतांचा धिःक्कार किंवा उल्लेखहि गीतेंत आलेला दिसत नाहीं. तेव्हां बौद्धधर्म गीतोत्तर कालांतील आहे, हें सिद्ध होतें. पण वर निर्दिष्ट केलेला लहान कां होईना एक वर्ग होता यांत संशय नाहीं; कारण गीताकार त्यांना अनुलक्षूनच 'स्त्रियो वैश्यातथा शूद्राः etc.' (९ ३२) हा श्लोकार्ध उच्चारतात असें वाटतें.

(ई) **सांख्य, योग, भक्ति, पिशाचपूजा इ:**—ह्या परिस्थितींतच 'सांख्य' आणि 'योग'[2] हीं दर्शनें प्रतिपादलीं जाऊं लागलीं

---

(१) गी. र. पान. ५६९

(२) या ठिकाणीं 'योग' पातंजलयोग या अर्थी योजला आहे. गीतेंत सहावा अध्याय सोडून इतरत्र योग हा कर्मयोग या अर्थींच वापरला आहे. गीतापूर्वकालांत 'योग' म्हणजे कर्मयोग हें स्वतंत्र दर्शन नव्हतें. पातंजलयोगदर्शन मात्र होतें. गीताकारांना तेंच आपल्या तत्त्वज्ञानाशींहि सुसंगत आहे हें दाखवावयाचें होतें. कर्मयोग–दर्शन हें गीता प्रथमच प्रतिपादन करिते असें म्हणण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं. अर्थात ह्या सर्वच शास्त्रांचें मूळ वेदांमध्यें बीजभूत आहे, हें सांगणें नलगे.

होतीं व त्यांचा प्रचलित विचारप्रणालीशीं पूर्णांशानें विरोध आहे, अशी सार्वत्रिक समजूत होती.

'भक्ति' दर्शनाचा जवळ जवळ लोप झाला होता, त्याला अद्याप दर्शनाचें व्यवस्थित स्वरूपहि कोणी दिलें नव्हतें.

**९. गीतेपुढील कार्यः**—ह्या मतमतांतराच्या गलबल्यांत सामान्य जनता दिङ्मूढ झाली असल्यास त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहींच नाहीं. सामान्य जनतेला आपण कोणता मार्ग स्वीकारावा हें समजेनासें झालें. गीतेला ही सामान्य जनतेची केविलवाणी अवस्था दूर करून, त्यांचा होणारा बुद्धिभेद थांबवावयाचा होता. त्याचप्रमाणें ह्या व्यावहारिक भूमिकेवरून उच्च तत्त्वज्ञानाच्या भूमिकेवर जाऊन विद्वानांना देखील त्यांच्या तत्त्वज्ञानांतील फोलपणा दाखवून, आपल्या गोटांत सामील करून घ्यावयाचें होतें. असें करतांना गीताकारांना मनुष्यस्वभावाकडेहि लक्ष देणें आवश्यक होतें. मनुष्यस्वभाव प्रचलित मतांशीं अगदींच विसंगत असा एकदम झालेला फरक सहन करूं शकत नाहीं. तेव्हां प्रचलित मतांचेंच पण खरें स्वरूप प्रगट करण्याचें बिकट कार्य गीताकारांना करावयाचें होतें. यावरून त्यांच्यापुढें असलेल्या समस्यांची कल्पना येते. पण गीताकारांनीं हें कार्य अत्यंत यशस्वी रीतीनें पार पाडल्यानें गीताग्रंथ '**सर्वसंग्राहक**' ह्या यथार्थ पदवीला प्राप्त झाला आहे.

**१०. गीतेंतील सर्वसंग्राहक तत्त्वज्ञानः**—आतां ह्या पार्श्वभूमिकेवर उठून दिसण्यासारखें—म्हणजे सर्वांना योग्य स्थान दिलें आहे असें—गीतेचें तत्त्वज्ञान काय आहे, हें पहाणें अवश्य आहे.

**( अ ) तात्त्विक शिकवणः**—ईश्वर, नित्य चैतन्ययुक्त व सर्वशक्तिमान आहे.[1] तो नाशिवंत, जगाहून जसा भिन्न, त्याचप्रमाणें अक्षर आत्म्याहूनहि भिन्न आहे; थोडक्यांत तो उत्तम पुरुष आहे.[2] ईश्वराच्या प्रेरणेशिवाय प्रकृति कांहींहि करूं शकत नाहीं; तो ईश्वर

---

(१) यो मामजमनादिं च वेत्ति लोकमहेश्वरम्। ( गी. १०-३ )

(२) क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते ॥ ( गी. १५-१६ ) उत्तमः पुरुषस्त्वन्यः। ( गी. १५. १७ )

प्रकृतिला आपलें खेळणें बनवून तिच्यातर्फे सारे व्यवहार करितो. ईश्वर प्रकृतीरूपी योनींत बीज पेरणारा सर्व जगताचा पिता आहे.[३] तोच जगताच्या उत्पत्ति, स्थिति व लयाचें कारण होतो.[४]

प्राणिमात्राचें सुखदु:ख, मोह इत्यादि सर्व भाव ईश्वरापासूनच उत्पन्न होतात.[५] तोच त्यांना त्यांच्या कर्मानुरूप फळ देतो व अशा रीतीनें संसाराच्या पाशांत अडकावून, यंत्रावर चढविल्याप्रमाणें त्यांना सारखें चाळवीत असतो.[६] सत्व, रज व तम यापैकीं, ज्या गुणाचा प्रभाव आपल्यावर असेल त्यानुरूपच सात्विक, राजस अगर तामस फळ आपणांस मिळत असतें.

अर्थात हें सर्व जगाच्या धारणेकरितां,[७] अज्ञ लोकांचा बुद्धिभेद होऊं नये म्हणून तो करीत असतो.[८] त्याला स्वत:चें असें कांहींच शिल्लक उरलेलें नसतें.[९] जेव्हां जेव्हां खऱ्या धर्माचा ऱ्हास होतो, तेव्हां तेव्हां तो पुन्हां प्रस्थापित करण्याकरितां व सज्जनांचें रक्षण करून, दुष्टांचा संहार करण्याकरितां अवतार धारण करीत असतो.[१०]

इतकें सारें करूनहि ईश्वराला कर्म बंधनकारक होत नाहीं. कारण कर्में करण्यांत त्याला कांहीं स्वार्थ साधावयाचा नसतो.[११] त्याचें खरें स्वरूप जे ओळखतात, आणि त्याचे जे एकनिष्ठ भक्त आहेत ते त्यांस अत्यंत

---

( ३ ) तासां ब्रह्म महद्योनिरहं बीजप्रद: पिता । ( गी. १४-४ )
( ४ ) कल्पक्षये पुनस्तानि कल्पादौ विसृजामि पुन: पुन: । (गी. ९-७)
( ५ ) भवन्ति भावा: भूतानां मत्त: एव प्रथग्विधा: । ( गी. १०-५. )
( ६ ) स्वभावजेन कौंतेय निबद्ध: स्वेन कर्मणा । ( १८-६० )
भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया । ( १८-६१ )
( ७ ) उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहम् । ( ३-२४ )
( ८ ) न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम् । ( ३-२६ )
( ९ ) न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन । ( ३-२२ )
( १० ) यदा यदा हि धर्मस्य...( ४-७ )
( ११ ) न मां कर्माणि लिंपन्ति न मे कर्मफले स्पृहा । ( ४-१३ )

प्रिय आहेत.[1] अर्थात दुसरे अप्रिय आहेत असा अर्थ नव्हे. याकरितां जें कांहीं करावयाचें तें त्याला समर्पणबुद्धीनें करावें.[2] याप्रमाणें अनन्य भावानें त्याला जो शरण जातो, त्याची तो दयाघन परमेश्वर सर्व पापापासून मुक्तता करतो.[3]

ईश्वर जरी सर्व जगाचा नियंता आहे, तरी प्रकृतिच देह व इंद्रियांच्या व्यापाराचें कारण आहे.[4] हे जगत् अव्यक्तापासून म्हणजे प्रकृतिपासूनच होतें व पुन्हां प्रकृतींतच विलीन पावतें.[5] प्रकृति ही नित्य असली तरी, नामरूपात्मक सुखदुःखमोहात्मक नाशिवंत उपाधि तिच्याच आहेत, म्हणून मनुष्यानें त्या उपाधि आपणांस जडूं न देण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

प्रकृतिच्या नामरूपात्मक उपाधि जरी नाशिवंत असल्या तरी आत्मा हा अमरच आहे.[6] उपाधि त्याच्यावर कांहीं परिणाम करूं शकत नाहींत. तो सर्व कर्मांचा मनानें संन्यास करून, नवद्वारांनीं युक्त अशा देहरूपी नगरांत सुखानें राहात असतो.[7] जीर्ण झालेल्या ह्या शरीरांना सोडून आत्मा पुन्हां नव्या शरीरांत प्रवेश करितो.[8] म्हणून

(१) प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रियः। (७-१७)

(२) यत्करोषि...तत्कुरुष्व मदर्पणम्। (९-२७)

(३) सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।
अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः॥ (...६६)

(४) कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते। (१३-२०)

(५) अव्यक्ताद्व्यक्तयः सर्वाः प्रभवन्त्यहरागमे।
रात्र्यागमे प्रलीयन्ते तत्रैवाव्यक्तसंज्ञके। (८-१...

(६) प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादी उभावपि।
विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसंभवान्॥ (१३-...

(७) सर्वकर्माणि मनसा संन्यस्यास्ते सुखं वशी।
नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन्॥ (५-१३)

(८) तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही। (२-२२)

ग्रंथ संग्रह
अनुक्रम ३०
विभाग
क्रमांक २३
नों. दि.
वाचन

मृत देहाकरितां शोक करणें व्यर्थ आहे.[९] व्यक्तिगत आत्मा हा दिव्य–अक्षर आत्म्याचा अंश आहे.[१०] तेव्हां मानवाची जीवित–यात्रा ही कीं, हा दिव्यांश पुन्हां अक्षर आत्म्यांत विलीन होईल असा प्रयत्न करीत राहणें. जन्ममरणरूपी फेऱ्यांतून आपल्या आत्म्याची सुटका करून त्याची मूळची स्थिति प्राप्त करून देणें म्हणजेच मोक्ष.

हा झाला तात्त्विक विवेचनाचा भाग. ह्याप्रमाणें ठरविलेलें जें ध्येय–मोक्ष—तें प्राप्त करून कसें घ्यावें, हा गीतेंतील महत्त्वाचा भाग आहे.

(ब) **व्यावहारिक शिकवण:**—गीतेप्रमाणें कर्मसंन्यासापेक्षां, कर्तव्यबुद्धीनें पण फलाशा न धरितां कर्म करीत राहणें हाच मोक्ष-साधनाचा श्रेयस्कर मार्ग आहे.[१] सर्वसंगपरित्याग करून ज्ञानमार्गानें मोक्ष मिळविणें हा मार्ग गीतेला त्याज्य आहे, असा मात्र याचा अर्थ नव्हे. ज्ञानमार्गापेक्षां कर्म मार्ग सोपा एवढेंच गीतेचें सांगणें आहे. वस्तुतः संन्यास व कर्म दोन्ही इष्टध्येय प्राप्तीच्या दृष्टीनें तुल्यबलच आहेत.[२]

सर्वपरस्परविरोधी गोष्टींत (यश व अपयश, सुख व दुःख) मनाचा समतोलपणा कायम ठेवून विहित कर्म हें केलेंच पाहिजे.[३] ईश्वरार्पण बुद्ध्या केलेलें कोणतेंहि कर्म बंधनकारक होत नाहीं.[४] मीमांसकांचीं काम्य कर्में त्याज्य होत.

आपल्या उच्च ध्येयप्राप्तीच्या मार्गांत दोन मोठे शत्रू आहेत, एक अज्ञान व दुसरा काम. यांचा प्रथम बीमोड केला पाहिजे.[५] पण

---

(९) तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि। (२-२७)

(१०) ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः। (१५-७)

(१) नियतं कुरु कर्म त्वं कर्म जायो ह्यकर्मणः। (३-७)
मा कर्मफलहेतुर्भूः। (२-४७)

(२) संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ। (५-२)

(३) समःसिद्धावसिद्धौ च कृत्वापि न निबध्यते। (४-२२)

(४) यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते। (४-२३)

(५) काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः। (३-३७)
अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः। (५-१५)
जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदं। (३-४३)

मृत देहाकरितां शोक करणें व्यर्थ आहे. [९] व्यक्तिगत आत्मा हा दिव्य-अक्षर आत्म्याचा अंश आहे. [१०] तेव्हां मानवाची जीवित-यात्रा ही कीं, हा दिव्यांश पुन्हां अक्षर आत्म्यांत विलीन होईल असा प्रयत्न करीत राहणें. जन्ममरणरूपी फेऱ्यांतून आपल्या आत्म्याची सुटका करून त्याची मूळची स्थिति प्राप्त करून देणें म्हणजेच मोक्ष.

हा झाला तात्त्विक विवेचनाचा भाग. ह्याप्रमाणें ठरविलेलें जें ध्येय-मोक्ष—तें प्राप्त करून कसें घ्यावें, हा गीतेंतील महत्त्वाचा भाग आहे.

**( ब ) व्यावहारिक शिकवण:**—गीतेप्रमाणें कर्मसंन्यासापेक्षां, कर्तव्यबुद्धीनें पण फलाशा न धरितां कर्म करीत राहणें हाच मोक्ष-साधनाचा श्रेयस्कर मार्ग आहे. [१] सर्वसंगपरित्याग करून ज्ञानमार्गानें मोक्ष मिळविणें हा मार्ग गीतेला त्याज्य आहे, असा मात्र याचा अर्थ नव्हे. ज्ञानमार्गापेक्षां कर्म मार्ग सोपा एवढेंच गीतेचें सांगणें आहे. वस्तुतः संन्यास व कर्म दोन्ही इष्टध्येय प्राप्तीच्या दृष्टीनें तुल्यबलच आहेत. [२]

सर्वपरस्परविरोधी गोष्टींत ( यश व अपयश, सुख व दुःख ) मनाचा समतोलपणा कायम ठेवून विहित कर्म हें केलेंच पाहिजे. [३] ईश्वरार्पण बुद्धया केलेलें कोणतेंहि कर्म बंधनकारक होत नाहीं. [४] मीमांसकांचीं काम्य कर्में त्याज्य होत.

आपल्या उच्च ध्येयप्राप्तीच्या मार्गांत दोन मोठे शत्रू आहेत, एक अज्ञान व दुसरा काम. यांचा प्रथम नीमोड केला पाहिजे. [५] पण

---

( ९ ) तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि । ( २-२७ )

(१०) ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः । ( १५-७ )

( १ ) नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः । ( ३-८ )
मा कर्मफलहेतुर्भूः । ( २-४७ )

( २ ) संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ । ( ५-२ )

( ३ ) समःसिद्धावसिद्धौ च कृत्वापि न निबध्यते । ( ४-२२ )

( ४ ) यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते । ( ४-२३ )

( ५ ) काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः । ( ३-३७ )
अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः । ( ५-१५ )
जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदं । ( ३-४३ )

तत्पूर्वी श्रद्धेची शिदोरी जवळ असली पाहिजे; कारण संशयात्मा हा इष्ट ध्येय केव्हांच गांठू शकत नाहीं.[६] इंद्रियें, मन, बुद्धि, अहंकार यांना कह्यांत ठेवण्याकरितां अभ्यास म्हणून समाधियोग हें उत्तम साधन आहे.[७] आतां हें सर्व जरी एका जन्मांत नाहीं प्राप्त झालें तरी, तें कांहीं वाया जात नाहीं.[८] यायोगें श्रीमंत व सज्जन कुटुंबांत जन्म मिळतो व इच्छित कार्य प्राप्त करून घेण्याचें कार्य सहजगत्या पुढें चालू करतां येतें.[९] पुन्हां पहिल्यापासून प्रयत्न करण्याची मुळींच गरज नाहीं.

ईश्वराविषयींच्या अनन्यभक्तीनें ईश्वराचें ज्ञान होतें[१०] व अशा रीतीनें स्त्रिया, शूद्र आदिकरून देखील मोक्ष मिळवूं शकतात, कारण ज्ञानानेंच मोक्ष मिळतो.[११] अशी परिस्थिति असल्यानें मनुष्याच्या अंत:काळच्या विचारांना महत्त्व येतें. त्यावेळची त्याची जी मन:स्थिति त्यानुसारच त्याला पुढील गति मिळते.[१२] संसारचक्रांतून मुक्त झालेला आत्मा ईश्वराशीं साधर्म्य पावतो, तादात्म्य पावत नाहीं;[१] म्हणजेच त्याचें व्यक्तिविशिष्ट अस्तित्व ईश्वराच्या प्रत्यक्ष कृपाछत्राखालीं सुरू होतें.

---

( ६ ) अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति । ( ४-४० )

( ७ ) असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।
अभ्यासेन तु कौंतेय वैराग्यणच गृह्यते ॥ ( ६-३५ )

( ८ ) पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते । ( ६-४० )

( ९ ) शूचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते । ( ६-४१ )

(१०)भक्त्या मामभिजानाति । (१८-५५) (११) स्त्रियो वैश्या । (९-३२)

(१२) यं यं वापि स्मरन्भावं त्यजत्यंते कलेवरम् ।
तं तमेवैति कौंतेय सदा तद्भावभावितः ॥ ( ८-६ )

( १ ) मम साधर्म्यमागताः । ( १४-२ )

टीप—गीता अध्याय १४ श्लोक २ मधील ‘ साधर्म्य ’ या शब्दावर द्वैतवाद्यांची सारी भिस्त आहे. गीतेंतील ‘ पुरुषोत्तमयोग ’ तसेंच श्रीकृष्णांनीं ठिकठिकाणीं आग्रहानें व निश्चयानें ‘ योगी मलाच येऊन मिळतो, ’ ‘ योगी माझ्यांत विलीन होतो ’ असें सांगितलें आहे, त्यावरून गीतेची शिकवण अद्वैतपरच आहे, असें म्हणणें भाग पडतें. अर्थात तो आपला येथें विषय नाहीं, त्यामुळें या वादांत पडण्याची जरुरी नाहीं.

**११. गीतापूर्वकालीन मतांचा गीतेंत अंतर्भाव:**—गीता-तत्त्वज्ञान थोडक्यांत हें असें आहे. यावरून गीता एकाच धोंड्यानें सर्व पक्षी मारण्याचा कसा यशस्वी प्रयत्न करित्ये हें गीताभ्यासकांना सहज दिसून येईल.

**(अ) गीतेंतील यज्ञयोग:**—भगवद्गीतेंत वैदिक मंत्रयोग व यज्ञयोग आहे, पण तो वेदाप्रमाणें आपणांस कर्मठ याज्ञिक बनविणार नाहीं. वस्तुतः श्रीकृष्ण गीतातत्त्वज्ञान नेहमीं उच्च भूमिकेवरून प्रतिपादन करतात; पण ह्या कर्मठ याज्ञिकांचें नांव निघाल्यावर त्यांचा स्वतःवरील ताबा उडतो व अगदीं स्पष्ट शब्दांत त्यांचा धिःकार[२] करून अर्जुनाला वेदांशीं[3] आपला संबंध तोडण्याला सांगतात. अर्थातच रागाचा हा भर ओसरल्याबरोबर आपली भूमिका ते विशद करतात. कर्में दोन प्रकारचीं:— यज्ञाकरितां केलेलें कर्म व तादितर. आतां मीमांसक म्हणतात कीं, यज्ञार्थ कर्में करावींत, कारण तीं बंधक होत नाहींत. पण तींहि, म्हणजे यज्ञार्थ जीं कर्में करावयाचीं तींहि, फलाशा सोडून करावींत[४]. कारण हीं यज्ञार्थ केलीं असल्यानें इतर कोणत्या प्रकारें जरी बंधक होत नाहींत, तरी त्यांनींच स्वर्गप्राप्तीरूप फल मिळाल्याशिवाय राहात नाहीं; आणि आपलें ध्येय तर मोक्षप्राप्ती ! तेव्हां यज्ञाकरितां जीं कर्में करावयाचीं, तींहि फलाशा सोडून करावींत असें गीतेचें सांगणें आहे. पण एवढ्यानेंच सामान्य लोकांचें समाधान होणें शक्य नव्हतें; कारण अज्ञानें गीतेनें थोडाफार तात्त्विक फरक करून मीमांसकांच्याच यज्ञसंस्थेचा पूर्णपणें स्वीकार केला. ती यज्ञसंस्था तर सामान्य लोकांच्या आंवाक्या-बाहेरची झाली होती. तेव्हां गीतेनें सर्वसंमत असें यज्ञाचें स्वरूप करण्याकारितां यज्ञ शब्दाचीच व्याप्ति वाढविली. यज्ञ पुष्कळ प्रकारचे

---

(२) भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम् ।
व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते ॥ (२-४४)

(३) त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन । (२-४५)

(४) यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोयं कर्मबंधनः ।
तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंगः समाचर ॥ (३-९)

आहेत. द्रव्ययज्ञ, तपोयज्ञ, योगयज्ञ, स्वाध्याययज्ञ, जपयज्ञ वगैरे.[५] थोडक्यांत जी जी गोष्ट ईश्वरार्पणबुद्धया आपण करूं ती ती यज्ञच होय. शेवटीं मात्र मीमांसकांच्या द्रव्यमय यज्ञापेक्षां ज्ञानयज्ञच आपणांस पसंत असल्याचा निकाल देऊन टाकतात.[१] अशा रीतीनें मीमांसकांनाहि आपली यज्ञसंस्था बुडाल्याची तक्रार करण्यास जागा राहिली नाहीं व यज्ञसंस्थेचें स्वर्ग किंवा पाताळांत ढकलण्याचें कार्य करण्याचें हिडीस स्वरूपहि पार बदललें. गीतेंतील यज्ञयोग आपल्या हातून घडणाऱ्या एकूणएक स्वभावसिद्ध कर्मांनाच यज्ञस्वरूपात ढकलून या यज्ञकर्त्या जीवालाच भगवान् श्रीकृष्ण बनविणारा आहे.

**(ब) गीता व उपनिषदें:**—ज्या उपनिषदांनीं अगदीं हीन दर्जाला पोहोंचलेल्या यज्ञसंस्थेच्या विरुद्ध शस्त्र उचललें, त्या उपनिषदांतील तत्त्वज्ञानाचाच गीतेनें आपल्या तत्त्वज्ञानांत समावेश केलेला आहे. उपनिषदांत सर्वत्र विखुरलेल्या कल्पना, गीतेंत एकत्र केल्या आहेत व त्याच ब्रह्मसूत्रांत सूत्ररूपानें मांडल्या आहेत; म्हणूनच या तिन्ही ग्रंथांना मिळून हिंदू तत्त्वज्ञानाचे प्रमाणभूत ग्रंथ किंवा प्रस्थानत्रयी असें नामाभिधान प्राप्त झालें आहे. 'गीतेच्या दुसऱ्या अध्यायांतील आत्म्याचें अशोच्यत्व, आठव्यांतील अक्षर–ब्रह्मस्वरूप आणि तेराव्यांतील क्षेत्रक्षेत्रज्ञविचार व त्यांतहि विशेषेंकरून 'ज्ञेय' परब्रह्माचें स्वरूप, हे सर्व विषय अक्षरशः उपनिषदांच्याच आधारें गीतेंत वर्णिले आहेत.'[२] शब्दसादृश्याचीं ठिकाणें येथें दाखवीत बसण्याचें कांहींच कारण नाहीं, कारण गीतेंतील वेदान्त उपनिषदांच्याच आधारें प्रतिपादन केला आहे, याबद्दल कोणालाच शंका नाहीं. 'सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनन्दनः।' हा सुप्रसिद्ध श्लोकार्ध या विधानाचें उत्कृष्टपणें समर्थन करतो. पण उपनिषदें गोरूप असली

---

(५) द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा योगयज्ञ स्तथापरे ।
स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रताः ॥ (४-२८)
एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे । (४-३२)

(१) श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परंतप । (४-३३)

(२) गी. र. ५२१.

तरी धार काढणारा गवळी श्रीकृष्णच होता. उपनिषदांवर शेवटीं शेवटीं निराशावादाचा पगडा बसला व समाजांतील शहाण्या लोकांची प्रवृत्ति संन्यासाकडे वळली. 'तमेव विदित्वातिमृत्युमेति नान्यः पन्था विद्यतेऽयनाय' (श्वेता. ३-८) 'त्या एका ब्रह्मालाच जाण, कारण ज्ञानयोगाशिवाय मोक्षाला दुसरा उपाय नाहीं;' हा विचार झपाट्यानें प्रसार पावला व ज्यावेळीं जगाच्या मिथ्यत्वाबद्दल खात्री होईल त्याच वेळीं संन्यास घ्यावा,[३] हें मत चोहोंकडे वातावरणांत निनादूं लागलें. अर्जुनावर याच मताचा फार परिणाम झाला होता. तेव्हां आपल्या ह्या गवळ्यानें मानवाला मानव्यांत गोडी लागावी म्हणून इतर कोणत्याही दर्शनाला कमी न लेखतां कर्मयोग प्रतिपादन केला आहे.

तार्किक दृष्ट्या भगवंतांनीं असें दाखवून दिलें कीं, कर्म करणें हा मनुष्य-स्वभाव आहे. कोणताहि मनुष्य क्षणभरसुद्धां कर्म केल्याशिवाय राहूं शकत नाहीं, कारण प्रकृतिपासून उत्पन्न होणारे गुण सर्व मनुष्यांकडून मुसक्या बांधून कर्म करवितात.[१] कर्मेंद्रियांस दाबून टाकलें तरी मनाचें कार्य कोठें थांबतें? बाह्यात्कारी कर्मेंद्रियांचा निग्रह करून मनानें इंद्रियांच्या विषयांचा ध्यास करणारा मनुष्य ढोंगी तर खराच पण मूर्ख होय. तेव्हां प्रत्येकानें प्राप्त कर्में केलींच पाहिजेत. बरें कर्म न करण्यानें मनुष्याचा चरितार्थ क्षणभरदेखील चालायचा नाहीं;[३] कारण एका चलाख मुलानें तत्त्वज्ञाला दिलेल्या उत्तराप्रमाणें 'आपण निदान वाढण्याचें' तरी कार्य करीत असतोंच.

---

(३) यदहरेव विरजेत् तदहरेव प्रव्रजेत्।

(१) न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत्।
कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः। (३-५)

(२) कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन्।
इन्द्रियार्थान् विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते॥ (३-६)

(३) नियतं कुरु कर्म त्वं... शरीरयात्रापि च ते न प्रसिध्येदकर्मणः। (३-८)

(४) संन्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः। (५-६)

आणखी संन्यास खरोखरच चांगला आहे, पण सामान्य जनाला तो कठीण आहे.[४] आतां ज्ञान्यांची गोष्ट घेतली तरी देखील त्यांनीं सर्वसंगपरित्याग करून अरण्यांत जाऊन समाधि लावून बसण्यापेक्षां आपल्या ज्ञानाचा फायदा सर्वांना करून देणें श्रेयस्कर नाहीं काय? जें जें मोठे लोक आचरितात तें तें करण्याचा अज्ञ लोकहि प्रयत्न करितात.[५] तेव्हां लोकांचा अशा रीतीनें बुद्धिभेद[६] करण्यापेक्षां ज्ञानी पुरुषांनींदेखील लोकांची बुद्धि चांगल्या मार्गाकडे लावण्याकरितां विहित कर्मच फलाशा सोडून करीत राहणें योग्य होय.[७] संन्यास झाला तरी त्याला दुसरा काय अर्थ आहे? **कर्मफल**संन्यास हाच खरा संन्यास होय,[८] **सर्वकर्म**संन्यास नव्हे. कारण सर्वकर्मसंन्यास अशक्य आहे.[८] जनकादि आत्मसंतुष्ट महात्मे कर्म करूनच संसिद्धि अर्थात् मोक्ष पावले.[९] फलावर इच्छा न ठेवतां पूर्वी होऊन गेलेल्या मुमुक्षूंनींहि कर्म केलें. यासाठीं पूर्वींच्या लोकांनीं जें पूर्वी केलें तें कर्मच सर्वांनीं करीत राहणें इष्ट आहे.[१०]

याप्रमाणें गीतेंत ज्ञानयोग आहे, पण तो बोलक्या वेदांत्याचा नाहीं, तो सर्व संसार सोडून विरक्त होऊन अरण्यांत जाऊन राहण्यास सांगणारा नाहीं. तर प्रत्येकास प्राप्त प्रसंगाला योग्य कर्तव्य करण्यास सांगणारा ज्ञानयोग आहे. असा हा उपनिषदाच्या निराशावादावर सुचविलेला तोडगा चार्वाकमतानुयायी जडवादी कर्मठांचा नाहीं. तो स्वभावकर्म बदलून कर्म करण्यास सांगत नाहीं. स्वभावसिद्ध कर्माचें कर्मस्वरूपच नाहींसें होऊन ज्ञानरूप करणारा कर्मयोग आहे.

---

(४) पान १६ वर
(५) यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः। (३-२१)
(६) न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम्।
(७) जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समाचरन्॥ (३-२६)
(८) यस्तु कर्मफलत्यागी स त्यागीत्यभिधीयते। (१८-११)
न हि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माण्यशेषतः। (१८-११)
(९) कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः। (३-२०)
(१०) एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः।
कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम्॥ (४-१५)

(क) **चार्वाकदर्शनः**—गीताकार ह्या कर्मठांवर फारच उखडतात. चार्वाक दर्शनाचे लोक, जगत् असत्यानें भरलेलें असून, तें निराधार आहे, अर्थात या जगतापलीकडे कांहीं नाहीं, त्यास कोणी ईश्वर किंवा शास्ता नाहीं, तें स्वतंत्र चार परिमाणूंचें बनलें आहे. तात्पर्य या लोकाचा (जगताचा) ' केवळ उपयोग ' हा हेतु आहे, दुसरें काय ?[१] असें मानितात. आज हा मनोरथ पूर्ण झाला, उद्यां हा पूर्ण करीन;[२] आज तो शत्रू मारला, उद्यां आणखी कांहीं मारीन; मी ईश्वर आहें, श्रीमंत आहें,[३] माझी बरोबरी करणारा दुसरा कोण आहे ?[४] अशा दांभिकपणाच्या फुशारक्या मारीत अज्ञानानें मूढ झालेले हे आसुरी स्वभावाचे लोक शेवटीं दुर्गंधानें भरलेल्या नरकांत पडतात.[५]

कर्मठांचें तत्त्वज्ञान, जगाला कोणी शास्ता नाहीं, असें प्रतिपादन करून सर्वत्र बजबजपुरी माजण्याला उत्तेजन देतें. ह्या तत्त्वज्ञानाचा सध्यांच्या काळांत देखील स्वीकार होऊं शकणार नाहीं. कारण सध्यां झपाट्यानें जग जरी निरीश्वरवादाकडे झुकत चाललें असलें, तरी निसर्ग कां होईना जगनियंता आहे ह्या विचारांशीं अद्याप जगाची फारकत झालेली नाहीं व पुढें होईलसें वाटतहि नाहीं. तेव्हां गीता ह्या तत्त्वज्ञानाचा आपल्या प्रतिपादनांत केवळ तिरस्कार दर्शविण्याकरितांच अंतर्भाव करते हें उघड आहे. अर्थात यावरून गीतातत्त्वज्ञान सर्वसंग्राहक आहे ह्या म्हणण्यास कदापिहि बाध येणें शक्य नाहीं. कारण हें तत्त्वज्ञान, यथार्थ ' तत्त्वज्ञान ' नाहीं.

---

(१) असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम् ।
अपरस्परसंभूतं किमन्यत्कामहैतुकम् ॥ (१६-८)

(२) इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम् । (१६-१३)

(३) ईश्वरोऽहम्...आढ्यः...कोऽन्योऽस्तिसदृशो मया। (१६-१४-१५)

(५) प्रसक्ताः कामभोगेषु पतन्ति नरकेऽशुचौ । (१५-१६)
तानहं द्विषतः क्रूरान्संसारेषु नराधमान् ।
क्षिपाम्यजस्रमशुभानासुरीष्वेव योनिषु ॥ (१६-१९)

(ड) **गीता हें सेश्वर सांख्यदर्शनः**—उपनिषत्-संन्यास-दर्शनापेक्षां सांख्यदर्शन अगदींच भिन्न आहे, अशी त्यावेळीं समजूत होती. गीतोत्तर कालांत सांख्यदर्शन जितकें परिणतीला पोंहोंचलें होतें, तितकें जरी गीताकालांत नसलें, तरी सांख्याचीं मुख्य मुख्य तत्त्वें कोणतीं याबद्दल कोणालाच शंका नव्हती. सांख्यदर्शनाच्या आचार्यांनीं त्याच्यावर ग्रंथ लिहून विशिष्ट स्वरूप दिलें होतें. गीता स्पष्टच गुणसंख्यान व सांख्यकृतान्त या नामाभिधानांनीं सांख्यांच्या प्रमाणभूत ग्रंथाकडे बोट दाखविते. गीतेंत सांख्य शब्द (१) सांख्यदर्शन [1] (२) संन्यास[2] आणि (३) तत्त्वज्ञान[3] या तीन्हीं अर्थांनीं वापरला आहे. संन्यास व तत्त्वज्ञान याविषयींच्या गीतेच्या मतांचा आपण वर विचार केलाच आहे. या ठिकाणीं सांख्यदर्शनाविषयींच्या गीतेच्या मतांचा विचार कर्तव्य आहे.

कर्मयोग गीतापूर्व फार प्राचीन कालांत प्रचलित होता. पण बराच काळ गेल्यावर तो लुप्त झाला होता.[4] वेदवादीमतें उत्पन्न होऊन, आग्रहानें विरोध होऊन तो लोकांतून नाहींसा झाला, तोच पुन्हां गीताकार प्रस्थापित करितात. 'योग'[5] याचा अर्थ 'कौशल,' 'युक्ति' घेऊन, मोक्ष मिळविण्याची उत्तमोत्तम युक्ति कोणती तर कर्मयोग, असें म्हणून गीताकार 'योग' शब्दाचा अर्थ, सहाव्या अध्यायांतील कांहीं स्थळें सोडून, कर्मयोगच घेतात; व कर्मयोगाचा सांख्यदर्शनाशींहि विरोध नाहीं, जे विरोध आहे असें समजतात ते वेडे आहेत,[6] असें स्पष्ट सांगतात.

---

(१) सांख्ये कृतांते प्रोक्तानि सिद्धये सर्वकर्मणाम् । (१८-१३)

(२) यत्सांख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते । (५-५)

(३) एषा तेऽभिहिता सांख्ये बुद्धिर्योगे त्विमां श्रृणु । (२-३९)

(४) एवं परंपराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः ।
स कालेनेह महता योगो नष्टः परंतप ॥ (४-२)

(५) योगः कर्मसु कौशलम् । (२-५०)

(६) सांख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदन्ति न पंडिताः । (५-४)

गीताकार सांख्यांच्या सर्वच्या सर्व तत्त्वज्ञानाचा गीतेंत अंतर्भाव करितात. सांख्यांप्रमाणेंच गीताहि मूलतत्त्वें २५ मानिते. गीतेचें व सांख्याचें वर्गीकरण खालीलप्रमाणें आहेः—

| तत्त्वें | सांख्य[७] | | गीता[८] | |
|---|---|---|---|---|
| १ पुरुष | न-प्रकृति-न-विकृति | | परा प्रकृति | |
| १ प्रकृति | अविकृति : मूलप्रकृति | | अपरा प्रकृति | |
| १ महान् | महान् | प्रकृति विकृति | बुद्धि-महान् | अष्टधा प्रकृति |
| १ अहंकार | अहंकार | | अहंकार | |
| ५ तन्मात्रें | ५ तन्मात्रें | | ५ महाभूतें | |
| १ मन | मन | षोडश विकार प्रकृतीचे | मन (सूक्ष्म) | |
| १५ विकार | ५ बुद्धींद्रियें<br>५ कर्मेंद्रियें १५ विकार<br>५ महाभूतें-( स्थूल ) | | ५ बुद्धींद्रियें<br>५ कर्मेंद्रियें<br>५ महाभूतें ( स्थूल ) | |
| २५ | | | | |

याप्रमाणें गीतेचें वर्गीकरण सांख्यापासून थोडेसें भिन्न असलें तरी त्यांत फारसा फरक नाहीं व एकूण तत्त्वें पंचवीसच होतात.

गीतेवर सांख्यांच्या गुणत्रयविभागाचाहि बराच परिणाम झालेला आहे. अध्याय १४ व १७ हे पूर्णपणें ह्या विभाग प्रतिपादनालाच वाहिले

(७) मूलप्रकृतिरविकृतिः महदाद्याः प्रकृतिविकृतयः सप्त ।
षोडशकस्तु विकारो न प्रकृतिर्नविकृतिः पुरुषः ॥ (सां. कारिका ३)

(८) भूमिरापो—मनो बुद्धिरेवच । अहंकार इतीयं मे भिन्ना
प्रकृतिरष्टधा ॥ (७-४)
अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम् । (७-५)
जीवभूताम् ——
महाभूतान्यहंकारो बुद्धिरव्यक्तमेवच । इन्द्रियाणि दशैकंच पंच-
चेन्द्रियगोचरा (१३-५)

आहेत. सर्वकर्मांच्या सिद्धीस जीं पांच कारणें असतात, तींहि सांख्य-शास्त्रांतून जशींच्या तशीं गीतेंत घेतलीं आहेत.[1]

याप्रमाणें गीतेंत सांख्ययोग आला असला तरी निरीश्वरसंन्यास-वाद्यांचा नाहीं. गीता वर निर्दिष्ट केलेल्या पंचवीस तत्त्वांवर एक नियंता असा उत्तम पुरुष परमेश्वर[2] आहे असें प्रतिपादन करते, व अशा रीतीनें त्या दर्शनाला उपनिषद् दर्शनाच्या व त्यांत कर्मयोगाची भर घालून स्वतःच्या तत्त्वज्ञानाच्या पातळींत आणते.

( इ ) **गीतेंतील समाधियोगः**—भगवद्गीतेंत योगमार्गाचा अभ्यास आहे. पण तो हटयोग मार्गाचा नसून साधा राजयोग मार्गाचा आहे. चित्तस्थिरतेकरितां हा ध्यानयोग सांगितलेला आहे,[3] व जेव्हां मन स्थिर होऊन मनुष्य सर्व भोगवस्तूंविषयीं निरिच्छ होतो, तेव्हां तो पूर्ण योगी होतो. ह्या योगाचें आचरण करीत असतां मनुष्य जर मध्येंच चलचित्त झाला; तर पुन्हां उत्तम कुळांत जन्म घेऊन पूर्वजन्मींचा हा अभ्यास चालू ठेवतो व पुष्कळ जन्मानंतर उत्तम गतीला पोहोंचतो. अशा रीतीनें योगमार्गाकडे ज्यांचें चित्त वेधलें आहे, त्यांनाहि गीता-तत्त्वज्ञानांत जागा आहे. अर्थातच मूळ निरीश्वर योगाला गीतेनें ईश्वराचें अधिष्ठान दिलें आहे.

जातां जातां भगवान् अर्जुनाला आपलें हृद्गत सांगून टाकण्यास विसरत नाहींत. 'मी तुला तपस्वी ( गीतापूर्वकालांतील योग—म्हणजे हटयोग दर्शनाच्या अनुयायांना उद्देशून श्रीकृष्ण हा शब्द योजतात ) ज्ञानी आणि कर्मी वर्णून सांगितले आहेत. तपस्व्यांहूनहि मला कर्मयोगी अधिक आहे, कारण तपांत क्लेश व फलासक्ति आहे; ज्ञान्यांहूनहि तो मला अधिक आहे, कारण ज्ञान्यांत लोकसंग्रह नाहीं; मीमांसकांपेक्षांहि

(१) पंचैतानि—कारणानि—सांख्ये कृतान्ते प्रोक्तानि— (१८-१३)
तीं कारणें— अधिष्ठानं तथा कर्ता कारणं च पृथग्विधम् ।
विविधाश्च पृथक् चेष्टा दैवं चैवात्र पंचमम् ।। (१८-१४)

(२) उत्तमः पुरुषस्त्वन्यः । (१५-१७)

(३) चंचलं हि मनः कृष्ण। (६-३४) असंशयं...अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येण च गृह्यते ।। (६-३५)

तो मला अधिक आहे, कारण त्यांस स्वर्ग, पृथ्वी, जन्ममरण सुटत नाहीं, यासाठीं तूं कर्मयोगी हो. [४] आणखी तुला पुढें सांगतों, या सर्व प्रकारच्या कर्मयोग्यांत जो योगी आपला अन्तरात्मा माझ्या ठिकाणीं लावून श्रद्धेनें माझें भजन करितो, तो माझ्या मतें सर्वश्रेष्ठ कर्मयोगी होय. [५]

**( क ) भक्तियोग**—भक्तिमार्ग अगदीं ऋग्वेदकालापासून आढळतो. वरुण–सूक्तांत याची प्रतीति येते. पुढें मोठमोठ्या ज्ञानी पुरुषांनादेखील विनाशी नामरूपात्मक, मायेनें आच्छादिलेल्या अमृतस्वरूपी परब्रह्माचें वर्णन करितांना ' नेति ' ' नेति ' म्हणून 'मूग गिळून बसण्याची पाळी आली. अशा स्थितींत त्याचें स्वरूप सामान्य जनांना कळणें अशक्यच होतें. तेव्हां जें कांहीं ज्ञानी म्हणतात, त्यावर विश्वास ठेव, ' श्रद्धस्व ' असें त्यांना सांगण्यावांचून गत्यंतरच नव्हतें. आपण कितीहि तर्ककर्कश विचारसरणीचा अवलंब केला तरी, शेवटीं श्रद्धेला स्थान द्यावेंच लागतें. सर्वांनाच कांहीं विलायत पहाणें शक्य होत नाहीं, पण विलायत आहे ह्या भूगोल वचनांवर आपण विश्वास ठेवतोंच कीं नाहीं! असो. याप्रमाणें गीतापूर्वकालांत श्रद्धा–भक्ति–संप्रदाय आपलें अस्तित्व जाणवूं लागला होता यांत शंका नाहीं. पण त्याला निराळ्या दर्शनाचें स्वरूप अद्याप कोणीहि दिलें नव्हतें. हें काम गीताकार अत्यंत यशस्वी रीतीनें करितात. इतकें कीं, गीतेच्या भक्तिप्रतिपादनांत त्यानंतर कोणीहि जास्त भर टाकूं शकलें नाहीं.

गीता पुन्हां पुन्हां बजावून सांगते कीं, श्रद्धायुक्त अंतःकरण होत्साताच तें ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेतो. अज्ञ, श्रद्धारहित आणि संशयात्मा विनाश

---

(४) तपस्विभ्योऽधिकोयोगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः ।
कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन ॥ (६-४६)

(५) योगिनामपि सर्वेषां मद्गतेनांतरात्मना ।
श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमोमतः ॥ (६-४७)

पावतो.[१] गीता भक्तिमार्गावर जोर कां देते, याचें कारण उघड आहे. परमात्म्याचें चिंतन करणें हें ठीक आहे, पण हें किती जणांना साधणारें? अव्यक्ताचें चिंतन करणें हें खरोखरच फार कठीण काम आहे; तेव्हां तें सामान्य जनांच्या आवाक्याबाहेरचें आहे. गीताधर्माचा ओढा सामान्य जनांकडेच फार, कारण त्यांनाच योग्य मार्गदर्शनाची जरूरी. आणखी तत्त्वज्ञानाचीं पुस्तकेंच्या पुस्तकें वाचून जें ज्ञान होणें शक्य नसतें, तें व्यवहारांतील एका उदाहरणानें होतें. म्हणून श्रीकृष्ण सांगतात 'अव्यक्ताचें चिंतन करणारे मला येऊन मिळतात, हें खरें; परंतु अव्यक्ताची उपासना करण्यांत त्यांना अधिक क्लेश होतात. कारण देहधारी मनुष्यांस अव्यक्ताची उपासना मोठ्या कष्टानें साधते.[२] तेव्हां कर्मफलसंन्यास करून, माझें ठिकाणीं चित्त स्थिर करून रहा, म्हणजे तूं शेवटीं इहलोकींची यात्रा संपल्यावर माझ्याच ठिकाणीं येऊन राहशील यांत शंका नाहीं.[३] आणि मला पोहोंचल्यावर पुनर्जन्म नाहीं.'[४]

अशा रीतीनें सगुण परमेश्वराची उपासना गीतेंत प्रतिपादून ब्रह्मज्ञान जी थोड्याच लोकांची वतनदारी झाली होती, ती नष्ट होऊन सर्वांची सामान्य मालमत्ता झाली. परमेश्वराची भक्ति करणें मुळींच कठीण नाहीं. जो भक्तीनें नुसतें पान, फूल, फळ किंबहुना नुसतें पाणी, त्या सगुण परमेश्वराला अर्पण करतो, त्या शुद्ध चित्ताच्या पुरुषानें भक्तीनें

---

(१) श्रद्धावांल्लभते ज्ञानं तत्परः संयतेंद्रियः। (४-३९)
अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति। (४-४०)
आणखी (७-२१, २२; ९-३, १२-२०; १७-३, १७, १८ इ पहा)

(२) ते प्राप्नुवन्ति मामेव...( पण )...
क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम्।
अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥ (१२-४, ५)

(३) मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय।
निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशय ॥ (१२-८)

(४) मामुपेत्य तु कौंतेय पुनर्जन्म न विद्यते। (८-१६)

दिलेलें तें तो स्वतः सेवन करतो.[1] श्रीकृष्ण म्हणतात, हे कुंतीपुत्रा, जें तूं करतोस, खातोस, हवन करतोस, दान देतोस, तप करतोस, तें तूं मला अर्पण कर,[2] म्हणजे ज्या ठिकाणीं पोहोंचलें असतां पुनरावृत्ति होत नाहीं, त्या माझ्या परमधामाला तूं पोहोंचशील.[3] म्हणूनच गीतेच्या शेवटच्या अध्यायांत उपसंहार करतांना प्रतिज्ञापूर्वक, गीताकार अर्जुनाला ( म्हणजे सर्वांना ) सांगतात, ध्यान करावयाचें तर माझें कर, भक्ति करावयाची तर माझी कर, यजन करावयाचें तर माझें कर, कांहीं करणें नसलें तर मला नुसता नमस्कार कर, म्हणजे तूं मलाच येऊन पोहोंचशील हें सत्य आहे, हें मी प्रतिज्ञा करून तुला सांगतों. ह्या मतमतांराच्या गलबल्यांत बुद्धि गांगरून जाऊं न देतां, धर्माधर्मविवेकाच्या भानगडींत न पडतां सर्व प्रकारचे धर्म सोडून तूं मला एकट्यालाच शरण ये. ज्या अनेक पापांची तुला भीति वाटत आहे, त्या सर्व पापांतून मी तुला मुक्त करीन, तूं शोक करूं नकोस. हेंच गीता तत्त्वज्ञानाचें सार आहे, हाच गीतोपदेश आहे.[4]

असा हा गीतेचा भक्तियोग भजनमार्गी सकाम भक्ताचा किंवा रामानुजी संन्याशी भक्ताचाहि नाहीं. तो लो. टिळक म्हणतात त्याप्रमाणें कशाचेंहि साधन म्हणून नाहीं, तर तो कर्माला, योगाला व ज्ञानाला ओढून आणून परमेश्वराच्या साकार स्वरूपासह सर्वांना आपल्या स्वरूपांत लीन करणारा आहे. यावरून गीता हें स्पष्ट करिते कीं, अव्यक्तपूजा–संन्यास–हा तात्त्विक अतैव कठीण व सगुणोपासना–भक्ती हा व्यवहारी मार्ग सोपा व श्रेष्ठ आहे.

---

(१) पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति।
तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः॥ (१२-२६)

(२) यत्करोषि... तत्कुरूष्व मदर्पणम्। (१२-२७)

(३) मामुपैष्यासि। )१२-२८) ( आणि माझें धाम ) यं प्राप्य न निवर्तन्ते तद्धाम परमं मम। (८-२१)

(४) मन्मना भव...मामेवैष्यासि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे॥
सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज।
अहंत्वां... माशुचः॥ (१८-६५, ६६)

**(ज) मोक्षद्वार सर्वांना खुलें:**—गीता मोक्षाचें द्वार कांहीं भेदाभेद न करतां, सर्वांनाच खुलें करते. संन्यास किंवा योग (ध्यान-योग) किंवा यज्ञ हे मार्ग मोकळे नसलेल्या चांडालादि पापयोनींत उत्पन्न झालेले, तसेंच स्त्रिया, वैश्य आणि शूद्र, जर त्या परमात्म्याचा आश्रय भक्तिमार्गानें करतील—कारण हाच सर्वांत सोपा आहे—तर तेहि परमगतीला जातील.[1] फार काय, अत्यंत दुराचारी मनुष्यसुद्धां जर अनन्यभावानें परमेश्वराचें भजन करील, तर तो सुद्धां अविनाशी शांतीला पोहोंचतो, कारण भगवद्भक्त कधींहि नाश पावत नाहीं.[2]

**(त) भूत-पिशाच-पूजकांबद्दल सहानुभूति :**—गीतेच्या व्यापक दृष्टिकोनांतून गीतापूर्वकालीन भूत-पिशाचादिकांची आराधना-देखील सुटलेली नाहीं. गीता त्यांचा बुद्धिभेद करूं इच्छित नाहीं. त्यांनाहि गीता आश्वासन देते कीं, अन्य देवतांची भक्ति करून श्रद्धेनें तुम्ही त्यांचें विधि-सोडून कां होईना-पूजन केलेंत, तरी तें परमेश्वरालाच पोहोंचतें.[3] पण हा आडमार्ग आहे. तुम्ही ब्रह्माला तत्त्वतः जाणीत नाहीं, म्हणूनच तुम्ही पुण्य संपल्यावर खालीं येतां.[4] भूतांची भक्ति करणारे भूतांप्रत जातात, प्रेतांची पूजा करणारे प्रेतांना जाऊन मिळतात आणि परमेश्वराची भक्ति करणारे परमेश्वराला पोहोंचतात. याप्रमाणें सामान्य जनांचा गीता जरी बुद्धिभेद करीत नाहीं, तरी त्यांना त्याच अवस्थेंत फार दिवस ठेवूं इच्छित नाहीं. गीताकार स्पष्टच सांगतात कीं, देवपूजा सात्त्विक, यक्ष व राक्षस-पूजा राजस व प्रेत-भूत-पिशाच-पूजा तामस

---

(१) मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयाः।
स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम्॥ (९-३२)

(२) अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक्। (९-३०)
... शश्वच्छान्तिं निगच्छति। (९-३१)
कौंतेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति। (९-३१)

(३) येऽप्यन्यदेवता भक्ता यजन्ते श्रद्धयान्विताः।
तेऽपि मामेव कौंतेय यजन्त्यविधिपूर्वकम्। (९-२३)

(४) न तु मामभिजानन्ति तत्त्वेनातश्च्यवन्ति ते। (९-२४)

होय. पण या सर्वांचेंच ठिकाणीं श्रद्धा असल्यानें तामसपूजा करणारे लोकहि कामांतून गेलेले नाहींत. त्यांनीं शक्य तो भगवद्भक्तीची कास धरली पाहिजे, म्हणजे शेवटीं ते भगवंतालाच जाऊन मिळतील.

**(न) सूत्ररूपानें तत्त्वज्ञानः**—याप्रमाणें विवेचन केलेलें हें गीतातत्त्वज्ञान सूत्ररूपानें मांडावयाचें झाल्यास असें मांडतां येईल. ईश्वरसेवा म्हणजे समाजसेवा. ( सर्वभूतहितरतत्त्व ) समाजसेवा फलाशारहित कर्मांत व्यक्त होते. फलाशारहित कर्म हीच खरी ज्ञानप्राप्ति आणि हाच खरा मोक्ष. यावरून गीतातत्त्वज्ञान प्रचलित असलेल्या सर्व तत्त्वज्ञानांना एकच एक सुसंबद्ध स्वरूप कसें देतें, हें उघड होतें.

**१२. टीकाकारांचा स्वमतांबद्दलचा दुराग्रहः**—पण भाष्यकारांनीं गीतेचें हें स्वरूप न ओळखतां, आपणाला हवें तेंच गीतेंत मुख्य प्रतिपादन आहे, अशी समजूत करून घेऊन गीतेच्या अर्थाची निव्वळ ओढाताण केलेली आहे. श्रीमदाद्यशंकराचार्य ( ७१०-७४२ इ. स. ) म्हणतात कीं, अद्वैत संन्यास मार्गच गीतेचा प्रतिपाद्य विषय आहे. गीतेंत जो ठिकठिकाणीं अहम्, मम वगैरे परमेश्वर वेगळा व जीवभूत आत्मा वेगळा असा फरक केला आहे, तो शोकमोहानें युक्त असलेल्या शरीरधारी मानवाला समजण्यास सुगम, अतैव व्यवहारी आहे, तत्त्वतः दोन्ही एकच आहेत,[१] असा गीतेचा सिद्धान्त आहे. त्याचप्रमाणें 'ज्ञानाग्निःसर्वकर्माणि भस्मसात् कुरुते।' (४-३७) 'सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।' (४-३३) 'संन्यासयोगयुक्तात्मा विमुक्तो मामुपैष्यसि।' (९-२८) 'नैष्कर्म्यसिद्धिं परमां संन्यासेनाधिगच्छति' (१८-४९) या वाक्यांवरून गीतेंत संन्यासच प्रधान आहे, कर्मयोगपर वाक्यें अर्थवादात्मक आहेत, असें सिद्ध होतें, असें ते म्हणतात.

रामानुजाचार्य (९३८ इ. स.) 'न त्वेवाहं जातु नासं न त्वं नेमे जनाधिपाः।' (२-१२) 'मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते।'(१३-१८) यावरून 'शांकर अद्वैत व मायामिथ्यावाद हीं दोन्हीं खरीं नसून जीव, जगत्, ईश्वर हीं तत्त्वें जरी भिन्न असलीं तरी जीव (चित्-अक्षर) व जगत्

(१) अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः। (१०.२०)

(अचित्-क्षर) हीं दोन्हीं एका ईश्वराचेंच शरीर असल्यामुळें चिदचिद्विशिष्ट ईश्वर एकच होय[1] असें गीतेचें विशिष्टाद्वैती तात्पर्य काढतात. रामानुजांनीं आणखी संन्यासाऐवजीं भक्ति प्रमुख असा फरक केला. पण त्यांनीं सांसारिक स्वधर्मोक्त कर्मांना गौण पक्ष दिला, त्यामुळें गीतेचें रामानुजीय तात्पर्यहि एकप्रकारें कर्मसंन्यासपरच आहे.[1]

त्यानंतर (इ. स. ११२०) मध्वाचार्यांनीं आपला द्वैती संप्रदाय सुरू केला. त्यांना रामानुजांची भक्ति मान्य आहे. पण 'परब्रह्म व जीव कांहीं अंशीं एक व कांहीं अंशीं भिन्नमानणें परस्परविरुद्ध असून असंबद्ध होय; म्हणून दोन्हीहि सदैव भिन्नच मानिले पाहिजेत,[1] असें हे आचार्य प्रतिपादितात.

यानंतर श्रीवल्लभाचार्यांचा (१४०१) 'शुद्धाद्वैती' संप्रदाय निंबार्काचार्यांचा 'द्वैताद्वैती' संप्रदाय, ज्ञानेश्वरांचा भक्तियुक्त निष्कामकर्मयोग, श्रीधरस्वामींचा 'भक्तियोग' हे निरनिराळे संप्रदाय आहेतच. वामनपंडीतांनीं हे भिन्न भिन्न मतांचे भाष्यकार पाहून 'मज नावडे ती थोरांचीहि करणी। काय करूं जी भगवंता।' असें भगवंताजवळ गाऱ्हाणें गाऊन आपला यथार्थ दीपिका हा ग्रंथ लिहिला आहे.

लो. टिळकांनीं तीव्र तक्रार पुढें करून आपला गीतारहस्य हा बहुमोल ग्रंथ लिहिला आहे. त्यांनीं कर्मयोगाला जरी योग्य प्राधान्य दिलें आहे तरी बाकीच्या योगांना निष्कारण कर्मयोगाचे दास केलेलें आहे.

या सर्वांत भर घालून ब्रह्मघोटाळा करण्याकरितांच कीं काय, अगदीं अलिकडील पाश्चात्य टीकाकार तिसरींच मतें गीतेविषयीं देतात.

हॉपकिन्स साहेब म्हणतात, गीता हें मूळ वैष्णव संप्रदायाचें कृष्णसंप्रदायी रूपांतर आहे. ह्यांत निरनिराळ्या मतांची खिचडी आहे. वेबर साहेब 'गीता अगदीं परस्परविरोधी मतांची मिसळ आहे' असें मत देतात. हॉल्ट्झ्मनचें मतें, जगदीश्वरवादी, निर्गुण निराकार ब्रह्म प्रतिपादणाऱ्या गीतेला, सगुण, साकार ईश्वरवादी स्वरूप दिलें आहे. गार्बे साहेबांचें यांच्या अगदीं उलट मत आहे.

(१) गीता–रहस्य पान १६.

अशीं आणखी कितींतरी मतें निरनिराळ्या विद्वानांनीं गीतेविषयीं दिलीं आहेत. पण अगदीं सुरवातीला म्हटल्याप्रमाणें, हे गीतेचा व्यापक दृष्टिकोन जाणूं शकले नाहींत, हेंच आतांपर्यंतच्या विवेचनावरून दृग्गोचर होतें. अर्थात हें तत्त्वज्ञान प्रधान आहे, तें मुख्य आहे, ह्या निरनिराळ्या टीकाकारांच्या मतांवरून गीतेंत निरनिराळीं तत्त्वज्ञानें आहेत, म्हणजेच गीता **सर्वसंग्राहक** ग्रंथ आहे, ही आपली प्रतिज्ञा सिद्धच होते. गीता-तत्त्वज्ञान यावरून 'खिचडी' किंवा 'मिसळ' नाहीं हें आपण वर सिद्ध केलेंच आहे.

**१३. सर्वसंग्राहक ग्रंथाचा धर्मः**—सर्व तत्त्वज्ञानांचा अंतर्भाव व्यवस्थित करण्याच्या अवघड कार्यामुळें गीतेंत तत्त्वज्ञांची तर्ककर्कश सुसंबद्धता न सांपडणें अपरिहार्य आहे. म्हणून याचा टीकाकारांनीं राईचा पर्वत करण्याचें कांहींच कारण नाहीं. वास्तविक गीतेचा व्यापक दृष्टिकोन या महाभागांच्या लक्षांत न आल्यानें त्यांना भासणारी असंबद्धता रज्जुसर्पन्यायानें भासते. तत्त्वतः गीतेंत असंबद्धता नाहींच; यद्यपि त्यांना 'आहे, आहे' म्हणून ओरडायचें असेल तर खुशाल ओरडूं देत! त्यांच्या कोल्हेकुईकडे जास्त लक्ष देण्यांत अर्थ नाहीं. वॉल्ट व्हिटमनची उक्ति गीता ह्या सर्वसंग्राहक तत्त्वज्ञान-ग्रंथास यथार्थतेनें लागूं पडते.

'Do I contradict myself ? Well then,
I contradict myself. I am large, And contain many.'

हा सर्वसंग्राहक ग्रंथाचा धर्मच आहे.

**१४. गीतादर्शः**—हें गीतेंतील सर्वसंग्राहक तत्त्वज्ञान आपल्यापुढें उच्च आदर्श ठेवतें. 'ज्ञानप्रदीपानें विश्व-प्रेम जागृत करा आणि तें जगदुद्धाराच्या आत्यंतिक तळमळींत व्यक्त होऊं द्या.' (The ideal of the divotee of the गीता, is one in whom love is lighted up by knowledge and bursts forth into fierce desire to suffer for mankind.' Pro. Radhakrishnan.) याकरितांच गीता सांगते कीं, तूं कर्मेंच कर. कर्में करीत असतांना तुला कसलीहि काळजी नको, कसलीहि भीति नको, मी तुझ्या पाठीशीं आहें. मी तुझा योगक्षेम वाहीन व सर्व पापांपासून मीच तुला मुक्त करीन, याबद्दल तुला मुळींच शंका नको.

**१५. व्यापक गीताधर्मः**—गीताधर्म म्हणजे, 'काफरास ते मुसलमान होईपर्यंत स्वर्गाचें द्वार खुलें केलें जाणार नाहीं.' असें प्रति-

पादणारा महंमदी धर्म नव्हे; किंवा 'आकाशांतील बापाची प्रार्थना कर, तो तुझ्या सर्व कामना पुऱ्या करील,' असें म्हणून रजोगुणाचा परिपोष करणाऱ्या येशूचाहि तो धर्म नाहीं; तर जें कांहीं करावयाचें तें प्रकृति तुला करण्यास भाग पाडते, असें समजून फलाशारहित सतत उद्योग चालू ठेव,[1] असें म्हणणाऱ्या त्रिगुणातीत निर्भय कर्मयोग्याचा आहे.

१६. **शास्त्रप्रामाण्यः**—'जें कांहीं करावयाचें' याला श्रीकृष्ण शास्त्राचा हवाला देतात,[2] आणि तेंहि गीतेच्या सर्वसंग्राहक दृष्टिकोनास अनुलक्षूनच आहे. अमुक विहित, तमुक अविहित, असा फरक करीत गीता बसली असती, तर ती संकुचित मनोवृत्तीच्या तत्त्वज्ञांस हल्ला चढविण्याचें साधन होऊन बसली असती; कारण-'सूक्ष्मा गतिर्हि धर्मस्य'-आचारधर्माचें स्वरूप सूक्ष्म आहे, त्यामुळें आवळ्याचा भोपळा यशस्वी रीतीनें करणें शक्य होतें. तेव्हां असल्या वादांत न जातां मोघम शास्त्रांवरच गीता हवाला देते आणि तेंहि योग्यच आहे. शास्त्र सर्वकालीं सारखें असणें अशक्य आहे. तेव्हां आपापल्या कुवतिप्रमाणें (गुणकर्मविभागशः) बदलत्या कालानुरूप बदललेलें विहित कर्म केलें पाहिजे, असा गीतेचा आदेश आहे. यावरून गीता चातुर्वर्ण्याकडे देखील किती व्यापक दृष्टीनें पहाते हें उघड होतें.

१७. **बुद्धिप्रामाण्यः**—असें करण्यांत गीता शब्दप्रामाण्याला अवास्तव महत्व न देतां बुद्धिप्रामाण्यालाहि यथायोग्य महत्व देते, हें स्पष्ट होतें. एके ठिकाणीं तर गीता कांहीं आडपडदा न ठेवतां असें स्पष्ट सांगते कीं, भिन्न श्रुतिवाक्यांनीं भांबावलेली तुझी बुद्धि मनाच्या शांत स्थितींत निश्चल होईल, तेव्हांच तुला हा कर्मयोग प्राप्त होईल.[3]

१८. **मनुष्यस्वभाव व गीताः**—निरनिराळ्या तत्त्वज्ञानांवरून व भिन्न भिन्न मतांवरून एवढी गोष्ट सिद्ध होते कीं, मनुष्य हा स्वतंत्र

---

(१) तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर। (३-१९)
(२) तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ (१६-२४)
(३) श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला।
तदायोगमवाप्स्यासि। (२-५३)

बुद्धीचा आहे व त्याच्या बुद्धीला अनेक बाजू आहेत. पण याप्रमाणें मनुष्यस्वभावाला अनेक कप्पे असले, तरी त्या सर्वांना सांधणारा एक दुवा असतोच. गीताकारांना मनुष्य–स्वभावाची ही गुरुकिल्ली कळलेली होती. म्हणूनच प्रत्येकाच्या भिन्नभिन्न स्वभावधर्मांचा परिपोष करण्यास पूर्ण वाव देऊन, त्या सर्वांनाच एका मध्यबिंदूकडे आकर्षून घेण्याची शक्ति एका गीतेंतच आहे.

१९. कार्लाइलनें म्हटल्याप्रमाणें 'Let a man do his work, the fruit of it is in the care of the another than he.' कर्म करण्यापुरताच आपला अधिकार, फल देणें ईश्वराचें काम[1]——हाच तो गीतेचा मध्यबिंदू होय, आणि तो साध्य करण्याचें उत्कृष्ट साधन म्हणजे सर्वधर्म सोडून त्या एकट्या गीतेलाच शरण जाणें होय. तीच आपल्याला उत्कृष्ट मार्गदर्शन करील.

२०. याप्रमाणें भगवद्गीतेंत संसारी मनुष्याला संसारव्यवहाराचा निषेध नाहीं; पुण्यवान् जातीलाच मोक्ष देण्याचा पक्षपात नाहीं; महान् पातक्यालाहि भक्तिचें द्वार खुलें केलें आहे; कोणत्याहि जातिधर्माला प्रतिबंध ठेवलेला नाहीं. अशा ह्या सर्वसंग्राहक तत्त्वज्ञानांत प्रवेश करूं इच्छिणाऱ्या, श्रद्धाभक्तिसंपन्न समस्त स्त्री-पुरुषांना आपल्या जवळ बोलावून त्यांना आपल्या स्वरूपांत पोहोंचविणारी, पतितांना अभयाचें आश्वासन देऊन त्यांना जवळ करणारी धर्ममाता जर कोणती असेल तर ती श्रीमद्-भगवद्गीताच होय, अन्य कोणीहि नाहीं, म्हणून तिलाच आपण सर्व धर्म सोडून शरण जाऊं या.

अशा या व्यापक तत्वज्ञानाचा श्री शंकराचार्यांनंतरच्या काळात आपणांस अगदीं विसर पडलेला दिसतो. भगवान् बुद्धानें सांगितलेला धर्महि हा व्यापक हिंदुधर्माचाच भाग आहे. जैन, लिंगायत हेहि धर्मपंथ ह्या सनातन धर्माचेच भाग आहेत. असें आग्रहानें सांगणाऱ्या सहिष्णू पूर्वजांची गोष्ट कोणीकडे व त्याच धर्माचे अनुयायी म्हणवून घेणाऱ्या, पण हा ब्राह्मण, हा क्षत्रिय, हा शूद्र, हा मुसलमान हा ख्रिस्ती असें

(१) कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन । (२-४७)

म्हणणाऱ्या आम्हां आधुनिकांची गोष्ट कोणीकडे ! केवढें हें महदंतर ! श्री शंकराचार्यांनंतर ह्या व्यापक हिंदुत्वाची कल्पना देणारा पुरुष जन्मला नाहीं. तसा पुरुष अवतरला असता तर त्यानें आपल्या बुद्धिप्रभावानें 'ख्रिश्चन,' 'इस्लाम' हीं धर्मतत्वें ह्या व्यापक हिंदुधर्मतत्वज्ञानाचेच भाग आहेत, असें म्हणून ह्यांच्यांतील वेगळेपणाच्या भावनेस सुरुंग लाविला असता व निदान हिंदुस्थानांत तरी, हे दोन्ही पंथ इतर अनेक पंथांप्रमाणें ह्या व्यापक तत्वज्ञानाचे सन्माननीय भाग म्हणून वावरले असते. परधर्मियांत आपल्या धर्मापासून वेगळेपणाची भावना निर्माण होण्याचें प्रमुख कारण म्हणजे, त्या काळच्या हिंदूंची संकुचित मनोवृत्तीच, असें म्हणणें भाग पडतें. असो. आतां तरी ह्या सर्वव्यापक तत्वज्ञानाची जाणीव आपण करून घेऊं या व गीतेंतील **सर्वसंग्राहक** वृत्ति अंगीं बाणवूं या.

**२१. नव्या व्याख्या** — येथपर्यंत आपण गीतेंतील प्रतिपाद्य विषयांचा 'ईश्वर,' 'पुनर्जन्म' 'मोक्ष' या कल्पनांचा रूढ अर्थ स्वीकारून आढावा घेतला. प्राचीन व अर्वाचीन भारतीय तत्त्ववेत्त्यांची भूमिका या कल्पनांबावत स्पष्ट आहे. पुष्कळ विचार केल्यानंतर या कल्पनेचे जे रूढ अर्थ प्रचलित आहेत, त्याशिवाय दुसरे अर्थ बुद्धिप्रामाण्याच्या निकषावरहि तपासून पाहतां बुद्धीस पटत नाहींत, म्हणूनच हे रूढ अर्थ स्वीकारले आहेत. याबाबत त्यांची दुराग्रही भूमिका नाहीं. ह्या रूढ अर्थापेक्षां दुसरा अर्थ किंवा ह्या चराचर जगताविषयींची दुसरी यथार्थ तात्त्विक कल्पना मांडली तर, ती स्वीकारण्यासही त्यांची तयारी आहे. प्रत्यक्ष ऋग्वेदांतच या भूमिकेविषयींचा पुरावा मिळतो. 'एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति ।' (ऋ. १।१६४।४६) 'एकाच अस्तित्वशक्तीला (ईश्वराला) विद्वान् निरनिराळ्या नांवानें संबोधतात' किंवा 'एकं सन्तं बहुधा कल्पयन्ति' (ऋ. १०।११४।५) 'एकाच ईश्वराला विद्वान् निरनिराळ्या स्वरूपांत पहातात.' आपणाला ह्या चिच्छक्तीला अगदीं वेगळ्या स्वरूपांत पाहतां येणें शक्य आहे का ? ह्याचा विचार करूं.

**२२. ईश्वर**—वेदग्रंथामध्यें, परमेश्वर म्हणजे एक महान् प्रकाशमय पुरुष, असें वर्णन आहे. एक ऋषि स्वतःचा अनुभव म्हणून आपणांस सांगतो—' मी ह्या महापुरुषाला जाणलें आहे. हा सूर्यासारखा प्रकाशमय

असून, अंधःकाराच्या पलीकडील आहे.' [1] भगवद्गीतेंत हींच कल्पना विस्तारानें सांगितलेली आहे. 'ईश्वर हा सर्वज्ञ, अनादि, जगन्नियंता, अणूपेक्षांहि सूक्ष्म, सर्वांचा धारण-पोषण करणारा, अचिन्त्यरूप, सूर्यासारखा प्रकाशमय व अंधःकाराच्या पलीकडील आहे.'[2] नासदीय सूक्तामध्यें जगताच्या आरंभीं परमेश्वर कसा होता, याची काव्यमय कल्पना अत्यंत मनोरम्य आहे. तेव्हां आस्तित्व नव्हतें किंवा अस्तित्वाचा अभावहि नव्हता. तेव्हां मृत्यु नव्हता किंवा अमृतत्वहि नव्हतें. एकटा परमेश्वरच निर्वात स्थितींत आत्ममायेनें श्वासोच्छ्वास करीत आहे. त्याचेशिवाय दुसरी कोणतीहि वस्तु किंवा स्थिति नव्हती.'[3] निर्वात स्थितींत श्वासोच्छ्वास करण्याची कल्पना अत्यंत संवेदनाक्षम व प्रगल्भ कविमनाशिवाय दुसऱ्या कोणास सुचेल काय? ह्या परमेश्वरास नंतर आपण प्रजा निर्माण करावी असें वाटलें. (तत्तेज ऐक्षत बहुस्यां प्रजायेयेति। छां. ६-२-४) म्हणून ही सृष्टी निर्माण झाली, अशीं वर्णनें आहेत.

सारांश परमेश्वर, म्हणजे एक आस्तित्व असलेली अत्यंत सुंदर कल्पनामय चिच्छक्ति (सत्यं शिवं सुदरम्) असें त्याचें काव्यमय वर्णन केलेलें आहे. तो या जड सृष्टीच्या पलीकडे कोणीतरी या जडसृष्टीचा नियन्ता आहे, त्याच्याच प्रेरणेनें हें सर्व जगत् चाललेलें आहे. तोच या जगताचा आधार आहे, इत्यादि इत्यादि. तो प्रत्यक्ष कसा आहे, याचें वर्णन करतांना -'नेति नेति'-असा नाहीं, असा नाहीं, अशी नकारात्मक भाषा उपनिषदांनीं देखील वापरली आहे.

या सर्व काव्यमय कल्पना-तरंगाच्या बुडाशीं एक गृहित वस्तु आहे. यःकश्चित् जीवजंतुदेखील कांहींतरी हेतूनें व हृदयस्थ आत्म्याच्या

(१) वेदाहमेतं पुरुषं महान्तमादित्यवर्णं तमसः परस्तात्।
(यजु.) (वा. ३१-१८)

(२) कविं पुराणमनुशासितारमणोरणीयांसमनुस्मरेद्यः।
सर्वस्य धातारमचिन्त्यरूपमादित्यवर्णं तमसः परस्तात्॥ (गी.८-९)

(३) नासदासीन्नो सदासीत्तदानीं...न मृत्युरासीदमृतं न तर्हि:।
आनीदवातं स्वधया तदेकं तस्माद्धान्यन् नपरः किं चनास॥ (ऋ.१०-१२९)

नियंत्रणाखालीं प्रत्येक हालचाल करतो. मग एवढें मोठें ब्रह्माण्ड हें कोणाच्याच नियमनाशिवाय चालतें, हें मानणें बुद्धिगम्य नाहीं. अशा स्थितींत जगन्नियंता कोणीतरी असला पाहिजे, मग तुम्ही त्यास अग्नि म्हणा, मातरिश्वा म्हणा, यम म्हणा किंवा आणखी कांहीं म्हणा ![1]

जीवजंतूंची हालचाल कांहींतरी हेतूनें होत असते. परमेश्वर कोणत्या हेतूनें ह्या सर्व जगाची हालचाल करतो, असा प्रश्न संभवतो. अनादि अशा परमेश्वरानें जग निर्माण करूनहि कित्येक युगें झालेलीं आहेत. एवढ्या असंख्य वर्षांत जगाचा उत्पत्ति–हेतु कोणाच्याहि लक्षांत आलेला नाहीं. तेव्हां आपल्या प्राचीन तत्त्ववेत्त्यांनीं या प्रश्नाचें उत्तर 'निर्हेतुका उत्पत्ति' असें देऊन आपली सोडवणूक करून घेतली. हें उत्तर बुद्धीलाहि पटण्यासारखें आहे. पण हें जग जेव्हां परमेशाच्या नियंत्रणाखालीं चालतें, असें जेव्हां आपण म्हणतों, तेव्हां खरी गुंतागुंत निर्माण होते.

जगन्नियंता परमेश्वर आहे, अशी कल्पना केल्यावर ह्या जगतांत कांहीं ठिकाणीं डोंगर, कांहीं ठिकाणीं नद्या, कांहीं ठिकाणीं वाळवंटें, कांहीं ठिकाणीं घनदाट अरण्यें, कांहीं ठिकाणीं सुपीक जमिनी, कांहीं ठिकाणीं माळरानें, कांहीं गोरे व देखणे लोक तर कांहीं काळे व कुरूप लोक; असे एक का अनेक भेद त्यानें कां निर्माण केले, असा प्रश्न उद्भवतो.[2] याचेंहि उत्तर परमेश्वरानें सहज गंमत म्हणून ही चित्रविचित्र पृथ्वी निर्माण केली आहे, असें देतां येईल. तसेंच कांहीं ठिकाणीं लोकशाही, कांहीं ठिकाणीं राजेशाही, तर कांहीं ठिकाणीं हुकूमशाही; तसेंच देशपरत्वें सामाजिक चालीरीतींत भेद दिसून येतात, लोकांच्या नीतिच्या कल्पना बदलतात; असें कां ? याहि प्रश्नाचें उत्तर, परमेश्वरानें मानवास बुद्धि दिली आहे, तिचा तो वापर करून आपापल्या कुवतीप्रमाणें निरनिराळ्या देशांतील समाजघटकांनीं आपणांस अनुरूप अशी राज्यपद्धति,

(१) अग्निं यमं मातरिश्वानमाहुः । (ऋ. १-१६४-४६)

(२) यांसच ब्रह्मसूत्रांत 'वैषम्यनैर्घृण्य' दोषारोप असें म्हटलें आहे. ब्र. सू. २-१-१२-३४.

समाजरचना, नीतिकल्पना इत्यादि निमाण केल्या आहेत, असें म्हणून देतां येईल. पण असा विचार करतां करतां शेवटीं जेव्हां आपण एक मनुष्य दुःख भोगतो, दुसरा सुख भोगतो, एकास दुपारची भ्रांत तर दुसरा खुशालचेंडू निरनिराळ्या पक्वान्नावर ताव मारीत असतो, अशी विषमता कां ? या प्रश्नाकडे येतों, तेव्हां याचें उत्तर नीट मिळत नाहीं. म्हणून हें ज्याच्या त्याच्या पूर्वजन्मींच्या कर्माचें फळ आहे, असें म्हणून आपण मोकळे होतों.

**२३ पुनर्जन्म**—प्रत्येकास जी विषमता भोगावी लागते, ती त्याच्या पूर्वजन्मींचें फळ असें म्हटल्यानें त्याच्या पहिल्या जन्मापासून तों आतां-पर्यंतच्या त्यास भोगाव्या लागणाऱ्या सुखदुःखाचा संगतवार क्रम लावतां येतो; व त्याबरोबरच प्रत्येकानें या जन्मांत चांगलें कर्म करावें म्हणजे एकाहून एक चांगले जन्म मिळून शेवटीं त्यास मोक्ष मिळवितां येईल, असाहि पीनलकोडासारखा व्यवहारी युक्तिवाद करतां येतो पण या-बरोबरच आपण दुसऱ्या घोटाळ्यांत पडतों. प्रत्येक मनुष्याचें हें पहिलें कर्म कोणीं निर्माण केलें ? त्या सर्वव्यापी, सर्वसाक्षी दयाघन परमेशानेंच ना ? मग प्रत्येकाच्या कर्मामध्यें प्रथम विषमता निर्माण करून ज्यानें ठेविली, तो परमेश सर्वांच्या दृष्टीनें दयाघन कसा ? बरें, कर्म हें अनादि आहे, तें परमेश्वराबरोबरच निर्माण झालें आहे, असें मानलें तर पर-मेश्वराच्या अद्वितीयत्वास बाध येतो. ह्या कोड्यांतून सुटण्याकरितां ब्रह्म-सूत्रकारांनीं परमेश्वरानें हें सर्व ‘ लीलया ’ ( **लोकवत्तु लीलाकैवल्यम् ।** ब्र. सू. २-१-११-३३ ) निर्माण केलें आहे, असें उत्तर देऊन टाकलें आहे. त्यांच्या मतें ही विषमता जगांत दिसते, हें खरें; पण हा परमे-श्वराचा खेळ आहे. हेंच निराळ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे परमे-श्वरानें गंमत म्हणून ‘ कर्म ’ निर्माण केलें व नंतर त्यानें जी दडी मारली तो त्याचा आजतागायत पत्ता नाहीं. सुखोपभोगांत दंग होऊं शकणाऱ्यांच्या दृष्टीनें हें ठीक आहे. पण ज्यांना ह्या जन्मांत मनस्वी यातना भोगाव्या लागतात, त्यांना ह्या परमेश्वराबद्दल काय वाटेल ! ‘ मुलें आणि बेडूक ’ या गोष्टींतल्या बेडकांप्रमाणें हे अभागी लोक

ओरडत आहेत, वा! परमेश्वरा! तूं निर्माण केलेल्या कर्माचा खेळ होतो, पण आमचा जीव जातो. तुला दया कशी येत नाहीं?

हा कर्मसिद्धांत मानल्यावर आपण दुसऱ्या कित्येक घोंटाळ्यांत पडतों. जर प्रत्येकाच्या पूर्वकर्माप्रमाणें इहलोकींची वाटचाल प्रत्येकजण करतो, असें मानलें तर मनुष्य हा एक 'कर्मा'च्या हातांतील बाहुलें बनतो. मग त्यानें काय करावें, काय न करावें, हें जर ठरूनच गेलेलें आहे, तर त्यानें ही धडपड तरी कशाला करावयाची? ह्या कल्पनेनें एकदां एखाद्या समाजास भारलें कीं, तो दैववादी, निष्प्रभ, कर्तृत्वहीन बनून कुत्र्याच्या मोलानें त्यास जगावें लागतें, असा इतिहासाचा दाखला आहे.

या बरोबरच प्रत्येक जीवजंतूच्या आत्म्यास स्वतंत्र अस्तित्व आहे व तो एका देहांतून दुसऱ्या देहांत मोक्ष मिळेतों चक्कर मारीत असतो, अशी कल्पना करावी लागते. म्हणजे आत्मा पंचतत्त्वांत विलीन न होतां, तो स्वतंत्रच असतो व अशा असंख्य आत्म्यांनीं हें विश्व व्यापलें आहे, असें मानावें लागतें. आतां आरोग्यविषयक ज्ञानांत प्रगति होत असल्यानें, मृत्यूचें प्रमाण कमी होऊन लोकसंख्या वाढते आहे. अविभाज्य भारताची अकबराच्या वेळची लोकसंख्या १५ कोटि होती असें म्हणतात. ती आतां द्विखंड भारताची ३८ कोटि आहे. म्हणजे इतके जीवात्मे परमेश्वरानें जादा निर्माण केले कीं काय? पुनर्जन्माच्या कल्पनेंत ठराविक आत्मे एका स्थितींतून दुसऱ्या स्थितींत आपल्या पूर्व-सुकृतानुसार भ्रमण करीत असतात. मग हे जादा कोठून आले? बरें, बाकीच्या योनींनीं पुण्यकर्म केल्यानें, मनुष्यजन्म वाढले, असें म्हटलें तर 'कलि मातला आहे' म्हणजे पापकर्म वाढलें आहे, या सामान्य समजुतीस धक्का पोहोंचतो. याहि समजुतींत अर्थ नाहीं असें म्हटलें तरी लोकसंख्यावाढीनें एकंदर मनुष्य-जातीचा जीवन-कलह तीव्र होतो. याचा अर्थ पापकर्माची वाढ झाली असा करावा लागतो. मग एकंदर विश्वांत पुण्यकर्माच्या वाढीनें जर मनुष्यजात वाढली असें म्हटलें तर पापकर्म व पुण्यकर्म ह्या दोन्ही परस्परविरोधी गोष्टी एकदमच वाढल्या

असा वदतोव्याघात होतो. हे घोटाळे टाळण्याकरितां ईश्वरविषयक कल्पनें-तच बदल केला पाहिजे.

**२४ ईश्वर म्हणजे काय ?**–'ईश्वर' हा शब्दप्रयोग वापरावयाचाच असें म्हटलें तर, तो ह्या जगतापलीकडील कोणी एक आहे, असें मानण्याची गरज नाहीं. हें जें दृश्य जगत्, 'विश्व,' तोच परमेश्वर होय. अर्थात् ह्या दृश्य जगतांतील जी सुप्त चैतन्यशक्ति, तिचाहि ह्या दृश्य जगतांत समावेश होतोच. ती कांहीं ह्या जगतापलीकडील नाहीं. जसा जिवंत चालता बोलता माणूस आपणांस दिसतो, पण ज्या त्याच्याच ठिकाणीं वास करीत असलेल्या चैतन्यशक्तीचें आपणांस दर्शन होत नाहीं, तसेंच ह्या दृश्य जगताच्या अणूअणूंमध्यें भरून असलेल्या चैतन्यशक्तीचें दर्शन आपणांस होत नाहीं. ह्या शक्तीसच ' परमेश्वर ' ह्या नांवानें आपणांस संबोधावें असें वाटत असेल तर खुशाल तसें करा. त्यास हरकत असण्याचें कारण नाहीं. पण तिचें वर्णन करतांना ती जगाहून कोणी वेगळी आहे, ती निर्गुण आहे, निराकार आहे, असें मानण्याचें कारण नाहीं. ती जगताच्या प्रत्येक अणूअणूंमध्यें सामावलेली आहे. ती अणूअणूंपासून भिन्न नसल्यामुळें तिला निर्गुणत्व व निराकारत्व असण्याचें कारण नाहीं. पाण्यास ज्या भांड्यांत घालावें तो आकार येतो, तसें जी जडवस्तू दिसेल, तो त्या चैतन्यशक्तीचा आकार. आपण मृत शरीराचें उदाहरण घेऊं. शरीर मृत झालें म्हणजे त्यांतील चैतन्यशक्ति निघून गेली असें आपण म्हणतों. परंतु वस्तुस्थिति तशी आहे काय ? शरीर मृत झालें याचा अर्थ त्यांतील प्राणवायु निघून गेला, पण त्यांतील चैतन्यशक्ति निघून गेली असा होत नाहीं. तसा अर्थ घेतला तर शरीरांतील घटकद्रव्यें कुचकामीं झालीं असें म्हणावें लागेल. पण हीं जीं घटकद्रव्यें, म्हणजे त्या शरीरांतील क्षार, जलांश, इत्यादींचा खत म्हणून तर निश्चित् वापर करतां येतो. याचाच अर्थ ह्या निर्जीव शरीरांत पोषक द्रव्यें पूर्वीप्रमाणेंच आहेत, कीं ज्यांचा उपयोग पुन्हां धान्य, फुलें, फळें यांच्या पोषणाकडे होतो. तसा जर त्या निर्जीव शरीराचा उपयोग झाला नाहीं, तरच त्यांतील चैतन्यशक्ति गेली असें म्हणणें योग्य होईल. प्राणवायु हा एक ह्या

चैतन्यशक्तीचा घटक आहे. प्राणवायु म्हणजेच चैतन्यशक्ति नव्हे. सारांश, जी जडवस्तू तो त्या चैतन्यशक्तीचा आकार, ही गोष्ट बुद्धिगम्य वाटते. आतां याच न्यायानें जडवस्तूंचे जे गुणधर्म तेच या चैतन्यशक्तीचे, असें मानण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं. चैतन्यशक्ति व जडवस्तू ह्या दोहोंची फारकतच संभवत नाहीं. चैतन्यशक्ति जडवस्तूचाच गुणधर्म आहे.

ह्या चैतन्यशक्तीस वायूप्रमाणें निश्चित् अस्तित्व आहे. वायूनें सर्व विश्व व्यापलें आहे; ही जाणीव आपणांस क्षणोक्षणीं होते. त्याचप्रमाणें ह्या चैतन्यशक्तीचीहि जाणीव आपणांस होते. वायूप्रमाणें ती अदृष्ट आहे, एवढेंच.

ह्या रीतीनें परमेश्वर ह्या कल्पनेचा अर्थ लावला तर, रूढ कल्पनेंत जे पुनर्जन्म व परमेश्वरास विषमतेचा दोष लागण्याचे घोटाळे आहेत, ते दूर होतात.

**२५ बुद्धिग्राही कल्पना**—ही अनंतरसा पृथ्वी, हीं वायूमंडलें, ग्रह–तारे, इत्यादि मिळून हें सर्व जगत् व जगत् हाच परमेश्वर. अशी बुद्धीस पटणारी कल्पना आपण केली.

हा परमेश्वर आपल्या मायेनें हें जीवजंतूंचें जग निर्माण करतो. ही जीवनसृष्टि ह्या जगताचीच प्रतिकृति असल्यानें, ह्या जगतांत जे निरनिराळे गुणधर्म सामावलेले आहेत, ते सर्व ह्या प्रतिकृतींतहि दिसून येणार, हें ओघानेंच प्राप्त होतें. अणुशक्तीच्या शोधानें ह्या पृथ्वींतील एका अणूंत किती प्रचंड शक्ति सांठलेली आहे, हें आपल्या नजरेस आलें आहे. त्याच पृथ्वीसहित ह्या सर्व जगताचा–म्हणजेच आपण कल्पना केलेल्या परमेश्वराचा–प्रतिनिधिभूत मानव हाही किती सामर्थ्यसंपन्न असला पाहिजे, याची सहज कल्पना येते.

हें जगत् म्हणजेच हा परमेश्वर ह्या जगतावर नेहमीं ‘ नवता ’–‘ ताजेपणा ’, राहावा म्हणून जुन्यास आपल्या ‘ मृत्यू ’ या साधनानें परत आपल्यांत विलीन करून घेतो, सामावून घेतो व तेंच पुन्हां नवतेजानें आपल्या ‘ जन्म ’रूप साधनानें प्रकट करतो. हा त्याचा गुणधर्मच आहे. ह्यांत मानवाच्या पुनर्जन्माच्या कल्पनेस थाराच नाहीं. मानवाचा

आत्मा जणूं एका कुडींतून दुसऱ्या कुडींत आपल्या कर्मफलानुसार प्रवेश करीत असतो, ही कल्पना, वरील सत्यसृष्टीचा जो गुणधर्म म्हणून सांगितला त्याशीं तुलना करतां अति हिणकस वाटते. सत्यसृष्टींत नवतीची दुर्दम्य इच्छा नवीनतेच्या जोमानें फुललेली, फळलेली, बहरलेली दिसते; तर, ही पुनर्जन्माची कल्पना एका खोड्यांत सांपडलेल्या जीवाणूप्रमाणें आपल्याच सांपळ्यांत सारखी उलट्यासुलट्या कोलांट्या मारीत असते. जाळ्यांत सांपडलेला कीटक बाहेर पडण्याकरितां–मोक्ष मिळविण्याकरितां–सारखी धडपड करीत असतो, पण त्यास मोक्ष तर मिळत नाहींच, पण ह्या धडपडीच्या श्रमानें शेवटीं त्यास प्राणत्याग करावा लागतो. तसें हें पुनर्जन्माचें जाळें आहे. ही खोड्यांत पाडून अगतिक बनविणारी कल्पना सोडून द्या, कीं मग एकदम 'क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते।' हा सत्यसृष्टीचा जीवनानंद अखंड आस्वादण्यास मिळतो. ज्या जगतानें–म्हणजे आपण कल्पना केलेल्या परमेश्वरानें–हा देह निर्माण केला, तो जराग्रस्त झाला, क्लेशयुक्त झाला कीं, नवीन फळाच्या रूपानें, नवीन देहाच्या रूपानें, तो पुन्हां नवता धारण करून वावरतो. ही नवनवोन्मेषशालिनी नवता हा या परमेश्वराचा गुणधर्मच आहे. उत्पत्ति, लय पुन्हां उत्पत्ति हा त्याचा स्वभावच आहे. येथें पुनर्जन्म, पूर्वकर्म ह्या कल्पना जराग्रस्त ठरतात.

**२६ विषमतेचा कार्यकारणभाव**—अशी जरी परमेश्वरविषयक कल्पना बदलली तरी, एक मनुष्य सुख कां भोगतो, व दुसरा दुःख कां भोगतो, याचें उत्तर, या कल्पनेनें कसें देणार ? असा प्रश्न येणें संभवनीय आहे. याचें उत्तर या कल्पनेंतच सामावलेलें आहे. कसें, तें पाहा.

ह्या जगतांत अनेक रस आहेत. ह्या पृथ्वींतून आपणांस आंबा, चिंच, ऊंस, काजू अशीं निरनिराळ्या गुणधर्मांचीं फळें मिळतात. तसेंच अति थंडी, अति उष्णता, अति उंच, अति सखल, अति सुरूप, अति कुरूप अशी निरनिराळ्या प्रकारची विषमता, हाही ह्या जगताचा गुणधर्मच आहे. असा विषमतायुक्त परमेश्वर, आपली प्रतिकृति म्हणून जी जीवसृष्टि निर्माण करतो, तीहि विषमतायुक्तच असणार. ह्याच न्यायानें

प्रत्येक मनुष्यामध्यें भेद, प्रत्येकाचे गुणधर्म, आचारविचार थोडेथोडे वेगळे, असे दिसून येतात. जसे गुणधर्म वेगवेगळे तसेच प्रत्येकाचे भोगोपभोगहि निरनिराळे. ह्यांत पूर्वकर्मांचा कांहींच हात नाहीं. भेद असणें हा जगताचाच गुणधर्म आहे. ज्याप्रमाणें जगतामध्यें लोखंड, सोनें, सूर्य, तारे आहेत; तसेच निरनिराळीं उपभोगसाधनें असलेले मनुष्यप्राणी आहेत. हा एकच प्राणी असा आहे कीं, जो ह्या परमेश्वरापासून बुद्धीचे जादा अंश घेऊन जन्मास येतो. ह्या बुद्धीच्या अंशानें मानवी जीवन सर्व दृष्टीनें परिपूर्ण व सुखी व्हावें, असा ह्या परमेश्वराचा उद्देश आहे. ह्या उद्देशपूर्तीकरितांच मानवी धडपड चाललेली असते. ह्या कल्पनेनें मानवी धडपडीस एक विशिष्ट अर्थ प्राप्त होतो. पुनर्जन्माच्या कल्पनेंतील मानवाची अगतिकता यांत नष्ट होते.

ह्या कल्पनेप्रमाणें ‘ कर्मानुसार बुद्धि ’ ही रूढ म्हण बदलून ‘ बुद्धिनुसार कर्म ’ ही यथार्थवादी म्हण रूढ करणें अवश्य आहे. मानवास ह्या जन्मांत जीं सुखदुःखें भोगावीं लागतात, तीं त्याच्याच बुद्धीचीं फळें आहेत, पूर्वकर्मांचीं नव्हेत. थोडेसें व्यापक उदाहरण घेतलें कीं, त्यांत या विधानांतील सत्यता पटेल. आफ्रिकेंतील जंगली प्राणी घ्या व अमेरिकेंतील आधुनिक नागरिक घ्या. आफ्रिकेंतील जंगली प्राणी पशुतुल्य जीवन जगत असतो. याउलट, अमेरिकेंतील एखादा सामान्य नागरिक राजाला देखील लाजवील अशा वैभवांत नांदत असतो. हें एक अतिस्थूल उदाहरण आहे, असें वाटल्यास प्रत्यक्ष श्रीरामचंद्राचें उदाहरण घ्या. ह्या जगतांत ह्या मर्यादा पुरुषोत्तमास सबंध जन्मभर अत्यंत हाल सोसावे लागले आहेत. वास्तविक जो क्षमा, शांति, दातृत्व, वीर्य, शौर्य इत्यादि मानवी गुणांचा प्रकर्षानें अंतर्भाव असलेला प्रत्यक्ष सम्राटच, त्यास इतकें हाल सोसावे लागणें हें त्याच्या पूर्वकर्मांचें फळ असें मानणें शुद्ध वेंधळेपणा आहे. ह्या पूर्वकर्मांच्या सिद्धांतानुसारच हें नररत्न जन्माला आलें असें म्हणणें व त्याबरोबरच त्याच्या पूर्वीच्या जन्मांतील कर्मांचीं फळेंच तो उपभोगीत होता, असें म्हणणें, हा असंबद्ध भाषणाचा उत्कृष्ट नमुनाच आहे. याउलट, आपण मांडलेल्या सिद्धांतानुसार ह्या प्रश्नाचें उत्तर सहज मिळतें. आपली लाडकी पत्नी कैकेयी हिनें आपणांस युद्धांत मदत केली

म्हणून श्रीदशरथानें तिला दोन वर देऊं केले. ही एक साधीसुधी गोष्ट आहे. राजाला बऱ्याच दिवसानें प्रथम पुत्र झाला ही बातमी राजास एका दासीनें सांगावी व तिला राजानें नवरत्नांचा हार देऊं करावा, अशा प्रकारची गोष्ट. कैकेयीनें त्याच वेळीं आपणांस इष्ट त्या गोष्टी न मागतां तिनें त्या राखून ठेवल्या. यांत एक गोष्ट स्पष्टच आहे कीं, श्री दशरथानें कैकेयीला आवडणाऱ्या व स्वतःसहि मरणांतिक दुःख न देणाऱ्या, अशाच गोष्टी देऊं केल्या होत्या. श्रीदशरथ स्वतःस प्राणघातक गोष्टी देऊं करणार नाहीं, हें उघडच आहे. असें असतांना, कैकेयीनें राजाचा विश्वासघात करून, रामास वनवास व भरतास राज्य, अशा प्रकारच्या श्रीदशरथास प्राणघातक गोष्टी मागितल्या. ज्या देऊंच केल्या नव्हत्या, त्या मागण्याचा कैकेयीस अधिकारच नव्हता. मग त्या देण्याचा प्रश्नच उरत नव्हता. असें असतांना श्रीदशरथानें आपल्या बुद्धीनुसार या गोष्टी दिल्या व स्वतःचा प्राण ओढवून घेतला. हें बुद्धिनुसारच कर्म नव्हे तर दुसरें काय ? आतां प्रश्न उरतो कीं, हें सर्व खरें. पण रामास वनवास भोगावा लागला, त्याचें काय ? अहो, रामानें व भरतानें सुविचार करून कैकेयीस धाब्यावर बसवून, योग्य तऱ्हेचे निर्णय घेऊन राज्य केलें असतें तर ह्या सर्व कटकटी निर्माणच झाल्या नसत्या ![1] तात्पर्य, हें जें सर्व ‘ रामायण ’ पुढें निर्माण झालें, तें या बुद्धिनुसार कर्माचेंच दृश्य स्वरूप आहे.

ज्या वेळीं मनुष्य जन्माला येतो, तेव्हां तो या परमेश्वरापासून निरनिराळ्या गुणधर्मांचे कमीजास्ती अंश घेऊन येतो. जो जास्त चांगले अंश घेऊन जन्मास येतो, त्याचें, चांगले अंश कमी घेऊन जन्माला आलेल्या आपल्या बांधवास, आपल्या जादा चांगल्या अंशाचा फायदा

(१) आतां यायोगें ‘ रामायण ’च निर्माण झालें नसतें, व त्यामुळें ह्या महाकाव्यास आपण मुकलों असतों, तसेंच अखिल जगतास ललामभूत झालेल्या श्रीरामचंद्राचें व्यक्तिमत्व आपणांसमोर आलें नसतें, हा भाग वेगळा. ‘ बुद्धीनुसार कर्म ’ ह्या सिद्धांताचें प्रतिपादन करण्याकरितांच हें उदाहरण घेतलें आहे.

देणें हें कर्तव्यच ठरतें. या कल्पनेनें सर्व मानव एकाच सहोदरत्वाच्या नात्यानें जखडला जाऊन, विश्वबंधुत्वास नवीन उजाळा मिळतो. याच दृष्टीनें वेदांमधील 'भेदामध्यें अभेद व अभेदामध्यें भेद' पाहाण्याच्या कल्पनेचेंही यथायोग्य स्पष्टीकरण मिळतें.

**२७ आक्षेप खंडन**—परमेश्वराच्यां कल्पनेस अशी मुरड घातल्यानें, गीतेच्या सोळाव्या अध्यायांत वर्णिलेल्या आसुरी गुणास प्राधान्य मिळून, जगाची धारणा बिघडेल, असाही एक आक्षेप येण्याचा संभव आहे. पण मुळांत आपण जी परमेश्वराची बुद्धिगम्य कल्पना केली, ती ह्या जगताशीं तादात्म्य स्वरूपाची आहे. या जगतांत सत्व, रज, तम हे गुण एका विशिष्ट प्रमाणांत अंतर्भूत आहेत. हें प्रमाण आधुनिक विज्ञानशास्त्राप्रमाणेंहि बदलणें अशक्य आहे, हें सिद्ध झालेलें आहे. तेव्हां आसुरी गुणास या कल्पनेनें जादा वाव मिळेल, ही भीति व्यर्थ आहे. उलट परमेश्वरविषयक रूढ कल्पना बुद्धिप्रामाण्यास अनुसरून नसल्यानें व ही नवीन कल्पना बुद्धिगम्य असल्यानें विश्वबंधुत्वाची कल्पना वाढीस लागून, जोंपर्यंत आपण जिवंत आहोंत, तोंपर्यंत आपण सर्व ह्या जगताचेच अंश, जादा माणुसकीनें वागून सहकार्यानें ह्या पृथ्वीवर 'सहराज्य' (Commonwealth) निर्माण करूं शकूं, अशी इच्छा दुर्दम्य होईल.

ह्या कल्पनेवर वैज्ञानिकांकडून अशी एक शंका उपस्थित होण्याचा संभव आहे कीं, चैतन्ययुक्त जडसृष्टि हाच जर परमेश्वर मानला-म्हणजे दृश्य जडवस्तूंचा चैतन्य हा गुणधर्म मानला तर, ज्याप्रमाणें रसायन-शाळेंत प्रयोग करून निरनिराळ्या पदार्थांच्या मिश्रणानें, रसायन-शास्त्रज्ञ एखादी नवीनच वस्तू निर्माण करूं शकतो, त्याच न्यायानें तो मनुष्य किंवा कोणताही जीवजंतू रसायन–शाळेंत निर्माण करूं शकेल काय ?

अशी शंका उपस्थित करतांना, हे शास्त्रज्ञ एक गोष्ट विसरतात. जड वस्तूंचा चैतन्य हा जो गुणधर्म, तो जीवरूपानें आविर्भाव करण्याची प्रक्रिया हाही जडवस्तूंचाच गुणधर्म आहे. रसायनशाळेंत जडवस्तूंवर कितीही आघात प्रत्याघात केले तरी, अशा तऱ्हेचा आविर्भाव ती करूं शकणार नाहीं. शेणाच्या विशिष्ट स्थितीपासून त्यांत कृमि, कीटक निर्माण

होतात, बीजापासून वनस्पतींची उत्पत्ति होते, पक्षीमात्र अंडज आहेत, तसेंच इतर प्राणी नर, मादी तत्त्वांच्या मीलनापासून निर्माण होतात. कोणत्या प्रकारच्या जीवसृष्टीचा कसा आविर्भाव करावयाचा, हा ह्या आपण कल्पिलेल्या परमेश्वराचा स्वभाव आहे. तो स्वभाव मानवास हस्तांतर्गत करणें अशक्य दिसतें. न जाणों, तसें वैज्ञानिकांस करतां येईलही. तो स्वभाव जर हस्तगत करतां आला तर हें सृष्टीचें कोडें चटकन् सुटेल. पण मग जिज्ञासेचा अंत होईल. जिज्ञासेचा अंत म्हणजेच जीवसृष्टीचा अंत. कांहीं मूलतत्त्वांच्या विशिष्ट प्रमाणांतील संयोगीकरणानें वैज्ञानिक निरनिराळ्या इतर गोष्टी बनवितो पण त्यास मूलतत्त्वें निर्माण करतां येत नाहींत. वायू दिसत नाहीं, तसाच निर्माणहि करतां येत नाहीं. हें एक सत् (अस्तित्वशील) तत्त्व आहे. तद्वतच मनुष्याची किंवा जीवजंतूंची उत्पत्ति हें एक अस्तित्वशील तत्त्व आहे. त्याची प्रयोगशाळेंत निर्मिति होऊं शकत नाहीं.

२८. **मोक्ष**—जीवसृष्टीच्या अंतासारखीच जगतांतील चैतन्यशक्तीनें चालणारी गतिमानता, हालचाल बंद करून चोहोंकडे निःस्तब्धतेची म्हणजेच मृत्यूची शांतता पसरविणारी ही मोक्षाची कल्पना आहे. 'हें मानवी जीवन, हा संसार ही एक बडी भयानक वस्तु आहे. या संसार-चक्रांतून सोडवणूक करून घेणें हीच मानवाची इतिकर्तव्यता आहे.' असा उपदेश आपलीं धर्मशास्त्रें व साधुसंत आर्तस्वानें करीत आहेत. समजा यांच्या उपदेशाप्रमाणें सर्व मानवसमाज वागला तर सर्वांनाच मोक्ष मिळेल. याचा अर्थ सर्वांचेच आत्मे या जीवन–मरणाच्या फेऱ्यांतून मुक्त होतील. हेंच स्पष्ट शब्दांत सांगावयाचें म्हणजे, पृथ्वीवरील सर्व मनुष्यजातच नष्ट होईल. स्वर्ग–नरकाची कल्पना ही देखील जसें पीनल कोडाची भीति दाखवून मनुष्यानें चांगलें वागावें, तशासारखी कमी दर्जाची आहे. प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्ण गीतेंत 'स्वर्गप्राप्ति' हा हेतू असलेलीं कर्में कमी दर्जाचीं होत असें सांगतात.'[1] मनुष्यजात

(१) यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्त्यविपश्चितः ।......
कामात्मानः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम् । (२–४२–४३)

नष्ट झाली याचा अर्थ प्रलयच ओढवला असा होतो. आणि प्रलयकाल पापकर्मांच्या प्रादुर्भावानें होतो, अशीहि कल्पना आहे. म्हणजे पापकर्म व पुण्यकर्म या दोहोंनींहि प्रलयकाल ओढवतो अशा तर्कदुष्ट कल्पनेचा या मोक्षाच्या रूढ कल्पनेनें आपणांस आश्रय घ्यावा लागतो.

या घोटाळ्यांतून परमेश्वरविषयक आपण जी कल्पना केली, त्यायोगें चटकन् सोडवणूक होते. गीतेंत 'सर्वभूतहितरत' निष्काम समाजसेवकास मोक्ष मिळतो, असें सांगितलें आहे.[२] तसेंच ज्यांना चित्तशांति प्राप्ति झाली त्यांना या लोकांतच मोक्ष मिळतो असें म्हटलें आहे.[३] जनकादि राजर्षि जीवन्मुक्तावस्थेंत इहलोकांतील सर्व कार्यें करीत होते, असेंहि म्हटलेलें आहे. या सर्व गोष्टींवरून हेंच सिद्ध होतें कीं, मोक्षावस्था म्हणजे जन्ममृत्युपलीकडील कोणी एक अवस्था आहे, ही एक कविकल्पनाच आहे; व ती पुनर्जन्माच्या कल्पनेमुळें त्या प्रकारें मांडलेली आहे. वास्तविक मोक्षावस्था म्हणजे सर्व प्राणिमात्र आपले बांधव आहेत, ही कल्पना करून कोटल्याहि परिस्थितींत आपली चित्तशांति ढळूं न देतां, निष्काम समाजसेवा करीत राहाणें हीच होय. याच अर्थानें जनकादींनीं जीवन्मुक्तावस्था भोगिली अशीं वर्णनें आहेत. प्रसिद्ध व्याकरणकार भगवान् पाणिनींचेंच उदाहरण घ्या ना. ते व्याकरण शिकवितांना देहभान विसरून जात. एकदां आपल्या शिष्यांना ते व्याकरण शिकवीत असतां कांहीं शिष्यांनीं वाघ (व्याघ्र) येत असतांना पाहिला. ते 'व्याघ्र, व्याघ्र' म्हणून ओरडून इतस्ततः धांवूं लागले. भगवान् पाणिनींनीं 'व्याघ्र' हा शब्द ऐकिल्याबरोबर त्या शब्दाच्या व्युत्पत्तिकडे त्यांचें लक्ष वेधलें गेलें. ते ताबडतोब 'व्याजिघ्रतीति व्याघ्रः' असें म्हणूं लागले. या अवधींत वाघानें येऊन त्या जीवन्मुक्तावर झडप मारून त्यांची जीवनांतून सुटका केली. तात्पर्य ते एका विशिष्ट प्रकारच्या

(२) लभन्ते ब्रह्मनिर्वाणमृषयः क्षीणकल्मषाः ।
छिन्नद्वैधा यतात्मानः सर्वभूतहिते रताः ॥ (५-२५)

(३) इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः । (५-१९)

समाजसेवेंत इतकें तादात्म्य पावले होते कीं, त्या जीवन्मुक्तास व्याघ्राचें भय कोठून ? चित्तशांति म्हणजे तरी काय ? कसल्याहि चांगल्या वाईट परिस्थितीस तोंड देण्याची तयारी ठेवणें. अशा चित्तशांतीनें निष्काम समाजसेवा करणें हाच मोक्ष. मोक्ष म्हणजे जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटका करून घेणें नव्हें.

ही मोक्षाची कल्पना आपल्या नव्या परमेश्वरविषयक कल्पनेशीं यथायोग्य जुळते. जो या परमेश्वरतत्त्वापासून अधिकाधिक चांगले अंश घेऊन आला, त्यानें आपल्या 'सहोदर' बांधवांस आपल्या या चांगल्या अंशाचा लाभ करून देणें हें त्याचें कर्तव्यच ठरतें. पुनर्जन्मापासून मुक्त होण्याकरितां तो ही समाजसेवा करीत नसून, त्याच्यांत जादा असलेल्या सद्गुणांचा तो आपल्या बांधवांस आपल्या स्वभावधर्मानें लाभ करून देत असतो. याच अर्थानें श्रीज्ञानेश्वर, श्रीशंकराचार्य, भगवान् श्रीकृष्ण यांच्या लोकोत्तर अद्वितीय समाजसेवेची संगति लागते. नाहींतर पुनर्जन्माच्या कल्पनेनें श्रीज्ञानेश्वर, श्रीशंकराचार्य यांच्या जन्माच्या अगदीं निकटच्या पूर्वकाळांत यांच्यापेक्षां थोडा कमी दर्जाचा महापुरुष आपणांस दाखवितां आला पाहिजे. गीतेंत म्हटल्याप्रमाणें, '**शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते**', सात्विक व श्रीमंत माणसांच्या घरामध्यें योगभ्रष्टांचा जन्म होतो, अशी घटना इतिहासाच्या दाखल्यानें सिद्ध करतां आली असती. श्रीज्ञानेश्वरांच्या अगदीं नजिकच्या पूर्वकाळांत त्यांच्या तोडीचा इसम होऊन गेलेला दिसत नाहीं. अशीं देदिप्यमान नररत्नें कित्येक शतकांतून केव्हांतरी निर्माण होत असतात. पुनर्जन्माच्या कल्पनेनें त्यांची परंपराच दाखवितां आली पाहिजे. आतां श्रीज्ञानेश्वरांसारखीं भूतभविष्य जाणणारीं माणसेंहि आपल्या पूर्वजन्मांविषयीं कांहीं अनुमानें काढूं शकलेलीं नाहींत. यावरून पुनर्जन्माची कल्पना त्याज्य ठरवून, मोक्ष म्हणजे निष्काम समाजसेवा, ही नव्या ईश्वर कल्पनेशीं सुसंगत व बुद्धिगम्य असणारी कल्पना स्वीकारणें योग्य ठरतें.

**२९ एक कुशंका**—यावर, कोणी अशी कुशंका घेतील कीं, कां हो ! तुम्हांला असा कांहीं साक्षात्कार झाला आहे काय ? तुम्ही

श्री·ज्ञानेश्वर, श्रीशंकराचार्य किंवा प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्ण यापेक्षांहि श्रेष्ठ आहां काय ? तुम्ही ज्याला रूढ अर्थाचा परमेश्वर म्हणतां, तो त्यांनींच तर आम्हांला सांगितला ना ?

या आक्षेपास माझें उत्तर सरळ आहे. या जगांत श्रीज्ञानेश्वर, श्रीशंकराचार्य यांच्यानंतर ज्ञानाची प्रगतीच खुंटली असें मानण्यास मी तयार नाहीं. आमच्यांतील कांहीं सनातनी बांधव वेदानंतर नवीन 'ज्ञान' निर्माणच झालें नाहीं असें मानतात. किंवा आपले मुसलमानी बांधव, कुराणानंतर ज्ञानाची प्रगतीच खुंटली, असें समजतात. असें समजणारा मी नाहीं. मुद्दे संपल्यानंतर मुद्यावर येण्यापैकीं हा प्रकार आहे. अर्थात्, मी येथें अत्यंत नम्रपणें स्पष्ट करूं इच्छितों कीं, मी एक अगदीं यःकश्चित् पामर आहें. जिज्ञासा थोडी जागृत आहे. विचार करतां करतां कल्पना सुचली. ती माझ्या अल्पबुद्धीप्रमाणें योग्य वाटली म्हणून पुढें मांडली आहे. पटली तर विचार करा, न पटली तर सोडून द्यां. मी एवढेंच सुचवूं इच्छितों कीं, मी गीतेंत सांगितलेल्या चार[1] प्रकारच्या भक्तांपैकीं 'जिज्ञासू' गीताभक्त आहें. श्रीज्ञानेश्वर, श्रीशंकराचार्य इत्यादि महान् पूर्वजांचा वारसा घेऊन आलेला 'हा अज्ञ बालक त्यांच्याच खांद्यावर उभा असल्यानें त्यांनीं पाहिलेल्या क्षितिजापेक्षां थोडें विस्तीर्ण क्षितीज पाहूं शकतों, ही निर्विवाद गोष्ट आहे.

**३० कांहीं लोकभ्रमः**—पुनर्जन्म व पूर्वकर्म या कल्पनांचा विलक्षण पगडा हिंदूमनावर आहे. 'बुडत्यास काडीचा आधार' या न्यायानें या मनास काडीच काय पण स्वप्नांत दिसलेल्या क्षीण तंतूचा देखील आधार या कल्पना मानण्यास पुरतो. अलिकडे इंग्लंड–अमेरिका इत्यादि पुढारलेल्या (!) देशांत 'भ्रम–पटल' ( Hypnosis ) च्या साहाय्यानें कोणा ल्युसीला ती पूर्वजन्मांत मर्फी डे होती, अशी जाणीव झाली, अशा तऱ्हेचीं निवेदनें अधूनमधून प्रसिद्ध होत असतात. झालें, लगेच आमच्याकडील पंडीत 'पहा, हा पुनर्जन्माविषयींचा भरभक्कम पुरावा,' म्हणुन ओरडूं लागतात. आमचें म्हणणें असें कीं, पुनर्जन्माच्या कल्पनेस अशा व्यवहारी पुरावा मिळाला तर, या कल्पनेस मूर्त स्वरूपच येईल व मग

(१) आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ । (७–१६)

कोणासहि या भ्रमपटलाच्या साहाय्यानें आपल्या हजारों पूर्वजन्मांची माहिती होईल व असें मागें जात जात या सृष्टीचें कोडें सुटण्यास देखील मदत होईल. या भ्रमपटलाच्या मृगजळापाठीमागें लागण्याचीहि वास्तविक जरूरी नाहीं. आपल्याकडे 'योगशास्त्र' पूर्वींपासूनच अतिप्रगतावस्थेंत आहे. त्या साहाय्यानें कोणाहि योग्यास त्याच्या पूर्वजन्माची तरी माहिती मिळण्यास अडचण पडूं नये. पण अद्याप कोणाहि योग्यानें ही माहिती सांगितल्याचें ऐकिवांत नाहीं. कांहीं भावडे, संत जनाबाईनें ती पूर्वजन्मांत मंथरा होती वगैरे लिहून ठेवलें आहे, त्याकडे बोट दाखवितात. पण हे लोक एक गोष्ट विसरतात कीं, संत जनाबाईचा असें लिहितांना तिच्या पुनर्जन्माची माहिती देण्याचा हेतू नाहीं. पुनर्जन्म ही कल्पना ती गृहीतच धरते व परमेश्वराच्या चरणाची ती दासी, पौराणिक काळांत देवमाणसाजवळच्या दासी कोण होत्या याचा शोध करतां, तिला मंथरेची आठवण होते. ती सहज म्हणते, मी पूर्वीं मंथरा होत्यें.

या ठिकाणीं तिचें म्हणणें परमार्थानें घेण्याची जरुरीच नाहीं. ज्याप्रमाणें एखादें मूल आपल्या आईस भक्तिभावानें म्हणतें, 'मी तुझी आई, व तूं माझें लेकरूं.' यावर आई म्हणते, 'खरंच, मी तुझें लेकरूं, आतां दे माम' वगैरे, तशांतलाच हा प्रकार. श्रीज्ञानेश्वर तर प्रत्यक्ष योग्यांचा राणा. त्यांना कुंडलिनीदेखील जागृत करतां येत असे. पण त्यांनीं आपल्या पूर्वजन्माविषयीं कोठेंहि लिहून ठेवल्याचें कोणाच्या पहाण्यांत नाहीं.

जी कल्पना बुद्धिप्रामाण्याच्या निकषावर तपासून पहातां हिणकस ठरते व जिच्या योगें सबंध मानवजात अगतिकतेच्या खोड्यांत अडकून पडते, अशी कल्पना उराशीं बाळगण्याचा अट्टाहास कां, हेंच समजत नाहीं.

ह्या कल्पनेस विज्ञानशास्त्राचाहि पुरावा मिळतो, अशी एक भ्रामक समजूत आहे. विज्ञानशास्त्रांत सर्वमान्य असा 'शक्तीची सातत्यता' (Conservation of energy) हा सिद्धान्त आहे. ह्या सिद्धांताप्रमाणें सर्व वस्तूंत बदल होत असतो, ती नाश पावत नाहीं, असें सिद्ध होतें.

मडकें फुटलें याचा अर्थ मडक्याचा मडकेपणा गेला, पण त्यांतील वस्तूंचा नाश झाला नाहीं. मडक्याची माती बनली, एवढाच बदल झाला. तद्वतच मनुष्य मेला याचा अर्थ, त्याच्या शरीरांतील निरानिराळे अंश पुन्हां मूल तत्त्वांत बदल पावले. यावरून हे पुनर्जन्मवादी असें म्हणतात कीं, या सिद्धांताप्रमाणेंहि मनुष्य एक देह टाकून दुसरा घेतो, याचा अर्थच तो पुनर्जन्म पावतो. पण येथें एक गफलत होते. मनुष्याच्या शरीरांतील जलांश, मृत्तिकांश वगैरे समस्त जलांश, मृतिकांश यांत विलीन होतात, पण आत्मा मात्र वेगळा राहातो तो समस्त प्राणवायूमध्यें विलीन होत नाहीं, तो वेगळा राहून वेगळीच कुडी धारण करतो; असें गृहीत धरलें जातें. यांत कांहीं भाग विलीन होतात व कांहीं भाग होत नाहींत, असें बिनआधारींच गृहीत धरलें जातें. एकदां माणूस मेला कीं, तो पंचतत्त्वांत विलीन होतो व पंचतत्त्वांपासूनच पुन्हां त्याची उत्पत्ति होते, असा हा सातत्यक्रम आहे. एक आत्मा एक देह सोडून दुसरा धारण करतो, असें नव्हें. मातीच्या ढिगांतून हजारों मडकीं तयार होतात, फुटलीं कीं त्यांची माती होते. ह्या मातींतून दुसरीं अनेक होतात. पण एका फुटलेल्या मडक्याचा कांहीं विशिष्ट अंश बुद्ध्या वेगळा राहून दुसऱ्या नव्या मडक्यांत येत नाहीं. अभावितपणें आला तर, त्यास त्याची विशिष्ट जाणीव असण्याचें खास कारण दिसत नाहीं. तद्वत्च एका विशिष्ट मनुष्याच्या देहांतील प्राणवायु समस्त प्राणवायूच्या पुंजक्यांतच विलीन होतो, त्या पुंजक्यांत त्यास वेगळें अस्तित्व असण्याचें कारण नाहीं. पुन्हां देहधारी मानव जन्मतांना ह्या पुंजक्यांतून जरूर तेवढा प्राणवायु त्यांस मिळत असतो. विशिष्ट प्राणवायु, ह्या गोष्टीस वेगळें अस्तित्व असण्याचें कारण दिसत नाहीं.

पाश्चात्य राष्ट्रांतील 'मोहनिद्रा' (Hypnotism) या साधनाच्या साहाय्यानें 'पुनर्जन्माचा सिद्धांत' सिद्ध होत नाहीं. ह्या मोहनिद्रेस अनुकूल अशा व्यक्ति (Mediums) शोधल्या जातात व त्यांच्या करवीं त्यांच्या पूर्वजन्मांविषयीं वा इतरांच्या पूर्वजन्मांविषयीं माहिती मिळविली जाते. कोणीतरी ल्यूसी पूर्वजन्मांत मर्फी डे होती अशासारखी विश्वासार्ह म्हणून माहितीहि प्रसिद्ध केली जाते, हा उल्लेख वर आलाच आहे. आपल्याकडेहि कोणा एका १० वर्षांच्या मुलीस आपल्या पूर्वजन्मांतील

मुलां-नातवांची आठवण होऊन त्यांच्याविषयीं ओढा लागला व तीं त्यांना भेटूनहि आली, अशासारखें वृत्तहि प्रस्तुत लेखकाच्या वाचनांत १०–१५ वर्षांपूर्वी आलें होतें. पण या सर्व गोष्टी सत्य आहेत असें जरी गृहीत धरलें तरी, यावरून पूर्वजन्म सिद्ध होत नाहीं. मनुष्य जिवंत असतांना त्याच्या मनांत कांहींतरी मनसंवेदना असतातच, कांहीं तीव्र असतात. ह्या सर्व मनसंवेदना त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या शरीरांतील इतर भागांप्रमाणें कांहीं द्रव्यांत विलीन होतात; पूर्णपणें नष्ट होत नाहींत. कोणताहि पदार्थ नष्ट होत नाहीं, तो आपलें स्वरूप तेवढें बदलतो, असें 'विज्ञानशास्त्र' सांगतें. त्याप्रमाणें ह्या मनसंवेदना निराळ्या स्वरूपांत ह्या सृष्टींत अस्तित्वांत असतातच. कांहीं विशिष्ट संयोगानें ह्या संवेदनांचें ज्ञान कांहीं व्यक्तींना होतहि असेल, पण ह्या काकतालीयन्यायासारख्या संबंधावरून पुनर्जन्म-सिद्धांत मान्य करावा लागतो, असें मानणें धाष्टर्याचें आहे. त्याच्याविरुद्ध पुरावा सर्वत्र उपलब्ध असतांना एका क्षीण तंतूच्या आधारावर हिमालय चढण्याचा प्रयत्न करण्यासारखें, हें हास्यास्पद आहे.

मध्यस्थांमार्फत ( Mediums ) जे जीवात्मे आपणांबरोबर येऊन बोलतात, असें म्हटलें जातें, त्यावरूनहि पुनर्जन्माची कल्पना खोटी ठरते. कारण मृत्यूनंतर जर पुन्हां जन्म तर या जीवात्म्यांना या मध्यस्थां-मार्फत कांहीं येऊन सांगण्याची जरूरीच काय? त्यांना त्यांचें स्वतंत्र शरीर असतेंच कीं !

**३१ जाणीवयुक्त परमेश्वर**—ह्या जगतांतील सर्व जीवमात्रांस मनुष्य, इतर प्राणी, वनस्पती इत्यादिकांस कमी अधिक प्रमाणांत बुद्धि आहे. हें प्राणी आपापल्या बुद्धीनुसार आपापली प्रगति किंवा परागति करून घेत असतात. हे सर्व जाणीवयुक्त ( Consciousness ) आहेत. आपण दृश्य जगत् (विश्व) ह्यालाच परमेश्वर म्हटलें तर त्यासहि जाणीव ( Consciousness ) आहे, असें म्हणावें लागेल. पण यास दृश्य पुरावा कांहीं दिसत नाहीं, अशी एक शंका उपस्थित होऊं शकेल. पण याचें उत्तर फार दूर शोधायला नको. ज्याअर्थीं मानव व इतर प्राणिमात्र, या परमेश्वराचींच प्रतिनिधिभूत बालकें आहेत, त्याअर्थीं ह्या सर्व प्राणि-मात्रांमध्यें दिसणारे गुण ह्या परमेश्वरामध्यें आहेतच यांत शंकाच नाहीं.

हा परमेश्वर आपले सर्व चांगले वाईट गुण आपल्या प्रतिनिधिमार्फत प्रगट करीत असतो. ह्या जगतांत जें वातावरण निर्माण केलेलें आहे, तें या प्राणिमात्रांस पूरक असेंच आहे. ह्या विशिष्ठ वातावरणांतच ह्या प्राणिमात्रांची जीवधारणा व पोषण होत असतें, हा या परमेश्वराचा जाणीवयुक्त प्रयत्नच आहे. हा परमेश्वर म्हणजे अशी कोणी व्यक्ति नाहीं कीं, तिनें पुढें पुढें करून आपल्या अस्तित्वाची व इतर गुणांची जाणीव सर्वांना करून द्यावी. ह्या परमेश्वराच्या सर्व गुणांचा आविर्भाव त्याच्या प्रतिनिधिमार्फत होत असतो.

कांहीं कांहीं वेळेस परमेश्वर सुजाणतेनें मनुष्यांकरवीं एकंदर विश्वाची प्रगति घडवून आणतो व हें त्याचें ध्येय आहे, अशी कल्पना केली जाते. परंतु जो कांहीं मानवजातीचा इतिहास उपलब्ध आहे, त्यावरून या कल्पनेस पुष्टि मिळत नाहीं. भौतिक प्रगति निश्चित् झाली आहे, परंतु मनुष्याच्या मानसिक प्रवृत्तींत बिलकूल बदल झालेला नाहीं. ऋग्वेद-कालीन माणूस व आतांचा माणूस यांची तुलना केली असतां, माणसाच्या आशा, आकांक्षा, परस्परांशीं वागण्याची तऱ्हा, त्याच्या ठिकाणची ईर्ष्या, असूया, लोभ, माणुसकी इत्यादि प्रवृत्तींत कांहींच फरक दिसून येत नाहीं. फरक राहण्याच्या घरांत, वेशभूषेंत, वागण्याच्या बाह्य तऱ्हांत दिसून येईल; मूळ मानसिक प्रवृत्तींत कांहींच फरक झालेला दिसत नाहीं. हीहि गोष्ट हें ठराविक प्रवृत्तींचें विश्व, स्वतःच्या मायेनें आपलें रहाटगाडगें प्रथमपासून अनंतकालपर्यंत चालवीत राहील, या आपल्या म्हणण्यास पुराव्यासारखी आहे. ‘ निर्हेतुका उत्पात्ति ’ म्हणण्याचा हाच अर्थ आहे.

**३२ परमेश्वराचा निर्माता**—हें विश्व हाच परमेश्वर ह्या कल्पनेवर आणखी हा एक आक्षेप येण्याचा संभव आहे कीं, हा परमेश्वर कोणीं निर्माण केला ? ह्याला निर्माण करणारा जो कोणी अव्यक्त, अचिंत्य आहे तोच खरा परमेश्वर; यास्तव तुमचा हा परमेश्वर बुद्धिगम्यतेच्या कसोटीस उतरूं शकणार नाहीं. पण थोडा विचार केला असतां या शंकेंत कांहीं

अर्थ नाहीं, हें चटकन् कळून येईल. आम्ही कल्पना करतों त्या परमेश्वरास रूढ कल्पनेंतील परमेश्वराप्रमाणें अनादि अनंत माना म्हणजे झालें. श्रुतिवाक्याप्रमाणें देखील ही गोष्ट सिद्ध होते. नासदीयसूक्तांतील कांहीं ऋचांचा वर उल्लेख आलेलाच आहे. ऋग्वेदांत मूळ सृष्टि-उत्पत्तिसंबंधीं शंकायुक्त कल्पनांचा सुकाळ आहे. हेंच नासदीय-सूक्तांवरून सिद्ध होतें. अशी एक कल्पना आहे कीं, प्रथम एक सुवर्णाचें अंडें होतें;[१] व तेथून सर्व उत्पत्ति परमेश्वरी प्रेरणेनें झाली. किंवा, 'सतः सद्जायत' 'सदेव सौम्य इदमग्रे आसीत् एकमेवाद्वितीयम्' ( छां. ६-२-१ ) ( हे सौम्य, सर्वप्रथम सत् हें एकटेंच होतें ) या श्रुतिवचनावरून अस्तित्वातूनच अस्तित्वशील सृष्टि निर्माण झाली असें दिसतें. कांहीं असो; या वचनांचा व या मागील कल्पनांचा आधार घेऊन आपण असें म्हणूं शकतों कीं, हें विश्व अनादि आहे, तसेंच अनंतहि आहे.

सारांश, परमेश्वरविषयक ह्या नव्या बुद्धिगम्य कल्पनेनें कित्येक बुद्धीस भुरळ पाडणाऱ्या कोड्याचा उलगडा होईल व सामाजिक समता व एकता हा जो वेदांचा संदेश आहे, तो प्रत्यक्षांत उतरवितां येईल, असा भरंवसा वाटतो. वेदांतील कित्येक काव्यमय कल्पनांचें विवरणहि ह्या कल्पनेच्या साहाय्यानें सुसूत्र करतां येईल.

उदाहरणार्थ, छांदोग्य उपनिषदांत 'तज्जलानिति शांत उपासीत' ( ३-१४-२ ) असें ब्रह्मस्वरूपाचें लक्षण म्हणून वर्णन केलेलें आहे. याचा अर्थ 'तस्मात् जायते, तस्मिन् लीयते, तस्मिन् (ब्रह्मणि ) अनिति-प्राणिति-चेष्टते-' ब्रह्मापासून हें सर्व जगत् उत्पन्न होतें, त्यांतच विलीन होतें व त्यामध्येंच श्वासोच्छ्वास-प्राण धारण करते, असा आहे. आपण केलेल्या परमेश्वराच्या-ब्रह्माच्या-व्याख्येशीं या लक्षणाची सुसंगति लागते. ह्या सर्व चैतन्ययुक्त दृश्य जगतापासूनच सर्व नामरूपात्मक ( डोंगर, नद्या, वनस्पति, प्राणि इ. ) जगताची उत्पत्ति होते, ह्या नामरूपात्मक जगताच्या विलीनीकरणाच्या-नाशाच्या-प्रसंगीं ह्या दृश्य जगतांतच तें

( १ ) हिरण्यगर्भः समवर्तताग्रे । (ऋ. १०-१२१-१)

विलीन होतें. ह्या दृश्य जगतांतच ह्या नामरूपात्मक सृष्टीचा चैतन्याचा आविष्कार–प्राणधारणा–होते. येथें, ‘ ब्रह्म ’ म्हणजे कोणीतरी ‘अचिंत्य’–या दृश्य जगतापासून वेगळें सदाख्य ( अस्तित्वशील ) तत्त्व, ह्या कल्पनेचा त्याग केला व चैतन्ययुक्त दृश्य जगत् हाच परमेश्वर, हेंच ब्रह्म, ही बुद्धिगम्य कल्पना स्वीकारली, एवढाच फरक केला. तसेंच श्रीशंकराचार्यांच्या मायावादाचेंहि ह्या कल्पनेशीं सुसंगत व अधिक बुद्धिगम्य असें विश्लेषण करतां येतें. हें दृश्य जगत् हें ब्रह्माचें स्थायी लक्षण व वनस्पति, प्राणी, डोंगर, नद्या इ. हें नामरूपात्मक, अवस्था भेदांमुळें विविध असें हें आपण कल्पना केलेल्या परमेश्वराचें मायावादी स्वरूप, अशी चिकित्सा बुद्धीलाहि पटते. हा सर्व नानाविध विस्तार ह्या परमेश्वराच्याच मायाशक्तीमुळें झालेला आहे. ‘ रूपंरूपं मघवा बोभवीति मायाः कृण्वानस्तन्वं परि स्वाम् । ( ऋ.–३–५३–८ ) हा उदार देव, स्वतःच्या ईश्वरीमायेच्या योगानें अनेक निरनिराळीं रूपें धारण करतो. ’ अशीं जीं वर्णनें वैदिक ग्रंथांत वारंवार आढळतात, तीं आपल्या कल्पनेशीं विसंगत बिलकूल नाहींत, उलट, तीं आपल्या कल्पनेशीं सुसंगतच ठरतात, हें यावरून दिसून येईल.

**२३ सामाजिक संदेश**– ह्या कल्पनेचें स्थूल स्वरूप वर दिग्दर्शित केलें आहे. यथाकाल विस्तार करतां येईल. तूर्त वेदांतील सामाजिक समता व एकतेचा संदेश उध्दृत करून लेखणीस विराम देतों.

> सं गच्छध्वं सं वदध्वं सं वो मनांसि जानताम् ।
> देवा भागं यथा पूर्वे संजानाना उपासते ॥२॥
>
> समानो मंत्रः समितिः समानी समानं मनःसह चित्तमेषाम् ।
> समानं मंत्रमभिमंत्रये वः समानेन वो हविषा जुहोमि ॥३॥
>
> समानी व आकूतिः समाना हृदयानि वः
> समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासति ॥४॥ (ऋ. १०।१९१)

' मित्रांनो, तुम्हीं एकत्र होऊनच कार्य करा आणि परस्पर विचार-विनिमय करण्यासाठीं संवाद करीत जा; आणि पूर्वकाळीं देव ज्याप्रमाणें यज्ञमंदिरांत एकत्र येऊनच हविर्भागाचा स्वीकार करीत असत, त्याप्रमाणें तुम्हींही एकत्र बसून एकमेकांचे विचार समजावून घ्या. २.—हे जे तुम्हीं त्यांचा सर्वांचा मन्त्र म्हणजे मनांतील उद्देश एकसारखाच असूं द्या; तुमची समिति म्हणजे सभा ही सर्वांची एकाच जागीं करीत जा. त्या योगानें तुमचें मन आणि तुमचें चित्त म्हणजे विचारानें ठरविलेली गोष्ट हेही एकसारखेच राहतील; म्हणून तुम्हां सर्वांसाठीं मी आतां एकच मन्त्र सांगतों, आणि सर्वांचा मिळून एकच हविर्भाग अग्नीला अर्पण करितों. ३. ती तत्त्वांची गोष्ट ही कीं, तुमचा विचार आणि योजना एकच असूं द्या; तुमचीं अंतःकरणें एकसारखीं—एकाच भावनेनें परिपूर्ण असूं द्या. तसेंच तुमचें मनहि सारखें—एकाच ध्येयाकडे लागलेलें—असूं द्या, म्हणजे तुम्हांला पाहिजे असेल ती गोष्ट सहज साध्य होईल. ४. '

॥ ॐ तत्सद् ब्रह्मार्पणमस्तु ॥

# अथध्यानम् !

पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेन स्वयं ।
व्यासेन ग्रथितां पुराणमुनिना मध्येमहाभारतम् ।
अद्वैतामृतवर्षिणीं भगवतीमष्टादशाध्यायिनी-
मम्ब त्वामनुसंदधामि भगवद्गीते भवद्वेषिणीम् ॥१॥

नमोऽस्तु ते व्यास विशालबुद्धे फुल्लारविन्दायतपत्रनेत्र ।
येन त्वया भारततैलपूर्णः प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः ॥२॥

प्रपन्नपारिजाताय तोत्रवेत्रैकपाणये ।
ज्ञानमुद्राय कृष्णाय गीतामृतदुहे नमः ॥३॥

सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनन्दनः ।
पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ॥४॥

वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम् ।
देवकीपरमानन्दम् कृष्णं वन्दे जगद्गुरुम् ॥५॥

भीष्मद्रोणतटा जयद्रथजला गान्धारनीलोत्पला ।
शल्यग्राहवती कृपेण वहनी कर्णेन वेलाकुला ।
अश्वत्थामविकर्णघोरमकरा दुर्योधनावर्तिनी ।
सोत्तीर्णा खलु पाण्डवै रणनदी कैवर्तकः केशवः ॥६॥

पाराशर्यवचः सरोजममलं गीतार्थगंधोत्कटं ।
नानाख्यानककेसरं हरिकथासंबोधनाबोधितम् ।
लोके सज्जनषट्पदैरहरहः पेपीयमानं मुदा ।
भूयाद्भारतपंकजं कलिमलप्रध्वंसि नः श्रेयसे ॥७॥

मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम् ।
यत्कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम् ॥८॥

शान्ताकारं भुजगशयनं पद्मनाभं सुरेशं
विश्वाधारं गगनसदृशं मेघवर्णं शुभाङ्गम् ।
लक्ष्मीकान्तं कमलनयनं योगिभिर्ध्यानगम्यं
वन्दे विष्णुं भवभयहरं सर्वलोकैकनाथम् ॥९॥

यं ब्रह्मावरुणेन्द्ररुद्रमरुतः स्तुन्वन्ति दिव्यैः स्तवै-
र्वेदैः सांगपदक्रमोपनिषदैर्गायंति यं सामगाः ।
ध्यानावस्थिततद्गतेन मनसा पश्यंति यं योगिनो ।
यस्यान्तं न विदुः सुरासुरगणा देवाय तस्मै नमः ॥१०॥

॥ इति ध्यानम् ॥

## श्रीमद्भगवद्गीता प्रशस्तिः ।

गीता सुगीता कर्तव्या किमन्यैः शास्त्रसंग्रहैः ।
या स्वयं पद्मनाभस्य मुखपद्माद्विनिःसृता ॥१॥

सर्वशास्त्रमयी गीता सर्वदेवमयो हरिः ।
सर्वतीर्थमयी गङ्गा सर्वधर्ममयी दया ॥२॥

गीता गङ्गा च गायत्री गोविन्दो हृदि संस्थितः ।
चतुर्गकारसंयोगात् पुनर्जन्म न विद्यते ॥३॥

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

॥ श्रीगोपालकृष्णाय नमः ॥

# श्री म द्भ ग व द्गी ता

**संदर्भ**—कौरव व पांडव यांच्यामध्यें राज्याच्या वांटणीबद्दल दीर्घकाल चाललेली बोलणीं व शेवटीं कृष्णशिष्टाई विफल ठरल्यानंतर उभय पक्षांनीं युद्धाचा मार्ग अवलंबण्याचें ठरविलें. युद्धाची तयारी झाल्यानंतर उभय पक्ष आपापल्या रथी–महारथी योध्यांसह कुरुक्षेत्राच्या समरांगणांत दंड थोपटून उभे ठाकले. आतां रीतिप्रमाणें धर्मयुद्धास सुरवात होणार इतक्यांत अर्जुनानें आपणांस कोणाकोणांशीं रणप्रसंग कर्तव्य आहे ह्या दृष्टीनें आपला सारथी श्रीभगवान् कृष्ण यास आपला रथ उभय सैन्याच्या मध्यभागीं नेण्यास आज्ञापले. श्रीकृष्णानें तसें केलें. अर्जुनानें सभोंवार नजर फेंकली. तों त्यांस काय दिसलें ! आपलेच आजे, पणजे, मातुल, मेहुणे, भाऊ, आप्तइष्ट इत्यादि आपल्यासमोर युद्धास ठाकले आहेत.

अर्जुनाच्या मनांत साहजिकच व्यामोह उत्पन्न झाला. माझ्याच आप्तइष्टांना ठार मारून पृथ्वीचें अप्रतिहत राज्य मिळालें तरी, त्याचा काय उपयोग ! ज्यांच्या सुखाकरितां हा खटाटोप करावयाचा त्यांनाच मारल्यानंतर जगावयाचें तरी कोणाकरितां व राज्य तरी कोणाकरितां करावयाचे ? ह्या प्रसंगीं माझें कर्तव्य काय ? माझा धर्म कोणता ? अशा एक कां अनेक प्रश्नांनीं त्याच्या मनांत काहूर निर्माण केलें.

संसारी माणसाच्या जीवनांत असें प्रसंग प्रत्यही घडत असतात. व त्याचेंहि मन 'कोणते माझें कर्तव्य ?' 'हें करूं कीं, तें करूं !' अशा संभ्रमांत गोतें खाते.

अर्जुन या ठिकाणीं निमित्तमात्र आहे. त्याला पुढें करून भगवान् श्रीकृष्णांनीं सर्व व्यवहारी माणसास, अशा पेंचप्रसंगीं आपलें कर्तव्य कोणते, हें विशद करण्याकरितांच, ह्या गीताचें प्रयोजन केलें आहे.

असें हें महत्काव्य महाभारताच्या भीष्मपर्वाच्या २५ ते ४२ अध्यायांत गोंविलेलें आहे.

# अथप्रथमोऽध्यायः।

धृतराष्ट्र उवाच।

**धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः।**
**मामकाः पांडवाश्चैव किमकुर्वत संजय ॥१॥**

**धृतराष्ट्र म्हणाला**—हे संजया लढण्याकरितां एकत्र जमलेल्या माझ्या व पांडूच्या मुलांनीं पावनभूमि कुरुक्षेत्रामध्यें काय केलें? (१)

संजय उवाच।

**दृष्ट्वा तु पांडवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा।**
**आचार्यमुपसंगम्य राजा वचनमब्रवीत् ॥२॥**

**संजय म्हणाला**—त्यावेळीं पांडवाचें व्यूहरचनायुक्त सैन्य पाहून राजा दुर्योधन द्रोणाचार्यांजवळ जाऊन असें म्हणाला. (२)

**पश्यैतां पांडुपुत्राणामाचार्य महतीं चमूम्।**
**व्यूढां द्रुपदपुत्रेण तव शिष्येण धीमता ॥३॥**

हे आचार्य, आपला बुद्धिमान् शिष्य द्रुपदपुत्र धृष्टद्युम्न यानें व्यूहाकार केलेली ही पांडवांची मोठी सेना पहा. (३)

**अत्र शूरा महेष्वासा भीमार्जुनसमा युधि।**
**युयुधानो विराटश्च द्रुपदश्च महारथः ॥४॥**

येथें शूर, महाधनुर्धर व भीमार्जुनाप्रमाणें मोठे पराक्रमी असें पुष्कळ वीर आहेत. जसें सात्यकि, विराट आणि महारथी राजा द्रुपद. (४)

**धृष्टकेतुश्चेकितानः काशिराजश्च वीर्यवान्।**
**पुरुजित्कुंतिभोजश्च शैब्यश्च नरपुंगवः ॥५॥**

त्याचप्रमाणें धृष्टकेतु, चेकितान, वीर्यशाली काशिराज, पुरुजित्, कुंतिभोज आणि मनुष्यश्रेष्ठ शैब्य, (५)

**युधामन्युश्च विक्रांत उत्तमौजाश्च वीर्यवान्।**
**सौभद्रो द्रौपदेयाश्च सर्व एव महारथाः ॥६॥**

पराक्रमी युधामन्यु, बलवान् उत्तमौजा, सुभद्रापुत्र अभिमन्यु आणि द्रौपदीचे पांच पुत्र हे सर्व महारथी आहेत. ( ६ )

**अस्माकं तु विशिष्टा ये तान्निबोध द्विजोत्तम ।**
**नायका मम सैन्यस्य संज्ञार्थं तान्ब्रवीमि ते ॥७॥**

हे द्विजश्रेष्ठ, आतां आमच्या पक्षाचे जे जे प्रमुख आहेत, ते लक्षांत घ्या. आपल्या माहितीकरितां माझ्या सैन्याचे जे सेनानायक आहेत, त्यांपैकीं कांहींचा नामनिर्देश मी येथें करीत आहे. ( ७ )

**भवान्भीष्मश्च कर्णश्च कृपश्च समितिंजयः ।**
**अश्वत्थामा विकर्णश्च सौमदत्तिस्तथैव च ॥८॥**

आपण स्वतां, भीष्म, कर्ण, आणि संग्रामविजयी कृपाचार्य, त्याचप्रमाणें अश्वत्थामा, विकर्ण आणि सोमदत्तपुत्र भूरिश्रवा, ( ८ )

**अन्ये च बहवः शूरा मदर्थे त्यक्तजीविताः ।**
**नानाशस्त्रप्रहरणाः सर्वे युद्धविशारदाः ॥९॥**

तसेंच अनेक प्रकारच्या शस्त्रास्त्रांमध्यें तरबेज, व युद्धप्रवीण, असे आणखी पुष्कळ माझ्याकरितां प्राणार्पण करण्यास तयार असलेले योद्धे आहेत. (९)

**अपर्याप्तं तदस्माकं बलं भीष्माभिरक्षितम् ।**
**पर्याप्तं त्विदमेतेषां बलं भीमाभिरक्षितम् ॥१०॥**

तात्पर्य, भीष्माचार्यांच्या अधिपत्याखालील आपली सेना अफाट आहे; आणि भीमद्वारा रक्षित हें पांडवांचे सैन्य तोकडे आहे. ( १० )

**अयनेषु च सर्वेषु यथाभागमवस्थिताः ।**
**भीष्ममेवाभिरक्षन्तु भवंतः सर्व एव हि ॥११॥**

याकरितां, आपापल्या सैन्य विभागाच्या आघाडीला राहून, आपण सर्वांनीं भीष्मांचेंच चोहोंकडून रक्षण करणें जरूर आहे. ( ११ )

**तस्य संजनयन्हर्षं कुरुवृद्धः पितामहः ।**
**सिंहनादं विनद्योच्चैः शंखं दध्मौ प्रतापवान् ॥१२॥**

याप्रमाणें दुर्योधनाचें द्रोणाचार्यांशीं भाषण चाललें आहे, तोंच त्या कुरुराज दुर्योधनास उत्साह प्राप्त व्हावा, म्हणून प्रतापी कुरुवृद्ध पितामह भीष्माचार्यांनीं सिंहासारखीं मोठी गर्जना करून शंख फुंकला. ( १२ )

ततः शंखाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखः ।
सहसैवाभ्यहन्यन्त स शब्दस्तुमुलोऽभवत् ॥१३॥

त्यानंतर, शंख आणि नौबदी, ढोल आणि मृदंग, गोमुख आदि-रणवाद्यें एकसाथ वाजूं लागलीं. त्यांचा आवाज अति भयंकर झाला. (१३)

ततः श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यंदने स्थितौ ।
माधवः पांडवश्चैव दिव्यौ शंखौ प्रदध्मतुः ॥१४॥

मग पांढरे घोडे जोडलेल्या मोठ्या रथांत विराजमान झालेल्या कृष्णार्जुनांनींहि आपापले अलौकिक शंख फुंकिले. (१४)

पाञ्चजन्यं हृषीकेशो देवदत्तं धनंजयः ।
पौंड्रं दध्मौ महाशंखं भीमकर्मा वृकोदरः ॥१५॥

श्रीकृष्णांनीं पांचजन्य, अर्जुनानें देवदत्त आणि महाभयानक कर्मशाली भीमसेनानें पौंड्र नामक शंख वाजविला. (१५)

अनंतविजयं राजा कुंतीपुत्रो युधिष्ठिरः ।
नकुलः सहदेवश्च सुघोषमणिपुष्पकौ ॥१६॥

कुंतीपुत्र राजा युधिष्ठिर यानें अनंतविजय आणि नकुल सहदेवांनीं अनुक्रमें सुघोष व मणिपुष्पक हे शंख फुंकिले. (१६)

काश्यश्च परमेष्वासः शिखंडी च महारथः ।
धृष्टद्युम्नो विराटश्च सात्यकिश्चापराजितः ॥१७॥
द्रुपदो द्रौपदेयाश्च सर्वशः पृथिवीपते ।
सौभद्रश्च महाबाहुः शंखान्दध्मुः पृथक्पृथक् ॥१८॥

श्रेष्ठ धनुर्धारी काशिराज, महारथी शिखंडी, धृष्टद्युम्न, विराट आणि अजेय सात्यकि, राजा द्रुपद, द्रौपदीचे पांच पुत्र, महाबाहु अभिमन्यु, या सर्वांनीं, हे राजा धृतराष्ट्रा, आपापले वेगवेगळे शंख फुंकले. (१७-१८)

स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत ।
नभश्च पृथिवीं चैव तुमुलो व्यनुनादयन् ॥१९॥

आकाश आणि पृथ्वी यांस थरारून सोडणाऱ्या त्या भयंकर आवाजानें कौरवांचें हृदय विदीर्ण केलें. (१९)

**अथ व्यवस्थितान्दृष्ट्वा धार्तराष्ट्रान्कपिध्वजः ।**
**प्रवृत्ते शस्त्रसंपाते धनुरुद्यम्य पांडवः ॥२०॥**

अर्जुन उवाच ।

**हृषीकेशं तदा वाक्यमिदमाह महीपते ।**
**सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत ॥२१॥**

याप्रमाणें, हे राजा धृतराष्ट्रा, तयारीत असलेल्या कौरवांना पाहून व आतां शस्त्रप्रहारास सुरवात होणार हें जाणून, कपिध्वज अर्जुन, आपलें धनुष्य सज्ज करून, श्रीकृष्णाला म्हणाला, हे अच्युता, माझा रथ दोन्ही सैन्याच्या मध्यभागीं नेऊन उभा कर. ( २०-२१ )

**यावदेतान्निरीक्षेऽहं योद्धुकामानवस्थितान् ।**
**कैर्मया सह योद्धव्यमस्मिन्रणसमुद्यमे ॥२२॥**

म्हणजे याठिकाणीं युद्धोत्सुक कोण आहेत व या रणसंग्रामांत कोणा-बरोबर मला लढावयाचें आहे, यांचे निरीक्षण करीन ( २२ )

**योत्स्यमानानवेक्षेऽहं य एतेऽत्र समागताः ।**
**धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेर्युद्धे प्रियचिकीर्षवः ॥२३॥**

दुर्बुद्धि दुर्योधनाचें कल्याण इच्छिणारे कोण कोण युद्धेच्छु येथें जमा झालेले आहेत, तेंहि पाहीन. ( २३ )

संजय उवाच

**एवमुक्तो हृषीकेशो गुडाकेशेन भारत ।**
**सेनयोरुभयोर्मध्ये स्थापयित्वा रथोत्तमम् ॥२४॥**
**भीष्मद्रोणप्रमुखतः सर्वेषां च महीक्षिताम् ।**
**उवाच पार्थ पश्यैतान्समवेतान्कुरूनिति ॥२५॥**

**संजय म्हणाला**—हे भारता, याप्रमाणें ज्यानें सर्व आळस सोडलेला आहे अशा अर्जुनानें म्हटल्यावर, जितेंद्रिय श्रीकृष्णानें आपला उत्तम रथ दोन्ही सैन्याच्या मध्यभागीं, विशेषतः भीष्म, द्रोण यांच्यासमोर व सर्व

राजेलोकांच्या समोर उभा करून म्हटलें, ' हे पार्था, हे एकत्र झालेले कौरव पाहा. ' ( २४–२५ )

**तत्रापश्यत्स्थितान्पार्थः पितॄनथ पितामहान् ।**
**आचार्यान्मातुलान्भ्रातॄन्पुत्रान्पौत्रान्सखींस्तथा ॥२६॥**

**श्वशुरान्सुहृदश्चैव सेनयोरुभयोरपि ।**
**तान्समीक्ष्य स कौंतेयः सर्वान्बंधूनवस्थितान् ॥२७॥**

त्या ठिकाणीं, दोन्ही पक्षाच्या सैन्यामध्यें आपलेंच वडील, आजे, आचार्य, मातुल, भ्राते, पुत्र, पौत्र, मित्र, श्वशुर, स्नेही इत्यादि उपस्थित आहेत, हें त्यानें पाहिलें. आपल्याच बांधवांशीं लढण्याचा हा प्रसंग आहे, हें पाहून अत्यंत दयन्वित होऊन व शोकयुक्त अंतःकरणानें, अर्जुन श्रीकृष्णास म्हणाला. ( २६, २७, २८ पूर्वार्ध )

अर्जुन उवाच ।

**कृपया परयाविष्टो विषीदन्निदमब्रवीत् ।**
**दृष्ट्वेमं स्वजनं कृष्ण युयुत्सुं समुपस्थितम् ॥२८॥**

**सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति ।**
**वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते ॥२९॥**

**अर्जुन म्हणाला**—हे कृष्णा, लढण्याकरितां उत्सुक झालेल्या या स्वबांधवांस पाहून, माझीं गात्रें विगलीत होत आहेत, तोंडाला कोरड पडली आहे, आणि साऱ्या शरीराला कंप सुटला आहे व अंगावर कांटा उभा राहिला आहे. ( २८ दुसरी ओळ, २९ )

**गांडीवं स्रंसते हस्तात्त्वक्चैव परिदह्यते ।**
**न च शक्नोम्यवस्थातुं भ्रमतीव च मे मनः ॥३०॥**

गांडीव धनुष्य हातून गळून पडूं लागलें आहे, सर्व शरीराचा दाह होऊं लागला आहे. मला उभें देखील राहवत नाहीं. माझें मन भ्रमिष्टासारखें झाले आहे. (३०)

निमित्तानि च पश्यामि विपरीतानि केशव ।
न च श्रेयोऽनुपश्यामि हत्वा स्वजनमाहवे ॥३१॥

हे केशवा, बांधवांशींच लढणें, हें कांहीं चांगले लक्षण नाहीं; हे स्पष्ट दिसत आहे. रणसंग्रामांत स्वबांधवांसच मारणें, हें हितकारक आहे, असें वाटत नाहीं. ( ३१ )

न कांक्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च ।
किं नो राज्येन गोविंद किं भोगैर्जीवितेन वा ॥३२॥

हे कृष्णा, मला विजयाची इच्छा नाहीं, तें राज्य नको, व सुखा-चीहि इच्छा नाहीं. हे गोविंदा, राज्य अथवा उपभोग किंबहुना जीवित यांचाहि आम्हांला काय उपयोग आहे; ( ३२ )

येषामर्थे कांक्षितं नो राज्यं भोगाः सुखानिच ।
त इमेऽवस्थिता युद्धे प्राणांस्त्यक्त्वा धनानि च ॥३३॥

ज्यांच्या हिताकरितां हे राज्य, उपभोग आणि सुखें यांची आम्ही अपेक्षा करितों, तेंच बांधव सर्व धन व जीविताशा सोडून या ठिकाणीं युद्धास ठाकले आहेत. ( ३३ )

आचार्याः पितरः पुत्रास्तथैव च पितामहाः ।
मातुलाः श्वशुराः पौत्राः श्यालाः संबंधिनस्तथा ॥३४॥

एतान्न हंतुमिच्छामि घ्नतोऽपि मधुसूदन ।
अपि त्रैलोक्यराज्यस्य हेतोः किं नु महीकृते ॥३५॥

आचार्य, वडील, पुत्र, तसेंच आजे, मामे, श्वशुर, नातू, मेहुणे व इतर आप्तजन यांना हे मधुसूदना, मी मारणार नाहीं, मग यांनीं माझ्या-वर हत्यार चालविलें तरी बेहत्तर ! यांना मारून त्रैलोक्यराज्याची प्राप्ति होत असली तरी हें कृत्य मीं करणार नाहीं. मग पृथ्वीवरील राजपदाची काय कथा ! ( ३४, ३५ )

निहत्य धार्तराष्ट्रान्नः का प्रीतिः स्याज्जनार्दन ।
पापमेवाश्रयेदस्मान्हत्वैतानाततायिनः ॥३६॥

हे जनार्दना! या कौरवांना मारून आम्हांला काय सुख होणार आहे? या आततायी लोकांस मारून (हे आमचे बांधव असल्यानें) आम्हांला पापच लागेल. (३६)

**तस्मान्नार्हा वयं हंतुं धार्तराष्ट्रान्स्वबांधवान् ।**
**स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम माधव ॥३७॥**

याकारितां हे माधवा, स्वबांधव अशा या कौरवांना मारणें हें इष्ट नाहीं. स्वजनांनाच मारून आम्ही कसें सुखी होऊं? (३७)

**यद्यप्येते न पश्यंति लोभोपहतचेतसः ।**
**कुलक्षयकृतं दोषं मित्रद्रोहे च पातकम् ॥३८॥**

**कथं न ज्ञेयमस्माभिः पापादस्मान्निवर्तितुम् ।**
**कुलक्षयकृतं दोषं प्रपश्यद्भिर्जनार्दन ॥३९॥**

लोभानें भ्रष्टचित्त झालेल्या या कौरवांस जरी कुलक्षयामुळें घडणारे दोष व मित्रद्रोहाचें पातक दिसत नसले तरी, कुलक्षयामुळें होणारा दोष आम्ही स्पष्ट पाहात असतां, या पापांपासून कां बरें परावृत्त होऊं नये! (३८–३९)

**कुलक्षये प्रणश्यंति कुलधर्माः सनातनाः ।**
**धर्मे नष्टे कुलं कृत्स्नमधर्मोऽभिभवत्युत ॥४०॥**

कुलक्षय झाला असतां सनातन कुलधर्म नष्ट होतात, आणि धर्मच नष्ट झाला तर सर्व कुलच अधर्मात बुडेल. (४०)

**अधर्माभिभवात्कृष्ण प्रदुष्यंति कुलस्त्रियः ।**
**स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकरः ॥४१॥**

हे कृष्णा, कुल अधर्मी झालें तर कुलस्त्रिया उन्मार्गगामी होतात, व वार्ष्णेया, स्त्रिया तशा झाल्या कीं, वर्णसंकर ठरलेलाच! (४१)

**संकरो नरकायैव कुलघ्नानां कुलस्य च ।**
**पतंति पितरो ह्येषां लुप्तपिंडोदकक्रियाः ॥४२॥**

वर्णसंकर हा कुलनाशक लोक व सबंध कुल यांच्या नरकास कारण होतो. पिंडदान व तर्पण इत्यादि क्रिया बंद झाल्यानें त्यांचे पितरहि अधोगतीला जातात. (४२)

**दोषैरेतैः कुलघ्नानां वर्णसंकरकारकैः ।**
**उत्साद्यंते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः ॥४३॥**

कुलघातक्यांच्या या वर्णसंकरकारक दोषांनीं सनातन जातिधर्म व कुलधर्म नष्ट होतात. ( ४३ )

**उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन ।**
**नरके नियतं वासो भवतीत्यनुशुश्रुम ॥४४॥**

हे जनार्दना, ज्या मनुष्यांचे कुलधर्म नष्ट झाले आहेत, अशांना अनंत-कालपर्यंत नरकवास प्राप्त होतो, असें आम्हीं ऐकत आलों आहों. (४४)

**अहो बत महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम् ।**
**यद्राज्यसुखलोभेन हंतुं स्वजनमुद्यताः ॥४५॥**

एकूण राज्यलोभानें स्वजनांसच मारण्यास आम्ही उद्यत झालों. हाय हाय ! हें केवढें भयंकर पाप आम्ही करित आहों ! ( ४५ )

**यदि मामप्रतीकारमशस्त्रं शस्त्रपाणयः ।**
**धार्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मे क्षेमतरं भवेत् ॥४६॥**

अशा स्थितींत शस्त्ररहित व प्रतिकार न करणाऱ्या मला, शस्त्रधारी कौरवांनीं या रणांगणांत ठार मारलें तरी ते अधिक श्रेयस्कर. ( ४६ )

संजय उवाच ।

**एवमुक्त्वाऽर्जुनः संख्ये रथोपस्थ उपाविशत् ।**
**विसृज्य सशरं चापं शोकसंविग्नमानसः ॥४७॥**

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादेऽर्जुनविषादयोगो नाम
प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥

**संजय म्हणाला**—याप्रमाणें बोलून शोकाकुल मनानें धनुष्यबाण टाकून अर्जुन रणभूमीमध्यें आपल्या रथांत स्वस्थ बसला. ( ४७ )

याप्रमाणें सर्व उपदेशाचा बीजभूत असा **अर्जुनविषादयोग** नांवाचा

पहिला अध्याय समाप्त झाला.

# अथ द्वितीयोऽध्यायः ।

( जगतामध्यें हें सुविख्यातच आहे कीं, ‘ प्रयोजनमनुद्दिश्य न मन्दोऽपि प्रवर्तते ’ अप्रबुद्ध मनुष्य झाला तरी तो कारणांवाचून कोणतेंही काम करण्यास प्रवृत्त होत नाहीं. येथें तर सर्व जगतांतील मनुजमात्रांस मार्गदर्शक असें स्वप्रवृत्तिनुसार स्वकर्म कसें उत्कृष्टरित्या पार पाडावे, या शास्त्राचा उहापोह करणें आहे. त्यास पार्श्वभूमिका तशीच योग्य हवी. ती या पहिल्या अध्यायानें दिग्दर्शित केली आहे. )

संजय उवाच ।

**तं तथा कृपयाविष्टमश्रुपूर्णाकुलेक्षणम् ।**
**विषिदंतमिदं वाक्यमुवाच मधुसूदनः ॥१॥**

**संजय म्हणाला**— याप्रमाणें दयेनें व्याप्त झालेल्या व आसवांनीं डोळे भरून आलेल्या शोकयुक्त अर्जुनास खालीलप्रमाणें मधुसूदन बोलते झाले.(१)

श्रीभगवानुवाच ।

**कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितम् ।**
**अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन ॥२॥**

**श्रीभगवान् म्हणाले**—हे अर्जुना, या भलत्याच ठिकाणीं हें अज्ञान तुला सुचलें तरी कसें ? हा कांहीं शहाण्या माणसांचा मार्ग नव्हे. तसेंच हें स्वर्ग प्राप्तीला हानिकारक व कीर्तिला काळिमा लावणारें काम आहे. (२)

**क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ।**
**क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ॥३॥**

हे पार्था, असा गलितधैर्य होऊं नकोस. हे तुझ्यासारख्यास योग्य नाहीं. हे परंतपा, हा मनाचा क्षुद्र दुबळेपणा सोडून युद्धास तयार हो. (३)

अर्जुन उवाच ।

**कथं भीष्ममहं संख्ये द्रोणं च मधुसूदन ।**
**इषुभिः प्रतियोत्स्यामि पूजार्हावरिसूदन ॥४॥**

अर्जुन म्हणाला—हे मधुसूदना, हे शत्रुनाशना, पूजनीय अशा भीष्म व द्रोण यांच्यावर युद्धामध्यें कसें बाण सोडूं ? ( ४ )

**गुरूनहत्वा हि महानुभावान्**
**श्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीह लोके ।**
**हत्वार्थकामांस्तु गुरूनिहैव**
**भुंजीय भोगान्रुधिरप्रदिग्धान् ॥५॥**

कारण या महासामर्थ्यवान् गुरुजनांना मारण्यापेक्षां या जगतीतलावर भिक्षा मागून जगणें बरें. येथें गुरुजनांना मारून त्यांच्या रक्तानें माखलेले अर्थ व कामरूपीं उपभोग मी कसें भोगूं ! ( ५ )

**न चैतद्विद्मः कतरन्नो गरीयो**
**यद्वा जयेम यदि वा नो जयेयुः ।**
**यानेव हत्वा न जिजीविषाम-**
**स्तेऽवस्थिताः प्रमुखे धार्तराष्ट्राः ॥६॥**

आणखी हेंहि आम्हांला कळेनासे झालें आहे कीं, यांना जिंकणें बरें कीं, यांच्याकडून जिंकले जाणें बरें. कारण ज्यांना मारून आम्ही जगूं इच्छित नाहीं, तेंच कौरव या रणांगणांत उपस्थित आहेत. ( ६ )

**कार्पण्यदोषोपहतस्वभावः पृच्छामि**
**त्वां धर्मसंमूढचेताः ।**
**यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे**
**शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ॥७॥**

( तेव्हां हे श्रीकृष्णा, यांतील तत्वविचार सांग. उगाच कीर्तिला काळिमा आणणारें आहे, असा सामान्य व्यवहारी उपदेश नको. ) मोहानें माझा मूळस्वभाव नष्ट पावला आहे. किंकर्तव्यतामूढ मी तुला तत्वविचार विचारतो आहे. जें कल्याणकारक तें निश्चित सांग. मी तुझा शिष्य आहे. तुला शरण आलेल्या मला योग्य मार्ग दाखव. ( ७ )

**न हि प्रपश्यामि ममापनुद्याद्**
**यच्छोकमुच्छोषणमिन्द्रियाणाम् ।**
**अवाप्य भूमावसपत्नमृद्धं**
**राज्यं सुराणामपि चाधिपत्यम् ॥८॥**

या भूमीचें निष्कंटक व समृद्ध राज्य जरी प्राप्त झालें, किंबहुना देवलोकाचें राज्य जरी प्राप्त झालें, तरी ज्यायोगें माझ्या इंद्रियांना शोषण करणारा शोक नाहींसा होईल असा मार्ग मला दिसत नाहीं. ( ८ )

संजय उवाच ।

**एवमुक्त्वा हृषीकेशं गुडाकेशः परंतप ।**
**न योत्स्य इति गोविंदमुक्त्वा तूष्णीं बभूव ह ॥९॥**

**संजय म्हणाला**—याप्रमाणें जितेंद्रिय श्रीकृष्णाला बोलून हे शत्रुनाशना मी लढणार नाहीं, असें म्हणून तो जितनिद्र स्वस्थ बसला. (९)

**तमुवाच हृषीकेशः प्रहसन्निव भारत ।**
**सेनयोरुभयोर्मध्ये विषीदंतमिदं वचः ॥१०॥**

हे धृतराष्ट्रा, दोन्ही सैन्याच्या मध्यभागीं विषाद करीत बसलेल्या अर्जुनास किंचित् हास्य करून, श्रीकृष्ण याप्रमाणें बोलूं लागले. ( १० )

श्रीभगवानुवाच ।

**अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे ।**
**गतासूनगतासूंश्च नानुशोचंति पंडिताः ॥११॥**

**श्रीभगवान म्हणाले**—हे अर्जुना, तूं शोक करण्यास योग्य नसलेल्या वस्तूंबद्दल शोक करतो आहेस, आणि पांडित्यांच्या गप्पा मारतो आहेस ! ज्ञानी लोक मेलेल्याबद्दल शोक करीत नाहींत, व जिवंत असलेल्याबद्दलहि हर्ष मानीत नाहींत. ( ११ )

**न त्वेवाहं जातु नासं न त्वं नेमे जनाधिपाः ।**
**न चैव न भविष्यामः सर्वे वयमतः परम् ॥१२॥**

कारण मी पूर्वी कधीं नव्हतो असें नाहीं; तूं व हे राजे लोक पूर्वी कधीं नव्हते असेंहि नाहीं. बरें, इतःपर पुन्हां आपण सर्व होणारच नाहीं असेंहि नाहीं. ( आत्मा अमर आहे ). ( १२ )

**देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं यौवनं जरा ।**
**तथा देहांतरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ॥१३॥**

ज्याप्रमाणें देहधारी प्राण्याला बालपण, तारुण्य, व म्हातारपण प्राप्त होतात, त्याचप्रमाणें त्यांस अन्य देहही धारण करावा लागतो. यामुळें ज्ञानी लोक ( जन्म-मृत्युबाबत ) शोक करीत नाहींत. ( १३ )

**मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्णसुखदुःखदाः ।**
**आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ॥१४॥**

हे कौंतेया, शीत व उष्ण, सुख व दुःख हें जे इंद्रियांचे गुणधर्म आहेत, ते क्षणभङ्गूर आणि अनित्य आहेत. याकरितां हे भारता, अशा अनित्यांचा तूं शोक करूं नयेस. ते सहन करावेस. ( १४ )

**यं हि न व्यथयंत्येते पुरुषं पुरुषर्षभ ।**
**समदुःखसुखं धीरं सोऽमृतत्वाय कल्पते ॥१५॥**

हे पुरुषश्रेष्ठा, सुख व दुःख या दोन्हीं वेदनांस समान समजणाऱ्या ज्या धीर पुरुषांस हे इंद्रियविषय पीडा देऊं शकत नाहींत, तो मोक्षाचा अधिकारी होतो. ( १५ )

**नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ।**
**उभयोरपि दृष्टोऽतस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः ॥१६॥**

जें नाहींच तें आहेसें होत नाहीं; व जें आहे त्याचा अभावच असूं शकत नाहीं. या दोन्हींतील तत्व, तत्वज्ञांनीं जपलें आहे. ( आत्मा नित्य आहे, त्यास नाश नाहीं. ) ( १६ )

**अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम् ।**
**विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति ॥१७॥**

ज्यानें हें सर्व विश्व व्यापलें आहे, तेंच सत्स्वरूपी ब्रह्म अविनाशी आहे हें जाण. या अविनाशी ब्रह्माचा कोणीहि नाश करूं शकत नाहीं. (१७)

**अंतवंत इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः ।**
**अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ॥१८॥**

ह्या नित्य व देहधारी आत्म्याचें हे देह नाशिवंत आहेत. आत्मा अविनाशी व अचिंत्य आहे. तेव्हां या नाशिवंत देहाकरितां शोक न करितां युद्धाला तयार हो. ( १८ )

**य एनं वेत्ति हंतारं यश्चैनं मन्यते हतम् ।**
**उभौ तौ न विजानीतो नायं हंति न हन्यते ॥१९॥**

जो या आत्म्याला तो मारणारा आहे, असें समजतो व जो याला मेला असें समजतो, या दोघांनाहि कांहीं समजत नाहीं; हें तूं पक्के समज. कारण हा आत्मा मारीत नाहीं व मारलाही जात नाहीं. ( १९ )

**न जायते म्रियते वा कदाचिन्नायं**
**भूत्वा भविता वा न भूयः ।**
**अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो**
**न हन्यते हन्यमाने शरीरे ॥२०॥**

हा आत्मा कधींहि जन्म पावत नाहीं, किंवा मरतहि नाहीं. हा कधीं जन्म पावला नाहीं व पुन्हां कधीं जन्म पावणार नाहीं असेंहि नाहीं. हा अजन्म, नित्य, शाश्वत, आणि पुरातन आहे. शरीराचा नाश झाला तरी याचा नाश होत नाहीं. ( २० )

**वेदाविनाशिनं नित्यं य एनमजमव्ययम् ।**
**कथं स पुरुषः पार्थ कं घातयति हन्ति कम् ॥२१॥**

हे पार्था, जो पुरुष या आत्म्यास अविनाशी, नित्य, अजन्म, आणि विकारशून्य असें जाणतो, तो कोणाला कसें मारविणार आणि कोणाला कसें मारणार ? ( २१ )

**वासांसि जीर्णानि यथा विहाय**
**नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।**
**तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि**
**संयाति नवानि देही ॥२२॥**

जसें मनुष्य जुनीं वस्त्रें टाकून नवीं धारण करितो. तसें हा आत्मा जुनीं शरीरें टाकून नवीन शरीरांत प्रवेश करितो. ( २२ )

**नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।**
**न चैनं क्लेदयंत्यापो न शोषयति मारुतः ॥२३॥**

या आत्म्यास शस्त्रें तोडूं शकत नाहींत, अग्नि जाळूं शकत नाहीं, पाणी भिजवूं शकत नाहीं व वारा सुकवूं शकत नाहीं. ( २३ )

**अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च ।**
**नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः ॥२४॥**

हा आत्मा अच्छेद्य, अदाह्य, अक्लेद्य व अशोष्य आहे. तसेंच तो नित्य सर्वव्यापक, स्थिर, अचल व सनातन आहे. ( २४ )

**अव्यक्तोऽयमचिंत्योऽयमविकार्योऽयमुच्यते ।**
**तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि ॥२५॥**

हा आत्मा अव्यक्त, अचिन्त्य, अविकारी आहे, असें मानलें जातें. म्हणून हे आत्मस्वरूप जाणल्यावर तूं याचा शोक करणें बरें नाहीं. (२५)

**अथ चैनं नित्यजातं नित्यं वा मन्यसे मृतम् ।**
**तथापि त्वं महाबाहो नैनं शोचितुमर्हसि ॥२६॥**

( आत्म्याचें अमरत्व व पुनर्जन्म या तत्त्वाचा आधार घेऊन वरील विवेचन केलें. आतां अमरत्व जरी मानलें नाहीं तरी जगाचें रहाटगाडगें सतत अनंतकालपर्यंत चालू राहात असल्यानें या तऱ्हेचे मनुष्यप्राणी वारंवार जन्माला येत राहाणार व मृत्युहि पावणार अशा स्थितींत आपापलें कर्तव्य करणें हाच योग्य मार्ग, हा उपदेश आतां करतात. ) हे महाबाहो, आतां तूं या आत्म्यास हा नेहमींच जन्मतो व नेहमींच मरतो, असें समजत असशील, तरीहि त्याचा शोक करणें उचित नाहीं. ( २६ )

**जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च ।**
**तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ॥२७॥**

कारण जो जन्मास आला, त्यास मृत्यु ठरलेलाच, व जो मेला त्यास पुनर्जन्म निश्चितच आहे. म्हणून या अपरिहार्य गोष्टीबद्दल तूं शोक करणें, हें गैर आहे. ( २७ )

**अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत ।**
**अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ॥२८॥**

प्राण्यांची जन्मपूर्व स्थिति ही अव्यक्त आहे. जन्म प्राप्त झाल्यावर ती व्यक्त होते. मृत्युनंतर पुन्हां ती अव्यक्त होते. तेव्हां येथें शोक कशाबद्दल करावयाचा ? ( २८ )

**आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति तथैव चान्यः ।**
**आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित् ॥२९॥**

ह्या आत्म्याकडे, एक आश्चर्यकारक वस्तु म्हणून कोणी पाहातो; ही आश्चर्यकारकच म्हणून कोणी याचें वर्णन करतो, ही खरोखरच आश्चर्यकारक वस्तु म्हणून कोणी हिचें वर्णन ऐकत असतो, पण यांपैकीं कोणासच या आत्म्याचें खरें स्वरूप कळलेलें नसते. ( २९ )

**देही नित्यमवध्योऽयं देहे सर्वस्य भारत ।**
**तस्मात्सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि ॥३०॥**

सर्वांच्या देहांमध्यें वास्तव्य करणारा हा आत्मा अवध्य आहे. म्हणून कोणत्याही प्राण्यांबद्दल शोक करणें तुला योग्य नाहीं. ( ३० )

**स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकंपितुमर्हसि ।**
**धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत्क्षत्रियस्य न विद्यते ॥३१॥**

केवळ क्षात्रधर्माकडे लक्ष दिलेंस, तरी भित्रेपणा तुला शोभत नाहीं. कारण स्वधर्मानें योग्य असलेल्या युद्धापेक्षां दुसरें कोणतेंच श्रेयस्कर असें कर्म क्षत्रियास असत नाहीं. ( ३१ )

**यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारमपावृतम् ।**
**सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभंते युद्धमीदृशम् ॥३२॥**

अरे पार्था, यासारखें म्हणजेच आपोआप प्राप्त झालेलें उघडें स्वर्गद्वार केवळ भाग्यवान् क्षत्रियांनाच प्राप्त होतें. ( ३२ )

**अथ चेत्त्वमिमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि ।**
**ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापमवाप्स्यसि ॥३३॥**

यासाठीं हा धर्मयुक्त संग्राम जर तूं नाहीं केलास, तर स्वधर्म व कीर्ति ह्या दोहोंसही तूं मुकशील व पापाचा धनी मात्र होऊन बसशील. ( ३३ )

**अकीर्तिं चापि भूतानि कथयिष्यंति तेऽव्ययाम् ।**
**संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते ॥३४॥**

आणि सर्व लोक तुझी अखंड दुष्कीर्ति गातील. माननीय पुरुषाला दुष्कीर्ति ही मरणापेक्षांही अधिक कष्टप्रद असते. ( ३४ )

**भयाद्रणादुपरतं मंस्यंते त्वां महारथाः ।**
**येषां च त्वं बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम् ॥३५॥**

ज्यांच्या आदरास तूं आजपर्यंत प्राप्त झाला होतास, त्यांच्याच निंदेस तूं पात्र होशील, व हें सर्व महारथी, अर्जुन भीतिनें युद्धापासून पराङ्मुख झाला असें मानतील. ( ३५ )

**अवाच्यवादांश्च बहून्वदिष्यंति तवाहिताः ।**
**निन्दन्तस्तव सामर्थ्यं ततो दुःखतरं नु किम् ॥३६॥**

तुझे वैरी तुझ्या सामर्थ्याची निंदा करून तुजविषयीं भलभलत्या गोष्टी बोलूं लागतील. यापेक्षां अधिक दुःखतर ती गोष्ट कोणती ! ( ३६ )

**हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।**
**तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः ॥३७॥**

हे कौंतेया, मेलास तर स्वर्गसुख भोगशील, जिंकलेस तर पृथ्वीचें राज्य भोगशील. तेव्हां युद्ध करण्याचा निश्चय करून, ( शोक टाकून ) ऊठ. (३७)

**सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।**
**ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥३८॥**

सुखदुःख, लाभहानि, जयापजय या द्वंद्वांस समान मानून तूं युद्धास तयार हो. म्हणजे तुला पाप लागणार नाहीं. ( ३८ )

**एषा तेऽभिहिता सांख्ये बुद्धिर्योगे त्विमां शृणु।**
**बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि ॥३९॥**

हे पार्था, येथपर्यंत तुला ज्ञानयोगाचा मार्ग सांगितला. आतां कर्मयोगाचा ऐक, कीं, ज्यायोगें तुझा कर्मबंध नाहींसा होईल. ( ३९ )

**नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते।**
**स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥४०॥**

(श्लोक ११ ते २५ पर्यंत, आत्म्याचें अमरत्व प्रतिपादन करून नाशिवंत देहाबद्दल आत्मियता व खंत बाळगणें हें ज्ञानी मनुष्याचें काम नाहीं, असें आग्रहानें प्रतिपादिलें. तथापि हें अमरत्व ही गोष्ट बुद्धिग्राह्य नाहीं, असें जरी मानलें, तरी त्याच निकषावर जन्मपूर्व व मरणोत्तर आस्तित्व हेहि अव्यक्तांतच असल्यानें, अशा अव्यक्तांबद्दल खंत बाळगणें हेंहि ज्ञान्यांचें काम नाहीं, हें श्लोक २६ ते ३० मध्यें सांगितलें. आतां हा सर्व भागच बुद्धिगम्य नाहीं असें वाटलें तर मग स्वधर्माप्रमाणें युद्ध करणें योग्य हें श्लोक ३१ ते ३८ मध्यें सांगितले,

यापुढें संसारी माणसानें आपलें नित्य कर्तव्यकर्मच फलाशारहित भावनेनें केलें तरच तें उत्कृष्ट कर्म हा जो गीतेचा मुख्य प्रतिपाद्य विषय त्या विषयास श्रीकृष्ण सुरवात करतात.)

या कर्मयोगांत सुरवात केलेलें कार्य अर्धवट जरी राहिलें, तरी त्याचा नाश होत नाहीं. (फलाशा नसल्यानें) मध्यें अडचणी येत गेल्या तरी त्या नाहींशा होतात. या धर्माचें स्वल्प जरी आचरण घडलें तरी तें (अज्ञानरूपी) मोठ्या भयापासून संरक्षण करतें. ( ४० )

**व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनंदन।**
**बहुशाखा ह्यनंताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ॥४१॥**

हे कुरुनंदना, या कर्मयोगांत मनुष्याची कर्मबुद्धि (कर्मफलाच्या वासनेच्या पाठीमागें धांवत नसल्यानें) निश्चल असते. पण तेंच, सकामी

पुरुषांच्या बुद्धिस फार फांटे फुटलेले असतात. व ती अनंत मनोरथांच्या झंझावातांत सांपडलेली असते. ( ४१ )

**यामिमां पुष्पितां वाचं प्रवदंत्यविपश्चितः ।**
**वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीति वादिनः ॥४२॥**

**कामात्मानः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम् ।**
**क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यगतिं प्रति ॥४३॥**

**भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम् ।**
**व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते ॥४४॥**

जे सकामी पुरुष, वेदांत सांगितलेल्या काम्य कर्मांशिवाय दुसरें ( मनुष्य जातीपुढें ध्येयच ) नाहीं, असें अलंकारिक भाषेंत सांगतात, ते फलाशेनें कर्मबंधांत गुंतलेलें, स्वर्गप्राप्तिवर नजर ठेवणारे, नाना प्रकारच्या कर्मांनीं युक्त अशी उपभोग व ऐश्वर्यांनीं बरबटलेली पुनर्जन्माचे फल देणाऱ्या गतीस प्राप्त होतात. अर्थातच भोग व ऐश्वर्य यांमध्यें आसक्ति असलेलें व त्यामुळें ज्यांच्या बुद्धिस ज्ञानाचा उजाळा मिळणें कठीण होते, अशा लोकांची बुद्धि कर्मफलाशारहित कर्तव्य करण्याच्या मनःस्थितींत स्थीर राहूं शकत नाहीं. ( ४२, ४३, ४४ )

**त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन ।**
**निर्द्वन्द्वो नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ॥४५॥**

याकरितां, हे अर्जुना, सत्व, रज व तम या गुणांना अनुसरून काम्य कर्मांचे विवरण वेदामध्यें केलेले आहे, ते तूं सोडून दे व फलाशारहित कर्तव्यकर्म करणारा खरा कर्मयोगी ( निस्त्रैगुण्य ) तूं हो. सुख–दुःख शीत–उष्ण या द्वंद्वापासून दूर रहा. नित्य वस्तूंमध्यें ( परब्रह्मामध्यें म्हणजेच निष्काम समाजसेवेमध्यें ) स्थीर चित्त करून आपल्या उदरनिर्वाहाची चिंता सोडून खरा आत्मज्ञानी हो. ( ४५ )

**यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके ।**
**तावान्सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः ॥४६॥**

( आणि असा आत्मज्ञानी झालास; म्हणजे ) ज्याप्रमाणें सर्व बाजूंनीं संपूर्ण जलाशय प्राप्त झाल्यावर लहान विहिरीचें प्रयोजन राहात नाहीं त्याप्रमाणें खरा ब्रह्मज्ञानी झाल्यावर वेदांतील कर्मकांडाचे प्रयोजन असत नाहीं. ( ४६ )

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।**
**मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संङ्गोऽस्त्वकर्मणि ॥४७॥**

तात्पर्य, कर्तव्यकर्म करण्यापुरताच तुझा अधिकार आहे; त्या कर्माच्या फलांशीं तुझा संबंध नाहीं. कर्मफलाच्या लोभानें कर्मे करीत जाऊं नकोस तसेंच कर्तव्यकर्में करण्यामध्येंहि गोडी ठेवूं नकोस. ( ही कर्मयोगाची चतुःसूत्री आहे ) ( ४७ )

**योगस्थः कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय ।**
**सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते ॥४८॥**

हे धनंजया [ कर्मफलाची ] आसक्ति सोडून; समबुद्धि धारण करून [ योगस्थः ] सर्व कर्तव्यकर्में कर. त्यांची सफलता किंवा निष्फलता यांचें ठिकाणीहि समबुद्धि धारण कर. कारण या प्रकारच्या समबुद्धिसच कर्मयोग म्हणतात. ( ४८ )

**दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धनंजय ।**
**बुद्धौ शरणमन्विच्छ कृपणाः फलहेतवः ॥४९॥**

बा धनंजया, या समत्वबुद्धिच्या कर्मयोगापेक्षां, आसक्तियुक्त कर्म फारच कमी प्रतीचें आहे. या समबुद्धिचीच कांस धर. फलाच्या आशेनें कर्म करणारे लोक अत्यंत दीन होत. ( ४९ )

**बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते ।**
**तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥५०॥**

या समत्वबुद्धिनें युक्त मनुष्य पाप व पुण्य या दोहोंच्या बंधनापासून मुक्त होतो. याकरितांच या कर्मयोगाचीच कांस धर. समत्वबुद्धिरूप योग म्हणजेच कर्तव्यकर्में करण्यामधील चातुर्य. ( ५० )

**कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः ।**
**जन्मबंधविनिर्मुक्ताः पदं गच्छंत्यनामयम् ॥५१॥**

हे बुद्धियोगयुक्त ज्ञानीजन कर्मफलाचा त्याग करून, जन्मरूप बंधनापासून मुक्त होऊन, अमृतमय परमपदाप्रत जातात. ( ५१ )

**यदा ते मोहकलिलं बुद्धिर्व्यतितरिष्यति ।**
**तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च ॥५२॥**

जेव्हां तुझी बुद्धि ही मोहरूप दलदल पार करून जाईल, तेव्हां तूं ऐकण्यालायक किंवा ऐकिलेल्या वैराग्याची प्राप्ति करून घेशील. ( निष्काम समाजसेवा ही जी वैराग्याची परमावस्था, ती तूं प्राप्त करून घेशील. ) ( ५२ )

**श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला ।**
**समाधावचला बुद्धिस्तदा योगमवाप्स्यसि ॥५३॥**

वेदांतील कर्मकांडाच्या भ्रामक वाक्यांनीं विचलित झालेली तुझी बुद्धि परमात्म्याच्या सत्स्वरूपांत जेव्हां अचल व स्थीर होईल तेव्हां तुला कर्मयोगाची प्राप्ति होईल. ( ५३ )

अर्जुन उवाच ।

**स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव ।**
**स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम् ॥५४॥**

**अर्जुन म्हणाला**—हे केशवा, अशा समाधिस्थ स्थीरबुद्धि मनुष्याचें काय लक्षण आहे ? तो कसा बोलतो, बसतो व चालतो ? ( त्याचें व्यवहारांतील वागणें कसें असतें ? ) ( ५४ )

श्रीभगवानुवाच ।

**प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् ।**
**आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ॥५५॥**

## स्थितप्रज्ञाची लक्षणें

**श्रीभगवान् म्हणाले**–हे पार्था, जेव्हां मनुष्य मनांतील सर्व कामनांचा त्याग करतो, व स्वतः स्वतःचेच ठिकाणीं रममाण होतो; (निष्काम

समाजसेवेनें जेव्हां त्याचा आपपरभाव नाहींसा झाल्यानें आत्मविश्वास वाढतो, तेव्हां तो ब्रह्मानंदाचा अनुभव करतो; ) त्यास स्थितप्रज्ञ म्हणतात. ( ५५ )

**दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः ।**
**वीतरागभयक्रोधः स्थिधीर्मुनिरुच्यते ॥५६॥**

दुःखप्राप्ति झाली असतां ज्याचे मनांस उद्वेग होत नाहीं, सुखप्राप्तिमध्यें ज्याला गोडी नाहीं, प्रेम, भय, क्रोध इत्यादि विकार ज्याचे नाहींसे झाले आहेत; त्याला स्थितप्रज्ञ ऋषि म्हणतात. ( ५६ )

**यः सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम् ।**
**नाभिनन्दति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥५७॥**

जो कोणत्याहि गोष्टीवर प्रेम व्यक्त करीत नाहीं, ( ज्याला स्वतःची आवडनिवडच राहिली नाहीं, ) शुभ किंवा अशुभ गोष्टीची प्राप्ति झाली असतां जो आनंदून जात नाहीं, किंवा द्वेषहि करीत नाहीं; त्याची बुद्धि स्थीर झाली असें समजावें. ( ५७ )

**यदा संहरते चायं कूर्मोऽङ्गानीव सर्वशः ।**
**इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥५८॥**

ज्याप्रमाणें कांसव आपलीं सर्व गात्रें समेटून घेतें, त्याप्रमाणें इंद्रियार्थांपासून आपलीं सर्व इंद्रियें जो समेटून घेतो, त्याची बुद्धि स्थीर झाली असें समजावें. ( ५८ )

**विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः ।**
**रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते ॥५९॥**

आहार सोडणाऱ्या मनुष्याचे विषय म्हणजे उपभोग्य वस्तु सुटत जातात, पण त्यावरील गोडी, व सना कायम राहातात परंतु या पुरुषाची ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तिमुळें ही गोडी—वासनाहि—नष्ट होते. ( ५९ )

**यततो ह्यपि कौन्तेय पुरुषस्य विपश्चितः ।**
**इन्द्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः ॥६०॥**

संग्रहालय विभाग क्रमांक नों. दि.

हे कौंतेया, इंद्रिय निग्रह करणाऱ्या बुद्धिमान् पुरुषाचें मनहि, हीं अवखळ इंद्रियें जबरदस्तीनें आकर्षून नेतात. ( ६० )

**तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः ।**
**वशे हि यस्येन्द्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥६१॥**

ह्या सर्व इंद्रियावर ताबा ठेवून जो योगयुक्त माझ्यावर मन ठेवून निश्चल असतो,—त्याच्या ताब्यांत सर्व इंद्रियें असतात, त्याची बुद्धि स्थीर झाली असें समजावे. ( ६१ )

**ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते ।**
**संगात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ॥६२॥**

जो उपभोग्य वस्तूंचें चिंतन करितो, त्याची त्यांवर आसक्ति निर्माण होते. आसक्ति निर्माण झाली कीं, त्यांचा लोभ उत्पन्न होतो; लोभा-पासून क्रोधाची उत्पत्ति होते. ( ६२ )

**क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ।**
**स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥६३॥**

क्रोधापासून अविवेक उत्पन्न होतो. व अविवेकापासून स्मृतिभ्रम, स्मृतिभ्रमापासून बुद्धिनाश व बुद्धिनाश झाला कीं तो स्वत्वाचा नाश करून घेतो. (६३)

**रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिंद्रियैश्चरन् ।**
**आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ॥६४॥**

या उलट प्रेम व द्वेष यांनीं रहित व स्वतःच्या ताब्यांत असलेल्या इंद्रियद्वारां ( जीवनयात्रा चालविण्यापुरता ) जो विषयोपभोग घेतो, तो प्रसन्नचित्त राहातो. ( ६४ )

**प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते ।**
**प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते ॥६५॥**

अशा प्रसन्नचित्त इसमाच्या सर्व दुःखाचा नाश होतो. आणि याचीच बुद्धि लवकर स्थीर होते. ( ६५ )

**नास्ति बुद्धिरयुक्तस्य न चायुक्तस्य भावना ।**
**न चाभावयतः शांतिरशांतस्य कुतः सुखम् ॥६६॥**

जो ( निष्काम ) कर्मयोगी नाहीं, त्याची बुद्धि स्थीर नसते, व त्याच्या अंतःकरणांत श्रेष्ठ भूतदयाहि नसते. ज्याच्या अंतःकरणांत अस्त आस्तिक्यभाव नसतो, त्याला शांति मिळत नाहीं. अशांत माणसास सुख कोठून ! ( ६६ )

**इन्द्रियाणां हि चरतां यन्मनोऽनुविधीयते ।**
**तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावमिवांभसि ॥६७॥**

ज्याचें मन विषयोपभोगांत स्वैरसंचार करणाऱ्या इंद्रियांच्या मागें धांवते त्याची बुद्धि वारा ज्याप्रमाणें पाण्यांतील नावेस विचालित करतो, त्याप्रमाणें विचालित होते. ( ६७ )

**तस्माद्यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः ।**
**इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥६८॥**

याकारितां, हे महाबाहो, ज्याचीं सर्व इंद्रियें इंद्रियार्थांपासून आंवरून धरलीं जातात, त्याचीच बुद्धि स्थीर झाली असें समजावें. ( ६८ )

**या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।**
**यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥६९॥**

संपूर्ण भूतप्राण्यांस जेथें अज्ञानामुळें अंधःकार ( रात्र ) असतो, तेथेंच या इंद्रियनिग्रही योग्यास ज्ञानाचा प्रकाश दिसतो, आणि अज्ञानांधःकारामुळें बरबटलेल्या बुद्धिनें माणसें ज्यास दिवस समजून आपलें विषयोपभोग अनियंत्रितरीत्या उपभोगत असतात; तीच या योग्यास रात्र वाटत असते. ( ६९ )

**आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं समुद्रमापः**
**प्रविशन्ति यद्वत् ।**
**तद्वत्कामा यं प्रविशन्ति सर्वे**
**स शान्तिमाप्नोति न कामकामी ॥७०॥**

ज्याप्रमाणें जलानें परिपूर्ण व अचल अशा समुद्रांत नाना नद्यांचे पाणी प्रवेश करते. (तथापि तो आपली मर्यादा उल्लंघित नाहीं.) त्याप्रमाणें सर्व वासनांना जो आपलें ठिकाणीं स्थान देतो, (पण त्यांच्या फलाशेनें तो बद्ध होत नाहीं,) तोच खरी चित्तशांति मिळवितो, भोगासक्त नाहीं. (७०)

**विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निःस्पृहः ।**
**निर्ममो निरहंकारः स शान्तिमधिगच्छति ॥७१॥**

जो पुरुष संपूर्ण कामनांचा त्याग करून, निस्पृहतेनें, निर्ममतेनें व निरहंकारतेनें आपलें आचरण ठेवतो, तोच मनाची शांति मिळवितो. (७१)

**एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति ।**
**स्थित्वास्यामन्तकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति ॥७२॥**

हे अर्जुना, ब्रह्मैक्यभूत अशी जी ब्राह्मी स्थिती ती हीच. ही प्राप्त झाली असतां तो मोहित होत नाहीं. ज्ञानी पुरुष अंतःकालींहि याच स्थितींत राहून ब्रह्मप्राप्तिरूप मोक्ष मिळवितो. (७२)

श्रीमद्भगवद्गीतेतील सांख्य योग या नांवाचा दुसरा अध्याय
समाप्त झाला.

---

ॐ श्रीपरमात्मने नमः

# अथ तृतीयोऽध्यायः

अर्जुन उवाच

**ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुद्धिर्जनार्दन ।**
**तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव ॥१॥**

**अर्जुन म्हणाला**—हे जनार्दना, जर कर्मापेक्षां ज्ञान श्रेष्ठ असें म्हणतोस, तर मग हे केशवा, माझी या युद्धाच्या भयंकर कर्माच्या कामीं कां योजना करतोस ? ( १ )

**व्यामिश्रेणेव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे ।**
**तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयाम् ॥२॥**

तूं सांख्ययोग बरा व कर्मयोग बरा, अशा मिश्र वाक्यांनीं जणूं माझ्या बुद्धिस मोह पाडीत आहेस. तर एकच निश्चित गोष्ट सांग कीं, ज्यायोगें मी कल्याण मिळवूं शकेन. ( २ )

श्रीभगवानुवाच

**लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ ।**
**ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनाम् ॥३॥**

(दुसऱ्या अध्यायांत ११ ते २५ श्लोकांत ज्ञानयोगाची महती गायिली आहे. असें असतांना कर्मफलाशा सोडून कर्तव्यकर्म करीत जा, असाहि उपदेश केला आहे. ४९ व्या श्लोकांत तर कर्म हें बुद्धियोगापेक्षां फारच हीन दर्जाचें आहे, असें सांगितलें आहे.

त्याकाळच्या स्थितींत ज्ञानमार्ग म्हणजेच कर्मसंन्यास अशीं तात्त्विक भावना लोकांत बद्धमूल होती. त्यामुळें ज्ञानमार्ग म्हणजे कर्मसंन्यास नसून कर्मफलसंन्यास हा जो अर्थ भगवंतास अभिप्रेत आहे व या अर्थानें ज्ञानयोग व कर्मयोग यांत भेदच नाहीं, हें जें श्रीकृष्णास सांगावयाचे आहे, याचा स्पष्ट अर्थ अर्जुनाच्या लक्षांत आला नाहीं. म्हणून या प्रश्नानें

अर्जुन ( म्हणजेच संसारी पुरुष ) आपल्या मनांतील शंका श्रीकृष्णास बोलून दाखवून, त्यांचें निरसन करून घेत आहे. )

**श्रीभगवान् म्हणाले**—हे निष्पाप अर्जुना, या जगतांमध्यें दोन प्रकारच्या निष्ठा ( मोक्ष-कर्मबंध सोडण्याच्या मार्गांतील अत्युत्कृष्ट साधनें ) प्रचारांत आहेत असें मी पूर्वीं ( जगतारंभीं ) सांगितलें आहे. एक सांख्यांची ज्ञानयोग निष्ठा व दुसरी योग्यांची कर्मयोग निष्ठा. ( थोडक्यांत एक संन्यासमार्ग व दुसरा निष्काम कर्मयोगमार्ग. यांसच दुसऱ्या अध्यायांत समत्वबुद्धियोग, बुद्धियोग, योग या शब्दांनीं संबोधिलें आहे. ) (३)

**न कर्मणामनारम्भान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते ।**
**न च संन्यसनादेव सिद्धिं समधिगच्छति ॥४॥**

परंतु हे अर्जुना, कामाला केवळ आरंभ केला नाहीं म्हणून पुरुष कर्मसंन्यास ( कर्मफलसंन्यास, हा अर्थ अभिप्रेत आहे. ) प्राप्त करून घेऊं शकत नाहीं. तसेंच निव्वळ कर्मसंन्यास ( कर्मफलसंन्यास नव्हे; कर्मच न करणें, हा अर्थ येथें अभिप्रेत आहे. ) केला म्हणून मनुष्य सिद्ध होतो, असेंहि नाहीं. (४)

**न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ।**
**कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ॥५॥**

कारण, कोणाहि मनुष्याला क्षणभर देखील कांहींना कांहीं कर्म केल्याशिवाय स्वस्थ बसणें शक्य नाहीं. ( निव्वळ स्वस्थ बसणें म्हणजे तरी क्षणाक्षणांनीं अंत:कालाच्या समीप जाण्याची क्रिया करणें होय. ) सर्वजण प्रकृतीच्या गुणांनीं परतंत्र होऊन सर्व कर्में करण्यास प्रवृत्त होत असतात. (५)

**कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।**
**इन्द्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ॥६॥**

जो मूढ पुरुष कर्मेंद्रियांचें संयमन करून, मनानें मात्र विषयोपभोगांचें चिंतन करित असतो, त्यास दांभिक म्हणतात. (६)

**यस्त्विन्द्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन ।**
**कर्मेन्द्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते ॥७॥**

आणि, हे अर्जुना, जो पुरुष मनानें इंद्रियावर ताबा ठेवून अनासक्त राहून कर्मेंद्रियद्वारा कर्मयोगाचें आचरण करितो, तो श्रेष्ठ होय. (७)

**नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः ।**
**शरीरयात्रापि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः ॥८॥**

याकरितां तूं शास्त्रानें ठरवून दिलेलें काम करित राहा. अकर्मापेक्षां कर्म हें केव्हांही श्रेष्ठ होय. फार काय, कर्मत्यागानें तुझा शरीरनिर्वाहहि होणार नाहीं. (८)

**यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबन्धनः ।**
**तदर्थं कर्म कौन्तेय मुक्तसङ्गः समाचर ॥९॥**

जें ब्रह्मार्पणबुद्धया ( यज्ञार्थ ) कर्म केलें जाते त्याशिवाय इतर कर्म ( फलाशेनेंयुक्त असल्यानें जन्म–मृत्यु इत्यादिनीं ) बंधनकारक होय. याकरितां परमेश्वराचें नांवानें ( तदर्थ ) सर्व कर्म आसक्तिरहितबुद्धीनें करित जा. (९)

**सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः ।**
**व**
**अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्टकामधुक् ॥१०॥**

**देवान्भावयतानेन ते देवा भावयन्तु वः ।**
**परस्परं भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ ॥११॥**

**इष्टान्भोगान्हि वो देवा दास्यन्ते यज्ञभाविताः ।**
**तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुङ्क्ते स्तेन एव सः ॥१२॥**

पूर्वी ज्यावेळीं प्रजापतीनें यज्ञाबरोबरच प्रजेसही निर्माण केलें, व तो त्यांना म्हणाला, ' या यज्ञानें ( परमेश्वरार्पणबुद्धया सेवा हेंच कर्तव्य करून ) तुम्ही आपली वाढ करून घ्या. हा यज्ञ तुमचे सर्व मनोरथ पूर्ण करणारा होवो. या यज्ञचक्रानें तुम्ही देवतांस संतुष्ट करा, व ते देव

तुम्हांला इच्छित भोग अर्पण करीत. ( निष्काम कर्मानें समाजसेवा करा, त्यायोगें समाजास सर्व उपभोग साधनें उपलब्ध होतील. ) याप्रमाणें एकमेकांविषयींचें कर्तव्य केल्यानें तुम्हांला परम कल्याण प्राप्त होवो. याप्रमाणें यज्ञानें संतुष्ट झालेले हे देव तुम्हांस इष्ट अशीं उपभोग साधनें देतील. देवांनीं दिलेल्या वस्तु त्यांना परत न देतां पुरुष स्वतः एकटाच उपभोगितो, तो निःसंशय चोर होय. ( समाजऋण दिल्याशिवाय भोग भोगणें हें चौर्य होय. ) ( १०, ११, १२ )

**यज्ञशिष्टाशिनः सन्तो मुच्यन्ते सर्वकिल्बिषैः ।**
**भुञ्जते ते त्वघं पापा ये पचन्त्यात्मकारणात् ॥१३॥**

यज्ञांमध्यें शिल्लक राहिलेलें अन्न उपभोगणारे सज्जन सर्व पापांपासून मुक्त होतात. परंतु जे पापी लोक स्वतःकारितांच अन्न शिजवितात, ते पापच खात असतात. (१३)

**अन्नाद्भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसंभवः ।**
**यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः ॥१४॥**

अन्नापासून प्राणिमात्र निर्माण होतात. पर्जन्यापासून अन्न निर्माण होतें. यज्ञापासून वृष्टि होते व कर्मापासून यज्ञ जन्मास येतो. (१४)

**कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् ।**
**तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ॥१५॥**

हें कर्म प्रकृतिधर्मापासून उत्पन्न होतें. ह्या प्रकृतीचा उगम अक्षर परमात्म्यापासुन आहे. यावरून सर्वव्यापी प्रकृति ही यज्ञांत सुप्रतिष्ठित आहे, ( हें लक्षांत घे ). ( त्याकाळीं यज्ञसंस्थेंस देखील अतिमहत्व आलें होतें. श्रीकृष्ण लोकांचा बुद्धिभेद न करितां ही यज्ञसंस्था देखील सर्वव्यापी प्रकृतिचाच गुणधर्म आहे, व निष्काम कर्में केल्यानें प्रकृतीचीच उच्च बाजू व्यक्त होते, असें सांगून यज्ञसंस्थेस कलाटणी देण्याचा प्रयत्न करित आहेत. ) (१५)

**एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः ।**
**अघायुरिन्द्रियारामो मोघं पार्थ स जीवति ॥१६॥**

याप्रमाणें, हे पार्था, सृष्टिक्रमानुसार चालत आलेल्या ह्या व्यवहार-चक्राप्रमाणें जो आपलें वर्तन ठेवीत नाहीं, त्याचें आयुष्य पापमय होय. इंद्रियांचीच सुखें भोगण्यांत रममाण झालेला तो व्यर्थ जीणें जगतो.(१६)

**यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः ।**
**आत्मन्येव च संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते ।।१७।।**

परंतु जो मनुष्य आत्मतत्व जाणल्यानें आत्म्याच्या खऱ्या स्वरूपांत रममाण झालेला असतो, व जो आत्म्यामध्येंच संतुष्ट झालेला असतो, त्यांस स्वतांचें असें कांहींच कर्तव्य शिल्लक राहिलेलें नसतें. (१७)

**नैव तस्य कृतेनार्थो नाकृतेनेह कश्चन ।**
**न चास्य सर्वभूतेषु कश्चिदर्थव्यपाश्रयः ॥१८॥**

कांहीं कार्य केलें तरी किंवा न केलें तरी त्याचें त्यास कांहीं प्रयोजन नसतें किंवा कोणत्याही प्राण्याकडून त्याला कांहीं लाभ करून घ्यावयाचा असतो, असेंहि नाहीं. ( तथापि तो लोकहितार्थ कर्में करीतच असतो.)

**तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर ।**
**असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुषः ।।१९।।**

याकारितां तूंहि अनासक्त होत्सातां नेहमीं कर्तव्यकर्म करीत अस. आसक्तिरहित कर्में केल्यानेंच मनुष्य परमपदास पावतो. (१९)

**कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः ।**
**लोकसंग्रहमेवापि संपश्यन्कर्तुमर्हसि ॥२०॥**

आसक्तिरहित कर्में केल्यानेंच जनकादि महात्मे परमसिद्धि प्राप्त करते झाले. शिवाय सामान्यजनांस सन्मार्गास लावण्याचे दृष्टीनेंहि कर्तव्यकर्म करणें जरूर आहे. (२०)

**यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनाः ।**
**स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ।।२१।।**

श्रेष्ठ पुरुष जसें आचरण करितात, त्यानुसार सामान्य जन आपलें आचरण ठेवण्याचा प्रयत्न करीत असतात. ते ज्या गोष्टीला प्रमाण मानतात, तिचेंच अनुकरण सामान्य लोक करित असतात. (२१)

**न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ।**
**नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ॥२२॥**

हे अर्जुना, मला तिन्ही लोकांत काहींच कर्तव्यकर्म उरलें नाहीं. न मिळलेली वस्तू मला मिळवावयाची आहे, असेंहि नाहीं. तथापि मी कर्म करितच असतो. (२२)

**यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतन्द्रितः ।**
**मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥२३॥**

जर मी कदाचित् सावधान चित्तानें कर्मे न केलीं, तर हे पार्था, लोक सर्व प्रकारें माझें अनुकरण करतील. (२३)

**उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहम् ।**
**संकरस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः ॥२४॥**

मी जर कर्मे न केलीं तर हे लोक भ्रष्ट होतील. संकर केल्याचा दोष मला लागेल व या प्रजांची मजकडून हत्या होईल. (२४)

**सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत ।**
**कुर्याद्विद्वांस्तथासक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ॥२५॥**

ज्याप्रमाणें हे भारता, आसक्ति ठेवून अज्ञ जन कर्मे करितात त्याप्रमाणें लोकसंग्रहाची इच्छा करणाऱ्या ज्ञान्यानें अनासक्त राहून कर्मे करावीत.

**न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसङ्गिनाम् ।**
**जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समाचरन् ॥२६॥**

ज्ञानी पुरुषानें कर्मासक्त अज्ञ जनांचा बुद्धिभेद करूं नये. स्वतः अनासक्त राहून कर्मे करावीत व अज्ञ जनांच्या ठिकाणीं अशा कर्मांच्या ठायीं आवड निर्माण करावी. (२६)

**प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः ।**
**अहंकारविमूढात्मा कर्ताहमिति मन्यते ॥२७॥**

प्रकृति धर्माप्रमाणें केलीं जाणारीं सर्व कामें अहंकारी मूढ पुरुष, ‘ मी केली ’ असें मानतो. (२७)

तत्त्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः ।
गुणा गुणेषु वर्तन्त इति मत्वा न सज्जते ॥२८॥

परंतु हे महाबाहो, प्रकृतीचे मूलभूत गुणधर्म तसेंच ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें यांचें गुणधर्म व त्यांचा परस्पर कार्यसंबंध, त्यांपासून आत्मा अलिप्त आहे, हें जो ज्ञानी पुरुष जाणतो, तो गुण ( इंद्रियें ) त्यांच्या विषयांकडे ओढले जातात हें जाणून, त्यामध्यें तो लिप्त होत नाहीं. (२८)

प्रकृतेर्गुणसंमूढाः सज्जन्ते गुणकर्मसु ।
तानकृत्स्नविदो मन्दान्कृत्स्नविन्न विचालयेत् ॥ २९ ॥

प्रकृतीच्या गुणांनीं मोहित झालेले लोक गुण आणि कर्म यांचेंच ठिकाणीं आसक्त होतात. त्या नीट न समजणाऱ्या मन्दबुद्धि लोकास सर्व ज्ञानी पुरुषांनीं त्यांच्या व्यवसायापासून विचलित करूं नये. (२९)

मयि सर्वाणि कर्माणि संन्यास्याध्यात्मचेतसा ।
निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः ॥ ३० ॥

तूं ध्यानानिष्ठ चित्तानें संपूर्ण कर्में मला अर्पण करून, आशारहित व निर्मम होऊन निःशक लढाईला तयार हो. (३०)

ये मे मतमिदं नित्यमनुतिष्ठन्ति मानवाः ।
श्रद्धावन्तोऽनसूयन्तो मुच्यन्ते तेऽपि कर्मभिः ॥ ३१ ॥

ह्या माझ्या मताप्रमाणें जे मानव आचरण ठेवतात, ते मत्सररहित व श्रद्धाळू लोक, कर्मबंधनांतून मुक्त होतात. (३१)

ये त्वेतदभ्यसूयन्तो नानुतिष्ठन्ति मे मतम् ।
सर्वज्ञानविमूढांस्तान्विद्धि नष्टानचेतसः ॥३२॥

परंतु या मताचा द्वेष करणारे जे लोक याप्रमाणें आचरण ठेवीत नाहींत, ते पूर्ण अज्ञानी, चंचलचित्त व नष्ट झालेले आहेत, असें समज.

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि ।
प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति ॥३२॥

ज्ञानी पुरुष देखील आपल्या प्रकृतीच्या गुणधर्मानुरुपच वर्तन ठेवितो सर्व प्राणिमात्र आपल्या प्रकृतिनुरुप वागत असतात. हट्टानें इंद्रियदमन

करून सर्वकर्मत्याग करूं पाहाणें याचा काय उपयोग ? ( योग्य ज्ञान प्राप्त करून घेऊन इंद्रिय निग्रह करून अनासक्तरीत्या कर्तव्यकर्म करणें हें वेगळें. ) (३३)

**इन्द्रियस्येन्द्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ ।**
**तयोर्न वशमागच्छेत्तौ ह्यस्य परिपन्थिनौ ॥३४॥**

इंद्रियें आणि त्यांचे विषय, यांविषयीं प्रीति व द्वेष हे मूळचेच ठरलेले आहेत. या दोन्हींच्या तावडींत सापडूं नयें. प्रीति व द्वेष हे दोन्ही कल्याणमार्गांतील शत्रू होत. (३४)

**श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।**
**स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥३५॥**

( आतां युद्धासारख्या क्षात्रधर्मापेक्षां दुसरा धर्म इष्ट म्हणशील तर तेंहि योग्य नाहीं. कारण—) परक्याचा धर्म चांगल्या रीतीनें आचरितां येत असला, तरी स्वभावानुसार प्राप्त होणाऱ्या स्वधर्माचें अचरण हेंच ( समाज ) कल्याणकारक. (नाहींतर नेमून दिलेलीं कामें न करितां दुसरींच कामें प्रत्येकजण करीत राहिला तर समाजांत गोंधळ माजून समाजधारणेस अडथळा उत्पन्न होईल. श्लोक १८-४७ वरील टीप पाहा. ) स्वधर्माचरण करीत असतां मरण आलें तरी तें श्रेयस्कर, पण परधर्माचरण (समाजधारणेच्या दृष्टीनें ) भयावह आहे. (३५)

अर्जुन उवाच

**अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरुषः ।**
**अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः ॥३६॥**

**अर्जुन म्हणाला**—हे वृष्णिकुलोत्पन्ना, (आतां तूंच सांगितलेंस कीं, प्रत्येकजण आपल्या प्रकृतिधर्माप्रमाणें आचरण करितो, तेथें हट्ट उपयोगी नाहीं. ( श्लोक ३३ ) मग मला हें सांग कीं—) अनिच्छेनें जणूं याच्यावर बळजबरी केली आहे, अशा रीतीनें मनुष्य पापाचरण करितो. तेव्हां त्यास असें करावयास लावणारा कोण आहे बरें ? (३६)

श्रीभगवानुवाच

**काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः ।**
**महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम् ॥३७॥**

**श्रीभगवान् म्हणाले**—रजोगुणोद्भव हा काम व याचा भाऊ क्रोध. हा मोठा आधाशी व महापापी आहे, या जगांत हा मनुष्याचा मोठा वैरी आहे, हें तूं जाण. (३७)

**धूमेनाव्रियते वह्निर्यथादर्शो मलेन च ।**
**यथोल्बेनावृतो गर्भस्तथा तेनेदमावृतम् ॥३८॥**

धुरानें जसा अग्नि, धुळीनें जसा आरसा, वारेनें जसा गर्भ, त्याप्रमाणें यानें हें सर्व ज्ञान व्यापलेलें आहे. (३८)

**आवृत्तं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा ।**
**कामरूपेण कौन्तेय दुष्पूरेणानलेन च ॥३९॥**

हे कौंतेया, ह्या कामरूपी कधींहि तृप्त न होणाऱ्या अग्नीनें, हें ज्ञान व्यापलेलें आहे. हा ज्ञान्यांचा नित्यवैरी आहे. (३९)

**इन्द्रियाणि मनो बुद्धिरस्याधिष्ठानमुच्यते ।**
**एतैर्विमोहयत्येष ज्ञानमावृत्य देहिनम् ॥४०॥**

इंद्रियें, मन व बुद्धि, हीं याचीं निवासस्थानें होत. यांच्या साहाय्यानें हा ज्ञानावर पडदा टाकून मनुष्याला मोह पाडतो. (४०)

**तस्मात्त्वमिन्द्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ ।**
**पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम् ॥४१॥**

म्हणून, हे भरतश्रेष्ठा, तूं प्रथम इंद्रियांचें नियमन कर. व शास्त्रज्ञान व व्यवहारज्ञान यांचा नाश करणाऱ्या या पापी कामाला ठार कर.

**इन्द्रियाणि पराण्याहुरिन्द्रियेभ्यः परं मनः ।**
**मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः ॥४२॥**

पदार्थज्ञान करून देणारीं इंद्रियें सूक्ष्म आहेत. त्यापेक्षां मन सूक्ष्म आहे. मनापेक्षां बुद्धि सूक्ष्म आहे. बुद्धीच्याही पलीकडे आत्मा आहे.

**एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्यात्मानमात्मना ।**
**जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदम् ॥४३॥**

तेंव्हां या बुद्धीच्या पलीकडील आत्म्याला जाणून, स्वतांचें संयमन करून, हे महाबाहो, या दुर्जय कामरूप शत्रूचा निःपात कर. (४३)

श्रीमद्भगवद्गीतेंतील **कर्मयोग** नांवाचा तिसरा अध्याय
समाप्त झाला.

---

# अथ चतुर्थोऽध्यायः

श्रीभगवानुवाच

**इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् ।**
**विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत् ॥१॥**

**श्रीभगवान् म्हणाले**—हा अविनाशी योग मी प्रथम सूर्याला सांगितला. सूर्यानें मनूस व मनूनें इक्ष्वाकूस सांगितला. (१)

**एवं परम्पराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः ।**
**स कालेनेह महता योगो नष्टः परंतप ॥२॥**

हे परंतपा, याप्रमाणें परंपरेनें प्राप्त झालेला हा योग राजर्षींनीं जाणला, परंतु मध्यें बहुत काळ गेल्यानें ह्या योगाची परंपरा नष्ट झाली. (२)

**स एवायं मया तेऽद्य योगः प्रोक्तः पुरातनः ।**
**भक्तोऽसि मे सखा चेति रहस्यं ह्येतदुत्तमम् ॥३॥**

तोच हा पुरातन कर्मयोग तूं माझा भक्त आहेस, मित्र आहेस म्हणून, आज तुला सांगितला. हा कर्मयोग म्हणजे ( संसारी मनुष्यानें या जगतांत वागण्याचें ) एक अति उत्तम रहस्य आहे (३).

अर्जुन उवाच

**अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वतः ।**
**कथमेतद्विजानीयां त्वमादौ प्रोक्तवानिति ॥४॥**

( अर्जुनाच्या काळीं वैदिक कर्मकांडाचें अति प्राबल्य माजलें होतें. जो तो स्वर्गाला जाण्याचें साधन म्हणून किंवा पृथ्वीवर यश व सत्ता मिळावी म्हणून पशुयज्ञ वगैरे सारख्या अघोरी कृत्यांची कांस धरीत असें. निष्काम समाजसेवा जणूं लुप्तच झाली होती, व ह्यामुळें समाज-धारणेचा पायाच उखडला जाण्याची भीति निर्माण झाली होती. अशा वेळीं लोकांचें लक्ष पुन्हां कर्मयोगाकडे लागावें म्हणून अर्जुनास निमित्त मात्र करून, प्रत्येक संसारी माणसानें या जगतांत कसें वागावे हा उपदेश भगवंतांनीं पुन्हां येथें केला आहे. )

अर्जुन म्हणाला—आपला जन्म अलिकडचा. सूर्याचा जन्म पूर्वीचा. अशा स्थितींत हें मी कसें जाणूं कीं तुम्ही हा मार्ग प्रथम सांगितला. (४)

श्रीभगवानुवाच

**बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन ।**
**तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप ॥५॥**

श्रीभगवान् म्हणाले—हे अर्जुना, माझे आणि तुझे आतांपर्यंत पुष्कळ जन्म झाले. ते सर्व मी जाणतो, आणि हे परंतपा, तूं जाणत नाहींस, एवढाच फरक. (५)

**अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन् ।**
**प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया ॥६॥**

मी अजन्मा व अविनाशी असून देखील व सर्व प्राणिमात्रांचा मालक असून देखील, स्वतांच्या प्रकृतीच्या आश्रयानें व आपल्या मायेनें मी जन्म पावतो. ( परमात्माच स्वतःच्या मायेनें जन्म घेत असतो. ) (६)

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥७॥**

जेव्हां जेव्हां धर्माचा ऱ्हास व अधर्माचरणाची वाढ होते, तेव्हां तेव्हां मी जन्म घेत असतो. ( सृष्टिक्रम व समाजधारणा योग्य रीतीनें होण्यासाठीं, मधून मधून परमात्मा महात्म्याच्या रूपानें अवतार घेत असतो. आपण कल्पना केलेल्या परमेश्वराचा—जगताचा—हें सारें विश्व सत्त्व, रज व तम यांच्या विशिष्ट मिश्रणानें एका समतोल पातळीवर चालावे, हा गुणधर्म आहे. हा समतोलपणा ढळण्याचा प्रसंग निर्माण झाला तर ह्या विश्वांतून हा समतोलपणा पूर्ववत् प्रस्थापित करण्याकरितां सात्त्विक गुण प्रधान अशी प्रभावी व्यक्ति निर्माण होते, हा मतितार्थ ) (७)

**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥८॥**

सज्जनांचे रक्षण करण्यासाठीं व दुर्जनांचें पारिपत्य करण्यासाठीं, तसेंच धर्माची स्थापना करण्यासाठीं मी प्रत्येक युगांत अवतार घेत असतो. (८)

**जन्म कर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्त्वतः ।**
**त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन ॥ ९ ॥**

यांप्रमाणें माझा जन्म व माझें कर्म हें अलौकिक आहे, हें जो यथार्थ-पणें जाणतो, तो देह टाकून मग पुनर्जन्म पावत नाहीं, तर हे अर्जुना, तो मला येवून मिळतो. ( म्हणजे अमृतत्वास जाऊन मिळतो ) (९)

**वीतरागभयक्रोधा मन्मया मामुपाश्रिताः ।**
**बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागताः ॥१०॥**

प्रीति, भय आणि क्रोधरहित व अनन्यचित्तानें माझे ठायीं लीन झालेले, व माझाच आश्रय घेतलेले, ज्ञानरूप तपानें पावन झालेले, पुष्कळ लोक मला येवून मिळाले आहेत. (१०)

**ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ।**
**मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥११॥**

जे लोक ज्या रीतीनें मला भजतात त्याच रीतीनें मी त्यांस फल देत असतो. हे पार्था, सर्व मनुष्यें कोणत्याही मार्गानें शेवटीं माझ्याच मार्गाला येवून मिळतात. (११)

**काङ्क्षन्तः कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवताः ।**
**क्षिप्रं हि मानुषे लोके सिद्धिर्भवति कर्मजा ॥१२॥**

आपण केलेल्या कर्मांचें फळ मिळावें म्हणून लोक येथें देवतांची पूजा करीत असतात. या मनुष्य लोकांत केलेल्या कर्मांचें फळ लवकर मिळत असते. (१२)

**चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः ।**
**तस्य कर्तारमपि मां विद्ध्यकर्तारमव्ययम् ॥१३॥**

प्रत्येकांचे गुण व कर्म जाणून (समाज धारणेकरितां) मी चातु-र्वर्ण्य व्यवस्था केली आहे. त्याचा मी कर्ता आहे, हें, व त्याचा अवि-नाशी अकर्ता आहे, हेंही तूं जाण. ( व्यक्तरूपानें आत्ममायेनें हें चातु-र्वर्ण्य मी निर्माण केलेले आहे. पण माझें अव्यक्त परमात्मरूप तूं जाणलेंस

तर त्या अवस्थेमध्यें मी कशाचाच कर्ता नाहीं, हेंही तूं जाणशील. जन्मजात चातुर्वर्ण्य गीतेस मान्य नाहीं. गुणकर्मविशिष्ट चातुर्वर्ण्य व्यवस्था गीतेस अभिप्रेत आहे.) (१३)

**न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा ।**
**इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बध्यते ॥१४॥**

कारण मला कर्माची बाधा होत नाहीं, किंवा कर्मफलावरहि माझी आसक्ति नाहीं. याप्रमाणें जो मला जाणतो, (व स्वतां कर्में करितो) त्यासही कर्माची बाधा होत नाहीं. (१४)

**एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः ।**
**कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम् ॥१५॥**

हें जाणूनच पूर्वींच्या मुमुक्षूंनीं कर्में केलीं आहेत. तूंही पूर्वींच्या लोकांनीं ज्याप्रमाणें त्याकाळीं कर्म केलें, त्याप्रमाणें कर्म कर. (१५)

**किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः ।**
**तत्ते कर्म प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ॥१६॥**

(आतांपर्यंत 'कर्म कर' 'निष्काम कर्म कर' वगैरे पुष्कळ उपदेश केला. पण 'कर्म' या शब्दाचा नीट अर्थ कळावा म्हणून तो आतां येथें विशद करून सांगत आहेत.) 'कर्म' म्हणजें काय ? 'अकर्म' म्हणजे काय ? याचा अर्थ जाणतांना ज्ञानी मनुष्यांची देखील मति गुंग झाली आहे. याकारितां तें कर्म म्हणजे काय, तें येथें सांगतों. हें जाणलें असतां, तूं अशुभ अशा संसार बंधांपासून मुक्त होशील (१६)

**कर्मणो ह्यपि बोद्धव्यं बोद्धव्यं च विकर्मणः ।**
**अकर्मणश्च बोद्धव्यं गहना कर्मणो गतिः ॥१७॥**

(स्वधर्मरूप) सामान्य कर्म म्हणजे काय (मानसिक कुवतीप्रमाणें केलेलें) विशेष कर्म म्हणजे काय, व (निष्काम कर्म म्हणजे) अकर्म म्हणजे काय, हें नीट जाणून घेतलें पाहिजे. कर्माचें योग्य ज्ञान होणें कठीण आहे. (१७)

**कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः ।**
**स बुद्धिमान्मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ॥१८॥**

(फलाशारहित कर्म केल्यानें तें करूनहि तें कर्त्यास बाधक होत नाहीं. तो अशा कर्मांचा कर्ता असूनहि, त्याची त्यास बाधा होत नसल्यानें तो त्यांचा अकर्ताच असतो. अशा ) कर्मामध्यें जो अकर्म पाहातों व ( स्वस्थ बसणें म्हणजे तें अकर्म होय अशी सामान्य समजूत ) या अकर्मांत कर्म आहे असें जो पाहातों; तोच मानवांमध्यें बुद्धिमान् पुरुष होय. तोच योगी व तोच संपूर्ण कर्में करणारा होय. (१८)

**यस्य सर्वे समारम्भाः कामसंकल्पवर्जिताः ।**
**ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहुः पण्डितं बुधाः ॥१९॥**

ज्याचे सर्व उद्योग कामना व संकल्परहित आहेत, ज्ञानरूप अग्निनें ज्याच्या कर्मांतील कर्मबंध दग्ध होऊन गेलेले आहेत, अशा पुरुषास विद्वान् लोक पंडित म्हणतात. (१९)

**त्यक्त्वा कर्मफलासङ्गं नित्यतृप्तो निराश्रयः ।**
**कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किञ्चित्करोति सः ॥२०॥**

जो कर्मफलांवरील आसक्ति सोडून, नेहमीं संतुष्ट व सांसारिक आश्रयानें रहित असतो, तो सर्व कर्में योग्य रीतीनें करित असला तरी, तो कांहीं करीत नाहीं, असेंच म्हटलें पाहिजे. (२०)

**निराशीर्यतचित्तात्मा त्यक्तसर्वपरिग्रहः।**
**शारीरं केवलं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥२१॥**

फलाशेचा त्याग करणारा, इंद्रियावर पूर्ण ताबा असणारा व सर्वसंग परित्याग केलेला असा पुरुष केवळ शारीरिक कर्म केल्यानें पापबद्ध होत नाहीं. (२१)

**यदृच्छालाभसंतुष्टो द्वन्द्वातीतो विमत्सरः ।**
**समः सिद्धावसिद्धौ च कृत्वापि न निबध्यते ॥२२॥**

सहज रीतीनें प्राप्त होणाऱ्या वस्तूनें संतुष्ट असलेला, सुखदुःख शीतोष्ण इत्यादि द्वंद्वांच्या पलिकडे गेलेला, निर्मत्सरी, लाभ हानीच्या

-बावतींत समदृष्टीनें पाहणारा असा पुरुष कर्में करूनहि त्यांच्या बंधनांनीं बांधला जात नाहीं. (२२)

**गतसङ्गस्य मुक्तस्य ज्ञानावस्थितचेतसः ।**
**यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते ॥२३॥**

आसक्तिरहित, रागद्वेषादि पासून मुक्त, ज्ञानानें ज्याचें चित्त स्थीर झालेलें आहे, असा पुरुष केवळ यज्ञचक्र (सृष्टिक्रम व समाजधारणा) सुरळीत चालावे म्हणून जें कर्म करतो, तें सर्व लय पावते. (त्याचे गुण-दोष त्यास लागत नाहींत.) (२३)

**ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ।**
**ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥२४॥**

कर्मयोग्याला, यज्ञाचीं साधनें, यज्ञद्रव्यें, अग्नि, हवनक्रिया, हीं सर्व ब्रह्मरूप भासूं लागतात. याप्रमाणें ब्रह्मरूप कर्मांच्या समाधीत रममाण झालेला हा पुरुषही ब्रह्मरूपच होतो. (२४)

**दैवमेवापरे यज्ञं योगिनः पर्युपासते ।**
**ब्रह्माग्नावपरे यज्ञं यज्ञेनैवोपजुह्वति ॥२५॥**

दूसरे कांहीं योगी देवतांच्या पूजनरूपीं यज्ञाची कांस धरितात. दुसरे ज्ञानीजन ब्रह्मरूप अग्नीमध्यें यज्ञानेंच यज्ञाचें हवन करितात. (योगी ब्रह्मरूप व जगही ब्रह्मरूप. यज्ञही ब्रह्मरूपच. मग निष्काम कर्म हाच यज्ञ होतो.) (२५)

**श्रोत्रादीनीन्द्रियाण्यन्ये संयमाग्निषु जुह्वति ।**
**शब्दादीन्विषयानन्ये इन्द्रियाग्निषु जुह्वति ॥२६॥**

(त्याकाळीं यज्ञास अवास्तव महत्व असल्यानें, लोकांचा बुद्धिभेद होऊं नये म्हणून, यज्ञास अतिव्यापक स्वरूप गीताकार आतां देतात. सृष्टिक्रम व समाजधारणा, योग्य रीतीनें व्हावीत म्हणुन आरंभिलेलें कर्म म्हणजे यज्ञ, असा अर्थ गीताकारांना अभिप्रेत आहे.) श्रोत्रादि इंद्रियांचा स्वाधीनतारूप अग्निमध्यें कांहीं लोक हवन करितात. दुसरे शब्दादिक विषयांचें इंद्रियरूप अग्नीमध्यें हवन करितात. (उपभोग्य वस्तू रागद्वेषरहित इंद्रियांचे द्वारा ग्रहण केल्यानें, त्या आपोआपच भस्म होतात.) (२६)

**सर्वाणीन्द्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे ।**
**आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते ॥२७॥**

आणखी दुसरे योगीजन सर्व इंद्रियकर्म व प्राणांचे व्यापार यांचे ज्ञानानें प्रदीप्त झालेल्या आत्मसंयमरूप अग्नींत हवन करितात. (२७)

**द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा योगयज्ञास्तथापरे ।**
**स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रताः ॥२८॥**

दुसरे कांहीं संयमी यति ( ईश्वरार्पणबुद्धीनें लोकसेवेंमध्यें ) द्रव्य देऊन यज्ञ करितात, कांहीं ( स्वधर्मपालनरूप ) तप यज्ञ करितात कांहीं अष्टांग-योगरूप यज्ञ करितात, कांहीं स्वाध्याय ( कर्मानुष्ठान ) यज्ञ करितात; व इतर कोणी ज्ञानयज्ञ करितात. (२८)

**अपाने जुह्वति प्राणं प्राणेऽपानं तथापरे ।**
**प्राणापानगती रुद्ध्वा प्राणायामपरायणाः ॥२९॥**

तसेंच कोणी अपानवायूमध्यें प्राणवायूचें हवन करितात ( पूरक ). कोणी प्राणवायूमध्यें अपानवायूचें हवन करितात ( रेचक ). कोणी प्राणा-यामांत परायण असलेलें प्राण व अपान या दोहोंचाहि निरोध करितात ( कुंभक ). ( प्राण—उच्छ्वास व अपान—श्वासवायू ). (२९)

**अपरे नियताहाराः प्राणान्प्राणेषु जुह्वति ।**
**सर्वेऽप्येते यज्ञविदो यज्ञक्षपितकल्मषाः ॥३०॥**

दुसरे कांहीं योगी आपला आहार नियमित करून प्राणवायूमध्यें हवन करितात. वरील सर्व प्रकारचे यज्ञ करणारे हे यज्ञवेत्ते होत. हे यज्ञानें आपलीं पापें धुवून टाकितात. (३०)

**यज्ञशिष्टामृतभुजो यान्ति ब्रह्म सनातनम् ।**
**नायं लोकोऽस्त्ययज्ञस्य कुतोऽन्यः कुरुसत्तम ॥३१॥**

यज्ञ करून शिल्लक राहिलेलें अन्न हेंच अमृत, याचा उपभोग करणारे सनातन परब्रह्माची प्राप्ति करून घेतात. जे यज्ञ करीत नाहींत त्यांना इहलोक मिळत नाहीं, मग हे कुरुश्रेष्ठा, परलोकाची वार्ता कशाला ?

**एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे ।**
**कर्मजान्विद्धि तान्सर्वानेवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे ॥३२॥**

याप्रमाणें हे नाना प्रकारचे यज्ञ प्रत्यक्ष ब्रह्माच्या मुखांत चालू असतात. ( वेदवाणीनेंच हे प्रसृत केलेले आहेत. ) हे सर्व इंद्रियांच्या क्रियाद्वारा निर्माण झालेलें आहेत, हे जाण. हें जाणलें असतां तूं कर्मबंधापासून मुक्त होशील. (३२)

**श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परंतप ।**
**सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ॥३३॥**

हे परंतपा, द्रव्ययज्ञापेक्षां ज्ञानयज्ञ केव्हांहि श्रेष्ठ. हे पृथुनंदना, सर्व प्रकारचें कर्म अखेर ज्ञानामध्येंच विलीन होतें. ( ज्ञान ही कर्माची पराकाष्ठा आहे.) (३३)

**तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।**
**उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥३४॥**

तत्वदर्शी ज्ञानीजनांपासून त्यांना शरण गेल्यानें ( प्राणिपातेन–साष्टांग नमस्कार केल्यानें ) त्यांची सेवा केल्यानें, त्यांना निष्कपटभावानें प्रश्न विचारून, हे ज्ञान तुला प्राप्त होईल, हें लक्षांत घे. (३४)

**यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि पाण्डव ।**
**येन भूतान्यशेषेण द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि ॥३५॥**

हे पांडवा, हें ज्ञान एकदां मिळाल्यानंतर तूं पुन्हां अशाप्रकारें मोहित होणार नाहींस. या ज्ञानानेंच तूं सर्व प्राणिमात्र आपल्या ठिकाणीं राहत आहेत, हें पाहाशील. (पृथ्वीच्याच अंशांपासून प्रत्येक प्राणिमात्र झालेला आहे. हें ज्ञान झाल्यानें सर्व प्राणिमात्रांतील आपपर भाव तत्ववेत्त्यांत राहाणार नाहीं. यामुळें सर्वत्र प्राणिमात्र आपणांत व परमात्म स्वरूपांत सामावतात ही भावना दृढ होईल.) (३५)

**अपि चेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः ।**
**सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि ॥३६॥**

**सर्वाणीन्द्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे ।**
**आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते ॥२७॥**

आणखी दुसरे योगीजन सर्व इंद्रियकर्म व प्राणांचे व्यापार यांचे ज्ञानानें प्रदीप्त झालेल्या आत्मसंयमरूप अग्नींत हवन करितात. (२७)

**द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा योगयज्ञास्तथापरे ।**
**स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रताः ॥२८॥**

दुसरे कांहीं संयमी यति ( ईश्वरार्पणबुद्धीनें लोकसेवेंमध्यें ) द्रव्य देऊन यज्ञ करितात, कांहीं ( स्वधर्मपालनरूप ) तप यज्ञ करितात कांहीं अष्टांगयोगरूप यज्ञ करितात, कांहीं स्वाध्याय ( कर्मानुष्ठान ) यज्ञ करितात; व इतर कोणी ज्ञानयज्ञ करितात. (२८)

**अपाने जुह्वति प्राणं प्राणेऽपानं तथापरे ।**
**प्राणापानगती रुद्ध्वा प्राणायामपरायणाः ॥२९॥**

तसेंच कोणी अपानवायूमध्यें प्राणवायूचें हवन करितात ( पूरक ). कोणी प्राणवायूमध्यें अपानवायूचें हवन करितात ( रेचक ). कोणी प्राणायामांत परायण असलेलें प्राण व अपान या दोहोंचाहि निरोध करितात ( कुंभक ). ( प्राण—उच्छ्वास व अपान—श्वासवायू ). (२९)

**अपरे नियताहाराः प्राणान्प्राणेषु जुह्वति ।**
**सर्वेऽप्येते यज्ञविदो यज्ञक्षपितकल्मषाः ॥३०॥**

दुसरे कांहीं योगी आपला आहार नियमित करून प्राणवायूमध्यें हवन करितात. वरील सर्व प्रकारचे यज्ञ करणारे हे यज्ञवेत्ते होत. हे यज्ञानें आपलीं पापें धुवून टाकितात. (३०)

**यज्ञशिष्टामृतभुजो यान्ति ब्रह्म सनातनम् ।**
**नायं लोकोऽस्त्ययज्ञस्य कुतोऽन्यः कुरुसत्तम ॥३१॥**

यज्ञ करून शिल्लक राहिलेलें अन्न हेंच अमृत, याचा उपभोग करणारे सनातन परब्रह्माची प्राप्ति करून घेतात. जे यज्ञ करीत नाहींत त्यांना इहलोक मिळत नाहीं, मग हे कुरुश्रेष्ठा, परलोकाची वार्ता कशाला ?

**एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे ।**
**कर्मजान्विद्धि तान्सर्वानेवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे ॥३२॥**

याप्रमाणें हे नाना प्रकारचे यज्ञ प्रत्यक्ष ब्रह्माच्या मुखांत चालू असतात. (वेदवाणीनेंच हे प्रसृत केलेले आहेत.) हे सर्व इंद्रियांच्या क्रियाद्वारा निर्माण झालेलें आहेत, हे जाण. हें जाणलें असतां तूं कर्मबंधापासून मुक्त होशील. (३२)

**श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परंतप ।**
**सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ॥३३॥**

हे परंतपा, द्रव्ययज्ञापेक्षां ज्ञानयज्ञ केव्हांहि श्रेष्ठ. हे पृथुनंदना, सर्व प्रकारचें कर्म अखेर ज्ञानामध्येंच विलीन होतें. (ज्ञान ही कर्माची पराकाष्ठा आहे.) (३३)

**तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।**
**उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥३४॥**

तत्त्वदर्शी ज्ञानीजनांपासून त्यांना शरण गेल्यानें (प्रणिपातेन—साष्टांग नमस्कार केल्यानें) त्यांची सेवा केल्यानें, त्यांना निष्कपटभावानें प्रश्न विचारून, हे ज्ञान तुला प्राप्त होईल, हें लक्षांत घे. (३४)

**यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि पाण्डव ।**
**येन भूतान्यशेषेण द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि ॥३५॥**

हे पांडवा, हें ज्ञान एकदां मिळाल्यानंतर तूं पुन्हां अशाप्रकारें मोहित होणार नाहींस. या ज्ञानानेंच तूं सर्व प्राणिमात्र आपल्या ठिकाणीं राहत आहेत, हें पाहाशील. (पृथ्वीच्याच अंशांपासून प्रत्येक प्राणिमात्र झालेला आहे. हें ज्ञान झाल्यानें सर्व प्राणिमात्रांतील आपपर भाव तत्त्ववेत्त्यांत राहाणार नाहीं. यामुळें सर्वच प्राणिमात्र आपणांत व परमात्म स्वरूपांत सामावतात ही भावना दृढ होईल.) (३५)

**अपि चेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः ।**
**सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि ॥३६॥**

आतां असें जरी समजलें कीं, तूं सर्व दुराचारी लोकांपेक्षांही अधम आहेस, तरी ह्या पापाची नदी तूं ह्या ज्ञाननौकेनेंच तरून जाशील.(३६)

**यथैधांसि समिद्धोऽग्निर्भस्मसात्कुरुतेऽर्जुन ।**
**ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा ॥३७॥**

हे अर्जुना, प्रज्वलित अग्नि ज्याप्रमाणें सर्व इन्धन भस्मसात करितो, त्याप्रमाणें ज्ञानरूप अग्नि सर्व बऱ्यावाईट कर्मांचें भस्म करितो. (३७)

**न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।**
**तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि विन्दति ॥३८॥**

या जगतांत ज्ञानापेक्षां दुसरें कांहीं पवित्र नाहीं. कर्मयोगी पुष्कळ काळ शुद्ध कर्माचरणानें आपोआपच हें ज्ञान मिळवितो. (३८)

**श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः ।**
**ज्ञानं लब्ध्वा परां शान्तिमचिरेणाधिगच्छति ॥३९॥**

जो श्रद्धावान् आहे, जितेंद्रिय आहे व ज्ञान मिळविण्याची इच्छा ज्याचे ठिकाणीं आहे, असा पुरुष ज्ञान मिळवितो. एकदां हें ज्ञान मिळविल्यावर तो लवकरच परम चित्तशांति मिळवितो. (३९)

**अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति ।**
**नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः ॥४०॥**

जो अज्ञ आहे, श्रद्धेचा ज्याच्या ठिकाणीं वास नाहीं, आणि जो संशयात्मा आहे, तो परमार्थापासून भ्रष्ट होतो. अशा संशयात्म्यास धड हा लोक मिळत नाहीं, धड परलोक नाहीं व सुखही मिळत नाहीं.(४०)

**योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंछिन्नसंशयम् ।**
**आत्मवन्तं न कर्माणि निबध्नन्ति धनंजय ॥४१॥**

हे धनंजया, योगद्वारा ज्यानें सर्व कर्मांचा संन्यास केला आहे, व ज्ञानानें सर्व संशय दूर केले आहेत, अशा आत्मज्ञान्याला कर्मांचें बंधन लाऊं शकत नाहीं. (४१)

**तस्मादज्ञानसंभूतं हृत्स्थं ज्ञानासिनात्मनः ।**
**छित्त्वैनं संशयं योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत ॥४२॥**

याकरितां अज्ञानानें उत्पन्न झालेला तुझ्या हृदयांतील संशय ज्ञानरूप खड्गानें छेदून, समत्वबुद्धिरूप कर्मयोगाचें अवलंबन कर, व युद्धास तयार हो. (४२)

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायांयोगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे ज्ञानकर्मसंन्यासयोगो नाम
चतुर्थोऽध्याय ॥ ४ ॥

**श्रीमद्भगवद्गीतेंतील ज्ञानकर्मसंन्यासयोग नांवाचा**
**चवथा अध्याय समाप्त**

---

राजा ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम .........
विभाग .........
क्रमांक .........
नों. दि. .........

# अथ पञ्चमोऽध्यायः

अर्जुन उवाच

**संन्यासं कर्मणां कृष्ण पुनर्योगं च शंससि ।**
**यच्छ्रेय एतयोरेकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम् ॥१॥**

**अर्जुन म्हणाला**—हे कृष्णा, कर्मसंन्यासाची तसेंच निष्काम कर्मयोगाची, दोहोंचीहि प्रशंसा करतोस. या दोहोंतून जें एक अति श्रेयस्कर तेंच एक मला निश्चयेंकरून सांग. (१)

श्रीभगवानुवाच

**संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ ।**
**तयोस्तु कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते ॥२॥**

( त्याकाळीं सांख्य-( ज्ञानयोग किंवा संन्यासयोग ) व योग ( निष्काम-कर्मयोग ) या दोन मतांचा जनमनांवर परिणाम झालेला होता. त्यांतल्यात्यांत सांख्यमत मोक्षमार्गांतील उत्कृष्ट साधन, ही कल्पना जास्त बळावली होती. कर्मयोग हा सांख्ययोगापेक्षां कमी लेखण्याची पद्धति पडून गेली होती. अशा स्थितींत अर्जुनास श्रीकृष्ण निष्काम कर्मयोगाची कांस धरून युद्धास तयार हो, असें सांगत. पण त्याचबरोबर सर्वकर्म-संन्यास किंवा ज्ञानयोग हा श्रेष्ठ असें म्हणत. ज्ञानयोग व कर्मयोग हे दोन्ही भिन्न नव्हेत, असें कांहीं श्रीकृष्णांनीं आतांपर्यंत निश्चितपणें म्हटलेलें नाहीं. याकारितां अर्जुनाच्या मनांत श्रीकृष्णास निश्चित्‌पणें काय म्हणावयाचें आहे, याबद्दल संशय निर्माण झाला. ज्ञानप्राप्तीचा एक मार्ग ' परिप्रश्न ' यायोगें त्या संशयाचें निवारण अर्जुन करून घेत आहे. या अध्यायांत मांडलेल्या सर्व कल्पना पूर्वीच्या अध्यायांत येवून गेलेल्या आहेत. पण नवशिक्यास एखादी नवीन गोष्ट पटवून देतांना तीच गोष्ट निरनिराळ्या शब्दांत सांगतात, त्याच पद्धतीचा गीताकारांनीं अवलंब केलेला आहे. )

ग्रं. क्र. ८८३४

श्रीभगवान् म्हणाले—संन्यास आणि कर्मयोग हे दोन्ही मार्ग मोक्षकारी आहेत. तथापि त्या दोहोंमध्यें कर्मसंन्यासापेक्षां कर्मयोग श्रेष्ठ आहे. (२)

**ज्ञेयः स नित्यसंन्यासी यो न द्वेष्टि न काङ्क्षति ।**
**निर्द्वन्द्वो हि महाबाहो सुखं बन्धात्प्रमुच्यते ॥३॥**

( सर्वकर्मसंन्यास शक्यच नाहीं, निव्वळ स्वस्थ बसणें हें देखील कर्मच होय, हें तिसऱ्या अध्यायांत सांगितलें आहे. खरा संन्यासी म्हणजे कर्मफलसंन्यासी, कर्मसंन्यासी नव्हे, हेंहि तिसऱ्या अध्यायांत ( श्लोक ३० पहा ) सांगितलें आहे. हीच कल्पना या अध्यायांत विस्तारानें सांगितली आहे.

ह्या कल्पनेप्रमाणें श्रीशंकराचार्यांसारखे लोकही निष्कामकर्मयोगीच होत. संसारी माणसाप्रमाणें त्यांनीं लग्नकार्य केलें नाहीं म्हणूनच त्यांना लौकिकार्थानें संन्यासी म्हणावयाचे. या सकृद्दर्शनीं परस्पर भिन्न दिसणाऱ्या मार्गाचें यथायोग्य एकीकरण अभिनवरीत्या केलें म्हणूनच गीतेस सर्वसंग्राहक म्हणावयाचें. )

हे महाबाहो, जो कोणाचाही द्वेष करीत नाहीं, व जो कशाचीही अपेक्षा करीत नाहीं, तो ( निष्काम कर्मयोगी ) नित्यसंन्यासीच समजावा. तो द्वंद्वातीत असल्यानें सहजच कर्मबंधनापासून मुक्त होतो. (३)

**सांख्ययोगौ पृथग्बालाःप्रवदन्ति न पण्डिताः ।**
**एकमप्यास्थितः सम्यगुभयोर्विन्दते फलम् ॥४॥**

सांख्य आणि योग हे निरनिराळे आहेत, असे अज्ञजन म्हणतात, पंडित म्हणत नाहींत. या दोहोंपैकीं एकाचे जरी आचरण योग्य रीतीनें केलें तरी, दोहोंचेंही फल प्राप्त होतें. (४)

**यत्सांख्यैःप्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते ।**
**एकं सांख्यं च योगं च य पश्यति स पश्यति ॥**

ज्ञानयोगी जें स्थान मिळवितात, तें कर्मयोगीही मिळवितात. सांख्य आणि योग हें एकच आहेत, हें ज्याला नीट कळलें, त्यालाच खरें ज्ञान झालें असें म्हणावयाचे. (५)

**संन्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः ।**
**योगयुक्तो मुनिर्ब्रह्म न चिरेणाधिगच्छति ॥६॥**

संन्यास झाला तरी, हे महाबाहो, योगाशिवाय प्राप्त करून घेणें कठीण आहे. योगयुक्त मुनि शीघ्र ब्रह्माची प्राप्ति करून घेतो. (६)

**योगयुक्तो विशुद्धात्मा विजितात्मा जितेन्द्रियः ।**
**सर्वभूतात्मभूतात्मा कुर्वन्नपि न लिप्यते ॥७॥**

(संन्यास व योग, हे दोन्ही एकच आहेत, असा अर्थ गीताकारास अभिप्रेत असतां हे दोन्ही मार्ग जणुं वेगळे आहेत अशा दृष्टीनें येथें वर्णन चालूं आहे. यावरून मनुष्य पुन्हां बुचकळ्यांत पडतो. श्रीशंकराचार्य व श्री. टिळक हे दोघेही कर्मयोगी असतां, ज्याप्रमाणें आपण लौकिकार्थानें श्रीशंकराचार्यांस संन्यासी म्हणतो व श्री. टिळकांना आपण कर्मयोगी म्हणतो, त्याच अर्थानें ह्या दोहोंतील अर्थभेद गृहीत धरून ह्या दोन मार्गांचें येथें विवरण आहे. या अर्थानें मूळांतच श्रीशंकराचार्य किंवा श्रीज्ञानेश्वर पूर्ण ज्ञानी असल्यानें अत्युत्कृष्ट समाजसेवा करण्याकरितां ते संसारबंधनांत पडले नाहींत. पण हा मार्ग केव्हांही कठीणच. श्रीशंकर, श्रीज्ञानेश्वर, श्रीरामदास यांच्यासारखे जन्मतःच ज्ञानी कर्मयोगी मिळणें, विरळे. याकरितांच लौकिकार्थानें संन्यासमार्गाचें आचरण करून निष्काम कर्मयोगाची कांस धरणें कठीण आहे, असें सांगून श्रीकृष्ण अर्जुनासारख्या संसारी माणसास, संसारांत राहूनच मनोनिग्रह करून, हळूहळू निष्काम कर्म करण्याच्या रीतीनें पूर्ण ज्ञान प्राप्त करून घेऊन खरा कर्मयोगी व्हावे असा उपदेश करितात.)

जितेंद्रिय, मनावर ज्यानें ताबा मिळविला आहे, शुद्ध अंतःकरणाचा व सर्व प्राणिमात्रांचा आत्मा जो स्वतःच्या आत्म्यांत पाहातो, असा कर्मयोगी, कर्में करूनही त्यांच्या बंधनांपासून अलिप्त असतो. (७)

**नैव किंचित्करोमीति युक्तो मन्येत तत्त्ववित् ।**
**पश्यञ्शृण्वन्स्पृशञ्जिघ्रन्नश्नन्गच्छन्स्वपञ्श्वसन् ॥८॥**

प्रलपन्विसृजन्गृह्णन्नुन्मिषन्निमिषन्नपि ।
इन्द्रियाणीन्द्रियार्थेषु वर्तन्त इति धारयन् ॥९॥

जो खरा तत्वदर्शी कर्मयोगी आहे, तो पहात असतां, ऐकत असतां, स्पर्श करीत असतां, वास घेत असतां, अन्न घेत असतां, चालत असतां, निजत असतां, श्वास घेत असतां, बोलत असतां, मलमूत्र विसर्जन करीत असतां, कांहीं ग्रहण करीत असतां, डोळ्यांची उघडझांप करीत असतां (थोडक्यांत कोणतीही क्रिया करीत असतां) इंद्रियें आपापल्या विषयांच्या ठिकाणीं प्रवृत्त होत आहेत असें समजून मी कांहीं करीत नाहीं असें मानतो. (८-९)

ब्रह्मण्याधाय कर्माणि सङ्गं त्यक्त्वा करोति यः ।
लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवाम्भसा ॥१०॥

आसक्तिरहित ब्रह्मार्पणबुद्धीनें जो कर्में करितो, तो कमळपत्र ज्याप्रमाणें पाण्यानें लिप्त होत नाहीं, तसें तो कर्मांपासून होणाऱ्या पापानें लिप्त होत नाहीं. (१०)

कायेन मनसा बुद्ध्या केवलैरिन्द्रियैरपि ।
योगिनः कर्म कुर्वन्ति सङ्गं त्यक्त्वात्मशुद्धये ॥११॥

योगीजन कर्मफलावरील आवड सोडून आत्मशुद्धीकरितां, शरीरानें, मनानें, बुद्धीनें किंवा निव्वळ इंद्रियांकडून कर्में करीत असतात. (११)

युक्तःकर्मफलं त्यक्त्वा शान्तिमाप्नोति नैष्ठिकीम्
अयुक्तःकामकारेण फले सक्तो निबध्यते ॥१२॥

योगी पुरुष कर्मफलावरील आसक्ति सोडल्यानें भगवत्प्राप्तिरूप शांति मिळवितो. या उलट सकामी पुरुष कर्मफलांमध्यें आसक्त झाल्यानें कामनेच्या द्वारा बांधला जातो. (१२)

सर्वकर्माणि मनसा संन्यस्यास्ते सुखं वशी ।
नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन् ॥१३॥

ज्यानें सर्वेन्द्रियावर ताबा मिळविला आहे, असा पुरुष सर्व कर्मांचा मनानें त्याग करून सुखी असतो. तो डोळे, नाकपुड्या, तोंड, कान, जननेंद्रिय, आणि गुद हीं नऊ दारें असलेल्या शरीरांत स्वतां कांहीं न करितां किंवा करवितां सुखी असतो. (कर्मांचा आत्म्याशीं कांहीं संबंध नाहीं, हें त्यास समजते. (१३)

**न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः।**
**न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते ॥१४॥**

परमेश्वर, कर्तेपणा, कर्मे किंवा त्यांचा फलांशीं संयोग, हें कांहींच निर्माण करीत नाहीं. परमात्म्याच्या सानिध्यांत असलेली प्रकृतीच ह्या सर्व गोष्टी करीत असते. (१४)

**नादत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः।**
**अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः ॥१५॥**

परमेश्वर कोणाचें पाप घेत नाहीं, तसेंच कोणाचें पुण्य घेत नाहीं. अज्ञानानें ज्ञान झांकाळलें गेल्यानें प्राणिमात्र पापपुण्याच्या मोहांत गुरफटून जातात. (१५)

**ज्ञानेन तु तदज्ञानं येषां नाशितमात्मनः।**
**तेषामादित्यवज्ज्ञानं प्रकाशयति तत्परम् ॥१६॥**

परंतु ज्ञानाच्या योगानें ज्यांचें अज्ञान नष्ट झालें आहे, त्यांचें ज्ञान सूर्याच्या तेजाप्रमाणें परब्रह्मावर प्रकाश टाकते. (१६)

**तद्बुद्धयस्तदात्मानस्तन्निष्ठास्तत्परायणाः।**
**गच्छन्त्यपुनरावृत्तिं ज्ञाननिर्धूतकल्मषाः ॥१७॥**

ज्यांची बुद्धि ब्रह्मरूप झाली, ज्यांचें मन ब्रह्मरूप झालें, ज्यांची निष्ठा तेथेंच स्थिरता पावली व जे स्वतःच ब्रह्मरूप झाले, असे योगी ज्ञानानें त्यांचीं सर्व पापें धुवून गेल्यानें, पुनर्जन्म पावत नाहींत. (१७)

**विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि।**
**शुनि चैव श्वपाके च पण्डिताःसमदर्शिनः ॥१८॥**

विद्या आणि विनयानें संपन्न ब्राह्मण, तसेंच गाय, हत्ती किंवा कुत्रा च चांडाल या सर्वांच्या ठिकाणीं असे पंडित तात्त्विकदृष्ट्या एकाच भावनेनें पाहातात. (१८)

**इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः ।**
**निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद्ब्रह्मणि ते स्थिताः ॥ १९ ॥**

ज्यांचें मन अशा साम्यावस्थेप्रत पोचलेलें आहे, त्यांनीं जीवितावस्थेमध्येंच हा संपूर्ण संसार जिंकला असें समज. कारण ब्रह्म हें निर्दोष व सर्वत्र समान आहे, म्हणून या परमात्म्याच्या ठायीं असें पुरुष स्थिर होतात. (१९)

**न प्रहृष्येत्प्रियं प्राप्य नोद्विजेत्प्राप्य चाप्रियम् ।**
**स्थिरबुद्धिरसंमूढो ब्रह्मविद् ब्रह्मणि स्थितः ॥२०॥**

जो प्रिय वस्तु प्राप्त झाली असतां आनंदित होत नाहीं, किंवा अप्रिय वस्तु प्राप्त झाली असतां दुःखीही होत नाहीं, असा स्थीरबुद्धि संशयरहित, ब्रह्मवेत्ता पुरुष परमात्म्याच्या ठिकाणीं रममाण होतो. (२०)

**बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा विन्दत्यात्मनि यत्सुखम् ।**
**स ब्रह्मयोगयुक्तात्मा सुखमक्षयमश्नुते ॥२१॥**

सांसारिक भोगामध्यें ज्याचें मन गुरफटून जात नाहीं, त्याला आत्मानंद प्राप्त होतो. अशा प्रकारचा योगी पुरुष ब्रह्माशीं तादात्म्य पावल्यामुळें अक्षय सुख उपभोगितो. (२१)

**ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते ।**
**आद्यन्तवन्तः कौन्तेय न तेषु रमते बुधः ॥२२॥**

इंद्रियें व त्यांचे विषय यांच्या संयोगानें जे भोग प्राप्त होतात, ते दुःखास कारण होतात. म्हणून ह्या अनित्य ( आदि व अंत ) असलेल्या गोष्टींत ज्ञान्याचें चित्त रमत नाहीं. (२२)

**शक्नोतीहैव यः सोढुं प्राक्शरीरविमोक्षणात् ।**
**कामक्रोधोद्भवं वेगं स युक्तः स सुखी नरः ॥२३॥**

शरीराचा त्याग करण्यापूर्वीच म्हणजे जिवंतपणींच जो वासना क्रोध यांचा आवेग सहन करतो, तोच पुरुष योगी व तोच सुखी होय.

**योऽन्तःसुखोऽन्तरारामस्तथान्तर्ज्योतिरेव यः ।**
**स योगी ब्रह्मनिर्वाणं ब्रह्मभूतोऽधिगच्छति ॥२४॥**

जो अंतःकरणानें सुखी असतो, जो अंतरात्म्याच्या पूर्ण ज्ञानानें आनंद पावतो, व जो अंतर्ज्ञानानें प्रकाशित होतो, तो योगी स्वतां ब्रह्म-रूप होतो, व ब्रह्मांतच विलीन होतो. (२४)

**लभन्ते ब्रह्मनिर्वाणमृषय क्षीणकल्मषाः ।**
**छिन्नद्वैधा यतात्मानः सर्वभूतहिते रताः ॥२५॥**

जे सर्व प्राणिमात्रांच्या कल्याणांत रममाण झालेले, यति आहेत, ज्यांच्या ठिकाणीं आपपर भाव नाहीं, व ज्यांचें सर्व पाप नाहींसें झालें आहे, असे ऋषी मोक्षधारी होतात. (२५)

**कामक्रोधवियुक्तानां यतीनां यतचेतसाम् ।**
**अभितो ब्रह्मनिर्वाणं वर्तते विदितात्मनाम् ॥२६॥**

कामक्रोधांपासून जे मुक्त झाले, ज्यांनीं मनावर ताबा मिळविला ज्यांनीं आत्मज्ञान प्राप्त करून घेतलें, ते ब्रह्मनिर्वाणानें वेढलेल्या स्थितींत राहातात. ( जीवनमुक्त होतात. ) (२६)

**स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवान्तरे भ्रुवोः ।**
**प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यन्तरचारिणौ ॥२७॥**

**यतेन्द्रियमनोबुद्धिर्मुनिर्मोक्षपरायणः ।**
**विगतेच्छाभयक्रोधो यः सदा मुक्त एव सः ॥२८॥**

शब्दादिक बाह्य विषयांस दूर लोटून जो आपले डोळे दोन भुवयां-मध्यें स्थिर करतो, व नासिकांमध्यें वावरणारे प्राण व अपान वायु सम करून, ज्यानें आपलीं इंद्रियें, मन व बुद्धि यांवर ताबा मिळविला आहे व ज्याच्या इच्छा, भय, क्रोध आदि विकार नष्ट झालेले आहेत, तो मुनि सदा मुक्तच आहे, असें समजावें. ( २७,२८ )

**भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम् ।**
**सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शान्तिमृच्छति ॥२९॥**

जो मला ( परमात्म्याला ) यज्ञ, तप यांचा भोक्ता व सर्व लोकांमध्यें श्रेष्ठ आणि सर्व प्राणिमात्रांचा मी हितकर्ता आहे, असें जो जाणतो, तो अक्षय शांति मिळवितो. (२९)

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे कर्मसन्यासयोगो नाम
पञ्चमोऽध्यायः ॥ ५ ॥

**संन्यासयोग** नांवाचा पांचवा अध्याय समाप्त झाला.

# अथ षष्ठोऽध्यायः

श्रीभगवानुवाच

**अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः।**
**स संन्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रियः ॥१॥**

(निष्काम कर्मयोगच श्रेष्ठ हें आतांपर्यंत सांगितलें. कर्मयोग अंगीं बाणण्यास पातंजल योगासारख्या योगाचाही उपयोग होतो म्हणून त्याही साधनाचा उपयोग करावा, हें आतां गीताकार सांगतात.)

**श्रीभगवान् म्हणाले**—जो पुरुष कर्मफलाचा आधार न घेतां योग्य कर्म करतो तोच संन्यासी व तोच योगी. केवळ अग्निहोत्रादि क्रिया सोडणारा किंवा स्वस्थ बसणारा संन्यासी किंवा योगी नव्हे. (१)

**यं संन्यासमिति प्राहुर्योगं तं विद्धि पाण्डव।**
**न ह्यसंन्यस्तसंकल्पो योगी भवति कश्चन ॥२॥**

हे पांडवा, ज्याला संन्यास म्हणतात तोच योग आहे; हें जाण. कारण कर्मफलाचा संकल्प केल्याशिवाय कोणीहि योगी होत नाहीं.(२)

**आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्यते।**
**योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते ॥३॥**

ज्या ऋषीला कर्मयोग प्राप्त करून घ्यावयाचा असतो. त्याला निष्काम कर्म हें प्राप्तीचें कारण असें म्हणतात. परंतु एकदां योगसिद्धि झाल्यावर ही मनःशांतीच कर्माचें कारण होते. (निष्काम कर्मानें योगी बनल्यावर तो निष्काम कर्में शांत चित्तानें करीतच राहातो.) (३)

**यदा हि नेन्द्रियार्थेषु न कर्मस्वनुषज्जते।**
**सर्वसंकल्पसंन्यासी योगारूढस्तदोच्यते ॥४॥**

ज्यावेळेस एखादा पुरुष इंद्रियार्थांमध्यें किंवा कर्मफलामध्यें आसक्त होत नाहीं, तेव्हां सर्व फलाशांचा संन्यास केलेल्या त्याला योगारूढ म्हणतात. (४)

**उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।**
**आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मनः ॥५॥**

प्रत्येकानें स्वतःच स्वतःचा उद्धार केला पाहिजे. स्वतःस कधींही नाऊमेद करूं नये. कारण आपणच आपला मित्र. तसेंच आपणच आपला शत्रु होय. (५)

**बन्धुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मना जितः ।**
**अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत् ॥६॥**

ज्यानें स्वतःच आपल्या आत्म्यावर ताबा मिळविला तोच त्याचा स्वतःचा बंधु. परंतु ज्यानें आपल्या आत्म्यावर ताबा मिळविला नाहीं, तो स्वतांच्या शत्रुप्रमाणें वर्तन करतो. (६)

**जितात्मनः प्रशान्तस्य परमात्मा समाहितः ।**
**शीतोष्णसुखदुःखेषु तथा मानापमानयोः ॥७॥**

शीतोष्ण, सुखदुःख यांचें ठिकाणीं तसेंच मानापमानाच्या बाबतींत जो समदृष्टीनें वागतो, अशा जितेंद्रिय व शांत पुरुषाचा आत्मा स्थिर असतो.

**ज्ञानविज्ञानतृप्तात्मा कूटस्थो विजितेन्द्रियः ।**
**युक्त इत्युच्यते योगी समलोष्टाश्मकाञ्चनः ॥८॥**

शास्त्रज्ञान व अनुभवज्ञान झाल्यानें ज्याचा अंतरात्मा तृप्त आहे, जो विकाररहित विजितेंद्रिय आहे, असा मातीचें ढेकूळ, दगड व कांचन यांना समान लेखणारा योगी हा परमात्म्यांशीं युक्त झाला (तो सिद्धावस्थेस पोहोंचला) असें म्हणतात. (८)

**सुहृन्मित्रार्युदासीनमध्यस्थद्वेष्यबन्धुषु ।**
**साधुष्वपि च पापेषु समबुद्धिर्विशिष्यते ॥९॥**

जो पुरुष सुहृद, मित्र, वैरी, उदासीन (पक्षपात रहित), मध्यस्थ (दोन्ही बाजूंचें भलें चिंतणारा) द्वेषी व त्याचप्रमाणें आप्तगणांशीं, सज्जनांशीं व दुर्जनांशींहि समभाव दाखवितो तो श्रेष्ठ होय. (९)

**योगी युञ्जीत सततमात्मानं रहसि स्थितः।**
**एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रहः ॥१०॥**

(येथें समाजविन्मुख होऊन अरण्यांत राहून योग्यानें योगसाधनेचा अभ्यास करावा, असा अर्थ अभिप्रेत नाहीं. निष्काम कर्मयोग आचरणांत आणणें हें कठीण काम आहे. त्यास चित्तशांति अवश्य आहे. ह्या चित्तवृत्तिनिरोधाकरितां एकांतांत पातंजल योगाचा अभ्यास जरूर आहे. योग्यानें या साधनानें आपल्या चित्तवृत्ति आपल्या काबूंत ठेवण्याचा यत्न करावा. असे करतांना समाजधारणेच्या दृष्टीनें आवश्यक कर्में सोडावीत असा अर्थ नाहीं. अशीं कर्मे करतांना आपल्या चित्तवृत्ति किती प्रमाणांत प्रक्षोभित होतात याचाहि अभ्यास योग्यानें करावा व एकांतांत आत्मपरिक्षण करून उत्तरोत्तर चित्तवृत्ति निरोधाची पूर्णावस्था अंगीं बाणविण्याचा प्रयत्न करावा. समाजापासून दूर राहिल्यानें तुमच्या चित्तवृत्ति काबूंत राहिल्या तर त्यांत कांहींच पुरुषार्थ नाहीं, हा अभिप्राय, विषया-विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः। (२—५९) यावरून स्पष्ट होतो.) ज्यानें आपलें मन व इंद्रियें यांसहित सर्व शरीर जिंकलें आहे, जो वासनारहित व संग्रहरहित आहे, अशा योग्यानें एकांतांत एकटे राहून सतत योगसाधना करावी. (१०)

**शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः।**
**नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम् ॥११॥**
**तत्रैकाग्रं मनः कृत्वा यतचित्तेन्द्रियक्रियः।**
**उपविश्यासने युञ्ज्याद्योगमात्मविशुद्धये ॥१२॥**

पवित्र भूमीवर कुश, त्यावर मृगाजिन व त्यावर वस्त्र घालून, फार उंच नाहीं, फार सखल नाहीं, असें स्थीर आसन तयार करून, तेथें एकाग्र मन करून, मन व इंद्रियांच्या क्रियांवर नियंत्रण ठेवून योग्यानें बसावें, व आत्मशुद्धिकरितां योगाचा अभ्यास चालू ठेवावा (११–१२)

**समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः।**
**संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन् ॥१३॥**

दि. मागे ११.५ क्रमांक 2 नों. दि.

**प्रशान्तात्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थितः ।**
**मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः ॥१४॥**

योग्यानें पृष्ठभाग, मस्तक व मान हीं ताठ सरळ ठेवून, इतर दिशांकडे न पाहातां, प्रशांत अंतःकरणानें सर्व भीति नाहींशी करून, ब्रह्मचारीव्रताचें आचरण करून, मनांवर संयम ठेवून, माझेंच ठिकाणीं चित्तलय करून मत्परायण होऊन योगाभ्यास सुरू ठेवावा. (१३–१४)

**युञ्जन्नेवं सदात्मानं योगी नियतमानसः ।**
**शान्तिं निर्वाणपरमां मत्संस्थामधिगच्छति ॥१५॥**

याप्रमाणें नेहमीं असा योगाभ्यास ठेवणारा संयतचित्त योगी माझ्या सान्निध्यांत वास करीत असलेली मोक्षप्रद शांति मिळवितो. (१५)

**नात्यश्नतस्तु योगोऽस्ति न चैकान्तमनश्नतः ।**
**न चातिस्वप्नशीलस्य जाग्रतो नैव चार्जुन ॥१६॥**

हे अर्जुना, जादा खाणाराला हा योगाभ्यास कठीण आहे, तसेंच न खाणाराला एकान्त अशक्य आहे. त्याचप्रमाणें अति झोंपाळु किंवा अति जागरण करणारालाहि हा अभ्यास कठीण आहे. (१६)

**युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।**
**युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ॥१७॥**

आहार व विहार ज्याचे योग्य प्रमाणांत आहेत, नित्यकर्म जो योग्य प्रमाणांत ठेवतो, झोंप व जागृतावस्था ज्याची योग्य प्रमाणांत आहे, अशाला योगसाधन सुखावह ठरतें. (१७)

**यदा विनियतं चित्तमात्मन्येवावतिष्ठते ।**
**निस्पृहःसर्वकामेभ्यो युक्त इत्युच्यते तदा ॥१८॥**

जेव्हां अतिशय नियंत्रित असें चित्त आत्म्याच्या ठिकाणींच स्थिरता पावते, जेव्हां सर्व उपभोग, विषयवासना नष्ट झालेली असते, त्यावेळीं त्या पुरुषाला योगयुक्त असें म्हणतात. (१८)

**यथा दीपो निवातस्थो नेङ्गते सोपमा स्मृता।**
**योगिनो यतचित्तस्य युञ्जतो योगमात्मनः ॥१९॥**

ज्याप्रमाणें निर्वातस्थानीं असलेला दीप स्थीर असतो, ती उपमा यतचित्त योगसाधना करणाऱ्या योग्याला लागू पडते. (१९)

**यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया।**
**यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति ॥२०॥**

**सुखमात्यन्तिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतीन्द्रियम्।**
**वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्त्वतः ॥२१॥**

**यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः।**
**यस्मिन्स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते ॥२२॥**

**तं विद्याद्दुःखसंयोगवियोगं योगसंज्ञितम्।**
**स निश्चयेन योक्तव्यो योगोऽनिर्विण्णचेतसा ॥२३॥**

योगाभ्यासानें नियंत्रित केलेलें अंतःकरण ज्या अवस्थेमध्यें रममाण होतें, ज्या अवस्थेमध्यें स्वतःच स्वतःला पाहून स्वतःच्या ठिकाणीं योगी संतुष्ट पावतो, ज्या अवस्थेमध्यें सुख म्हणजे एक इंद्रियांच्या पलिकडील केवळ बुद्धिगम्यच असा एक अत्यंतिक आनंद होय, हें कळते, आणि ज्या स्थितीस प्राप्त झाला असतां परमात्म स्वरूपापासून जो चलच्चित्त होत नाहीं; आणि जी स्थिति प्राप्त झाली असतां दुसरी कोणतीहि अधिक योग्य असें ज्याला वाटत नाहीं, ज्या स्थितीत अति मोठ्या दुःखानें देखील ज्याचें अंतःकरण विचलित होत नाहीं, ह्या स्थितीला दुःखरूप संसार संयोगापासून वियोग करणारा ‘ योग ’ असें म्हणावें. कोणत्याही प्रकारचा त्रास न मानतां हा योग योग्यानें आचरणांत आणण्याचा प्रयत्न करावा.

**संकल्पप्रभवान्कामांस्त्यक्त्वा सर्वानशेषतः।**
**मनसैवेन्द्रियग्रामं विनियम्य समन्ततः ॥२४॥**

**शनैः शनैरुपरमेद्बुद्ध्या धृतिगृहीतया ।**
**आत्मसंस्थं मनः कृत्वा न किञ्चिदपि चिन्तयेत् ॥२५॥**

इच्छेपासून सर्व वासना निर्माण होतात. त्या सर्व निःशेषरीत्या टाकून द्याव्यात. तसेंच हा इंद्रियांचा बाजार सर्व बाजूंनीं मनानें नियमित करून धैर्ययुक्त बुद्धिद्वारा हळूंहळूं चित्तशांति मिळविण्याचा प्रयत्न करावा. आणि मन आत्म्याच्या ठिकाणीं स्थीर करून, दुसरा कोणताहि विचार मनांत आणूं नये (२४–२५).

**यतो यतो निश्चरति मनश्चञ्चलमस्थिरम् ।**
**ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् ॥२६॥**

जेव्हां जेव्हां हें चंचल व अस्थिर मन इकडे तिकडे ( सांसारिक विषयांकडे किंवा कर्मफलाशेकडे ) धांवूं लागतें, तेव्हां तेव्हां त्याचें नियमन करून, स्वतःच्या आत्म्याच्या ठिकाणींच तें स्थीर करावें. (२६)

**प्रशान्तमनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम् ।**
**उपैति शान्तरजसं ब्रह्मभूतमकल्मषम् ॥२७॥**

अशा शांतमनस्क व ज्याचा रजोगुण शांत झालेला व जो सच्चिदानन्दघन ब्रह्मरूप झाला आहे अशा निष्पाप योग्याला उत्तम आनंद प्राप्त होतो. (२७)

**युञ्जन्नेवं सदात्मानं योगी विगतकल्मषः ।**
**सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यन्तं सुखमश्नुते ॥२८॥**

याप्रकारें सतत योगसाधना करणारा, पापांपासून मुक्त झालेला योगी ब्रह्मसंयोगापासून प्राप्त होणारें सुख तो सहज उपभोगितो. (२८)

**सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि ।**
**ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः ॥२९॥**

असा सर्व ठिकाणीं समभावानें पाहणारा योगयुक्त पुरुष आपला आत्मा सर्व भूतांच्या ठायीं व आपल्या आत्म्याच्या ठिकाणीं सर्व प्राणिमात्र पहातो. ( त्याचा आपपरभाव नष्ट होतो ). (२९)

**यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति ।**
**तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ॥३०॥**

जो ( समबुद्धि झालेला योगी ) मला ( परमात्म्याला ) सर्व ठिकाणीं पहातो व सर्व प्राणिमात्रांना माझ्या ठिकाणीं पहातो, त्याला मी नष्ट होत नाहीं, व तो माझ्यांत नष्ट होत नाहीं. ( आत्मा व परमात्मा हे दोन आहेत ही भावना लौकिकदृष्ट्या राहूनहि, परमार्थदृष्ट्या दे दोन्ही एक आहेत असें तो जाणतो.) (३०)

**सर्वभूतस्थितं यो मां भजत्येकत्वमास्थितः ।**
**सर्वथा वर्तमानोऽपि स योगी मयि वर्तते ॥३१॥**

जो सर्वभूतात्मैक्यबुद्धि झालेला कर्मयोगी सर्वांच्या ठिकाणीं असलेल्या माझी भक्ति करतो, तो ( व्यवहारांत ) सर्व दृष्टीनें वर्तन करीत असतांही तो माझ्याच ठिकाणीं सर्व करीत असतो. ( तात्पर्य, तो ब्रह्मार्पणबुद्ध्या सर्व कर्मं करीत असतो.) (३१)

**आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ।**
**सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ॥३२॥**

हे अर्जुना, जो सुख असो वा दुःख असो, आपलें तेंच सर्वांचें असा भावनेनें सर्वत्र पहातो, तो कर्मयोगी अतिशय श्रेष्ठ होय. (३२)

अर्जुन उवाच

**योऽयं योगस्त्वया प्रोक्तः साम्येन मधुसूदन ।**
**एतस्याहं न पश्यामि चञ्चलत्वात्स्थितिं स्थिराम् ॥३३॥**

अर्जुन म्हणाला—हे मधुसूदना, सर्वत्र समदृष्टीनें पाहाण्याचा हा जो कर्मयोग तूं मला सांगितलास, तो मन चंचल असल्यानें कायम टिकेल असें वाटत नाहीं. (३३)

**चञ्चलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् ।**
**तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥३४॥**

हे कृष्णा, हे मन चंचल, अडदांड, अति बलिष्ठ व ताब्यांत ठेवण्यास कठिण असें आहे. त्याचा निग्रह करणें हें वाऱ्यास ताब्यांत ठेवणें जसें दुष्कर, तसेंच अत्यंत दुष्कर आहे, असें मला वाटते. (३४)

श्रीभगवानुवाच

**असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम्**
**अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते ॥३५॥**

**श्रीभगवान् म्हणाले**—हे महाबाही, तूं म्हणतोस तें निःसंदेह खरें आहे. मन आतिशय चंचल व नियमन करण्यास कठीण आहे. तथापि हे कौंतेया, तें वारंवार प्रयत्न करण्यानें व वैराग्यवृत्तीनें ताब्यांत ठेवणें शक्य आहे. (३५)

**असंयतात्मना योगो दुष्प्राप इति मे मतिः ।**
**वश्यात्मना तु यतता शक्योऽवाप्तुमुपायतः ॥**

मनावर ताबा ठेवूं न शकणाऱ्या पुरुषास कर्मयोग दुष्प्राप आहे. असेंच माझें मत आहे. परंतु जो मन ताब्यांत ठेवण्याचा प्रयत्न करितो अशा प्रयत्नशील पुरुषास तो उपायानें प्राप्त करून घेणें शक्य आहे. (३६)

अर्जुन उवाच

**अयतिः श्रद्धयोपेतो योगाच्चलितमानसः ।**
**अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति ॥३७॥**

**अर्जुन म्हणाला**—( प्रयत्न जरी करूं म्हटलें, तरी मन हें अति चंचल असल्यानें एखाद्यास या जन्मांत तरी योगप्राप्ति शक्य होईल, असें दिसत नाहीं. अशा मनुष्याची गति काय ? अशी शंका अर्जुनास येते, म्हणून तो विचारतो. ) हे कृष्णा, श्रद्धा आहे पण जो दृढ प्रयत्न करूं शकत नाहीं, यामुळें योगापासून त्याचें मन दूर आहे, असा पुरुष योगसिद्धि न झाल्यानें कोणत्या अवस्थेस प्राप्त होतो ? (३७)

**कच्चिन्नोभयविभ्रष्टश्छिन्नाभ्रमिव नश्यति ।**
**अप्रतिष्ठो महाबाहो विमूढो ब्रह्मणः पथि ॥३८॥**

हे महाबाहो, ब्रह्मप्राप्तीच्या मार्गांत मोहित झालेला असा अस्थिर पुरुष, काम्यकर्मांनें प्राप्त होणारा स्वर्गही नाहीं, व निष्काम कर्मानें प्राप्त होणारा मोक्षही नाहीं, अशा अधांतरी स्थितींत दुभंगलेल्या ढगाप्रमाणें नष्ट तर होत नाहीं ना ? (३८)

**एतन्मे संशयं कृष्ण छेत्तुमर्हस्यशेषतः ।**
**त्वदन्यः संशयस्यास्य छेत्ता न ह्युपपद्यते ॥३९॥**

हे कृष्णा, हा माझा संशय तूं विशेषरीत्या छेदू शकतोस. तुझ्याशिवाय ह्या संशयाचा छेद करणारा दुसरा कोणी योग्य नाहीं. (३९)

श्रीभगवानुवाच

**पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते ।**
**न हि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति ॥**

**श्रीभगवान् म्हणाले**—हे पार्था, येथेंहि नाहीं व तेथेंहि नाहीं, अशी विनाशकारी स्थिति त्यास प्राप्त होत नाहीं. अरे बाबा कल्याण मार्गाचा आश्रय करणारा कोणीहि दुर्गतीस प्राप्त होत नाहीं. (४०)

**प्राप्य पुण्यकृतां लोकानुषित्वा शाश्वतीःसमाः ।**
**शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ॥४१॥**

असा योगभ्रष्ट पुण्यकर्मांनीं प्राप्त होणाऱ्या स्वर्गादि लोकांत पुष्कळ वर्षें राहून पुन्हां पवित्र व श्रीमंत गृहस्थांच्या कुळांत जन्म पावतो. (४१)

**अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् ।**
**एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम् ॥४२॥**

अथवा असा योगभ्रष्ट पुरुष पुन्हां ज्ञानवान् अशा योग्यांच्या कुळांतच जन्म घेतो. परंतु अशा प्रकारचा जन्म या जगांत अति दुर्लभ आहे. (४२)

**तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम् ।**
**यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनन्दन ॥४३॥**

हे कुरुनंदना, अशा कुळांत त्यास पूर्वजन्मीचा बुद्धिसंयोग प्राप्त होतो. आणि पुन्हां तो सिद्धि मिळविण्याचा प्रयत्न करतो. (४३)

**पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः ।**
**जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते ॥४४॥**

तो पुरुष त्याची स्वतःची इच्छा नसतांनाही पूर्वजन्मींच्या अभ्यासानें योगमार्गाकडे खेंचला जातो. योगाची जिज्ञासा उत्पन्न झाली आहे, असा योगी शब्दब्रह्माच्या पलीकडे जातो. (शब्दब्रह्म–वैदिक काम्य कर्में, त्या पलीकडे म्हणजे निष्काम कर्मयोगाकडे.) (४४)

**प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः ।**
**अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम् ॥४५॥**

अशा रीतीनें तो योगी प्रयत्न करीत असतां त्याची सर्व पापें धुवून गेलेली असल्यानें पुष्कळ जन्मांच्या प्रयत्नानें श्रेष्ठ गतीस प्राप्त होतो. (आपण पुनर्जन्मच नाहीं असें म्हणतो. मग, असा कर्मयोगमार्गांत चंचुप्रवेश केलेला पुरुष, मृत्युनंतर याचा उपयोग नाहीं व या जन्मांत तरी पूर्णपणें तो साधणें शक्य नाहीं, मग मनसंयमांत अर्थ नाहीं, आजच ऋण काढून सण करा, अशा समाजद्रोही वृत्तीचा बनेल अशी शंका उत्पन्न होण्याचा संभव आहे. (४५)

जी गोष्ट मुळांतच नाहीं ती अशा अन्नांतर पण अगदीं योग्य गोष्टी-करितां आहे असें मानणें, ही आंधळेपणाची परमावधि होय. आम्ही 'पुनर्जन्माच्या' विवेचनांत प्रत्येक मनुष्य डोळसपणानें समाजांत राहून स्वतः चित्तशांति मिळविण्याकरितां चांगलीं कर्में करीत राहील असें म्हटलेंच आहे. तसेंच हें विश्व सत्त्व, रज, तम या गुणांच्या विशिष्ट अंशांनीं युक्त असल्यानें तें आपला त्रिगुणात्मक समतोलपणा ढळूं देणार नाहीं, हेंहि स्पष्ट केलें आहे. जो मनुष्य जेवढ्या प्रमाणांत निष्काम समाजसेवा करील, तेवढ्या प्रमाणांत चित्तशांति मिळवील. याच जन्मांत सर्व मिळवावयाचें आहे, ही जाणीव झाल्यावर तो येथेंच योगसाधना पूर्ण करण्याचा प्रयत्न करील. पुढील जन्माकरितां कांहीं शिल्लक ठेवणार नाहीं; व यायोगें समाजांत सत्प्रवृत्तीची वाढ होण्यास अधिक मदत होईल, असें मानणेंच युक्तिसंगत दिसते. पुनर्जन्माची कल्पना सोडून दिल्यानें खंत बाळगण्याची जरूरी नाहीं, उलट फायदाच होईल, हें यांवरून स्पष्ट होते.) (४५)

**तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः ।**
**कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन ॥४६॥**

हे अर्जुना, तपस्व्यापेक्षां कर्मयोगी अधिक श्रेष्ठ. ज्ञान्यांपेक्षां देखील तो श्रेष्ठ असें माझें मत आहे. वैदिक कर्मकांडाचें आचरण करणाऱ्यांपेक्षांहि तो श्रेष्ठ आहे. याकरितां तूं निष्काम कर्मयोगी हो. (४६)

**योगिनामपि सर्वेषां मद्गतेनान्तरात्मना ।**
**श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मतः ॥४७॥**

या सर्व निष्काम कर्मयोग्यांमध्यें देखील जो माझ्या ठिकाणीं आपल्या अन्तरात्म्याचा लय लावतो व श्रद्धायुक्त अंन्तकरणानें माझी भक्ति करितो तो सर्वांत श्रेष्ठ कर्मयोगी होय. ( प्रेमळ अंतःकरणाचा निष्काम कर्मयोगी अत्यंत श्रेष्ठ होय. निष्काम कर्म व प्रेमळ अंतःकरणाचा संयोग हा दूधशर्करा संयोग होय.) (४७)

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे आत्मसंयमयोगो नाम
षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥

श्रीमद्भगवद्गीतेतील ध्यानयोग नांवाचा
सहावा अध्याय समाप्त झाला.

# अथ सप्तमोऽध्यायः

श्रीभगवानुवाच

**मय्यासक्तमनाः पार्थ योगं युञ्जन्मदाश्रयः ।**
**असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छृणु ॥१॥**

( कर्मयोगी होणें इष्ट. त्याकरितां आत्मसंयमाची अत्यंत जरूरी आहे. आत्मसंयम करण्याकरितां ध्यानयोगाची कांस धरावी, हेंहि सांगितलें. तथापि या सर्व गोष्टीस ज्ञानाची जोड असणें अत्यंत आवश्यक आहे. ज्ञान हा शब्द आतांपर्यंत मोघम वापरला. त्याचें सविस्तर विवरण आतां करितात.)

श्रीभगवान् म्हणाले—हे पार्था, माझ्या ठिकाणीं चित्ताचा लय करून, व माझ्या आश्रयानें योगाचें आचरण करित असतां, मला निश्चित् समग्र कसा जाणशील, तें आतां ऐक. (१)

**ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः ।**
**यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते ॥२॥**

ज्ञान व विज्ञान कांहीं शेष न ठेवतां, तुला मी समग्र सांगतों. जें जाणलें असतां तुला पुन्हां जाणण्यासारखें येथें कांहीं शिल्लक राहाणार नाहीं. ( २ )

**मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये ।**
**यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ॥३॥**

हजारों मनुष्यांमध्यें कोणीतरी सिद्धि मिळविण्याकरितां प्रयत्न करतो. आणि या प्रयत्न करणाऱ्या सिद्धांपैकीं कोणी एखादाच मला तात्त्विकदृष्ट्या जाणतो. ( ३ )

**भूमिरापोऽनलो वायुः खं मनो बुद्धिरेव च ।**
**अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ॥४॥**

पृथ्वी, जल, अग्नि, वायु, आकाश, मन, बुद्धि व अहंकार या माझ्या आठ प्रकारच्या भिन्न प्रकृति आहेत. ( ४ )

**अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम् ।**
**जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ॥५॥**

ही झाली अपरा ( कमी दर्जाची ) प्रकृति. याशिवाय हे महाबाहो, जीवरूप अशी माझी पराप्रकृति आहे, कीं जिच्यायोगें ह्या सर्व जगताची धारणा होते. ( ५ )

**एतद्योनीनि भूतानि सर्वाणीत्युपधारय ।**
**अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा ॥६॥**

सर्व प्राणिमात्र या दोहोंपासून उत्पन्न होतात, हें तूं जाण. मीच सर्व जगाचें मूळ व अंत आहे. ( ६ )

**मत्तः परतरं नान्यत्किञ्चिदस्ति धनंजय ।**
**मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव ॥७॥**

माझ्यापेक्षां श्रेष्ठ असें, हे धनंजया, दुसरें कांहींही नाहीं. ज्याप्रमाणें दोऱ्यामध्यें मणि ओंवले जातात, त्याप्रमाणेंच माझ्यामध्यें हें सर्व प्राणिमात्र गोंवलें गेलेलें आहेत. ( ७ )

**रसोऽहमप्सु कौन्तेय प्रभास्मि शशिसूर्ययोः ।**
**प्रणवः सर्ववेदेषु शब्दः खे पौरुषं नृषु ॥८॥**

हे कौंतेया, पाण्यांमधील रस मी आहे, तसेंच चंद्रसूर्याचें तेज, तें मी आहे. सर्व वेदांतील ओंकार मीच आहे. आकाशांतील शब्द व पुरुषांतील पौरुषत्वही मीच आहे. ( ८ )

**पुण्यो गन्धः पृथिव्यां च तेजश्चास्मि विभावसौ ।**
**जीवनं सर्वभूतेषु तपश्चास्मि तपस्विषु ॥९॥**

तसेंच पृथ्वीमधील पुण्यपावन गंध व अग्निमधील तेज मी आहे. सर्व प्राणिमात्रांमधील जीवन मी आहे. तपस्व्यांमधील तपही मीच आहे. ( ९ )

**बीजं मां सर्वभूतानां विद्धि पार्थ सनातनम् ।**
**बुद्धिर्बुद्धिमतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् ॥१०॥**

हे अर्जुना ! सर्व प्राणिमात्रांचें सनातन बीज ( कारण ) मीच आहे, हें जाण. बुद्धिमानांची मी बुद्धि आहे. तेजस्वी लोकांचें मी तेज आहे.(१०)

**बलं बलवतां चाहं कामरागविवर्जितम् ।**
**धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ॥११॥**

बलवानांचे कामनारहित व आसक्तिरहित बल मी आहे. हे भरत-श्रेष्ठा, सर्व प्राणिमात्रांमधील धर्मानुकूल इच्छा मी आहे. ( ११ )

**ये चैव सात्त्विका भावा राजसास्तामसाश्च ये ।**
**मत्त एवेति तान्विद्धि न त्वहं तेषु ते मयि ॥१२॥**

आणि सत्त्व, रज, व तम हे जे भाव आहेत, तेंहि माझ्यापासूनच उत्पन्न होणारें आहेत. परंतु मी त्यांच्यांत नाहीं. ते माझ्यांत आहेत. ( हें त्रिगुणात्मक नानात्व जरी माझ्यापासून उत्पन्न झालें असले, तरी तें माझ्या निर्गुण रूपांत असत नाहीं, हा भावार्थ ) ( १२ )

**त्रिभिर्गुणमयैर्भावैरेभिः सर्वमिदं जगत् ।**
**मोहितं नाभिजानाति मामेभ्यः परमव्ययम् ॥ १३ ॥**

या तीन गुणांपासून उत्पन्न झालेल्या रागद्वेषादि विकारांनीं हें सर्व जगत् उत्पन्न झालेलें आहे. यांच्या पलीकडील ( निर्गुण ) अविनाशी मी आहे, हें लोक जाणत नाहींत. ( १३ )

**दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया ।**
**मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते ॥१४॥**

ही त्रिगुणमयी माझी योगमाया अलौकिक व दुस्तर आहे जे मलाच शरण येतात, ते ही माया तरून जातात. ( १४ )

**न मां दुष्कृतिनो मूढाः प्रपद्यन्ते नराधमाः ।**
**माययापहृतज्ञाना आसुरं भावमाश्रिताः ॥१५॥**

( मला शरण येण्यानें भवसागर तरून जाण्याचें सामर्थ्य लोकांना प्राप्त होत असतांही ) मायेनें ज्यांचें ज्ञान नष्ट झालें आहे, असें हे दुष्कर्मी, मूढ नराधम आसुरी बुद्धींत पडून मला शरण येत नाहींत ( १५ )

**चतुर्विधा भजन्ते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन ।**
**आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ ॥१६॥**

हे अर्जुना, चार प्रकारचे पुण्यवान् लोक माझी भक्ति करीत असतात. हे भरतश्रेष्ठा, हे चार प्रकार असे, आर्त (रोगानें पीडलेले), जिज्ञासु, अर्थार्थी (कामवासना बाळगणारें) व ज्ञानी. ( १६ )

**तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते ।**
**प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रियः ॥१७॥**

या सर्वांमध्यें अनन्यभक्त व नित्यकर्मयोगी ज्ञानी हा श्रेष्ठ होय. ज्ञानी लोकांना मी अत्यंत प्रिय आहे. व तो ज्ञानी मला प्रिय आहे. ( १७ )

**उदाराः सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतम् ।**
**आस्थितः स हि युक्तात्मा मामेवानुत्तमां गतिम् ॥१८॥**

हे सर्वच चांगले आहेत. परंतु यांमधील ज्ञानी म्हणजे मीच होय, असें माझें मत आहे. हा योगयुक्त पुरुष सर्वांत उत्तम गति म्हणजे मीच, त्या माझ्याच ठायीं तो स्थिर झालेला असतो. ( १८ )

**बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते ।**
**वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ॥१९॥**

पुष्कळ जन्माच्या शेवटीं 'सर्व जें कांहीं आहे, तें वासुदेव' असें ज्ञान झालेला पुरुष मला येऊन मिळतो. असा महात्मा अतिदुर्लभ होय. ( १९ )

**कामैस्तैस्तैर्हृतज्ञानाः प्रपद्यन्तेऽन्यदेवताः ।**
**तं तं नियममास्थाय प्रकृत्या नियताः स्वया ॥२०॥**

आपापल्या प्रकृतिनियमाप्रमाणें स्वर्गप्राप्ति इत्यादि निरनिराळ्या प्रकारच्या काम्यकर्मांनीं वेडावलेलें लोक निरनिराळे उपासनेचे नियम घालून निरनिराळ्या देवतांच्या उपासना करितात. ( २० )

**यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति ।**
**तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥२१॥**

अशावेळीं जो जो सकामी भक्त ज्या ज्या देवतेच्या स्वरूपाची श्रद्धेनें पूजा करण्याची इच्छा करितो, त्या त्या भक्ताची श्रद्धा मी त्याच देवतेच्या ठिकाणीं स्थिर करतो. ( २१ )

**स तया श्रद्धया युक्तस्तस्याराधनमीहते ।**
**लभते च ततः कामान्मयैव विहितान्हि तान् ॥२२॥**

त्या श्रद्धेनें युक्त झालेला तो पुरुष त्या देवतेची उपासना करूं लागतो. मग मीच निर्माण केलेली फळें त्यास मिळतात. ( २२ )

**अन्तवत्तु फलं तेषां तद्भवत्यल्पमेधसाम् ।**
**देवान्देवयजो यान्ति मद्भक्ता यान्ति मामपि ॥२३॥**

परंतु त्या अल्पबुद्धि पुरुषांना मिळणारें फळ नाशवंत असतें. कारण निरनिराळ्या देवतांची आराधना करणारें, त्या त्या देवतांना जाऊन मिळतात. व माझे भक्त मलाच येऊन मिळतात. ( २३ )

**अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यन्ते मामबुद्धयः ।**
**परं भावमजानन्तो ममाव्ययमनुत्तमम् ॥२४॥**

माझे ( परमेश्वराचे ) अव्यय अत्युत्कृष्ट व श्रेष्ठ स्वरूप ( निर्गुण ) न ओळखणारे मूढ लोक मी अव्यक्त असतां सगुणरूपधारी असें मला मानतात. ( २४ )

**नाहं प्रकाशः सर्वस्य योगमायासमावृतः ।**
**मूढोऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम् ॥२५॥**

मी योगमायेनें अच्छादिलेला असल्यानें माझें खरें स्वरूप सर्वांना स्पष्ट दिसत नाहीं. ( योगमायेनें मी सगुणरूप धारण करतो. यामुळें माझ्या निर्गुणरूपाचा अज्ञांना विसर पडतो. ) त्यामुळें मूर्ख लोक मी अजन्मा व अव्यय आहे हें जाणत नाहींत. ( २५ )

**वेदाहं समतीतानी वर्तमानानि चार्जुन ।**
**भविष्याणि च भूतानि मां तु वेद न कश्चन ॥२६॥**

हे अर्जुना, पूर्वीं झालेलें, आतां असलेलें आणि पुढें होणारें या सर्व प्राणिमात्रांना मी जाणतो. परंतु मला कोणीहि ओळखत नाहीं. ( २६ )

**इच्छाद्वेषसमुत्थेन द्वन्द्वमोहेन भारत ।**
**सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्ति परंतप ॥२७॥**

हे शत्रुतापना अर्जुना, इच्छा व द्वेष यांतून उत्पन्न होणाऱ्या सुखदुःखादि द्वंद्वांच्या मोहानें या सृष्टींत सर्व लोक भ्रम पावत असतात. (२७)

**येषां त्वन्तगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ।**
**ते द्वन्द्वमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढव्रताः ॥२८॥**

परंतु ज्यांचे पाप नष्ट झालेलें आहे असे पुण्यवान् लोक, सुखदुःखादि द्वंद्वांपासून मुक्त झालेलें असल्यानें, दृढ निश्चयानें माझी भक्ति करीत असतात.

**जरामरणमोक्षाय मामाश्रित्य यतन्ति ये ।**
**ते ब्रह्म तद्विदुः कृत्स्नमध्यात्मं कर्म चाखिलम् ॥२९॥**

याप्रमाणें माझा आश्रय करून जे जरा व मरण यांपासून मोक्ष मिळविण्याचा प्रयत्न करीत असतात, त्यांना ब्रह्म, अध्यात्म व कर्म यांचें पूर्णपणें ज्ञान झालेलें असतें. (२९)

**साधिभूताधिदैवं मां साधियज्ञं च ये विदुः ।**
**प्रयाणकालेऽपि च मां ते विदुर्युक्तचेतसः ॥३०॥**

अधिभूत अधिदेव व अधियज्ञ म्हणजे मीच आहे, हें जे जाणतात ते समत्वबुद्धि योगी लोक अंतःकालीं देखील मला जाणतात. (योग्याला परब्रह्माची जाणीव असल्यानें अंतःकालीही ती जाणीव त्याच्या ठिकाणीं असते. व अंतःकालीं जी जाणीव, त्या जाणीवेप्रमाणें त्यास पुढील लोक प्राप्त होतो, ही जी धर्मशास्त्राची कल्पना, त्यास या वचनानें पुष्टि देतात.) (३०)

श्रीमद्भगवद्गीतेतील **ज्ञानविज्ञानयोग** नांवाचा सातवा अध्याय समाप्त झाला.

---

# अथाष्टमोऽध्यायः

अर्जुन उवाच

**किं तद्ब्रह्म किमध्यात्मं किं कर्म पुरुषोत्तम ।**
**अधिभूतं च किं प्रोक्तमधिदैवं किमुच्यते ॥१॥**

( सातव्या अध्यायाच्या शेवटीं श्रीकृष्णांनीं अधिभूत, अधियज्ञ वगैरे शब्दांचा वापर केला. त्याचा नीट अर्थ जाणून घेण्याचे दृष्टीनें अर्जुन आतां प्रश्न विचारतो. )

**अर्जुन म्हणाला**—हे पुरुषोत्तमा, तें ब्रह्म म्हणजे काय ? तें अध्यात्म म्हणजे काय ? कर्म म्हणजे काय ? अधिभूत कशाला म्हणतात ? आधिदैवानें कशाचा बोध होतो ? ( १ )

**अधियज्ञः कथं कोऽत्र देहेऽस्मिन्मधुसूदन ।**
**प्रयाणकाले च कथं ज्ञेयोऽसि नियतात्मभिः ॥२॥**

आणि हे मधुसूदना, येथें आणि या शरिरामध्यें अधियज्ञ कोण आहे ? आणि युक्तचित्त योगी अंतःकालीं तुला कशाप्रकारें जाणतात ? ( २ )

श्रीभगवानुवाच

**अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते ।**
**भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसंज्ञितः ॥३॥**

**श्रीभगवान् म्हणाले**—सर्वांत श्रेष्ठ व अविनाशी असें जें तत्व, तें ब्रह्म. प्रत्येक पदार्थाचें मूळस्वरुप ( म्हणजे जीवात्मा ) त्याला अध्यात्म म्हणतात. अक्षर ब्रह्मापासून चराचर सृष्टीची उत्पत्ति करणारा जो सृष्टि व्यापार, त्याला कर्म म्हणतात. ( ३ )

**अधिभूतं क्षरो भावः पुरुषश्चाधिदैवतम् ।**
**अधियज्ञोऽहमेवात्र देहे देहभृतां वर ॥४॥**

उत्पन्न झालेल्या सर्व भूतमात्रांची जी नश्वरता तिला अधिभूत म्हणतात. आणि या सर्व वस्तूमात्रांच्या ठिकाणीं वास करणारा पुरुष, त्याला

अधिदैवत असें समजावयाचें. हे देहधारी लोकांमधील श्रेष्ठ पुरुषा, या सर्व शरीरधाऱ्यामधील जो यज्ञाचा अधिपति अधियज्ञ तो तर प्रत्यक्ष मीच आहे. ( ४ )

**अन्तकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् ।**
**यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः ॥५॥**

आणि अंतकालीं जो माझेंच स्मरण करीत आपला देहत्याग करतो, तो माझ्याच स्वरूपास येऊन मिळतो, यांत संदेह नाहीं. ( ५ )

**यं यं वापि स्मरन्भावं त्यजत्यन्ते कलेवरम् ।**
**तं तमेवैति कौन्तेय सदा तद्भावभावितः ॥६॥**

हे कौंतेया, जन्मभर ज्या वस्तूंच्या ठिकाणीं मनुष्य आसक्त असतो, त्याच वस्तूंचें स्मरण करीत तो शेवटीं आपला देहत्याग करतो म्हणून त्याच वस्तूंकडे तो जाऊन पोंचतो. ( ६ )

**तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च ।**
**मय्यर्पितमनोबुद्धिर्मामेवैष्यस्यसंशयम् ॥७॥**

याकरितां नेहमीं तूं माझेंच स्मरण करीत युद्ध कर. माझ्याच ठिकाणीं बुद्धीचा लय केल्यानें तूं अभ्यासानें निःसंशय मलाच येऊन मिळशील. (७)

**अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना ।**
**परमं पुरुषं दिव्यं याति पार्थानुचिन्तयन् ॥८॥**

हे पार्था, चित्त दुसरीकडे ढळूं न देतां जो परमप्रकाशस्वरूप दिव्य पुरुषाचें चिंतन करतो, तो त्यालाच जाऊन मिळतो. ( ८ )

**कविं पुराणमनुशासितारमणोरणीयांसमनुस्मरेद्यः ।**
**सर्वस्य धातारमचिन्त्यरूपमादित्यवर्णं तमसः परस्तात् ।**

**प्रयाणकाले मनसाचलेन भक्त्या युक्तो योगबलेन चैव ॥९॥**
**भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य सम्यक् स तं परं पुरुषमुपैति दिव्यम्**

जो भक्तियुक्त पुरुष, योगबलानें दोन्ही भुंवयांच्या मध्यें नीट प्राण आणून, समचित्तानें अंतकाळीं, सर्वज्ञ, अनादि, सर्वांचा नियंता, अतिसूक्ष्म, सर्वांचें धारणपोषण करणारा, अचिन्त्यस्वरूप व सूर्याप्रमाणें अति प्रकाशमान, अंधःकारापलीकडचा, अशा दिव्य पुरुषाचें चिंतन करतो, तो त्यालाच जाऊन मिळतो. ( ९–१० )

**यदक्षरं वेदविदो वदन्ति विशन्ति यद्यतयो वीतरागाः ।**
**यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति तत्ते पदं सग्रहेण प्रवक्ष्ये ॥११॥**

ज्याला वेदवेत्ते लोक अक्षरब्रह्म म्हणतात, आणि आसक्तिरहित यत्नशील योगीजन ज्यामध्यें प्रवेश करतात, व ज्या पदाच्या इच्छेनें ब्रह्मचर्यव्रताचें पालन करितात, त्या पदाची माहिती तुला संक्षेपानें सांगतो. ( ११ )

**सर्वद्वाराणि संयम्य मनो हृदि निरुध्य च ।**
**मूर्ध्न्याधायात्मनः प्राणमास्थितो योगधारणाम् ॥१२॥**
**ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ।**
**यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम् ॥ १३ ॥**

जो पुरुष सर्व इंद्रियरूपीं द्वारांचा निरोध करून, व मनाचें हृदयानें नियमन करून आणि आपला प्राण मस्तकांत निश्चल करून, समाधियोगाचा आश्रय करितो; व माझें स्मरण करीत ॐ या एकाक्षररूप ब्रह्माचें उच्चारण करीत जो आपला देह टाकून निघून जातो, तो श्रेष्ठ गतीला मिळतो. ( १२–१३ )

**अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः ।**
**तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः ॥१४॥**
**मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम् ।**
**नाप्नुवन्ति महात्मानः संसिद्धिं परमां गताः ॥१५॥**

नेहमीं माझ्याशिवाय दुसरीकडे चित्तवृत्ति ढळूं देत नाहीं, व जो माझें अखंड स्मरण करतो, अशा नित्ययुक्त योग्यालाही हे पार्था, मी सहज प्राप्त होतो. ( १४ )

असे परमसिद्ध महात्मे एकदां मला येऊन मिळाल्यानंतर पुन्हां क्षणभंगुर व दुःखाचें माहेरघर असा पुनर्जन्म त्यांनामिळत नाहीं. ( १५ )

**आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन ।**
**मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्यते ॥१६॥**

हे अर्जुना, स्वर्गादि लोक आदिकरून इतर सर्व लोकांस गेल्यानंतर पुन्हां केव्हांतरी परत येणें भाग आहे. पण हे कौंतेया, मला जे एकदां येऊन मिळाले, त्यांना पुनर्जन्म नाहीं. ( १६ )

**सहस्रयुगपर्यन्तमहर्यद्ब्रह्मणो विदुः ।**
**रात्रिं युगसहस्रान्तां तेऽहोरात्रविदो जनाः ॥१७॥**

चार युगे एक हजार वेळां येऊन गेलीं म्हणजे ब्रह्मदेवाचा एक दिवस होतो, हे ज्यांना माहीत आहे, व तसेंच एक हजारवेळां हीं युगें येऊन गेलीं म्हणजे रात्र होते, हें जे जाणतात, त्यांनाच कालगणनेचें खरें ज्ञान झालें असें समजावे. ( १७ )

**अव्यक्ताद्व्यक्तयः सर्वाः प्रभवन्त्यहरागमे ।**
**रात्र्यागमे प्रलीयन्ते तत्रैवाव्यक्तसंज्ञके ॥१८॥**

हा ब्रह्मदेवाचा दिवस सुरू झाला म्हणजे सर्व दृश्य वस्तू अव्यक्तापासून व्यक्त होतात. व पुन्हां रात्र सुरू झाली म्हणजे त्याच अव्यक्तांत लय पावतात. ( १८ )

**भूतग्रामः स एवायं भूत्वा भूत्वा प्रलीयते ।**
**रात्र्यागमेऽवशः पार्थ प्रभवत्यहरागमे ॥१९॥**

हे पार्था, हा प्राणिमात्रांचा समूह आपली इच्छा नसतांहि हा दिवस उगवला कीं पुन्हां उत्पन्न होतो व रात्र झाली असतां लय पावतो. ( १९ )

**परस्तस्मात्तु भावोऽन्योऽव्यक्तोऽव्यक्तात्सनातनः**
**यःस सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति ॥२०॥**

पण ह्या अव्यक्ताच्याहि पलीकडचा जो सनातन अव्यक्त पदार्थ, जो प्राणिमात्रें नष्ट पावली तरी नाश पावत नाहीं. ( २० )

**अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्तमाहुः परमां गतिम् ।**
**यं प्राप्य न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ॥२१॥**

असा जो अव्यक्त व अक्षर परमात्मा आहे, तीच श्रेष्ठ गति होय; जी प्राप्त झाली असतां पुनर्जन्म नाहीं, तें माझें श्रेष्ठ धाम होय. ( २१ )

**पुरुषः स परः पार्थ भक्त्या लभ्यस्त्वनन्यया ।**
**यस्यान्तःस्थानि भूतानि येन सर्वमिदं ततम् ॥२२॥**

हा परमात्मरूप श्रेष्ठ पुरुष अनन्य भक्तीनें प्राप्त होतो. ह्या पुरुषामध्येंच सर्व प्राणिमात्र वास करतात, व यानेंच हें सर्व जगत् व्यापलेलें आहे. ( २२ )

**यत्र काले त्वनावृत्तिमावृत्तिं चैव योगिनः ।**
**प्रयाता यान्ति तं कालं वक्ष्यामि भरतर्षभ ॥२३॥**

आतां हे भरतश्रेष्ठा, कोणत्या कालीं देहत्याग केला असतां योगीजन पुनर्जन्म पावत नाहींत व ज्या कालीं देहत्याग केला असतां पुनर्जन्म पावतात, तो काल मी सांगतों. ( २३ )

**अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम् ।**
**तत्र प्रयाता गच्छन्ति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः ॥२४॥**

अग्नि, ज्योति, दिवस, शुक्लपक्ष व उत्तरायणाचे सहा महिने, या काळांत देहत्याग केला असतां, योगी ब्रह्मपदास जाऊन मिळतो. ( हा अर्चिरादि किंवा देवयान मार्ग ) ( २४ )

**धूमो रात्रिस्तथा कृष्णः षण्मासा दक्षिणायनम् ।**
**तत्र चान्द्रमसं ज्योतिर्योगी प्राप्य निवर्तते ॥२५॥**

धूर, रात्र, कृष्णपक्ष व दक्षिणायनाचे सहा महिने, या काळांत देहत्याग करणारा योगी, चंद्रलोकास जातो व ( पुण्यांश संपल्यावर ) पुन्हां परत येतो. ( हा धूम्रादि किंवा पितृयान मार्ग ) ( २५ )

**शुक्लकृष्णे गती ह्येते जगतः शाश्वते मते।**
**एकया यात्यनावृत्तिमन्ययावर्तते पुनः ॥२६॥**

शुक्ल ( तेजोमय ) व कृष्ण ( अंधःकारमय ) असे जगताचे दोन शाश्वत मार्ग मानले गेले आहेत. एका मार्गानें गेलें असतां परत येत नाहीं. दुसऱ्या मार्गानें गेले असतां परत येतो. ( २६ )

**नैते सृती पार्थ जानन्योगी मुह्यति कश्चन ।**
**तस्मात्सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन ॥२७॥**

परंतु हे पार्था, जे योगी आहेत, ते हे मार्ग जाणून ( मृत्युच्या वेळीं देवयान मार्ग मिळेल कीं नाहीं ) त्याबद्दल मोह पावत नाहींत. ( ते निष्काम कर्मेंच करीत असतात.) याकरितां हे अर्जुना, तूं नेहमींच योगयुक्त हो. ( २७ )

**वेदेषु यज्ञेषु तपःसु चैव दानेषु यत्पुण्यफलं प्रदिष्टम् ।**
**अत्येति तत्सर्वमिदं विदित्वा योगी परं स्थानमुपैति चाद्यम् ॥**

याप्रमाणें हें सर्व जाणल्यानंतर वेदांमध्यें, यज्ञांमध्यें, तपांमध्यें व दानांमध्यें जें पुण्यफल सांगितलेलें आहे, त्या सर्वांचा त्याग करून या पलीकडील आद्य स्थानास तो जाऊन पोंचतो. ( २८ )

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे अक्षरब्रह्मयोगो
नामाष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥

श्रीमद्भगवद्गीतेंतील अक्षरब्रह्मयोग नांवाचा आठवा अध्याय
समाप्त झाला.

# अथ नवमोऽध्यायः

श्रीभगवानुवाच

**इदं तु ते गुह्यतमं प्रवक्ष्याम्यनसूयवे ।**
**ज्ञानं विज्ञानसहितं यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ॥१॥**

(सातव्या अध्यायापासून सृष्टि उत्पत्ति व परमात्मा यांच्या परस्पर-संबंधाचें ज्ञान सांगण्यास सुरुवात केली. तेंच विवेचन याहि अध्यायांत सुरू ठेवले आहे. 'वासुदेव हाच परमेश्वर' (७-१९) असें जाणणारा व त्याप्रमाणें आपलें वर्तन ठेवणारा महात्मा अत्यंत दुर्लभ, कित्येक युगांमधून एखादा जन्माला येतो, असें सांगून पूर्ण मुक्ति मिळविणारा प्राणी विरळा असा आपला अनुभवहि भगवंतांनीं नमूद करून ठेवला आहे. असा एकटा दुकटा प्राणी सोडला तर, इतर सर्व मी माझ्या मायेनें उत्पन्न करीत असतो व त्यांच्या कर्मानुसार त्यांची या जगतांतील वागणूक, सुखदुःखें निश्चित करीत असतो, असें या अध्यायांत पुन्हां सांगितलें आहे. (९-८) त्यांचीं कर्में कोण निर्माण करतो, या अवघड प्रश्नाचें उत्तर देण्याचे टाळलें आहे. या अध्यायांतील सृष्टिक्रमाची एकंदर परंपरा लक्षांत घेतली तर, असें दिसून येते कीं, श्रीकृष्णास परमेश्वर म्हणजे अत्यंत तेजोमय चित्‌शक्ति आपल्या मायेनें सृष्ट्युत्पत्ति व लयाचा क्रम चालू ठेवते, हें मान्य आहे. आपण केलेल्या कल्पनेनुसार, हें जगत्-हाच परमेश्वर-आपल्या अंगभूत शक्तीनें ह्या जगाचें रहाटगाडगें चालू ठेवतें, असें म्हटलें तर, गीताकार व आपल्या कल्पनेंत फक्त, चिच्छक्ति ह्या जगताहून वेगळी आहे, व ती या जगताचें नियमन करते (गीताकारांचें म्हणणें), आणि ह्या जगताचा चिच्छक्ति हा अंगभूत गुण आहे व जगत् स्वयंसिद्ध असून तेंच आपलें नियमन करतें, एवढाच फरक आहे, हें दिसून येईल. ही आपली कल्पना कशी बुद्धिग्राह्य आहे, ह्यांचें प्रथमारंभीं विवेचन केलेंच आहे.

ह्या अध्यायांत भक्तीनें कोणतेंहि कर्म केलें असतां, त्यायोगें ब्रह्मप्राप्ति लवकर होते, हें सहाव्या अध्यायाच्या शेवटीं व्यक्त केलेलें मत विस्तारानें सांगितलें आहे.)

श्रीभगवान् म्हणाले—तूं दोषदर्शी नाहींस म्हणून तुला विज्ञानासहित गुह्यांतलें गुह्य असें ज्ञान सांगतों कीं, जें जाणलें असतां तूं दुःखरूप संसारापासून मुक्त होशील. (१)

**राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम् ।**
**प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम् ॥२॥**

हें ज्ञान म्हणजे सर्व विद्यांचा राजा व सर्व गूढांमध्येंहि गूढ आहे. हें अत्यंत पवित्र व श्रेष्ठ आहे, प्रत्यक्ष फलदायी आहे. धर्मयुक्त आहे, व अविनाशी असून आचरण्यास सुगम आहे. (२)

**अश्रद्दधानाः पुरुषा धर्मस्यास्य परंतप ।**
**अप्राप्य मां निवर्तन्ते मृत्युसंसारवर्त्मनि ॥३॥**

परंतु या तत्वज्ञानरूप धर्मावर जे विश्वास ठेवीत नाहींत, ते, हे शत्रुतापना, मला येऊन न मिळतां या मृत्युरूप संसारचक्रामध्यें परत येत असतात. (३)

**मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना ।**
**मत्स्थानि सर्वभूतानि न चाहं तेष्ववस्थितः ॥४॥**

मीच माझ्या अव्यक्तरूपानें हें सर्व जग व्यापलेलें आहे. सर्व प्राणिमात्र माझ्या ठिकाणीं आहेत, पण ( निर्गुण स्वरूपांत ) मी त्यांच्या ठिकाणीं नाहीं. (४)

**न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम् ।**
**भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावनः ॥५॥**

( या निर्गुण स्वरूपांत ) सर्व प्राणिमात्रही माझ्या ठिकाणीं नाहींत. अशी ही माझी विलक्षण योगमाया आहे, हें तूं जाण. माझा आत्मा सर्व प्राणिमात्रांचा धारणकर्ता आहे, उत्पन्नकर्ता आहे, पण तो सर्व भूतांच्या ठायीं नाहीं. (५)

**यथाकाशस्थितो नित्यं वायुः सर्वत्रगो महान् ।**
**तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानीत्युपधारय ॥६॥**

ज्याप्रमाणें सर्वगामी महान् वायु नेहमीं आकाशाच्या ठिकाणीं असतो. त्याप्रमाणें (माझ्याच प्रभावानें उत्पन्न झालेले) सर्व प्राणिमात्र माझ्या ठिकाणीं आहेत, हें लक्षांत घे. (६)

**सर्वभूतानि कौन्तेय प्रकृतिं यान्ति मामिकाम्**
**कल्पक्षये पुनस्तानि कल्पादौ विसृजाम्यहम् ॥७॥**

हे कौंतेया, सर्व प्राणिमात्र कल्पक्षयाच्या वेळीं (ब्रह्मदेवाचा दिवस संपण्याच्या वेळीं) माझ्या प्रकृतीला येऊन मिळतात. कल्पाच्या सुरवातीस मी त्यांना पुन्हां निर्माण करतो. (७)

**प्रकृतिं स्वामवष्टभ्य विसृजामि पुनः पुनः ।**
**भूतग्राममिमं कृत्स्नमवशं प्रकृतेर्वशात् ॥८॥**

मी माझ्या त्रिगुणात्मक योगमायेचा अंगिकार करून आपल्या प्रकृतीच्या सर्वथा स्वाधीन असलेला सर्व प्राणिमात्र समूह पुन्हां पुन्हां (त्यांचा कर्मानुसार) निर्माण करतो. (८)

**न च मां तानि कर्माणि निबध्नन्ति धनंजय ।**
**उदासीनवदासीनमसक्तं तेषु कर्मसु ॥९॥**

हे धनंजया, तीं कर्में मला बंधनकारक होत नाहींत. कारण माझी त्या कर्मांत आसक्ति असत नाहीं. उदासीन राहूनच मी हे सर्व व्यवहार करीत असतों. (९)

**मयाध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।**
**हेतुनानेन कौन्तेय जगद्विपरिवर्तते ॥१०॥**

माझ्या नियमनाखालीं माझी प्रकृति (योगमाया) ही चराचर सृष्टी निर्माण करते. या कारणामुळें, हे कौंतेया, हा जगाचा क्रम चालू राहातो. (११)

**अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम् ।**
**परं भावमजानन्तो मम भूतमहेश्वरम् ॥११॥**

सर्व प्राणिमात्रांचा मी ईश्वर आहे, हें माझें स्वरूप न ओळखणारे मूढ लोक मी मनुष्य देहधारी समजून माझी अवहेलना करितात. (११)

मोघाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतसः ।
राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिताः ॥१२॥

ह्या लोकांच्या आशा वृथा, कर्मेंहि निष्फळ, ज्ञानहि व्यर्थच व चित्त भ्रष्ट असून, त्यांनीं मोहयुक्त राक्षसी व आसुरी स्वभावाचा आश्रय केलेला असतो. ( १२ )

महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिताः ।
भजन्त्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ॥१३॥

ज्यांनीं दैवी प्रकृतीचा आश्रय केला आहे असें महात्मे, हे पार्था, मी सर्व प्राणिमात्रांचें अव्यय आदिस्थान आहे, हें जाणून माझी अनन्य-मनानें भक्ति करितात. ( १३ )

सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रताः ।
नमस्यन्तश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ॥१४॥

आणि हे दृढनिश्चयी भक्तजन नेहमीं योगयुक्त राहून मला वारंवार प्रणाम करून, सतत माझें नामस्मरण करून, माझी प्राप्ति होण्याकरितां प्रयत्न करणारे, माझी भक्तीनें उपासना करितात. ( १४ )

ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजन्तो मामुपासते ।
एकत्वेन पृथक्त्वेन बहुधा विश्वतोमुखम् ॥१५॥

आणि दुसरे कांहीं ज्ञानयज्ञद्वारा माझी उपासना करितात. त्यांपैकीं कांहीं मला एक सच्चिदानंदघन परमात्मा समजून, तर कांहीं परमात्मा व जीवात्मा अशा भेदरूपानें तर कांहीं माझें रुप नानाविध प्रकारचें आहे, असें समजून उपासना करितात. ( १५ )

अहं क्रतुरहं यज्ञः स्वधाहमहमौषधम् ।
मन्त्रोऽहमहमेवाज्यमहमग्निरहं हुतम् ॥१६॥

( दृश्यसृष्टीमधील पृथकत्वात एकत्व कसें आहे, हें आतां सांगतात. ) मी श्रौत यज्ञ आहे, मी स्मार्त यज्ञ आहे, श्राद्धामध्यें पितरास अर्पण केलेलें अन्न मी आहे. वनस्पतीपासून ( यज्ञार्थ ) उत्पन्न झालेला रस मी आहे.

( यज्ञांतील ) मंत्र मी, घृत मी, अग्नि मी व हवनरूप क्रियाही मीच आहे. ( १६ )

**पिताहमस्य जगतो माता धाता पितामहः।**
**वेद्यं पवित्रमोंकार ऋक्साम यजुरेव च ॥१७॥**

या सर्व जगताचा पिता, माता, धारणपोषणकर्ता व पितामहही मीच. जें कांहीं पवित्र व ज्ञेय आहे तें व तसेंच, ॐ कार, ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेदही मीच आहे. ( १७ )

**गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत्।**
**प्रभवः प्रलयः स्थानं निधानं बीजमव्ययम् ॥१८॥**

सर्वांची गति, सर्वांचा पोषक, सर्वांचा स्वामी, सर्व शुभाशुभकर्मांचा साक्षी, सर्वांचें निवासस्थान व शरणागतांचें आश्रयस्थान, सर्वांचा सखा, उत्पत्तिस्थान, विलयस्थान, स्थिति, निधान ( प्रलयकाळीं सर्व प्राणिमात्र सूक्ष्मरूपानें ज्यांत विलीन होतात तें), व सर्वांचें अविनाशी बीज मीच आहे.

**तपाम्यहमहं वर्षं निगृह्णाम्युत्सृजामि च।**
**अमृतं चैव मृत्युश्च सदसच्चाहमर्जुन ॥१९॥**

मी ऊन पाडितो, अवर्षण तथा वृष्टीहि मीच करितों. हे अर्जुना, मी अमृत आहे, मृत्यु आहे व सत् व असत् हेंहि मीच आहे. ( १९ )

**त्रैविद्या मां सोमपाः पूतपापा**
**यज्ञैरिष्ट्वा स्वर्गतिं प्रार्थयन्ते।**
**ते पुण्यमासाद्य सुरेन्द्रलोक-**
**मश्नन्ति दिव्यान्दिवि देव भोगान् ॥२०॥**

ऋग्वेद, सामवेद व यजुर्वेद यांमध्यें सांगितलेल्या काम्यकर्मांचें आचरण करणारे पापक्षालन झालेलें व सोमयज्ञ करणारे. यज्ञानें माझी पूजा करून स्वर्गाची इच्छा करितात ते लोक पुण्यवान् देवलोक मिळवून तेथें दिव्य असे अनेक भोग उपभोगितात. ( २० )

**ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति।**
**एवं त्रयीधर्ममनुप्रपन्ना गतागतं कामकामा लभन्ते ॥२१॥**

ते त्या विशाल अशा स्वर्गलोकांतील भोग भोगून, पुण्यक्षय झाल्यानंतर परत मृत्युलोकांत येतात. याप्रमाणें वेदांमध्यें सांगितलेल्या धर्माचें (काम्यकर्माचें) आचरण केल्यानें स्वर्ग, मृत्युलोकांकडे हेलपाटे करावे लागणारीं फळें मिळवितात. (गीताकार स्वर्गप्राप्तिरूप काम्यकर्माचा निषेध ठिकठिकाणीं करतात. त्यांना निष्काम समाजसेवेचा मार्गच पसंत आहे. श्रीकृष्णाचा जीवनक्रमच या जीवितोद्देशाची साक्ष देतो.)

**अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।**
**तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥२२॥**

परंतु अनन्यभावानें जे लोक माझें चिंतन करून उपासना करितात, अशा नित्य योगयुक्त निष्काम कर्मयोग्यांचा संसारांतील नित्य निर्वाह मी चालवितों. (असे योगी निष्कामरीत्या कर्माचें आचरण योग्य रीतीनें करीत असल्यानें त्यांच्या उदरनिर्वाहाची त्यांना काळजी करावी लागत नाहीं, असा भावार्थ. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांना उदरनिर्वाहाची कधींच काळजी करावी लागली नाहीं, (२२)

**येऽप्यन्यदेवता भक्ता यजन्ते श्रद्धयान्विताः ।**
**तेऽपि मामेव कौन्तेय यजन्त्यविधिपूर्वकम् ॥२३॥**

आणि हे अर्जुना, जे भक्त दुसऱ्या देवतांची श्रद्धेनें उपासना करितात ते देखील माझीच अविधिपूर्वक (अज्ञानपूर्वक) उपासना करीत असतात.

**अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुरेव च ।**
**न तु मामभिजानन्ति तत्त्वेनातश्च्यवन्ति ते ॥२४॥**

मीच सर्व यज्ञांचा भोक्ता व स्वामी आहे, हें ते भक्त तत्वतः जाणत नाहींत, म्हणूनच त्यांच्याकडून अशा चुका होतात. (२४)

**यान्ति देवव्रता देवान्पितॄन्यान्तिः पितृव्रताः ।**
**भूतानि यान्ति भूतेज्या यान्ति मद्याजिनोऽपि माम् ॥**

जे देवतांची पूजा करितात, ते त्यांना जाऊन मिळतात. पितरांची पूजा करणारे पितरांस प्राप्त होतात, भूतखेतांची पूजा करणारे भूतांस व

माझी पूजा करणारे मलाच येऊन मिळतात. (तात्पर्य ज्याच्या मनीं जसा भाव, तया तैसा भेटे देव.) (२५)

**पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।**
**तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥२६॥**

(माझी भक्ति करण्यास मोठी साधनसामग्री नको) जो मला भक्तीनें पत्र, पुष्प, फळ किंबहुना पाणीही अर्पण करितो, त्या यतचित्त भक्ताची ती देणगी मी प्रेमानें स्वीकारतों. (२६)

**यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।**
**यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥२७॥**

याकरितां हे कौंतेया, तूं जें जें कर्म करितोस, जें जें भक्षण करितोस जें जें हवन करितोस, जें जें दान देतोस, आणि जी तपश्चर्या करितोस, ते सर्व मला अर्पण करीत जा. (२७)

**शुभाशुभफलैरेवं मोक्ष्यसे कर्मबन्धनैः ।**
**संन्यसयोगयुक्तात्मा विमुक्तो मामुपैष्यसि ॥२८॥**

म्हणजे तूं काम्य कर्मांपासून प्राप्त होणाऱ्या सर्व शुभाशुभ फलांच्या बंधनांपासून मुक्त होशील. आणि काम्य कर्मफलांचा त्याग करण्याच्या ह्या योगानें शुद्धान्तःकरण होत्साता तूं विमुक्त होऊन मला येऊन मिळशील. (२८)

**समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः ।**
**ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ॥२९॥**

सर्व प्राणिमात्रांस मी समभावानें लेखतो. मला कोणी अप्रिय नाहीं व प्रियही नाहीं. परंतु जे माझी भक्तीनें पूजा करितात, ते माझ्यामध्यें व मी त्यांच्यामध्यें वास करितो. (२९)

**अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक्।**
**साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ॥३०॥**

जर एखादा अत्यंत पापी मनुष्य माझी अनन्यभावानें भक्ति करूं लागला, तर तो साधूच समजला गेला पाहिजे. कारण त्याच्या बुद्धीचा निश्चय चांगला झालेला असतो. (३०)

**क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिं निगच्छति।**
**कौन्तेय प्रति जानीहि न मे भक्तः प्रणश्यति ॥३१॥**

(असा निश्चय झाल्यानें पुढें त्याच्याकडून पापाचरण होत नाहीं. त्यामुळें ) तो शीघ्र पुण्यात्मा होतो व सदा टिकणारी चित्तशांति मिळवितो. हे कौंतेया, तूं निश्चित् लक्षांत ठेव कीं, माझा भक्त कधींहि नाश पावत नाहीं. ( ३१ )

**मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः।**
**स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम् ॥३२॥**

हे पार्था, माझा एकदां आश्रय घेतला म्हणजे मग ती स्त्री असो, वैश्य असो, शुद्र असो किंवा एखाद्या पापयोनींत जन्मलेला असो, हे सर्व परमगतीस जाऊन मिळतात. ( येथें गीताकारांचा व्यापक दृष्टिकोन व्यक्त होतो. निष्काम समाजसेवा करणारा मग ती स्त्री असो वा पुरुष असो, ब्राह्मण असो वा शुद्र असो, तो परमगतीस मिळणारच असा त्यांचा दृढ अभिप्राय आहे. समाजसेवा म्हणजे टिळक, गांधीप्रमाणें केलेली अशी मोठी सेवा एवढाच संकुचित अर्थ घ्यावयाचा नाहीं. प्रत्येक व्यक्तीनें समाजधारणेच्या दृष्टीनें आपल्या प्रकृतिधर्मानुसार प्राप्त झालेलीं कर्तव्य-कर्में ईश्वरार्पणबुद्ध्या करणें, म्हणजे समाजसेवा होय; असा गीताकारांचा व्यापक दृष्टिकोन आहे. ) ( ३२ )

**किं पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयस्तथा।**
**अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम् ॥३३॥**

( अशी जर स्थिति आहे ) तर मग पुण्यशील ब्राह्मण व राजर्षि भक्तजन परमगतीस प्राप्त होतील यांत काय संशय ! ह्या अनित्य व सुख-रहित मनुष्यलोकास आलेला तूं, त्वां माझी ( अनन्यभावानें ) उपासना करावी. ( ३३ )

**मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।**
**मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः ॥३४॥**

माझ्या ठिकाणीं चित्तलय कर, माझा भक्त हो, माझेंच यजन कर, मला नमस्कार कर. अशा रीतीनें मत्परायण झालास तर शुद्धान्तःकरणाचा तूं मलाच येऊन मिळशील. ( ३४ )

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायांयोगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे ज्ञानकर्मसंन्यासयोगो नाम
नवमोऽध्याय ॥ ९ ॥

श्रीमद्भगवद्गीतेंतील **राजविद्याराजगुह्ययोग** नांवाचा नववा अध्याय समाप्त झाला.

# अथ दशमोऽध्यायः

श्रीभगवानुवाच

( मागील अध्यायांत सांगितलेल्या उपासनामार्गाचें विवेचन या अध्यायांत चालू ठेवलें आहे. )

**भूय एव महाबाहो शृणु मे परमं वचः ।**
**यत्तेऽहं प्रीयमाणाय वक्ष्यामि हितकाम्यया ॥१॥**

श्रीभगवान् म्हणाले—हे महाबाहो, तूं माझी उत्कृष्ट गोष्ट पुन्हां ऐक. तुझें कल्याण व्हावें म्हणून व तूं मला प्रिय असल्यानें तुला मी ती सांगतों. ( १ )

**न मे विदुः सुरगणाः प्रभवं न महर्षयः ।**
**अहमादिर्हि देवानां महर्षीणां च सर्वशः ॥२॥**

देवांचे समुदाय किंवा महर्षिलोक यांना माझी उत्पत्ति कळत नाहीं, कारण मीच सर्व प्रकारें या देवांचें व महर्षींचेंहि आदिकारण आहे. ( २ )

**यो मामजमनादिं च वेत्ति लोकमहेश्वरम् ।**
**असंमूढः स मर्त्येषु सर्वपापैः प्रमुच्यते ॥३॥**

मी जन्मरहित, अनादि व सर्व लोकांचा ( स्वर्ग, मृत्यु आदि ) महान् ईश्वर आहे, असें जो जाणतो; तो या मर्त्य मनुष्यांमध्यें ज्ञानवान् पुरुष सर्व पापांपासून मुक्त होतो. ( ३ )

**बुद्धिर्ज्ञानमसंमोहः क्षमा सत्यं दमः शमः ।**
**सुखं दुःखं भवोऽभावो भयं चाभयमेव च ॥४॥**
**अहिंसा समता तुष्टिस्तपो दानं यशोऽयशः ।**
**भवन्ति भावा भूतानां मत्त एव पृथग्विधाः ॥५॥**

बुद्धि, ज्ञान, असंमोह, क्षमा, सत्य, इंद्रियदमन, मनःशांति, सुख, दुःख, उत्पत्ति, प्रलय, भय आणि अभय, अहिंसा, समता, तृप्ति, तप,

दान, यश आणि अपयश, इत्यादि प्राणिमात्रांचे निरनिराळे भाव माझ्यापासूनच उत्पन्न होतात. ( ४–५ )

**महर्षयः सप्त पूर्वे चत्वारो मनवस्तथा ।**

**मद्भावा मानसा जाता येषां लोक इमाः प्रजाः ॥६॥**

( मरीचि, अंगिरस, अत्रि, पुलस्त्य, पुलह, ऋतु आणि वसिष्ठ हे ) सात महर्षि, वासुदेव ( आत्मा ), संकर्षण ( जीव ), प्रद्युम्न ( मन ), आणि अनिरुद्ध ( अहंकार ) हे ) पूर्वीचे चार तसेंच ( सात ) मनु, हें माझ्या मनांपासून उत्पन्न झालेलें भाव आहेत. हे सर्व लोक ही यांचीच प्रजा होय. ( ६ )

**एतां विभूतिं योगं च मम यो वेत्ति तत्त्वतः ।**

**सोऽविकम्पेन योगेन युज्यते नात्र संशयः ॥७॥**

माझी ही विभूति ( विस्तार ) व ती निर्माण करण्याचें सामर्थ्य हें जो तत्वतः जाणतो; त्याला स्थिर कर्मयोग प्राप्त होतो यांत संशय नाहीं. ( ७ )

**अहं सर्वस्य प्रभवो मत्तः सर्वं प्रवर्तते ।**

**इति मत्वा भजन्ते मां बुधा भावसमन्विताः ॥८॥**

मी सर्वांचे उत्पत्तिकारण, माझ्यापासूनच सर्वांची प्रवृत्ति होतें, असें जाणून शहाणे लोक भक्तिपुरःसर माझी पूजा करितात. ( ८ )

**मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयन्तः परस्परम् ।**

**कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च ॥९॥**

हे लोक माझ्या ठिकाणीं चित्त ठेवून, माझ्याच ठिकाणीं जीवप्राण ठेवून, एकमेकांना माझ्याचविषयीं माहिती सांगून व माझे गुण गाऊन नेहमीं संतुष्ट होतात व सुख पावतात. ( ९ )

**तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् ।**

**ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते ॥१०॥**

अशा सतत योगयुक्त अंतःकरणानें माझी प्रीतिपूर्वक पूजा करणाऱ्या भक्तांना मी समत्वबुद्धीचा योग देतों, कीं ज्यायोगें ते (सहज) मला येऊन मिळतात. ( १० )

**तेषामेवानुकम्पार्थमहमज्ञानजं तमः ।**
**नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता ॥११॥**

या लोकांवर दया करण्याकरितांच म्हणून अज्ञानानें उत्पन्न होणाऱ्या अंधःकाराचा त्यांच्या अंतःकरणांत प्रवेश करून प्रकाशमय तत्वज्ञानरूप दीपकद्वारा नाश करितो. ( ११ )

अर्जुन उवाच

**परं ब्रह्म परं धाम पवित्रं परमं भवान् ।**
**पुरुषं शाश्वतं दिव्यमादिदेवमजं विभुम् ॥१२॥**
**आहुस्त्वामृषयः सर्वे देवर्षिर्नारदस्तथा ।**
**असितो देवलो व्यासः स्वयं चैव ब्रवीषि मे ॥१३॥**

अर्जुन म्हणाला—तूं परब्रह्म, तूं श्रेष्ठ व पवित्र परमधाम आहेस. तूं अक्षर पुरुष आहेस, दिव्य आहेस. आदिदेव व अजन्मा व सर्वव्यापी आहेस, असें तुला सर्व ऋषीगण, देवर्षि नारद तसेंच असित, देवल व व्यास इत्यादि म्हणतात. तूं स्वतःहि तेंच सांगतोस. ( १२–१३ )

**सर्वमेतदृतं मन्ये यन्मां वदसि केशव ।**
**न हि ते भगवन्व्यक्तिं विदुर्देवा न दानवाः ॥१४॥**

हे केशवा, तूं जें कांहीं सांगतोस तें सर्व खरें आहे, असें मला वाटतें. हे भगवान्, तें तुझें मूळ स्वरूप देवानांहि कळत नाहीं. व दानवनांहि नाहीं. ( १४ )

**स्वयमेवात्मनात्मानं वेत्थ त्वं पुरुषोत्तम ।**
**भूतभावन भूतेश देवदेव जगत्पते ॥१५॥**

हे प्राणिमात्र उत्पन्न करणाऱ्या भूतेशा, हे देवाधिदेवा, हे जगत्पते, हे पुरुषोत्तमा, तूं स्वतःच स्वतःला जाणतोस. ( दुसरा कोणीहि तुला जाणत नाहीं.) ( १५ )

**वक्तुमर्हस्यशेषेण दिव्या ह्यात्मविभूतयः ।**
**याभिर्विभूतिभिर्लोकानिमांस्त्वं व्याप्य तिष्ठसि ॥१६॥**

तूं तुझ्या निःशेषरीत्या दिव्य विभूति ( विस्तार ) ज्यांच्यायोगें या सर्व लोकांना व्यापून राहातोस, त्या सर्व सांगूं शकतोस. ( १६ )

**कथं विद्यामहं योगिंस्त्वां सदा परिचिन्तयन् ।**
**केषु केषु च भावेषु चिन्त्योऽसि भगवन्मया ॥१७॥**

हे योगिन् , तुझें सतत चिंतन करीत असतां तुला मी कसें जाणावें. आणि हे भगवन् , कोणत्या कोणत्या स्वरूपांमध्यें मी तुझें चिंतन करावें. ( १७ )

**विस्तरेणात्मनो योगं विभूतिं च जनार्दन ।**
**भूयः कथय तृप्तिर्हि शृण्वतो नास्ति मेऽमृतम् ॥१८॥**

आणि हे जनार्दना ! तूं आपला विस्तार व योगशक्तीची माहिती पुन्हां सविस्तर सांग. तुझें अमृतमय वचन ऐकत असतां, तृप्तीच होत नाहीं, ( १८ )

श्रीभगवानुवाच

**हन्त ते कथयिष्यामि दिव्या ह्यात्मविभूतयः ।**
**प्राधान्यतः कुरुश्रेष्ठ नास्त्यन्तो विस्तरस्य मे ॥१९॥**

**श्रीभगवान् म्हणाले**—अरे बाबा, मी माझ्या मुख्य मुख्य दिव्य विभूति कोणत्या तें सांगतों. हे कुरुश्रेष्ठा, माझ्या विस्ताराला अंतच नाहीं. ( मग मी सर्व कशा सांगणार ! ) ( १९ )

**अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः ।**
**अहमादिश्च मध्यं च भूतानामन्त एव च ॥२०॥**

हे गुडाकेशा, सर्व प्राणिमात्रांच्या अंतःकरणांत असलेला आत्मा मी आहे. सर्व प्राणिमात्रांचा आदि, मध्य व अंतही मीच आहे. ( २० )

**आदित्यानामहं विष्णुर्ज्योतिषां रविरंशुमान् ।**
**मरीचिर्मरुतामस्मि नक्षत्राणामहं शशी ॥२१॥**

( बारा ) आदित्यांपैकीं विष्णू मी, तेजस्व्यांमधील किरणमाली सूर्य मी. वायुदेवतांमध्यें मरीचि मी. नक्षत्रांमध्यें चंद्रमा मी. ( २१ )

**वेदनां सामवेदोऽस्मि देवानामस्मि वासवः**
**इन्द्रियाणां मनश्चास्मि भूतानामस्मि चेतना ॥२२॥**

वेदांमध्यें सामवेद मी. देवांमध्यें इंद्र मी. सर्व इंद्रियांमध्यें मन मी. अखिल प्राणिमात्रांमधील चेतन म्हणजे ज्ञानशक्ति मी आहे. ( २२ )

**रुद्राणां शंकरश्चास्मि वित्तेशो यक्षरक्षसाम् ।**
**वसूनां पावकश्चास्मि मेरुः शिखरिणामहम् ॥२३॥**

( अकरा ) रुद्रांमध्यें शंकर मी. यक्ष व राक्षसांमध्यें धनाचा स्वामी कुबेर मी. (अष्ट) वसूंमध्यें अग्नि मी. (सप्त) पर्वतांत मेरुही मी. ( २३ )

**पुरोधसां च मुख्यं मां विद्धि पार्थ बृहस्पतिम् ।**
**सेनानीनामहं स्कन्दः सरसामस्मि सागरः ॥२४॥**

सर्व पुरोहितांमध्यें मुख्य पुरोहित जो बृहस्पति तोही मीच आहे, हें पार्था, हें तूं जाण. सेनानायकांमध्यें मी स्कंद आहे व जलाशयांमधील ( श्रेष्ठ ) सागरही मीच. ( २४ )

**महर्षीणां भृगुरहं गिरामस्म्येकमक्षरम् ।**
**यज्ञानां जपयज्ञोऽस्मि स्थावराणां हिमालयः ॥२५॥**

महर्षींत भृगु तो मी, वाणीमध्यें एकाक्षर ॐकार तोही मी. सर्व प्रकारच्या यज्ञांतील जपयज्ञ मी. स्थावर वस्तूंत हिमालय मी. ( २५ )

**अश्वत्थः सर्ववृक्षाणां देवर्षीणां च नारदः ।**
**गन्धर्वाणां चित्ररथः सिद्धानां कपिलो मुनिः ॥२६॥**

सर्व वृक्षांमध्यें श्रेष्ठ अश्वत्थ तो मी. देवर्षींमध्यें नारद तो मी. गंधर्वोमध्यें चित्ररथ तो मी. सिद्ध मुनिजनांमध्यें कपिल तो मी. ( २६ )

**उच्चैःश्रवसमश्वानां विद्धि माममृतोद्भवम् ।**
**ऐरावतं गजेन्द्राणां नराणां च नराधिपम् ॥२७॥**

घोड्यांमधील श्रेष्ठ घोडा उच्चैःश्रवा कीं जो अमृतापासून उत्पन्न झाला तोही मीच, हें तूं ओळख. गजश्रेष्ठांमधील ऐरावत व मनुष्यांमध्यें राजा मीच. ( २७ )

**आयुधानामहं वज्रं धेनूनामस्मि कामधुक् ।**
**प्रजनश्चास्मि कन्दर्पः सर्पाणामस्मि वासुकिः ॥२८॥**

सर्व शस्त्रास्त्रांमध्यें वज्र मी. गायींमधील कामधेनु मी. संतानउत्पत्तिहेतु कामदेव मी. सर्पगणांमध्यें वासुकि मी. ( २८ )

**अनन्तश्चास्मि नागानां वरुणो यादसामहम् ।**
**पितॄणामर्यमा चास्मि यमः संयमतामहम् ॥२९॥**

नागांमध्यें अनंत मी आहे. जलचरांमध्यें वरुण मी. पितरांमध्यें पित्रेश्वर अर्यमा तो मीच. शासन करणाऱ्यांमधील श्रेष्ठ जो यम तोही मीच. ( २९ )

**प्रह्लादश्चास्मि दैत्यानां कालः कलयतामहम् ।**
**मृगाणां च मृगेन्द्रोऽहं वैनतेयश्च पक्षिणाम् ॥३०॥**

दैत्यांमध्यें मी प्रल्हाद आहे. ( क्षण, घडी, दिन, पक्ष, मास इत्यादि ) कालगणनेंतील काल मी आहे. पशूंतील सिंह मी आणि पक्ष्यांतील गरुडही मीच. ( ३० )

**पवनः पवतामस्मि रामः शस्त्रभृतामहम् ।**
**झषाणां मकरश्चास्मि स्रोतसामस्मि जाह्नवी ॥३१॥**

वेगवानांत वायु मी आहे. शस्त्रधाऱ्यांमध्यें राम मी आहे, आणि माशांमध्यें (जलचरामध्यें) मगर मी आहे, व नद्यांमध्यें गंगा मी आहे. ( ३१ )

**सर्गाणामादिरन्तश्च मध्यं चैवाहमर्जुन ।**
**अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदतामहम् ॥३२॥**

हे अर्जुना, सकल सृष्टीचा आदि, अंत व मध्य मीच आहे. सर्व विद्यांमधील जी अध्यात्मविद्या ती मी. आणि तत्वविवेचनाकरितां जे वादविवाद करतात तोही मीच. ( ३२ )

**अक्षराणामकारोऽस्मि द्वन्द्वः सामासिकस्य च ।**
**अहमेवाक्षयः कालो धाताहं विश्वतोमुखः ॥३३॥**

अक्षरांमध्यें 'ॐ'कार तो मी आहे, आणि समासांमध्यें द्वंद्व समास तो मी. अविनाशी काल तो मी. आणि विराटस्वरूप सर्वांचा पोषणकर्ता ब्रह्मदेवही मीच. ( ३३ )

**मृत्युः सर्वहरश्चाहमुद्भवश्च भविष्यताम् ।**
**कीर्तिः श्रीर्वाक्च नारीणां स्मृतिर्मेधा धृतिः क्षमा ॥३४॥**

सर्वांचा नाश करणारा मृत्यु तो मीच. आणि पुढील उत्पत्तीचा उत्पादकही मीच. कीर्ति, श्री, वाक्, स्मृति, मेधा, धृति व क्षमा या स्त्री देवतांही मीच. ( ३४ )

**बृहत्साम तथा साम्नां गायत्री छन्दसामहम् ।**
**मासानां मार्गशीर्षोऽहमृतूनां कुसुमाकरः ॥३५॥**

सामांमध्यें बृहत्साम तो मी. तसेंच छन्दामध्यें गायत्रीही मीच. महिन्यांमध्यें मार्गशीर्ष मी व सर्व ऋतूंमध्यें वसंत तो मी. ( ३५ )

**द्यूतं छलयतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् ।**
**जयोऽस्मि व्यवसायोऽस्मि सत्त्वं सत्त्ववतामहम् ॥३६॥**

फसवणूक करणाऱ्यांत द्यूत तें मी. तेजस्व्यांमधील तेज तें मी. विजयी लोकांचा जय तो मी. उद्योगी लोकांचा उद्योग मी व सत्त्ववानांचें सत्त्वही मीच. ( ३६ )

**वृष्णीनां वासुदेवोऽस्मि पाण्डवानां धनंजयः**
**मुनीनामप्यहं व्यासः कवीनामुशना कविः ॥३७॥**

वृष्णिकुलांतील श्रेष्ठ वासुदेव तो मी. पांडवांमधील धनंजय तो मी. ऋषिलोकांतील व्यास मी. व कवीजनांमधील शुक्राचार्य मी आहे. ( ३७ )

**दण्डो दमयतामस्मि नीतिरस्मि जिगीषताम् ।**
**मौनं चैवास्मि गुह्यानां ज्ञानं ज्ञानवतामहम् ॥३८॥**

दमन करणाऱ्यांचा दंड मी आहे. जय इच्छिणाऱ्यांची राजनीति मी आहे. गुह्यवस्तूंतील मौन मी आहे आणि ज्ञानीजनांतील ज्ञानही मी आहे.

**यच्चापि सर्वभूतानां बीजं तदहमर्जुन ।**
**न तदस्ति विना यत्स्यान्मया भूतं चराचरम् ॥३८॥**

आणि हे अर्जुना, सर्व प्राणिमात्रांचें उत्पत्तिकारण बीज तें मी आहे. या चराचर प्राणिमात्रांमध्यें अशी एकही वस्तू नाहीं कीं जिच्यांत मी नाहीं. ( ३९ )

**नान्तोऽस्ति मम दिव्यानां विभूतीनां परंतप ।**
**एष तूद्देशतः प्रोक्तो विभूतेर्विस्तरो मया ॥४०॥**

हे परंतपा, माझ्या दिव्य विभूतींना अंत नाहीं. हा जो तुला सांगितला तो प्रमुख विभूति-विस्तार आहे. ( ४० )

**यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ।**
**तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम् ॥४१॥**

ज्या ज्या वस्तूंत ऐश्वर्य आहे, तेज आहे, ती ती माझ्या तेजाच्या अंशांतून निर्माण झाली आहे, असें समज. ( ४१ )

**अथवा बहुनैतेन किं ज्ञातेन तवार्जुन ।**
**विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् ॥४२॥**

अथवा हे पृथक् पृथक् विभूतिविस्तार जाणण्यांत तुला काय प्रयोजन आहे ? थोडक्यांत एवढेंच जाण कीं, हें सर्व चराचर जगत् मी माझ्याच अंशानें व्यापून उरलों आहे. ( ४२ )

श्रीमद्भगवद्गीतेंतील **विभूतियोग** नांवाचा दहावा अध्याय समाप्त झाला.

---

# अथैकादशोऽध्यायः

अर्जुन उवाच

**मदनुग्रहाय परमं गुह्यमध्यात्मसंज्ञितम् ।**
**यत्त्वयोक्तं वचस्तेन मोहोऽयं विगतो मम ॥१॥**

( एवढा विभूतियोग सांगितल्यावर अर्जुनास साहजिकच हा विस्तार स्वतः पहावा अशी इच्छा उत्पन्न झाली. तो अर्जुनास दाखविला. त्याचे वर्णन या अध्यायांत आहे. )

**अर्जुन म्हणाला**—माझ्यावर अनुग्रह करण्याकरितां तूं जें अध्यात्म-विषयक मोठें गुह्य वचन सांगितलेंस त्यामुळें माझा मोह नाहींसा झाला आहे. ( १ )

**भवाप्ययौ हि भूतानां श्रुतौ विस्तरशो मया ।**
**त्वत्तः कमलपत्राक्ष माहात्म्यमपि चाव्ययम् ॥२॥**

हे कमलनेत्रा, मी तुझ्यापासून प्राणिमात्रांची उत्पत्ति व प्रलय सविस्तर ऐकिली आहेत. तसेंच तुझें अक्षय्य माहात्म्यही श्रवण केलें आहे. ( २ )

**एवमेतद्यथात्थ त्वमात्मानं परमेश्वर ।**
**द्रष्टुमिच्छामि ते रूपमैश्वरं पुरुषोत्तम ॥३॥**

हे परमेश्वरा, तूं जसें सांगितलेंस तसेंच तें माहात्म्य आहे. परंतु हे पुरुषोत्तमा, हें तुझें ईश्वरी स्वरूप पाहावें अशी माझी इच्छा आहे. ( ३ )

**मन्यसे यदि तच्छक्यं मया द्रष्टुमिति प्रभो ।**
**योगेश्वर ततो मे त्वं दर्शयात्मानमव्ययम् ॥४॥**

हे प्रभो, तें स्वरूप पहाणें मला शक्य आहे; असें जर तुला वाटत असेल तर, हे योगेश्वरा, तें तुझें अव्यय रूप मला दाखव. ( ४ )

श्रीभगवानुवाच

**पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्रशः ।**
**नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनि च ॥५॥**

**श्रीभगवान् म्हणाले**—हे पार्था, माझीं नाना प्रकारचीं नाना रंगांचीं व आकारांचीं हीं शेंकडों अथवा हजारों रूपें पहा. ( ५ )

**पश्यादित्यान्वसून्रुद्रानश्विनौ मरुतस्तथा ।**
**बहून्यदृष्टपूर्वाणि पश्याश्चर्याणि भारत ॥६॥**

हे भारता, द्वादश आदित्य, अष्ट वसू, एकादश रूद्र, दोन अश्विनीकुमार, तसेंच एकोणपन्नास मरुद्गण आणि पुष्कळ पूर्वीं न पाहिलेलीं आश्चर्यें पहा. ( ६ )

**इहैकस्थं जगत्कृत्स्नं पश्याद्य सचराचरम् ।**
**मम देहे गुडाकेश यच्चान्यद्द्रष्टुमिच्छसि ॥७॥**

हे गुडाकेशा, ( निद्रेस जिंकणाऱ्या अर्जुना, ) माझ्या देहाच्या ठायीं एकत्र असलेलें हें संपूर्ण चराचर जग आतां पहा. तसेंच तूं जें दुसरें कांहीं पाहूं इच्छितोस तेंही पहा. ( ७ )

**न तु मां शक्यसे द्रष्टुमनेनैव स्वचक्षुषा ।**
**दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम् ॥८॥**

अर्थात् ह्या आपल्या डोळ्यांनींच हें माझें विश्वरूप तूं पाहूं शकणार नाहींस याकरितां मी तुला दिव्यदृष्टि देतों. आतां माझें ईश्वरी स्वरूप पहा. ( ८ )

संजय उवाच

**एवमुक्त्वा ततो राजन्महायोगेश्वरो हरिः ।**
**दर्शयामास पार्थाय परमं रुपमैश्वरम् ॥९॥**

**संजय म्हणाला**—हे राजन्, एवढें बोलून महायोगेश्वर श्रीकृष्ण असें ईश्वरी रूप अर्जुनास दाखवितां झाला. ( ९ )

**अनेकवक्त्रनयनमनेकाद्भुतदर्शनम् ।**
**अनेकदिव्याभरणं दिव्यानेकोद्यतायुधम् ॥१०॥**
**दिव्यमाल्याम्बरधरं दिव्यगन्धानुलेपनम् ।**
**सर्वाश्चर्यमयं देवमनन्तं विश्वतोमुखम् ॥११॥**

अनेक तोंडें व डोळे असलेलें, अद्भुत दिसणारें, अनेक दिव्यालंकारांनीं सजविलेलें, अनेक दिव्यास्त्र धारण केलेलें, दिव्य पुष्पें व वस्त्रें धारण केलेलें, दिव्य गंधाची उटी लाविलेलें, सर्वाश्चर्यांनीं युक्त, अनंत व विराट-स्वरूप, असें हें रूप होतें. ( १०–११ )

**दिवि सूर्यसहस्रस्य भवेद्युगपदुत्थिता ।**
**यदि भाः सदृशी सा स्याद्भासस्तस्य महात्मनः ॥१२॥**

आकाशामध्यें एकदम एक हजार सूर्यांची प्रभा उदित होईल; तरु कदाचित् ती या महात्म्याच्या प्रभेशीं समान होईल. ( १२ )

**तत्रैकस्थं जगत्कृत्स्नं प्रविभक्तमनेकधा ।**
**अपश्यद्देवदेवस्य शरीरे पाण्डवस्तदा ॥१३॥**

त्या श्रीदेवाधिदेवाच्या शरीरांत, अर्जुनानें तेव्हां नाना प्रकारांनीं विभक्त असलेलें संपूर्ण जगत् पाहिलें. ( १३ )

**ततः स विस्मयाविष्टो हृष्टरोमा धनंजयः ।**
**प्रणम्य शिरसा देवं कृताञ्जलिरभाषत ॥१४॥**

नंतर तो धनंजय आश्चर्यचकित होत्साता, हर्षानें रोमांचित झालेला त्या देवाला नमस्कार करून हात जोडून म्हणाला. ( १४ )

अर्जुन उवाच

**पश्यामि देवांस्तव देव देहे सर्वांस्तथा भूतविशेषसङ्घान् ।**
**ब्रह्माणमीशं कमलासनस्थमृषींश्च सर्वानुरगांश्च दिव्यान्॥१५॥**

**अर्जुन म्हणाला**—हे देवा, तुझ्या देहाच्या ठिकाणीं सर्व प्रकारच्या प्राणिमात्राचें समुदाय, तसेंच कमलासनस्थ ब्रह्मदेव आणि महादेव व सर्व ऋषिजन व दिव्य सर्पजाति यांना पहातो आहे. ( १५ )

**अनेकबाहूदरवक्त्रनेत्रं पश्यामि त्वां सर्वतोऽनन्तरूपम् ।**
**नान्तं न मध्यं न पुनस्तवादिं पश्यामि विश्वेश्वर विश्वरूप ॥**

अनेक बाहु, उदरें, तोंडें, डोळे असलेलें तुझें हे विराटरूप मी पहातों आहे. हे विश्वेश्वरा, विश्वरूपा, तुझा अन्त, मध्य किंवा आदि मला दिसत नाहीं. ( तूं अनंत आहेस हें मी पहात आहे )( १६ )

**किरीटिनं गदिनं चक्रिणं च तेजोराशिं सर्वतो दीप्तिमन्तम् ।**
**पश्यामि त्वां दुर्निरीक्ष्यं समन्ताद्दीप्तानलार्कद्युतिमप्रमेयम् ।१७।**

किरीट, गदा व चक्र धारण करणारा, तेजाचा राशि, सर्व बाजूंनीं दीप्तिमान्, डोळ्यांनीं पहाण्यास कठीण, प्रदीप्त अग्निप्रमाणें व सूर्याप्रमाणें तेजस्वी व चोहोंकडे अपरंपार भरलेलें तुम्हीच सर्वत्र दिसत आहां. (१७)

**त्वमक्षरं परमं वेदितव्यं त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।**
**त्वमव्ययः शाश्वतधर्मगोप्ता सनातनस्त्वं पुरुषो मतो मे ।१८।**

तूं अक्षर परमात्मा आहे असें जाणणें जरूर आहेस. तूंच या विश्वाचा मुख्य आधार आहेस. तूं अविनाशि असून चिरंतन धर्माचा संरक्षक आहेस. तूं सनातन पुरुष आहेस, असें माझें मत आहे. ( १८ )

**अनादिमध्यान्तमनन्तवीर्यमनन्तबाहुं शशिसूर्यनेत्रम् ।**
**पश्यामि त्वां दीप्तहुताशवक्त्रं स्वतेजसा विश्वमिदं तपन्तम् ॥**

तुला आदि, मध्य व अंत नाहीं. तूं अनन्त सामर्थ्यवान् आहेस. अनन्तबाहु असलेल्या तुझे चंद्र व सूर्य हे डोळे आहेत. तुझें तोंड म्हणजे प्रज्वलित अग्नि व तूं आपल्या तेजानें हें सर्व विश्व प्रकाशमान करीत आहेस, असें मी पहातों. ( १९ )

**द्यावापृथिव्योरिदमन्तरं हि व्याप्तं त्वयैकेन दिशश्च सर्वाः ।**
**दृष्ट्वाद्भुतं रूपमुग्रं तवेदं लोकत्रयं प्रव्यथितं महात्मन् ॥२०॥**
**व**

स्वर्ग व पृथ्वीमधील अंतर व सर्व दिशा तूं एकट्यानेंच व्यापल्या आहेस. हें महात्मन् , तुझें हें अद्भुत व उग्र रूप पाहून तिन्ही लोक भयभीत झालेले आहेत. ( २० )

**अमी हि त्वां सुरसङ्घा विशन्ति केचिद्भीताः प्राञ्जलयो गृणन्ति**
**स्वस्तीत्युक्त्वा महर्षिसिद्धसङ्घाः स्तुवन्ति त्वां स्तुतिभिः पुष्कलाभिः ॥२१॥**

हे सर्व देवतांचे समूह आपल्याच ठिकाणीं प्रवेश करीत आहेत. कांहींजण भयभीत होऊन हात जोडून आपलें गुणगान करीत आहेत.

तसेंच महर्षि व सिद्धांचे समुदाय 'कल्याणं होवो' असें म्हणून तुझी उत्तमोत्तम स्तोत्रांनीं स्तुति करीत आहेत. ( २१ )

**रुद्रादित्या वसवो ये च साध्या विश्वेऽश्विनौ मरुतश्चोष्मपाश्च**
**गन्धर्वयक्षासुरसिद्धसङ्घा वीक्षन्ते त्वां विस्मिताश्चैव सर्वे ।२२।**

एकादश रुद्र, द्वादश आदित्य, तसेंच अष्टवसु आणि साध्यगण, विश्वेदेव आणि अश्विनीकुमार, मरुद्गण आणि पितरांचे समुदाय, तसेंच गंधर्व, यक्ष, असुर, व सिद्धगणांचे समूह, हें सर्व विस्मित होऊन तुला पहात आहेत. ( २२ )

**रूपं महत्ते बहुवक्त्रनेत्रं महाबाहो बहुबाहूरुपादम् ।**
**बहूदरं बहुदंष्ट्राकरालं दृष्ट्वा लोकाः प्रव्यथितास्तथाहम् ।२३।**

हे महाबाहो, तुझें हें बहुत मुखें, डोळे व बहुत हात व मांड्या व पाय तसेंच पुष्कळ उदरें व अनेक दाढा असलेलें हें अक्राळ विक्राळ रूप पाहून सर्व लोक त्याचप्रमाणें मीहि गाबरून गेलों आहे. ( २३ )

**नभःस्पृशं दीप्तमनेकवर्णं व्यात्ताननं दीप्तविशालनेत्रम् ।**
**दृष्ट्वा हि त्वां प्रव्यथितान्तरात्मा धृतिं न विन्दामि शमं च विष्णो**

आकाशाला स्पर्श करणारे, अनेक वर्णांचें देदिप्यमान असें व मुख पसरलेलें व प्रकाशमान विशाल नेत्रांनीं युक्त असें हें तुझें रूप पाहून मी भयभीत झालों आहे. हे विष्णो, हें पाहून मला धीर व शांति मिळत नाहीं. (२४)

**दंष्ट्राकरालानि च ते मुखानि दृष्ट्वैव कालानलसन्निभानि ।**
**दिशो न जाने न लभे च शर्म प्रसीद देवेश जगन्निवास ।२५।**

विक्राळ दाढा असलेलीं व प्रलयकालच्या अग्नीप्रमाणें प्रज्वालित असलेलीं तुझीं मुखें पाहून दिशा जाणणेंहि अशक्य झालें आहे व मनाला समाधानहि वाटत नाहीं. हे देवेशा, जगन्निवासा, प्रसन्न हो.

अमी च त्वां धृतराष्ट्रस्य पुत्राः सर्वे सहैवावनिपालसङ्घैः ।
भीष्मो द्रोणः सूतपुत्रस्तथासौ सहास्मदीयैरपि योधमुख्यैः ॥
वक्त्राणि ते त्वरमाणा विशन्ति दंष्ट्राकरालानि भयानकानि ।
केचिद्विलग्ना दशनान्तरेषु संदृश्यन्ते चूर्णितैरुत्तमाङ्गैः ।२७।

त्यांच्या बाजूंच्या राजेलोकांच्या समुदायासह हे धृतराष्ट्राचे पुत्र, तसेंच भीष्म, द्रोण व हा सूतपुत्र कर्ण, आमच्याकडील प्रमुख योध्यांसह तुझ्या भयानक दाढा असलेल्या मुखामध्यें जलदीनें प्रवेश करीत आहेत. यांच्या पैकीं कांहींची तुझ्या दांतांत सांपडून मस्तकें चुराडा झालीं आहेत, असें दिसत आहे. (२६,२७)

यथा नदीनां बहवोऽम्बुवेगाः समुद्रमेवाभिमुखा द्रवन्ति ।
तथा तवामी नरलोकवीरा विशन्ति वक्त्राण्यभिविज्वलन्ति ॥

ज्याप्रमाणें नद्यांच्या पाण्याचे अनेक प्रवाह समुद्राकडेच धांवत जातात त्याप्रमाणेंच हे नरलोकवीर तुझ्या प्रज्वलित मुखामध्यें प्रवेश करीत असल्यासारखे दिसत आहेत. (२८).

यथा प्रदीप्तं ज्वलनं पतङ्गा विशन्ति नाशाय समृद्धवेगाः ।
तथैव नाशाय विशन्ति लोकास्तवापि वक्त्राणि समृद्धवेगाः ॥

किंवा ज्याप्रमाणें प्रज्वलित दीपाकडे पतंग स्वतःच्या नाशाकरितांच अतिवेगानें धांवत जातात, त्याप्रमाणें स्वतःच्या नाशाकरितांच हे सर्व लोक तुझ्या तोंडाकडे वेगानें धांव घेत आहेत, असें वाटतें. (२९)

लेलिह्यसे ग्रसमानः समन्ताल्लोकान्समग्रान्वदनैर्ज्वलद्भिः ।
तेजोभिरापूर्य जगत्समग्रं भासस्तवोग्राः प्रतपन्ति विष्णो ॥३०॥

आपल्या प्रज्वलित मुखांनीं तूं सर्व बाजूंनीं या सर्व लोकांना ग्रासून टाकित आहेस व आपल्या जिभा चाटीत आहेस. हे विष्णो, आपल्या उग्र प्रकाशानें सर्व जगाला व्यापून तुझ्या प्रभा चोहोंकडे तळपत आहेत.

आख्याहि मे को भवानुग्ररूपो नमोऽस्तु ते देववर प्रसीद ।
विज्ञातुमिच्छामि भवन्तमाद्यं न हि प्रजानामि तव प्रवृत्तिम् ॥

उग्ररूप धारण करणारे तुम्ही कोण हे मला सांगा. हे देववरा, तुला नमस्कार असो. तूं माझ्यावर प्रसन्न हो. तूं आदिपुरुष कोण, हें जाणण्याची इच्छा आहे. कारण तुझी प्रवृत्ति पूर्णपणें माझ्या लक्षांत येत नाहीं. (३१)

श्रीभगवानुवाच

**कालोऽस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धो लोकान्समाहर्तुमिह प्रवृत्तः ।**
**ऋतेऽपि त्वां न भविष्यन्ति सर्वे येऽवस्थिताः प्रत्यनीकेषु योधाः॥**

**श्रीभगवान् म्हणाले**—मी लोकांचा नाश करणारा व अनादि कालापासून वाढलेला 'काळ' आहे. येथें लोकांचा संहार करण्यास प्रवृत्त झालों आहे. हे सर्व सैन्यासैन्यांतून उभे असलेले वीर तूं येथें नसलास तरी जिवत राहणार नाहींत. (३२)

**तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व जित्वा शत्रून् भुङ्क्ष्व राज्यं समृद्धम्।**
**मयैवैते निहताः पूर्वमेव निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ॥३३॥**

त्या करितां तूं ऊठ व यश मिळव शत्रूंना जिंकून तूं समृद्ध राज्याचा उपभोग घे. मी पूर्वींच यांना मारिलेले आहे. हे सव्यसाची, तूं निमित्त मात्र हो. (३३)

**द्रोणं च भीष्मं च जयद्रथं च**
**कर्णं तथान्यानपि योधवीरान् ।**
**मया हतांस्त्वं जहि मा व्यथिष्ठा**
**युध्यस्व जेतासि रणे सपत्नान् ॥३४॥**

द्रोण, भीष्म, जयद्रथ व कर्ण तसेंच अन्य योद्धे यांना मी मारिलेले आहे. तेव्हां त्यांना मार, दुःख करूं नकोस. तूं युद्ध कर. निःसंदेह तूं वैऱ्यांना जिंकशील. (३४)

संजय उवाच

**एतच्छ्रुत्वा वचनं केशवस्य कृताञ्जलिर्वेपमानः किरीटी ।**
**नमस्कृत्वा भूय एवाह कृष्णं सगद्गदं भीतभीतः प्रणम्य ३५॥**

**संजय म्हणाला**—हें केशवाचें वचन ऐकून, हात जोडिलेला व कांपत असलेला मुकुटधारी अर्जुन पुन्हां नमस्कार करून सगद्गदित स्वरानें भीतभीत प्रणाम करून कृष्णाला म्हणाला. ( ३५ )

अर्जुन उवाच

**स्थाने हृषीकेश तव प्रकीर्त्या जगत्प्रहृष्यत्यनुरज्यते च।**
**रक्षांसि भीतानि दिशो द्रवन्ति सर्वे नमस्यन्ति च सिद्धसङ्घाः॥**

**अर्जुन म्हणाला**—हे हृषीकेशा, तुझ्या गुणकीर्तनानें हे सर्व जग हर्षित होतें, व तुझ्यावर प्रेम करतें, हें ठीकच आहे. तसेंच भयभीत झालेले राक्षस लोक दशदिशांना पळत आहेत, आणि हे सिद्धांचे समुदाय तुला नमस्कार करीत आहेत. ( ३६ )

**कस्माच्च ते न नमेरन्महात्मन् गरीयसे ब्रह्मणोऽप्यादिकर्त्रे।**
**अनन्त देवेश जगन्निवास त्वमक्षरं सदसत्तत्परं यत् ॥३७॥**

हे महात्मन्, ते समुदाय तुला कां बरें नमस्कार करणार नाहींत? श्रेष्ठ आहेस व ब्रह्मदेवाचाहि आदिकर्ता आहेस. हे अनंता, देवेशा, जगन्निवासा, तूं सत् व असत् यांच्याहि पलीकडचें अक्षर ब्रह्म आहेस.

**त्वमादिदेवः पुरुषः पुराणस्त्वमस्य विश्वस्य परं निधानम्।**
**वेत्तासि वेद्यं च परं च धाम त्वया ततं विश्वमनन्तरूप ।३८।**

तूं आदि देव व सनातन पुरुष आहेस. तूं या विश्वाचा श्रेष्ठ आधार आहेस. तूं जाणणारा आहेस व जें जाणावयाचें तेंहि तूं आहेस. तूंच परमपद आहेस, हे अनंतरूपा. तूंच हें सर्व विश्व व्यापलें आहेस. (३८)

**वायुर्यमोऽग्निर्वरुणः शशाङ्कः प्रजापतिस्त्वं प्रपितामहश्च।**
**नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्वः पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते ॥**

वायु, यम, अग्नि, वरुण, चंद्रमा. प्रजापति ( पितामह ) व प्रपितामहहि तूंच आहेस. तुला माझे सहस्रशः नमस्कार असो. पुनः पुनः तुला नमस्कार असो. ( ३९ )

**नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व ।**
**अनन्तवीर्यामितविक्रमस्त्वं सर्वं समाप्नोषि ततोऽसि सर्वः ॥**

( तूं सर्वव्यापी असल्यामुळें ) तुला समोरून नमस्कार असो, पाठी-मागून नमस्कार असो. सर्व बाजूंनीं नमस्कार असो. तुझें वीर्य अनंत, व पराक्रम अतुल, तूं सर्वांनाच सामावून घेत असल्यानें तूं 'सर्व'च आहेस. ( ४० )

**सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं हे कृष्ण हे यादव हे सखेति ।**
**अजानता महिमानं तवेदं मया प्रमादात्प्रणयेन वापि ॥४१॥**

तुझा हा महिमा न जाणल्यामुळें मी तुला हे 'सखा' हे 'कृष्ण' हे 'यादव' असें माझा मित्र समजून अज्ञानामुळें व चुकीनें म्हटलें, हें अविचारानें झालें. ( ४१ )

**यच्चावहासार्थमसत्कृतोऽसि विहारशय्यासनभोजनेषु ।**
**एकोऽथवाप्यच्युत तत्समक्षं तत्क्षामये त्वामहमप्रमेयम् ।४२।**

हे अच्युता, तुझी थट्टा करावी या उद्देशानें मी हिंडतां फिरतांना, निजतांना, बसतांउठतांना आणि खातांपितांना तूं एकटा असतांना किंवा दुसऱ्याच्या समक्ष मी जो तुझा अवमान केला, त्याबद्दल अप्रमेयस्वरूप अशा तुला मी विनवीत आहे. ( ४२ )

**पितासि लोकस्य चराचरस्य**
**त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान् ।**
**न त्वत्समोऽस्त्यभ्यधिकः कुतोऽन्यो**
**लोकत्रयेऽप्यप्रतिमप्रभाव ॥४३॥**

तूं या चराचर जगताचा पिता आहेस. तूं पूज्य आहेस, गुरु आहेस, किंब-हुना गुरुहूनही श्रेष्ठ आहेस. हे अतुलप्रभावा, या लोकत्रयांत तुझ्यासारखा कोणीहि नाहीं, मग तुझ्यापेक्षां श्रेष्ठ दुसरा कोण असणार ? ( ४३ )

**तस्मात्प्रणम्य प्रणिधाय कायं**
**प्रसादये त्वामहमीशमीड्यम् ।**

**पितेव पुत्रस्य सखेव सख्युः**
**प्रियः प्रियायार्हसि देव सोढुम् ॥४४॥**

याकारितां नमस्कार करून व शरीर वाकवून स्तुत्य व ‘ समर्थ ’ अशा तुमची ‘ कृपा कर ’ अशी मी प्रार्थना करीत आहे. ज्याप्रमाणें पिता पुत्राचे व मित्र आपल्या मित्राचे किंवा प्रिय मनुष्य आपल्या प्रिय मनुष्याचें अपराध सहन करतो, त्याप्रमाणें तूंहि माझे अपराध सहन करणें योग्य आहे. (४४)

**अदृष्टपूर्वं हृषितोऽस्मि दृष्ट्वा भयेन च प्रव्यथितं मनो मे ।**
**तदेव मे दर्शय देव रूपं प्रसीद देवेश जगन्निवास ॥४५॥**

तुझें हें अदृश्यपूर्व रूप पाहून मी हर्षित झालों आहे व माझें मन भयानें व्यापलें आहे. तेव्हां हे देवेशा, जगन्निवासा, प्रसन्न हो व पूर्वींचेंच तुझें रूप मला दाखव (४५)

**किरीटिनं गदिनं चक्रहस्तमिच्छामि त्वां द्रष्टुमहं तथैव ।**
**तेनैव रूपेण चतुर्भुजेन सहस्रबाहो भव विश्वमूर्ते ॥४६॥**

हे सहस्रबाहो, हे विश्वमूर्ते, किरीट, गदा व चक्र धारण केलेल्या तुझ्या पूर्वींच्या रूपांत मी तुला पाहूं इच्छितों. तेव्हां तेंच चतुर्भुज स्वरूप तूं पुन्हां धारण कर. (४६)

श्रीभगवानुवाच

**मया प्रसन्नेन तवार्जुनेदं रूपं परं दर्शितमात्मयोगात् ।**
**तेजोमयं विश्वमनन्तमाद्यं यन्मे त्वदन्येन न दृष्टपूर्वम् ॥४७॥**

श्रीभगवान् म्हणाले—हे अर्जुन, मी प्रसन्न होऊन तुला योगसामर्थ्यानें हें माझें श्रेष्ठ रूप दाखविलें. हें तेजोमय, अनन्त व आद्य विश्वरूप आहे. हें माझें रूप तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणीही पाहिलेलें नाहीं. (४७)

**न वेदयज्ञाध्ययनैर्न दानैर्न च क्रियाभिर्न तपोभिरुग्रैः ।**
**एवंरूपः शक्य अहं नृलोके द्रष्टुं त्वदन्येन कुरुप्रवीर ॥**

हे कुरुवीरश्रेष्ठा, या मनुष्यलोकांमध्यें या प्रकारें माझें रूप पहाणें हें तुझ्याशिवाय कोणालाही शक्य नाहीं. हें रूप वेदाध्ययन किंवा यज्ञ विषयक कल्पसूत्रादि अध्ययन किंवा दान, कर्म किंवा उग्र तप इत्यादिकांच्या योगें पहाणें शक्य नाहीं. (४८)

**मा ते व्यथा मा च विमूढभावो दृष्ट्वा रूपं घोरमीदृङ्ममेदम् ।**
**व्यपेतभीः प्रीतमनाः पुनस्त्वं तदेव मे रूपमिदं प्रपश्य ॥**

याप्रकारचें माझें हें विक्राळ रूप पाहून तूं व्याकूळ होऊं नकोस किंवा बावरल्यासारखाहि होऊं नकोस, भयरहित व संतुष्ट चित्तानें पुन्हां पहिलेंच हें माझें रूप पहा. (४९)

संजय उवाच

**इत्यर्जुनं वासुदेवस्तथोक्त्वा स्वकं रूपं दर्शयामास भूयः ।**
**आश्वासयामास च भीतमेनं भूत्वा पुनः सौम्यवपुर्महात्मा ॥**

**संजय म्हणाला**—याप्रमाणें वासुदेवानें अर्जुनास सांगून आपलें पहिलें रूप पुन्हां त्यास दाखविलें. आणि पुन्हां सौम्यरूप झालेल्या त्या महात्म्यानें भयभीत झालेल्या अर्जुनास धीर दिला. (५०)

अर्जुन उवाच

**दृष्ट्वेदं मानुषं रूपं तव सौम्यं जनार्दन ।**
**इदानीमस्मि संवृत्तः सचेताः प्रकृतिं गतः ॥५१॥**

**अर्जुन म्हणाला**—हे जनार्दना, तुझें हें शांत मनुष्यरूप पाहून मी आतां भानावर येऊन पूर्ववत् सावध झालों आहे. (५१)

श्रीभगवानुवाच

**सुदुर्दर्शमिदं रूपं दृष्टवानसि यन्मम ।**
**देवा अप्यस्य रूपस्य नित्यं दर्शनकाङ्क्षिणः ॥५२॥**

**श्रीभगवान् म्हणाले**—माझें हें जें रूप तूं आतां पाहिलेंस हें पहावयास मिळणें अति कठीण आहे. देवदेखील हें रूप पहाण्याची नित्य उत्कंठा बाळगून आहेत. (५२)

**नाहं वेदैर्न तपसा न दानेन न चेज्यया ।**
**शक्य एवंविधो द्रष्टुं दृष्टवानसि मां यथा ॥५३॥**

तूं मला जसें पाहिलेंस तसें पहाणें हें वेदाभ्यासानें, तपानें, दानानें, किंवा यज्ञानें शक्य नाहीं. (५३)

**भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन ।**
**ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परंतप ॥५४॥**

हे अर्जुना, अनन्य भक्तीनें मात्र मला अशाप्रकारें पहाणें शक्य आहे. मला जाणण्यास पहाण्यास किंवा तत्वतः मजमध्यें प्रवेश करण्यास हाच मार्ग आहे. (५४)

**मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः सङ्गवर्जितः ।**
**निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पाण्डव ॥५५॥**

हे पांडवा, माझ्याकरितांच सर्व कर्मं करणारा, मत्परायण व संगरहित व सर्व प्राणिमात्रांशीं वैर न बाळगणारा असा माझा भक्त मलाच येऊन मिळतो. (या श्लोकांत गीताशास्त्राचें सार आलें आहे, असें शांकर-भाष्यांत म्हटलेलें आहे. व तें खरेंच आहे. सर्व प्राणिमात्रांवर समभाव-ठेऊन ईश्वरार्पण बुद्धीनें समाजसेवा करणें हेंच माणसाचें परम कर्तव्य होय.)

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे विश्वरूपदर्शनयोगो नाम
एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥

श्रीमद्भगवतेंतील विश्वरूपदर्शनयोग नांवाचा अकरावा अध्याय
समाप्त झाला

# अथ द्वादशोऽध्यायः

( ईश्वरार्पण बुद्धया कर्मे केलीं तरी तीं प्रीतिपूर्वक केलीं म्हणजे तीं परमेश्वरास अत्यंत आवडतीं होतात. हें विवेचन आतां या अध्यायांत केलें आहे. )

अर्जुन उवाच

**एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते ।**
**ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगवित्तमाः ॥१॥**

**अर्जुन म्हणाला**—याप्रमाणें सतत शुद्धान्तःकरणानें जे तुझी उपासना करितात ( व्यक्तरूपाची उपासना करितात ); व जे अक्षर व अव्यक्त अशा ब्रह्माची उपासना करितात; या दोन्ही भक्तांमध्यें श्रेष्ठ कर्मयोगी कोण तें आतां सांग. ( १ )

श्रीभगवानुवाच

**मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते ।**
**श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः ॥२॥**

**श्रीभगवान् म्हणाले**—माझ्या ठिकाणीं मन एकाग्र करून नेहमीं योगयुक्त होऊन अतिशय श्रेष्ठ श्रद्धेनें जे माझी उपासना करितात, ते अति श्रेष्ठ कर्मयोगी होत, असें मी समजतों. ( २ )

**ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते ।**
**सर्वत्रगमचिन्त्यं च कूटस्थमचलं ध्रुवम् ॥३॥**

**संनियम्येन्द्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः ।**
**ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहिते रताः ॥४॥**

परंतु, जे अक्षर, प्रत्यक्ष दाखवितां न येणारे, अव्यक्त सर्वव्यापी, अचिन्त्य व सर्वांच्या बुडाशीं असलेलें, अचल व नित्य अशा ब्रह्माची, सर्व इंद्रियांवर ताबा ठेवून, उपासना करतात; ते सर्व प्राणिमात्रांचें हित करण्यांत रममाण असणारे समबुद्धि योगीहि मलाच येऊन मिळतात. ( ३-४ )

क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ।
अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥५॥

परंतु अव्यक्त ब्रह्मावर ज्यांनीं आपलें चित्त लावलें आहे, त्यांना आधिक क्लेश होतात. कारण देहधाऱ्यांस अव्यक्त मार्गाची प्राप्ति फार कष्टानें होत असते. ( ५ )

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः ।
अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त उपासते ॥६॥
तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् ।
भवामि नचिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ॥७॥

सर्व कर्में मलाच अर्पण करून जे मत्परायण भक्त माझे अनन्ययोगानें ध्यान करून माझी उपासना करितातः त्या माझ्याच ठायीं चित्तलय केलेल्या योग्यांचा हे पार्था, मी शीघ्र मृत्युसंसार सागरापासून उद्धार करितो. ( ६-७ )

मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय ।
निवसिष्यासि मय्येव अत ऊर्ध्वं न संशयः ॥८॥

म्हणुन तूं माझ्याच ठायीं चित्तलय कर. माझ्याच ठिकाणीं बुद्धि स्थिर कर. असें केलें असतां तूं माझ्याच ठिकाणीं येऊन राहशील यांत संशय नाहीं. ( ८ )

अथ चित्तं समाधातुं न शक्नोपि मयि स्थिरम् ।
अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं धनंजय ॥९॥

माझ्या ठिकाणीं चित्त स्थिर करणें तुला अशक्य झाल्यास, हे धनंजया, अभ्यासयोगानें तूं माझी प्राप्ति करण्याचा प्रयत्न कर. (९)

अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि मत्कर्मपरमो भव ।
मदर्थमपि कर्माणि कुर्वन्सिद्धिमवाप्स्यासि ॥१०॥

अभ्यास करणें देखील तुला अशक्य वाटल्यास, सर्व कर्में माझ्याच-करितां करावयाची, असा निश्चय कर. माझ्याकरितां कर्में केल्यानें देखील तूं सिद्धि मिळवूं शकशील. (१०)

**अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः ।**
**सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान् ॥११॥**

हेंहि करणें अशक्य झाल्यास मी सांगितलेल्या कर्मयोगाचा आश्रय करून यतचित्तानें हळूंहळूं सर्व कर्मफलांचा त्याग कर. (११)

**श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ।**
**ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम् ॥१२॥**

कारण अभ्यासापेक्षां ज्ञान श्रेष्ठ आहे. ज्ञानापेक्षां ध्यान श्रेष्ठ आहे. परंतु या सर्वांपेक्षां कर्मफलत्याग श्रेष्ठ आहे. (व तो सोपाहि आहे, हे वरील श्लोकांत सांगितलेंच आहे.) कर्मफलत्यागानें निरंतर शांति प्राप्त होते. (१२)

**अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ।**
**निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ॥१३॥**
**संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः ।**
**मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः ॥१४॥**

सर्व प्राणिमात्रांचा द्वेष न करणारा, सर्वांचा स्वार्थरहित मित्र आणि कृपाळु, ममतारहित व अहंकाररहित, व सुखदुःखादि द्वंद्वाकडे समदृष्टीनें पहाणारा, क्षमाशील अंतःकरणाचा, लाभ होवो वा हानि होवो, जो नेहमीं संतुष्ट असतो; असा दृढनिश्चयी यतचित्त नेहमीं कर्मयोगाचें आचरण करणारा व माझेंच ठिकाणीं मन व बुद्धि स्थिर करणारा असा माझा भक्त मला अत्यंत प्रिय आहे. (१३–१४)

**यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः ।**
**हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः ॥१५॥**

ज्याच्यापासून कोणासहि उद्वेग प्राप्त होत नाहीं, किंवा ज्याला लोकांपासून त्रास होत नाहीं. आणि जो हर्ष, मत्सर, भय व उद्वेग यांपासून मुक्त झालेला आहे, असा भक्त मला प्रिय आहे. (१५)

**अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः ।**
**सर्वारम्भपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः ॥१६॥**

ज्याला कशाची आकांक्षा नाहीं; जो चतुर व उदासीन ( पक्षपातरहित ) व दुःखरहित आहे व ज्यानें काम्यकर्मांचा त्याग केला आहे; असा भक्त मला प्रिय आहे. (१६)

**यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न काङ्क्षति ।**
**शुभाशुभपरित्यागी भक्तिमान्यः स मे प्रियः ॥१७॥**

जो कधीं हर्ष पावत नाहीं, द्वेष करीत नाहीं, शोक करीत नाहीं, कशाचीहि अपेक्षा करीत नाहीं, कर्मांचें फल शुभ असो वा अशुभ असो, दोहोंचाहि त्याग करणारा असा जो भक्त, तो मला प्रिय आहे. (१७)

**समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः ।**
**शीतोष्णसुखदुःखेषु समः सङ्गविवर्जितः ॥१८॥**
**तुल्यनिन्दास्तुतिर्मौनी संतुष्टो येन केनचित् ।**
**अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः ॥१९॥**

जो शत्रु व मित्र, तसेंच मान व अपमान, शीत आणि उष्ण, सुख व दुःख या द्वंद्वांचे ठायीं समबुद्धि धारण करितो व ज्यानें संसाराविषयीं सारी आसक्ति सोडली आहे; तसेंच निंदा व स्तुति यांना समान लेखतो, मितभाषी आहे, व जें कांहीं थोडें मिळेल त्यानें संतुष्ट आहे, व कर्मफलाशास्वरूप घर ज्याला नाहीं, जो स्थिरबुद्धि आहे, असा भक्तिमान् पुरुष मला प्रिय आहे. ( १८–१९ )

**ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते ।**
**श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः ॥२०॥**

जे हा अमृतासारखा धर्ममय उपदेश जसा सांगितला, त्याप्रमाणें उपासना रूपानें आचरणांत आणतात, असे श्रद्धावान् व मत्परायण भक्त मला अत्यंत प्रिय आहेत. (२०)

श्रीमद्भगवतेंतील **भक्तियोग** नांवाचा बारावा अध्याय समाप्त झाला.

अभ्यास करणें देखील तुला अशक्य वाटल्यास, सर्व कर्मे माझ्याच-करितां करावयाची, असा निश्चय कर. माझ्याकरितां कर्मे केल्यानें देखील तूं सिद्धि मिळवूं शकशील. (१०)

**अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः ।**
**सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान् ॥११॥**

हेंहि करणें अशक्य झाल्यास मी सांगितलेल्या कर्मयोगाचा आश्रय करून यतचित्तानें हळूंहळूं सर्व कर्मफलांचा त्याग कर. (११)

**श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ।**
**ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम् ॥१२॥**

कारण अभ्यासापेक्षां ज्ञान श्रेष्ठ आहे. ज्ञानापेक्षां ध्यान श्रेष्ठ आहे. परंतु या सर्वांपेक्षां कर्मफलत्याग श्रेष्ठ आहे. (व तो सोपाहि आहे, हे वरील श्लोकांत सांगितलेंच आहे.) कर्मफलत्यागानें निरंतर शांति प्राप्त होते. (१२)

**अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ।**
**निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ॥१३॥**
**संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः ।**
**मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः ॥१४॥**

सर्व प्राणिमात्रांचा द्वेष न करणारा, सर्वांचा स्वार्थरहित मित्र आणि कृपाळु, ममतारहित व अहंकाररहित, व सुखदुःखादि द्वंद्वाकडे समदृष्टीनें पहाणारा, क्षमाशील अंतःकरणाचा, लाभ होवो वा हानि होवो, जो नेहमीं संतुष्ट असतो; असा दृढनिश्चयी यतचित्त नेहमीं कर्मयोगाचें आचरण करणारा व माझेंच ठिकाणीं मन व बुद्धि स्थिर करणारा असा माझा भक्त मला अत्यंत प्रिय आहे. (१३–१४)

**यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः ।**
**हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः ॥१५॥**

ज्याच्यापासून कोणासहि उद्वेग प्राप्त होत नाहीं, किंवा ज्याला लोकांपासून त्रास होत नाहीं. आणि जो हर्ष, मत्सर, भय व उद्वेग यांपासून मुक्त झालेला आहे, असा भक्त मला प्रिय आहे. (१५)

**अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः ।**
**सर्वारम्भपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः ॥१६॥**

ज्याला कशाची आकांक्षा नाहीं; जो चतुर व उदासीन ( पक्षपात-रहित ) व दुःखरहित आहे व ज्यानें काम्यकर्माचा त्याग केला आहे; असा भक्त मला प्रिय आहे. (१६)

**यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न काङ्क्षति ।**
**शुभाशुभपरित्यागी भक्तिमान्यः स मे प्रियः ॥१७॥**

जो कधीं हर्ष पावत नाहीं, द्वेष करीत नाहीं, शोक करीत नाहीं, कशा-चीहि अपेक्षा करीत नाहीं, कर्माचें फल शुभ असो वा अशुभ असो, दोहीं-चाहि त्याग करणारा असा जो भक्त, तो मला प्रिय आहे. (१७)

**समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः ।**
**शीतोष्णसुखदुःखेषु समः सङ्गविवर्जितः ॥१८॥**
**तुल्यनिन्दास्तुतिर्मौनी संतुष्टो येन केनचित् ।**
**अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः ॥१९॥**

जो शत्रु व मित्र, तसेंच मान व अपमान, शीत आणि उष्ण, सुख व दुःख या द्वंद्वांचे ठायीं समबुद्धि धारण करितो व ज्यानें संसाराविषयीं सारी आसक्ति सोडली आहे; तसेंच निंदा व स्तुति यांना समान लेखतो, मितभाषी आहे, व जें कांहीं थोडें मिळेल त्यानें संतुष्ट आहे, व कर्म-फलाशास्वरूप घर ज्याला नाहीं, जो स्थिरबुद्धि आहे, असा भक्तिमान् पुरुष मला प्रिय आहे. ( १८–१९ )

**ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते ।**
**श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः ॥२०॥**

जे हा अमृतासारखा धर्ममय उपदेश जसा सांगितला, त्याप्रमाणें उपासना रूपानें आचरणांत आणतात, असे श्रद्धावान् व मत्परायण भक्त मला अत्यंत प्रिय आहेत. (२०)

श्रीमद्भगवतेंतील **भक्तियोग** नांवाचा बारावा अध्याय समाप्त झाला.

# अथ त्रयोदशोऽध्यायः

श्रीभगवानुवाच

( सातव्या अध्यायांत सुरूं केललें ज्ञानविज्ञानाचें निरूपण पूर्ण झालेलें नाहीं. तें आतां पुढें सुरूं करितात. )

**इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते ।**
**एतद्यो वेत्ति तं प्राहुः क्षेत्रज्ञ इति तद्विदः ॥१॥**

श्रीभगवान् म्हणाले—हे कौंतेया, ह्या शरीराला क्षेत्र असें म्हणतात. हें ज्ञान ज्याला झालें त्याला क्षेत्रज्ञ असें म्हणतात. ( १ )

**क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत ।**
**क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम ॥२॥**

हे भारता, सर्व क्षेत्रामध्यें वास करणारा जीवात्मा ( क्षेत्रज्ञ ) मीच आहे, हें जाण. क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांच्या संबंधींचें जें ज्ञान तेंच खरें ज्ञान असें माझें मत आहे. ( २ )

**तत्क्षेत्रं यच्च यादृक्च यद्विकारि यतश्च यत् ।**
**स च यो यत्प्रभावश्च तत्समासेन मे शृणु ॥३॥**

**ऋषिभिर्बहुधा गीतं छन्दोभिर्विविधैः पृथक् ।**
**ब्रह्मसूत्रपदैश्चैव हेतुमद्भिर्विनिश्चितैः ॥४॥**

तें क्षेत्र कसें आहे, कशा स्वरूपाचें आहे, त्याचे विकार कोणते, तें कोठून उत्पन्न होतें, तो क्षेत्रज्ञ कोण व त्याची उत्पत्ति कोठून होते, हें सर्व सारांशानें मी सांगत आहे, तें ऐक. ह्याची माहिती ऋषींनीं बहुत प्रकारांनीं सांगितली आहे. तसेंच नाना प्रकारच्या वेदमंत्रांनींहि निरनिराळ्या रीतीनें दिली आहे. कार्यकारणरूप हेतु दाखवून निश्चयपूर्वक ब्रह्मसूत्रपदांनींहि ह्या विषयाची माहिती दिली आहे. ( ३-४ )

**महाभूतान्यहंकारो बुद्धिरव्यक्तमेव च ।**
**इन्द्रियाणि दशैकं च पञ्च चेन्द्रियगोचराः ॥५॥**

**इच्छा द्वेषः सुखं दुःखं संघातश्चेतना धृतिः ।**
**एतत्क्षेत्रं समासेन सविकारमुदाहृतम् ॥६॥**

पंच महाभूतें, अहंकार, बुद्धि, आणि मूलप्रकृति, पंच ज्ञानेंद्रियें (त्वचा, कान, चक्षु, रसना व नाक) आणि पंच कर्मेंद्रियें (हात, पाय, वाणी अपान व उपस्थ). व एक (मन) इंद्रियाचे पांच विषय (रूप, रस, गंध स्पर्श व शब्द) याशिवाय इच्छा, द्वेष, सुख व दुःख, संघात (देह आणि इंद्रियें यांचा समूह) चेतना व धैर्य, या सर्वांच्या समुदायास सविकार क्षेत्र असें म्हणतात. (५-६)

**अमानित्वमदम्भित्वमहिंसा क्षान्तिरार्जवम् ।**
**आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः ॥७॥**
**इन्द्रियार्थेषु वैराग्यमनहंकार एव च ।**
**जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम् ॥८॥**
**असक्तिरनभिष्वङ्गः पुत्रदारगृहादिषु ।**
**नित्यं च समचित्तत्वमिष्टानिष्टोपपत्तिषु ॥९॥**
**मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी ।**
**विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि ॥१०॥**
**अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम् ।**
**एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा ॥११॥**

मी श्रेष्ठ अशा अभिमानाचा अभाव, निर्दंभत्व, अहिंसा, शांति सरळपणा, श्रद्धाभक्तियुक्त गुरुची सेवा, शुद्धता, स्थिरता, मनोनिग्रह, विषयोपभोगांचे ठिकाणीं वैराग्य, अहंकाराचा अभाव, तसेंच जन्म, मृत्यु, जरा, व्याधि, इत्यादिकांमध्यें दुःख व दोष सामावलेले आहेत, ही जाणीव, कर्मफलाविषयीं अनासक्ति, पुत्र, स्त्री, घर आदिविषयीं अलोलुपता, इष्ट वा अनिष्ट वस्तु प्राप्त झाली असतां नेहमीं मनाची समता बिघडूं न देणें, माझ्याच ठिकाणीं अनन्यभावानें अव्यभिचारिणी भक्ति, एकान्त व शुद्ध जागेंत राहाण्याची आवड, विषयासक्त सामान्य जनांत राहाण्याची नावड,

( ज्ञानाच्या व्याख्येचा हा प्रपंच आहे. सामान्य जनांचा बुद्धिभेद न करितां ज्ञानी माणसानें कसें वागावें, हें सतत विहित कर्में फलाशारहित बुद्धीनें करावीत, असें सांगून, त्याचें सविस्तर विवेचन ३ ऱ्या अध्यायांत केलें आहे. ) ज्यायोगें आत्मवस्तु व अनात्मवस्तु यांचें ज्ञान होतें, तें अध्यात्मज्ञान नित्य आहे, अशी बुद्धि असणें, व तत्त्वज्ञानाच्या सिद्धान्तांचें परिशीलन, हें सर्व ज्ञान होय. याशिवाय इतर सर्व अज्ञान होय (७-११).

**ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वामृतमश्नुते ।**
**अनादिमत्परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते ॥१२॥**

जें जाणल्यायोगें अमृतत्वाची प्राप्ति होते, तें ब्रह्म मीं तुला सांगतों. तें आदिरहित परब्रह्म होय. तें सत्‌हि नाहीं, असतहि नाहीं असें ज्ञाते म्हणतात. ( १२ )

**सर्वतःपाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम् ।**
**सर्वतःश्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ॥१३॥**

त्याला सर्व बाजूंनीं हातपाय आहेत, सर्व बाजूंनीं डोळे, डोकीं व तोंडें आहेत. त्याला सर्व बाजूंनीं कान आहेत. व तें सर्व जग व्यापून राहिलें आहे. ( १३ )

**सर्वेन्द्रियगुणाभासं सर्वेन्द्रियविवर्जितम् ।**
**असक्तं सर्वभृच्चैव निर्गुणं गुणभोक्तृ च ॥१४॥**

सर्व इंद्रियांच्या विषयांचा त्याच्या ठिकाणीं भास होतो, पण तें वस्तुतः सर्व इंद्रियरहित आहे. तें आसक्तिरहित असूनहि सर्वांचें धारणपोषण करतें, निर्गुण असूनहि सर्व गुण जाणणारें आहे. ( १४ )

**बहिरन्तश्च भूतानामचरं चरमेव च ।**
**सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चान्तिके च तत् ॥१५॥**

तें प्राणिमात्रांच्या अंतःकरणांत आहे, तसेंच बाहेरहि आहे. तें अत्यंत सूक्ष्म असल्यामुळें जाणण्यास कठिण आहे. तें दूर आहे, तसेंच जवळहि आहे. (१५)

**अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव च स्थितम् ।**
**भूतभर्तृ च तज्ज्ञेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च ॥१६॥**

तें अविभक्त असूनहि भूतमात्रांच्या ठिकाणीं विभागल्यासारखें आहे. तें भूतमात्रांचें पोषण करणारें आहे, संहार करणारें आहे, तसेंच उत्पन्न करणारेंहि आहे, असें समजावें. (१६)

**ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसः परमुच्यते ।**
**ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य धिष्ठितम् ॥१७॥**

तें तेजाचेंहि तेज व अंधःकारापलीकडील आहे, असें ज्ञानी लोक म्हणतात. ज्ञान, ज्ञानाचा विषय, ज्ञानाच्या योगानें मिळवावयाचेंहि तेंच होय. सर्वांच्या हृदयामध्यें तेंच वास करीत आहे. (१७)

**इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं चोक्तं समासतः ।**
**मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते ॥१८॥**

याप्रमाणें क्षेत्र, ज्ञान, ज्ञेय, यांची माहिती मी थोडक्यांत सांगितली. हें सर्व जाणून माझा भक्त मझ्याच स्वरुपाला येऊन मिळतो. (१८)

**प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादी उभावपि ।**
**विकारांश्च गुणाश्चैव विद्धि प्रकृतिसंभवान् ॥१९॥**

प्रकृति आणि पुरुष हीं दोन्हीहि अनादि आहेत, हें जाण. तसेंच इंद्रियाचे विकार व सत्त्व, रज तम हे गुण प्रकृतीपासून उत्पन्न होतात असं समंज. (१९)

**कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते ।**
**पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुरुच्यते ॥२०॥**

इच्छित वस्तु ( कारण ) मिळविण्याकरितां होणारी क्रिया ( कार्य ), या कर्तृत्वास प्रकृति ( मूळस्वभाव ) ही कारण आहे, असें मानितात. आणि सुखदुःखाच्या भोगाला पुरुष हा कारण आहे, असें समजतात. (२०).

**पुरुषः प्रकृतिस्थो हि भुङ्क्ते प्रकृतिजान्गुणान् ।**
**कारणं गुणसङ्गोऽस्य सदसद्योनिजन्मसु ॥२१॥**

प्रकृतीचे तंत्रानें चालणारा हा पुरुष तिजपासून उत्पन्न झालेल्या गुणांचा उपभोग घेतो. ह्या गुणांवरील आसक्तीच त्याच्या चांगल्यावाईट योनींमध्यें जन्म घ्यावा लागण्याचें कारण होय. (२१)

**उपद्रष्टानुमन्ता च भर्ता भोक्ता महेश्वरः ।**
**परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन्पुरुषः परः ॥२२॥**

प्रकृतीच्या सानिध्यांत राहून तिच्यापासून स्वतां वेगळा आहे असें पाहाणारा; अनुमति देणारा, मालक, भोक्ता; महेश्वर, परमात्मा, इत्यादि संज्ञा, या देहांत असणाऱ्या प्रकृतीपलिकडील पुरुषास आहेत. (२२)

**य एवं वेत्ति पुरुषं प्रकृतिं च गुणैः सह ।**
**सर्वथा वर्तमानोऽपि न स भूयोऽभिजायते ॥२३॥**

याप्रमाणें या पुरुषास जो अशा स्वरूपांत जाणतो, तसेंच गुणांसह वर्तमान प्रकृतीस जाणतो, तो सर्व प्रकारचीं (विहित) कर्में करीत असला, तरी त्यास पुनः कधींहि जन्म प्राप्त होत नाहीं. (२३)

**ध्यानेनात्मनि पश्यन्ति केचिदात्मानमात्मना ।**
**अन्ये सांख्येन योगेन कर्मयोगेन चापरे ॥२४॥**

कांहीं लोक आपल्या शुद्ध आत्मस्वरूपास ध्यानयोगानें तर कांहीं सांख्ययोगानें तर कांहीं कर्मयोगानें ओळखितात. (२४)

**अन्ये त्वेवमजानन्तः श्रुत्वान्येभ्य उपासते ।**
**तेऽपि चातितरन्त्येव मृत्युं श्रुतिपरायणाः ॥२५॥**

पण दुसरे कोणी ह्या आत्मस्वरूपास न जाणणारे दुसऱ्यापासून ऐकून परमेश्वराची उपासना करतात. आचार्यांपासून ऐकिलेल्या ज्ञानावर श्रद्धा ठेवणारे उपासकदेखील अमृतत्वाला जाऊन मिळतात. (२५)

**यावत्संजायते किंचित्सत्त्वं स्थावरजङ्गमम् ।**
**क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगात्तद्विद्धि भरतर्षभ ।२६॥**

हे भरतश्रेष्ठा, जी स्थावर किंवा जंगम वस्तु निर्माण होते, ती या क्षेत्र (प्रकृति) व क्षेत्रज्ञ (पुरुष) यांच्या संयोगानेंच निर्माण होते, हें तूं जाण.

**समं सर्वेषु भूतेषु तिष्ठन्तं परमेश्वरम्।**
**विनश्यत्स्वविनश्यन्तं यः पश्यति स पश्यति ॥२७॥**

सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणीं समभावानें वास करणाऱ्या व नाशिवंत भूतमात्रांमध्यें अविनाशी असलेल्या या परमेश्वरास, अशा स्वरूपांत जो पाहातो, तोच खरा डोळस होय. (२७)

**समं पश्यन्हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम्।**
**न हिनस्त्यात्मनात्मानं ततो याति परां गतिम् ॥२८॥**
**प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः।**
**यः पश्यति तथात्मानमकर्तारं स पश्यति ॥२९॥**

सर्वत्र समभावानें राहाणाऱ्या या ईश्वराला जो जाणतो, तो स्वतांच स्वतांचा घात करून घेत नाहीं, म्हणूनच तो परम गतीस प्राप्त होतो. प्रकृतिकडूनच सर्व प्रकारें कर्में केलीं जातात, आणि आत्मा अकर्ता आहे, हें जो जाणतो, तो खरा ज्ञानी होय. (२८–२९)

**यदा भूतपृथग्भावमेकस्थमनुपश्यति।**
**तत एव च विस्तारं ब्रह्म संपद्यते तदा ॥३०॥**

प्राण्यांचे भिन्न भिन्न अस्तित्व एकाच ठिकाणीं आहे, आणि त्या परमेश्वराचाच हा सर्व विस्तार आहे, हें जेव्हां पुरुष जाणतो, तेव्हांच त्याला ब्रह्माची प्राप्ति होते. (३०)

**अनादित्वान्निर्गुणत्वात्परमात्मायमव्ययः।**
**शरीरस्थोऽपि कौन्तेय न करोति न लिप्यते ॥३१॥**

हे कुंतीपुत्रा, हा परमात्मा अनादि व गुणरहित असल्यामुळें अव्यय आहे; व तो शरीरांत वास करीत असला तरी हा कांहीं कर्म करीत नाहीं, म्हणून कर्मबंधनापासून अलिप्त असतो. (३१)

**यथा सर्वगतं सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते।**
**सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते ॥३२॥**

ज्याप्रमाणें सर्वव्यापी आकाश सूक्ष्म असल्यामुळें कोणत्याहि वस्तूंशीं लिप्त होत नाहीं, तद्वत् आत्मा सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणीं वास करीत असूनही कर्मबंधनांनीं लिप्त होत नाहीं. ( ३२ )

**यथा प्रकाशयत्येकः कृत्स्नं लोकमिमं रविः ।**
**क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत ॥३३॥**

ज्याप्रमाणें एकच सूर्य सर्व जगताला प्रकाशित करतो, त्याप्रमाणें हे भारता, एकटा क्षेत्रज्ञ या अखिल शरीराला प्रकाशित करतो. (३३)

**क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवमन्तरं ज्ञानचक्षुषा ।**
**भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुर्यान्ति ते परम् ॥३४॥**

याप्रमाणें क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांमधील भेद व क्षेत्रभूत प्रकृतीपासून क्षेत्रज्ञाची मुक्ति करून घेण्याचा मार्ग जे आपल्या ज्ञानचक्षूंनीं जाणतात, ते श्रेष्ठ गतीस जाऊन मिळतात. (३४)

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायांयोगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे गुणत्रयविभागयोगो नाम
चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥

श्रीमद्भगवद्गीतेंतील क्षेत्रक्षेत्रज्ञयोग नांवाचा तेरावा अध्याय
समाप्त झाला.

---

# अथ चतुर्दशोऽध्यायः

( मागील अध्यायांत क्षेत्रभूत प्रकृति व क्षेत्रज्ञ आत्मा यांच्या स्वरूपाचें वर्णन केलें. प्रकृतीचे सत्व, रज, तम हे तीन गुण आहेत, त्यानुसार प्रत्येक प्राणिमात्राचा स्वभाव वेगवेगळा असतो. या गुणांच्या स्वरूपाचें सविस्तर वर्णन केल्याखेरीज क्षेत्रक्षेत्रज्ञाचें वर्णन पुरे होत नाहीं. तें आतां येथें करतात. आपला मुद्दा ठसवून सांगण्याकरितां गीताकार पुनरुक्ति दोष पत्करूनहि, तीच तीच गोष्ट थोड्याफार फरकानें त्याच शब्दांत सांगतात. ह्या गुणत्रयाच्या वर्णनांतहि मागील अध्यायांत सांगितलेल्या कल्पनाच पुन्हां आल्या आहेत. )

श्रीभगवानुवाच

**परं भूयः प्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानमुत्तमम् ।**
**यज्ज्ञात्वा मुनयः सर्वे परां सिद्धिमितो गताः ॥१॥**

**श्रीभगवान् म्हणाले**— जें सर्व ज्ञानामध्यें परम श्रेष्ठ ज्ञान आहे, व जें जाणल्यानें सर्व मुनिजन या जगांतून श्रेष्ठ सिद्धि प्राप्त करून घेते झाले, तें ज्ञान मी तुला पुन्हां सांगतों. (१)

**इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः ।**
**सर्गेऽपि नोपजायन्ते प्रलये न व्यथन्ति च ॥२॥**

ह्या ज्ञानाचा आश्रय करून जे माझ्याशीं साधर्म्य पावले, ते सृष्टीच्या आरंभीहि जन्म पावत नाहींत आणि प्रलयकालींहि दुःख ( मरण ) पावत नाहींत. (२)

**मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहम् ।**
**संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत ॥३॥**

हे भारता, महद्ब्रह्म म्हणजे माया, ही माझी योनि म्हणजे उत्पत्ति-स्थान आहे. तिच्या ठिकाणीं मी जगदुत्पत्तीचे गर्भ धारण करितो. आणि त्यांपासून सर्व प्राणिमात्रांची उत्पत्ति होते. (३)

**सर्वयोनिषु कौन्तेय मूर्तयः संभवन्ति याः ।**
**तासां ब्रह्म महद्योनिरहं बीजप्रदः पिता ॥४॥**

हे कौंतेया, प्रत्येक योनींत जीं जीं शरीरें निर्माण होतात, त्या सर्वांची महद्ब्रह्म ( माझी माया ) ही योनि असून तींत बीज पेरणारा मी पिता आहे. (४)

**सत्त्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसंभवाः ।**
**निबध्नन्ति महाबाहो देहे देहिनमव्ययम् ॥५॥**

हे महाबाहो, सत्त्व, रज व तम हे प्रकृतिपासून उत्पन्न होणारे गुण, या अविनाशी जीवात्म्याला शरीराशीं बद्ध करून ठेवतात. (५)

**तत्र सत्त्वं निर्मलत्वात्प्रकाशकमनामयम् ।**
**सुखसङ्गेन बध्नाति ज्ञानसङ्गेन चानघ ॥६॥**

हे निष्पाप अर्जुना, या तीन गुणांमध्यें सत्त्वगुण हा निर्दोष, त्यामुळें तो प्रकाशकारक व दुःखरहित आहे, तथापि तो जीवात्म्यास सुखाच्या आसक्तीनें व ज्ञानाच्या अभिमानानें बद्ध करतो. (६)

**रजो रागात्मकं विद्धि तृष्णासङ्गसमुद्भवम् ।**
**तन्निबध्नाति कौन्तेय कर्मसङ्गेन देहिनम् ॥७॥**

त्याचप्रमाणें हे कौंतेया, रजोगुण अभिलाषरूप असून, त्यापासून तृष्णा व आसक्ति उत्पन्न होतात, हें जाण. तो ह्या जीवात्म्याला कर्म व त्यांचीं फळें यांच्या आसक्तीनें बद्ध करतो. (७)

**तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्वदेहिनाम् ।**
**प्रमादालस्यनिद्राभिस्तन्निबध्नाति भारत ॥८॥**

आणि हे अर्जुना, तमोगुण हा अज्ञानजन्य आहे, व तो सर्व प्राण्यांना मोहविणारा आहे, हे जाण. तो प्रमाद ( चुकीचीं कृत्यें ), आळस व निद्रा इत्यादिकांनीं ह्या जीवात्म्याला जखडून टाकतो. (८)

सत्त्वं सुखे संजयति रजः कर्माणि भारत ।
ज्ञानमावृत्य तु तमः प्रमादे संजयत्युत ॥९॥

हे भारता, सत्त्वगुण सात्त्विक सुखाची व रजोगुण सकाम कर्माची आसक्ति निर्माण करतो; आणि तमोगुण ज्ञानावर आवरण टाकून प्रमाद निर्माण करणारा आहे. (९)

रजस्तमश्चाभिभूय सत्त्वं भवति भारत ।
रजः सत्त्वं तमश्चैव तमः सत्त्वं रजस्तथा ॥१०॥

हे भारता, रज व तम यांचा पराभव करून सत्त्वगुण बळावतो. सत्त्व व तम यांचे दमन करून रजोगुण वृद्धि पावतो; व रज आणि सत्त्व यांना दडपून तमोगुण वाढीस लागतो. (१०)

सर्वद्वारेषु देहेऽस्मिन्प्रकाश उपजायते ।
ज्ञानं यदा तदा विद्याद्विवृद्धं सत्त्वमित्युत ॥११॥

जेव्हां या देहामध्यें सर्व ठिकाणीं बोधशक्तीची जाणीव उत्पन्न होते, तेव्हां सत्त्वगुणाची वाढ झाली आहे, असें समजावें. (११)

लोभः प्रवृत्तिरारम्भः कर्मणामशमः स्पृहा ।
रजस्येतानि जायन्ते विवृद्धे भरतर्षभ ॥१२॥

हे भरतश्रेष्ठा, रजोगुणाची वाढ झाल्यावर, लोभ, सर्व सांसारिक कर्में करण्याची प्रवृत्ति, सकाम कर्मांचा आरंभ, मनाची चंचलता आणि विषयोपभोगाची लालसा हीं उत्पन्न होतात. ( १२ )

अप्रकाशोऽप्रवृत्तिश्च प्रमादो मोह एव च ।
तमस्येतानि जायन्ते विवृद्धे कुरुनन्दन ॥१३॥

हे कुरुश्रेष्ठा, तमो गुणाची वाढ झाल्यावर अज्ञान, कर्तव्यकर्मे करण्याकडे देखील अ-प्रवृत्ति, प्रमाद व मोह यांची वाढ होते. ( १३ )

यदा सत्त्वे प्रवृद्धे तु प्रलयं याति देहभृत् ।
तदोत्तमविदां लोकनमलान्प्रतिपद्यते ॥१४॥

सत्त्वगुणाची वाढ झाली असतां जीवात्म्यानें देह त्याग केला तर, तो उत्तम पुरुषांना प्राप्त होणाऱ्या शुद्ध लोकांना जाऊन मिळतो. ( १४ )

**रजसि प्रलयं गत्वा कर्मसङ्गिषु जायते ।**
**तथा प्रलीनस्तमसि मूढयोनिषु जायते ॥१५॥**

आणि रजोगुणाची वाढ झाली असतां जर तो मृत्यु पावला तर सकाम कर्माची आसक्ति धारण करणाऱ्या मनुष्यांमध्यें तो जन्म पावतो; व तसेंच तमोगुणाची वाढ झाली असतां तो मृत्यु पावला तर, कीटक, पशु आदि मूढ योनीमध्यें तो जन्म घेतो. ( १५ )

**कर्मणः सुकृतस्याहुः सात्त्विकं निर्मलं फलम् ।**
**रजसस्तु फलं दुःखमज्ञानं तमसः फलम् ॥१६॥**

सात्त्विक कर्माच्या फलास सात्त्विक ( सुख, ज्ञान वैराग्यादींनीं युक्त ) व निर्मळ असें म्हणतात; तर राजस कर्माच्या फलास दुःखकारक व तामस कर्माच्या फलास अज्ञानकारक असें म्हणतात. ( १६ )

**सत्त्वात्संजायते ज्ञानं रजसो लोभ एव च ।**
**प्रमादमोहौ तमसो भवतोऽज्ञानमेव च ॥१७॥**

सत्त्वगुणापासून ज्ञान उत्पन्न होतें; व रजोगुणापासून निःसंशय लोभ उत्पन्न होतो; व तमोगुणापासून प्रमाद, मोह तसेंच अज्ञान देखील उत्पन्न होते. ( १७ )

**ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसाः ।**
**जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसाः ॥१८॥**

सत्त्वगुणांनीं युक्त असे पुरुष ( मृत्युनंतर ) स्वर्गादि उच्च लोकास जातात; रजोगुणी पुरुष मधल्या लोकांत ( मनुष्य लोकांत ) राहातात; व तमोगुणी निंद्यगुणांनीं युक्त असलेल्या कीटक, पशु आदि नीच योनींत जन्म पावतात. ( १८ )

**नान्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टानुपश्यति ।**
**गुणेभ्यश्च परं वेत्ति मद्भावं सोऽधिगच्छति ॥१९॥**

जेव्हां साक्षीभूत जीवात्मा या तीन गुणांशिवाय दुसरा कोणी कर्ता नाहीं, हें जाणतो, आणि तीन गुणांच्या पलीकडचा जो मी परमात्मा, त्याला जाणतो, तेव्हां तो माझ्या स्वरूपाप्रत प्राप्त होतो. ( १९ )

**गुणानेतानतीत्य त्रीन्देही देहसमुद्भवान् ।**
**जन्ममृत्युजरादुःखैर्विमुक्तोऽमृतमश्नुते ॥२०॥**

देहस्थ जीवात्मा या देहापासून उत्पन्न होणाऱ्या या त्रिगुणांच्या पलीकडे जाऊन, जन्म, मृत्यु, जरा आदि दुःखापासून मुक्त होऊन तो अमृतत्वाचा उपभोग घेतो. ( २० )

अर्जुन उवाच

**कैर्लिङ्गैस्त्रीन्गुणानेतानतीतो भवति प्रभो ।**
**किमाचारः कथं चैतांस्त्रीन्गुणानतिवर्तते ॥२१॥**

**अर्जुन म्हणाला**—हे प्रभो, या तीन गुणांच्या पलीकडे गेलेला पुरुष कोणकोणत्या लक्षणांनीं युक्त असतो ? त्याचें आचरण कसें असते ? व तो या तीन गुणांच्या पलीकडे कसा जातो. ( २१ )

श्रीभगवानुवाच

**प्रकाशं च प्रवृत्तिं च मोहमेव च पाण्डव ।**
**न द्वेष्टि संप्रवृत्तानि न निवृत्तानि काङ्क्षति ॥२२॥**

**श्रीभगवान् म्हणाले**—( स्थितप्रज्ञाचेंच वर्णन थोड्याफार फरकानें पुन्हां येथें आले आहे. ) हे पांडवा, सत्त्वगुणाचा कार्यरूप प्रकाश (ज्ञान) रजोगुणाची कार्यरूप प्रवृत्ति, तसेंच तमोगुणाचा कार्यरूप मोह कशाचाहि अंतःकरणांत उदय झाला असतां, तो त्यास वाईट मानीत नाहीं, किंवा त्यांचा उपशम झाला असतां, त्यांची इच्छाहि धरत नाहीं. ( थोडक्यांत तो त्रिगुणांच्या तंत्रानें चालत नाहीं. ) (२२)

**उदासीनवदासीनो गुणैर्यो न विचाल्यते ।**
**गुणा वर्तन्त इत्येव योऽवतिष्ठति नेङ्गते ॥२३॥**

तो साक्षीदारासारखा तटस्थ असतो, गुणांच्या सुखदुःखात्मक फलानें विचलित होत नाहीं. हे त्रिगुणच आपल्या इंद्रियार्थांत व्यापृत आहेत, असें जाणून तो तटस्थ राहतो. तो गुणांच्या कार्यांनीं विचलित होत नाहीं. (२३)

**समदुःखसुखः स्वस्थः समलोष्टाश्मकाञ्चनः ।**
**तुल्यप्रियाप्रियो धीरस्तुल्यनिन्दात्मसंस्तुतिः ॥२४॥**

आत्मस्वरूपांत राहाणाऱ्या त्याला दुःख व सुख समान असतात, मातीचें ढेकूळ, दगड, व सोनें 'हीं त्याला सारखीच असतात, प्रिय व अप्रिय ह्या दोन्ही गोष्टी त्याला एकसारख्याच असतात, तसेंच स्वतःची निंदा किंवा स्तुति ह्या दोन्ही गोष्टीहि त्याला समानच वाटतात. (२४)

**मानापमानयोस्तुल्यस्तुल्यो मित्रारिपक्षयोः ।**
**सर्वारम्भपरित्यागी गुणातीतः स उच्यते ॥२५॥**

मान व अपमान ही त्याला एकसारखीच; तसेंच शत्रु व मित्र त्याला समानच. कोणत्याहि सकाम कर्माचा खटाटोप न करणारा, अशाला त्रिगुणातीत म्हणतात. (२५)

**मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते ।**
**स गुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते ॥२६॥**

आणि जो माझी अव्यभिचारी भक्तीनें सेवा करतो, तो या त्रिगुणांच्या पलीकडे जाऊन सच्चिदानंदघन ब्रह्माशीं तादात्म्य पावण्यालायक होतो.

**ब्रह्मणो हि प्रतिष्ठाहममृतस्याव्ययस्य च ।**
**शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकान्तिकस्य च ॥२७॥**

मीच अमृत व अविकारी ब्रह्माचें, व शाश्वत अशा धर्माचें आणि निरतिशय सुखाचें अधिष्ठान आहे. (२७)

श्रीमद्भगवद्गीतेंतील **गुणत्रयविभाग** नांवाचा चौदावा अध्याय समाप्त झाला.

---

# अथ पञ्चदशोऽध्यायः

( क्षेत्र-क्षेत्रज्ञविषयक ज्ञानाची माहिती तेराव्या अध्यायापासून सुरू केली. तीच या अध्यायांत पुरुषोत्तमयोग सांगून पुरी केली आहे. क्षेत्र म्हणजे क्षर-पुरुष म्हणजेच नाशिवंत शरीर व क्षेत्रज्ञ-अक्षर म्हणजे अविनाशी आत्मा. हा आत्माच परमात्म्याचा अंश आहे. पण हा आत्मा जेव्हां देहधारी बनतो, तेव्हां तो सगुण रूप धारण करतो. त्यापेक्षां निर्गुण परमात्म-तत्त्व वेगळें आहे, असें म्हणणें भाग पडते. हा भेद दाखविण्याकरितां अक्षर-जीवात्म्याच्या पलीकडचा जो परमात्मा तो पुरुषोत्तम असें या अध्यायांत सांगितलें आहे. जीवात्मा व परमात्मा हे दोन वेगळें, हें सांगण्याकरितां हा प्रपंच नसून, सगुण रूप व निर्गुणरूप वेगळे हें दाखविण्याकरितां हें प्रतिपादन आहे. ज्ञानेश्वरांनीं या अध्यायास कर्मप्रासादाचा कळस असें म्हटलें आहे. )

श्रीभगवानुवाच

**ऊर्ध्वमूलमधःशाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् ।**
**छन्दांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ॥१॥**

**श्रीभगवान् म्हणाले**—ज्याचें मूळ वर आहे, ( जो संसार परब्रह्मापासून झाला आहे) ज्याच्या शाखा कनिष्ठ (अधः) अशा महत्तत्त्वादि स्वरूपाच्या आहेत, जो अनित्य ( अश्वत्थ ) असूनहि अनादि ( अविनाशी ) आहे असें म्हणतात, वेद हे ज्याच्या पानाप्रमाणें आहेत, अशा या संसाररूपीं पिंपळ वृक्षाला जो जाणतो, त्यानेंच वास्तविक ब्रह्मस्वरूप जाणलें आहे, असें समजावे. (१)

**अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखा गुणप्रवृद्धा विषयप्रवालाः ।**
**अधश्च मूलान्यनुसंततानि कर्मानुबन्धीनि मनुष्यलोके ॥**

( हा क्षणभंगुर समजला जाणारा संसार सनातन व अनादि आहे असें येथें म्हटलें आहे. यावरून परमेश्वर बुद्ध्या या मानवी समाजाची

प्रगति करीत आहे, हीं परंपरागत कल्पना लटपटीत होते. आपण केलेली मोक्षाची कल्पनाच जास्त युक्तियुक्त हेंहि यावरून सिद्ध होते. नाहींतर परंपरागत कल्पनेप्रमाणें परमेश्वर मानवी समाजाची प्रगति करीत करीत सर्वांनाच मोक्ष प्राप्त करून देईल, व मग या जगतांत मृत्युची भयाण शांतता आपलें अधिराज्य स्थापन करील. असें झालें तर, श्रीभगवानांनीं ह्या अश्वत्थ वृक्षास जीं सनातन, अशी अनादि विशेषणें लाविलीं आहेत, तींहि अयथार्थ ठरतील. )

तीन गुणांच्या प्रभावानें वाढलेल्या व शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध या इंद्रियार्थांनीं (विषय) पल्लवित झालेल्या, त्या संसारवृक्षाच्या फांद्या खालीं मृत्युलोकांत व वर ब्रह्मभुवनापर्यंत पसरलेल्या आहेत. आणि कर्म-विपाकरूपीं त्याचीं मुळें खालीं मनुष्यलोकांत सर्वत्र पसरलेलीं आहेत. (२)

**न रुपमस्येह तथोलभ्यते नान्तो न चादिर्न च संप्रतिष्ठा ।**
**अश्वत्थमेनं सुविरूढमूलमसङ्गशस्त्रेण दृढेन छित्त्वा ॥३॥**
**ततः पदं तत्परिमार्गितव्यं यस्मिन्गता न निवर्तन्ति भूयः ।**
**तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी ॥४॥**

या संसारवृक्षाचें खरें स्वरूप, तसेंच याची सुरवात किंवा शेवट व तो कशावर आधारला आहे, याची कल्पना या मनुष्य लोकांत नीटशी येत नाहीं. याकरितां अहंता, ममता आणि वासनारूप अति दृढ मुळें असलेल्या या संसाररूपी अश्वत्थवृक्षास खंबीर अशा अनासक्तिरूप शस्त्रानें तोडून ज्या परमात्मतत्त्वास पोहोंचलें असतां पुनरावृत्ति नाहीं, अशा तत्त्वाचा शोध करावा. व ज्याच्यापासून ही सनातन संसाराची प्रवृत्ति झाली त्याच आद्य पुरुषास शरण जाण्याची भावना मनांत दृढ करावी.

**निर्मानमोहा जितसङ्गदोषा अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः ।**
**द्वन्द्वैर्विमुक्ताः सुखदुःखसंज्ञैर्गच्छन्त्यमूढाः पदमव्ययं तत् ॥**

मानापमान व मोहरहित, आसक्तिरूप दोष जिंकलेलें, आत्मज्ञानी सर्व वासनापासून निवृत्त झालेलें, सुखदुःखसंज्ञक द्वंद्वापासून पूर्ण मुक्त झालेलें, असें ज्ञानीजन त्या अविनाशी परमपदाप्रत जातात. (५)

**न तद्भासयते सूर्यो न शशाङ्को न पावकः ।**
**यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ॥६॥**

त्या ( स्वयंप्रकाशी ) परमपदास सूर्य, चंद्र किंवा अग्नि प्रकाशित करीत नाहींत. जेथें गेलेलें जीवात्मे परत संसारांत येत नाहींत, तेंच माझें श्रेष्ठ स्थान होय. (६)

**ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ।**
**मनःषष्ठानीन्द्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ॥७॥**

माझाच सनातन अंश या जीवलोकांत जीवात्मा झाला आहे. तोच या त्रिगुणरूपी प्रकृतींत असलेल्या मन आदिकरून सहा इंद्रियांना आपल्याकडे आकर्षून घेतो. (७)

**शरीरं यदवाप्नोति यच्चाप्युत्क्रामतीश्वरः ।**
**गृहीत्वैतानि संयाति वायुर्गन्धानिवाशयात् ॥८॥**

( वारा ज्याप्रमाणें आल्यावरोबर त्या स्थानांतील गंध घेऊन जातो त्याप्रमाणें ) हा जीवात्मा जेव्हां शरीर धारण करतो, किंवा शरीरांतून जेव्हां निघून जातो तेव्हां हा मन आदिकरून इंद्रियांना आपल्याबरोबर जन्मोजन्मीं घेऊन जातो. (८)

**श्रोत्रं चक्षुः स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च ।**
**अधिष्ठाय मनश्चायं विषयानुपसेवते ॥९॥**

शरीरांत असल्यावेळीं हा जीवात्मा कान, डोळे, त्वचा, जिव्हा, नाक व मन यांच्यावर अधिष्ठित होऊन त्यांच्या साहाय्यानें हा विषयोपभोग घेतो. (९)

**उत्क्रामन्तं स्थितं वापि भुञ्जानं वा गुणान्वितम् ।**
**विमूढा नानुपश्यन्ति पश्यन्ति ज्ञानचक्षुषः ॥१०॥**

शरीर सोडून जात असल्यावेळीं, किंवा शरीरांत असल्यावेळीं किंवा त्रिगुणांच्या साहाय्यानें विषयोपभोग घेत असल्यावेळीं, अज्ञानी या जीवात्म्यास जाणीत नाहींत, ज्ञानी मात्र त्याला जाणूं शकतात. (१०)

**यतन्तो योगिनश्चैनं पश्यन्त्यात्मन्यवस्थितम्।**
**यतन्तोऽप्यकृतात्मानो नैनं पश्यन्त्यचेतसः ॥११॥**

प्रयत्नशील योगी आपल्या ठिकाणीं वास करीत असलेल्या या जीवात्म्यास जाणूं शकतात. परंतु ज्यांचें अंतःकरण शुद्ध नाहीं अशीं अज्ञानी माणसें प्रयत्न करूनदेखील याला जाणूं शकत नाहींत. (११)

**यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम्।**
**यच्चन्द्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम् ॥१२॥**

जें सूर्याचे ठिकाणीं असलेलें तेज संपूर्ण जगताला प्रकाशित करतें, जें तेज चंद्रांमध्यें आहे व जें अग्निमध्यें आहे, तें माझेंच आहे, हें तूं जाण.

**गामाविश्य च भूतानि धारयाम्यहमोजसा।**
**पुष्णामि चौषधीः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मकः ॥१३॥**

तसेंच मी पृथ्वीमध्यें प्रवेश करून सर्व प्राणिमात्रांचें धारणपोषण करतो, व चंद्रामध्यें रसरूप होऊन मींच सर्व वनस्पतींचें पोषण करतो. (१३)

**अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः।**
**प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम् ॥१४॥**

मींच सर्व प्राणिमात्रांच्या देहांचा आश्रय करून वैश्वानर ( जठराग्नि ) अग्नि होऊन, प्राण व अपान यांच्या साहाय्यानें भक्ष्य, भोज्य, लेह्य, व चोष्य या चार प्रकारच्या अन्नाचें पाचन करतों. (१४)

**सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टो मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च।**
**वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो वेदान्तकृद्वेदविदेव चाहम् ॥१५॥**

सर्वांच्या हृदयांत मी प्रवेश करून राहिलों आहे. माझ्यापासून सर्वांना स्मृति, ज्ञान, व त्या ज्ञानद्वारा संशय, विपर्यय आदि दोषांचें निराकरण ( तर्क ) होतें. सर्व वेदांकडून मीच जाणला जाण्यास योग्य आहे. मीच वेदान्ताचा कर्ता व वेदांचें तत्त्व जाणणाराहि मीच आहे. (१५)

**द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च।**
**क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते ॥१६॥**

या सृष्टींत नाशिवंत व अविनाशी असे दोन प्रकारचे पुरुष आहेत. सर्व प्राणिमात्रांचें शरीर नाशवान् आहे व जीवात्मा अविनाशी आहे, असें म्हटलें जाते. (१६)

**उत्तम पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः ।**
**यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः ॥१७॥**

ह्या दोहोंहून वेगळा तो उत्तम पुरुष त्यास परमात्मा असें म्हटलें जाते. तो अविनाशी परमेश्वर या तिन्हीं लोकांना व्यापून त्यांचें सर्वांचें धारणपोषण करतो. (१७)

**यस्मात्क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः ।**
**अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः ॥१८॥**

ज्याअर्थी मी नाशिवंत पुरुषाच्या पलीकडचा, तसेंच अविनाशी जीवात्म्याचाहि पलीकडचा आहे, त्या अर्थीं या जगामध्यें व वेदामध्यें मी पुरुषोत्तम या नांवानें प्रसिद्ध आहे. (१८)

**यो मामेवमसंमूढो जानाति पुरुषोत्तमम् ।**
**स सर्वविद्भजति मां सर्वभावेन भारत ॥१९॥**

हे अर्जुना, जो संमोहातीत पुरुष मला पुरुषोत्तमाला वर वर्णन केलेल्या स्वरूपांत जाणतो, तो सर्ववेत्ता पुरुष माझी सर्वप्रकारें उपासना करतो. (१९)

**इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ ।**
**एतद्बुद्ध्वा बुद्धिमान्स्यात्कृतकृत्यश्च भारत ॥२०॥**

हे निष्पाप अर्जुना, याप्रमाणें मी तुला अति रहस्ययुक्त शास्त्र सांगितलें. हें शास्त्र जाणल्यानें मनुष्य ज्ञानवान् व कृतार्थ होईल. (२०)

श्रीमद्भगवद्गीतेंतील पुरुषोत्तमयोग नांवाचा पंधरावा अध्याय समाप्त झाला.

---

# अथ षोडशोऽध्याय

( वास्तविक पंधराव्या अध्यायाअखेर गीतेंतील मुख्य प्रतिपाद्य विषय संपला. पण गीतेचा मुख्य उद्देश संसारी माणसास तत्त्वज्ञान व व्यवहारांतील वागणूक यांचें यथार्थ ज्ञान करून देण्याचा आहे. आतांपर्यंत तात्त्विकदृष्ट्या निष्काम कर्मांचें जरुरी प्रतिपादन केलें. असा निष्काम कर्मयोगी व्यवहारांत कसा वागतो, याचाहि ओझरता उल्लेख स्थितप्रज्ञाच्या वर्णनांत केला. पण, दैनंदिन व्यवहारांत संसारी माणसानें कसें वागावें, याचा त्यावरून पूर्ण बोध होत नाहीं. या अध्यायांत त्याचें सविस्तर वर्णन आहे. या अध्यायास अर्जुनाच्या शंकेनें सुरवात झालेली नाहीं. एवढा उपदेश ऐकल्यावर सर्व कांहीं ज्ञान झालें अशी त्याची समजूत झालेली असावी. म्हणून पूर्णज्ञानी भगवान् श्रीकृष्णच लोककल्याणार्थ हा उपदेश सुरूं करतात. )

श्रीभगवानुवाच

**अभयं सत्त्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः ।**
**दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ॥१॥**
**अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शान्तिरपैशुनम् ।**
**दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ह्रीरचापलम् ॥२॥**
**तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता ।**
**भवन्ति संपदं दैवीमभिजातस्य भारत ॥३॥**

**श्रीभगवान् म्हणाले**— निर्भयता, शुद्धान्तःकरण-वृत्ति, ज्ञान व योगाचें ठिकाणीं पूर्ण निष्ठा, सात्त्विक दान, इंद्रियदमन, यज्ञनिष्ठा, वेदशास्त्रांचा अभ्यास, तपश्चर्या ( स्वधर्मपालन विषयक कष्ट ), अंतःकरणाची सरलता, कोणास कष्ट न देणें, यथार्थ भाषण, अपकारी माणसावरहि क्रोध न करणें, कर्तेपणाचा त्याग, चित्तशांति, दुष्टपणाचा अभाव, भूतमात्रांवर हेतुरहित दया, अनासक्ति, अंतःकरणाची कोमलता, शास्त्राविरुद्ध आचरणाविषयीं लज्जा, बुद्धीची निश्चलता, तेजस्विता ( व्यक्तिमत्व ), क्षमा, धैर्य, अंतर्बाह्य सर्व शुद्धि, शत्रुभावाचा अभाव, दुरभिमानाचा अभाव हे गुण दैवी संपत्ति घेऊन जन्मलेल्या माणसांत असतात. ( १-२-३ )

**दम्भो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च।**
**अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदमासुरीम् ॥४॥**

हे पार्था, आसुरी संपत्ति घेऊन जन्मलेल्या माणसांत, पाखंडीपणा, घमेण्डखोरपणा, दुराभिमान, क्रोध, वाणीची कठोरता व अज्ञान, हे गुण असतात. (४)

**दैवी संपद्विमोक्षाय निबन्धायासुरी मता।**
**मा शुचः संपदं दैवीमभिजातोऽसि पाण्डव ॥५॥**

दैवी संपत्ति मोक्षाला कारणीभूत होते, व आसुरी संपत्ति बंधनास कारण होते, असें मानतात. हे अर्जुना, तूं शोक करूं नकोस, कारण तूं दैवी संपत्ति घेऊन जन्माला आला आहेस. (५)

**द्वौ भूतसर्गौ लोकेऽस्मिन्दैव आसुर एव च।**
**दैवो विस्तरशः प्रोक्त आसुरं पार्थ मे शृणु ॥६॥**

हे अर्जुना, या सृष्टींत जन्मलेल्या लोकांचे ( स्वभाववरून ) दैव व आसूर असें दोन वर्ग असतात. दैवी स्वभावाचें मी वर विस्तारशः वर्णन केलें. आसुर स्वभावाविषयीं आतां ऐक. (६)

**प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुरासुराः।**
**न शौचं नापि चाचारो न सत्यं तेषु विद्यते ॥७॥**

आसुरी स्वभावाच्या लोकांना कर्तव्यकर्में करण्याची प्रवृत्ति, अयोग्य कर्में करण्याची वृत्ति, ह्या दोन्हीहि गोष्टी समजत नाहींत. त्यांच्यांत अंतर्बाह्य शुद्धीचा अभाव तसेंच श्रेष्ठ आचरण व सत्यभाषण ह्यांचाहि अभाव असतो. (७)

**असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम्।**
**अपरस्परसंभूतं किमन्यत्कामहैतुकम् ॥८॥**

हे लोक, या जगातास धर्म—आश्रयरहित व असत्य ( निश्चित् नियमबद्धतेचा अभाव ) व ईश्वररहित, असें मानतात. ह्या जगांतील व्यक्तींचा

एकमेकांशीं कांहीं संबंध नाहीं व हें जग केवळ विषयोपभोगांकरितां आहे, असें ते समजतात. (८)

**एतां दृष्टिमवष्टभ्य नष्टात्मानोऽल्पबुद्धयः ।**
**प्रभवन्त्युग्रकर्माणः क्षयाय जगतोऽहिताः ॥९॥**

अशा चुकीच्या दृष्टीचा आश्रय करून, नष्ट अंतःकरणाचे, कोत्या बुद्धीचे हे लोक, सर्वांवर अपकार करण्यास व जगताचा नाश करण्यास उद्युक्त होतात. (९)

**काममाश्रित्य दुष्पूरं दम्भमानमदान्विताः ।**
**मोहाद्गृहीत्वासद्ग्राहान्प्रवर्तन्तेऽशुचिव्रताः ॥१०॥**

ढोंगीपणा, दुरभिमान व उन्मत्तता या गुणांनीं युक्त व दुर्धर अशा वासनेचा आश्रय करून अज्ञानानें अयथार्थ सिद्धांतांचा आधार घेऊन, भ्रष्ट आचरणवाले हें लोक कोणतींहि कर्में करण्यास प्रवृत्त होतात. (१०)

**चिन्तामपरिमेयां च प्रलयान्तामुपाश्रिताः ।**
**कामोपभोगपरमा एतावदिति निश्चिताः ॥११॥**

**आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायणाः ।**
**ईहन्ते कामभोगार्थमन्यायेनार्थसञ्चयान् ॥१२॥**

आमरण टिकणारी व अमर्याद अशा विषयोपभोगाच्या चिंतेचा आश्रय करून, विषयोपभोगांत दंग हाच पुरुषार्थ असे मानणारे, शेंकडों वासनांच्या पाशांनीं जखडलेलें, काम व क्रोध या विकारांच्या पकडींत सांपडलेलें हे लोक वासनापूर्तीकरितां अन्यायानें धनादिक पदार्थांचा सांठा करण्याची इच्छा करतात. (११-१२)

**इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम् ।**
**इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम् ॥१३॥**
**असौ मया हतः शत्रुर्हनिष्ये चापरानपि ।**
**ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान्सुखी ॥१४॥**
**आढ्योऽभिजनवानस्मि कोऽन्योऽस्ति सदृशो मया ।**
**यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्यज्ञानविमोहिताः ॥१५॥**

**अनेकचित्तविभ्रान्ता मोहजालसमावृताः ।**
**प्रसक्ताः कामभोगेषु पतन्ति नरकेऽशुचौ ॥१६॥**

मी आज हें मिळविलें, व माझी ही इच्छा पूर्ण होईल, तसेंच हें धन आज मजजवळ आहे, व हें मजजवळ होईल, ह्या शत्रूला मी मारलें, आणि दुसऱ्याला देखील मारीन, मीच ईश्वर आहे व मीच भोगी आहे, मी सिद्ध, बलवान व सुखी आहे, मी धनवान आहे, कुलीन आहे, माझ्याशिवाय माझ्यासारखा दुसरा कोण आहे ? मी यज्ञ करीन, दान देईन, आनंद मिळवीन, अशा अज्ञानमय कल्पनांनीं मोहित झालेलें, अनेक मनोदयांनीं भ्रमिष्ट झालेलें, मोहजालांमध्यें फसलेलें व विषयोपभोगांत अत्यंत गढून गेलेले, हे लोक अपवित्र अशा नरकांत पडतात.

**आत्मसंभाविताः स्तब्धा धनमानमदान्विताः ।**
**यजन्ते नामयज्ञैस्ते दम्भेनाविधिपूर्वकम् ॥१७॥**

स्वतः स्वतःला श्रेष्ठ मानणारे, घमेंडखोर, धन व अभिमान यांनीं उन्मत्त झालेलें, हे लोक विधि न पाळतां नाममात्र यज्ञ करतात. ( १७ )

**अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं च संश्रिताः ।**
**मामात्मपरदेहेषु प्रद्विषन्तोऽभ्यसूयकाः ॥१८॥**
**तानहं द्विषतः क्रूरान्संसारेषु नराधमान् ।**
**क्षिपाम्यजस्रमशुभानासुरीष्वेव योनिषु ॥१९॥**

अहंकार, बल, उन्मत्तता, क्रोध, आदि गुणांचा आश्रय केलेले दुसऱ्याची निंदा करणारे व आपल्या व दुसऱ्याच्या शरीरांत वास करणाऱ्या माझा द्वेष करणारे, अशा माझा द्वेष करणाऱ्या क्रूरकर्मी नराधमांना या जगतांतील नीच प्राणिकोटींतच मी वारंवार जन्माला घालतो.

**आसुरीं योनिमापन्ना मूढा जन्मनि जन्मनि ।**
**मामप्राप्यैव कौन्तेय ततो यान्त्यधमां गतिम् ॥२०॥**

हे कौंतेया, जन्मोजन्मीं आसुरी योनीस प्राप्त झालेलें हे मूढ लोक मला येऊन न मिळतांच, त्याहूनहि नीच योनींत जाऊन पडतात. (२०)

**त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।**
**कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ॥२१॥**

काम, क्रोध त्याचप्रमाणें लोभ, हीं तीन नरकाचीं द्वारें आहेत, व तीं आत्म्याचा नाश करणारीं आहेत, म्हणून या तिन्हींचा त्याग करावा. (२१)

**एतैर्विमुक्तः कौन्तेय तमोद्वारैस्त्रिभिर्नरः ।**
**आचरत्यात्मनः श्रेयस्ततो याति परां गतिम् ॥२२॥**

हे कौंतेया, या तीन नरकाच्या दरवाजांपासून अलिप्त राहिलेला पुरुष, स्वतःचें कल्याण होईल असें आचरण करतो, व नंतर उत्तम गतीला जाऊन मिळतो. (२२)

**यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः ।**
**न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम् ॥२३॥**

जो पुरुष शास्त्रांत सांगितलेल्या विधींचा त्याग करून स्वेच्छेनें कोणतींहि कामें करतो, तो सिद्धिहि मिळवीत नाहीं, सुखहि नाहीं व परमपदाचीहि प्राप्ति करून घेत नाहीं. (२३)

**तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ।**
**ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ॥२४॥**

या करितां कोणतें कर्म कार्य व कोणतें अकार्य याचा निर्णय करण्याच्या वेळीं तूं शास्त्राचा आधार घ्यावास. शास्त्रांत कोणतें कर्म कोणत्या विधीनें करावे, असें सांगितलें आहे, याची नीट माहिती घेऊन तूं कर्तव्यकर्में करावींत.

( कर्तव्यकर्माची व्याख्या स्थलकालानुरूप बदलत असतें. पूर्वी चातुर्वर्ण्य व्यवस्थेप्रमाणें ज्याच्या स्वभावाला जीं योग्य तीं कर्में कर्तव्यबुद्धीनें करावींत, हें योग्यच होतें. आतां काळच बदलला आहे. समाजव्यवस्था पार बदलून गेली आहे. या काळांत आजच्या समाजव्यवस्थेनें ठरवून दिलेलीं कर्में करावींत, असाच या शास्त्रप्रामाण्याचा अर्थ आहे. यावरून गीताकारांचा व्यापक दृष्टिकोनाहि दिसून येतो. )

श्रीमद्भगवद्गीतेंतील **दैवासुरसंपद्विभागयोग** नांवाचा सोळावा अध्याय समाप्त झाला.

---

# अथ सप्तदशोऽध्यायः

अर्जुन उवाच

( सद्‌गुणी व दुर्गुणी अशा दोन विभागांत लोकांची विभागणी मागील अध्यायांत केली, पण या मधला बहुजनसमाज याची दखल घेतली गेली नाहीं. अर्जुनास ताबडतोब शंका आली कीं या मधल्या श्रद्धासंपन्न पण अज्ञानी लोकांची गति काय ? या अध्यायांत मागील अध्यायांतील विवेचनच सविस्तर पुढें चालू ठेविलें आहे. )

**ये शास्त्रविधिमुत्सृज्य यजन्ते श्रद्धयान्विताः ।**
**तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्त्वमाहो रजस्तमः ॥१॥**

**अर्जुन म्हणाला**—जो मनुष्य शास्त्रविहित विधि सोडून केवळ श्रद्धेनें देवादिकांचें पूजन करतो, त्यांचीं निष्ठा, हे कृष्णा, सात्त्विक राजस व तामस यापैकीं कोणत्या प्रकारची असते ? ( १ )

श्रीभगवानुवाच

**त्रिविधा भवति श्रद्धा देहिनां सा स्वभावजा ।**
**सात्त्विकी राजसी चैव तामसी चेति तां शृणु ॥२॥**

**श्रीभगवान् म्हणाले**—केवळ स्वभावानुसार उत्पन्न झालेली देहधारी मनुष्यमात्रांची श्रद्धा तीन प्रकारची असते. सात्त्विक, राजस व तामस त्यांचें विवरण तूं ऐक. ( २ )

**सत्त्वानुरूपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत ।**
**श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धः स एव सः ॥३॥**

हे अर्जुना, सर्वांची श्रद्धा त्यांच्या अंतःकरणास अनुरूप अशी असते. हा पुरुष श्रद्धामयच आहे. ज्याची जशी श्रद्धा तशी त्याची प्रकृति. (३)

**यजन्ते सात्त्विका देवान्यक्षरक्षांसि राजसाः ।**
**प्रेतान्भूतगणांश्चान्ये यजन्ते तामसा जनाः ॥४॥**

सात्त्विक पुरुष देवांची पूजा करतात; राजस यक्ष व राक्षसांची पूजा करतात; आणि इतर तामस पुरुष प्रेत व भूतगणांची पूजा करतात. (४)

**अशास्त्रविहितं घोरं तप्यन्ते ये तपो जनाः ।**
**दम्भाहंकारसंयुक्ताः कामरागबलान्विताः ॥५॥**
**कर्षयन्तः शरीरस्थं भूतग्राममचेतसः ।**
**मां चैवान्तःशरीरस्थं तान्विद्ध्यासुरनिश्चयान् ॥६॥**

ढोंग व अहंकार यांनीं, वासना, आसक्ति व शक्तीच्या अभिमानानें युक्त होऊन जे लोक शास्त्रविधि सोडून घोर तपाचरण करतात, व शरीरांतील पंचमहाभूतात्मक इंद्रियसमूह तसेंच त्या शरीरांत वास करणाऱ्या मलाहि त्रास देतात, असें अविवेकी लोक आसुरी श्रद्धेचेच होत, हें तूं जाण.

**आहारस्त्वपि सर्वस्य त्रिविधो भवति प्रियः ।**
**यज्ञस्तपस्तथा दानं तेषां भेदमिमं शृणु ॥८॥**

प्रत्येक प्राणिमात्रास आपापल्या स्वभावानुसार आहारहि तीन प्रकारचा आवडतो. तसेंच यज्ञ, तप, व दान यांचेहि तीन तीन भेद आहेत. ते तूं ऐक.

**आयुःसत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धनाः ।**
**रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः सात्त्विकप्रियाः ॥**

आयुष्य, बुद्धि बल आरोग्य, सुख आणि प्रीति वाढविणारे रसयुक्त, स्नेहपूर्ण व शरीरावर दीर्घकालीन परिणाम करणारे व मन प्रसन्न ठेवणारे आहार हे सात्त्विक पुरुषास प्रिय होत. ( ८ )

**कट्वम्ललवणात्युष्णतीक्ष्णरूक्षविदाहिनः ।**
**आहारा राजसस्येष्टा दुःखशोकामयप्रदाः ॥९॥**

तिखट, आंबट, खारट, अतिगरम, झणझणीत, रखरखीत, दाहक असे दुःख, चिंता व आजारास कारणीभूत होणारे आहार, हे राजस वृत्तीच्या पुरुषास प्रिय होत. ( ९ )

**यातयामं गतरसं पूति पर्युषितं च यत् ।**
**उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियम् ॥१०॥**

आणि निवून गार झालेलें, बेचव, दुर्गन्धयुक्त व शिळें, उष्टें व अपवित्र, असें अन्न तामस वृत्तीच्या पुरुषास प्रिय होय. ( १० )

**अफलाकाङ्क्षिभिर्यज्ञो विधिदृष्टो य इज्यते ।**
**यष्टव्यमेवेति मनः समाधाय स सात्त्विकः ॥११॥**

फलाशारहित अशा बुद्धीच्या मनुष्यांकडून जो विधियुक्त यज्ञ कर्तव्य-बुद्धीनें व मन प्रसन्न ठेवून केला जातो, तो सात्त्विक होय. ( ११ )

**अभिसंधाय तु फलं दम्भार्थमपि चैव यत् ।**
**इज्यते भरतश्रेष्ठ तं यज्ञं विद्धि राजसम् ॥१२॥**

हे भरतश्रेष्ठा, फलावरच दृष्टि ठेवून व स्वतःच्या मोठेपणाचें प्रदर्शन करण्याकरितां जो यज्ञ केला जातो तो राजस आहे, असें समज. ( १२ )

**विधिहीनमसृष्टान्नं मन्त्रहीनमदक्षिणम् ।**
**श्रद्धाविरहितं यज्ञं तामसं परिचक्षते ॥१३॥**

शास्त्रविधि सोडून, अन्नदानविरहित, मंत्रोच्चार न करतां, दक्षिणा न देतां, व आस्थेचा अभाव असतां जो यज्ञ केला जातो, तो तामसयज्ञ होय.

**देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवम् ।**
**ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते ॥१४॥**

देवता, ब्राह्मण, गुरुजन व ज्ञानीजन यांची पूजा करणें, पवित्रता, सरलता, ब्रह्मचर्य व अहिंसा अंगीं बाणणें यास कायिक तप म्हणतात.

**अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ।**
**स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते ॥१५॥**

कोणाच्याहि मनाला न लागणारें पण सत्य व हितकारक बोलणें व स्वतःस नेमून दिलेल्या शास्त्राचा अभ्यास, हें वाचिक तप होय. (१५)

**मनःप्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः ।**
**भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते ॥१६॥**

मनाची प्रसन्नता, शांति, वृथा बडबड टाळणें, इंद्रिय निग्रह, अंतःकरणाची पवित्रता, याला मानसिक तप म्हणतात. (१६)

**श्रद्धया परया तप्तं तपस्तत्त्रिविधं नरैः ।**
**अफलाकाङ्क्षिभिर्युक्तैः सात्त्विकं परिचक्षते ॥१७॥**

फलाची आशा न धरणाऱ्या लोकांकडून निरतिशय श्रद्धेनें आचरणांत आणलेलें वरील तीन प्रकारचें तप, सात्त्विक होय. (१७)

**सत्कारमानपूजार्थं तपो दम्भेन चैव यत् ।**
**क्रियते तदिह प्रोक्तं राजसं चलमध्रुवम् ॥१८॥**

सत्कार, मान आणि पूजा व्हावी अशा इच्छेनें किंवा ढोंगीपणानें केलेलें हें आनिश्चित व क्षणिक फलदायी तप, राजस गणलें गेलें आहे.

**मूढग्राहेणात्मनो यत्पीडया क्रियते तपः ।**
**परस्योत्सादनार्थं वा तत्तामसमुदाहृतम् ॥१९॥**

मूढतापूर्वक हटवादीपणानें व मन, वाणी व शरीर यांना त्रास देऊन तसेंच दुसऱ्याचें आनिष्ट व्हावें म्हणून जें तप केलें जातें, त्यास तामस असें म्हणतात. (१९)

**दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे ।**
**देशे काले च पात्रे च तद्दानं सात्त्विकं स्मृतम् ॥२०॥**

कर्तव्य म्हणून व ज्याला दिलें असतां प्रत्युपकारची शक्यता नाहीं जें दान योग्य ठिकाणीं, योग्य काळीं व योग्य इसमांस दिलें जातें, त्यास सात्त्विक दान असें म्हणतात. (२०)

**यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुनः ।**
**दीयते च परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम् ॥२१॥**

परंतु जें दान परत फेडीच्या अपेक्षेनें किंवा कांहीं फलाची अपेक्षा धरून, किंवा जें देतांना मनाची चरफड होते. तें दान राजस होय.(२१)

**अदेशकाले यद्दानमपात्रेभ्यश्च दीयते ।**
**असत्कृतमवज्ञातं तत्तामसमुदाहृतम् ॥२२॥**

जें दान अयोग्य ठिकाणीं, अयोग्य वेळीं, कुपात्रीं, सत्काररहित व तिरस्कारपूर्वक दिलें जातें, त्यांस तामस असें म्हणतात. (२२)

**ॐतत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः ।**
**ब्राह्मणास्तेन वेदाश्च यज्ञाश्च विहिताः पुरा ॥२३॥**

ॐ, तत्, सत्, हा ब्रह्माचाच तीन प्रकारचा निर्देश सांगितलेला आहे. या निर्देशानेंच पूर्वी ब्राह्मण, वेद व यज्ञ यांची रचना केली गेली.

**तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञदानतपःक्रियाः ।**
**प्रवर्तन्ते विधानोक्ताः सततं ब्रह्मवादिनाम् ॥२४॥**

याकरितां 'ॐ' या अक्षराचा उच्चार करून ब्रह्मवाद्यांच्या यज्ञ, तप आदि क्रिया शास्त्रविधीनें सुरू होतात. (२४)

**तदित्यनभिसंधाय फलं यज्ञतपःक्रियाः ।**
**दानक्रियाश्च विविधाः क्रियन्ते मोक्षकाङ्क्षिभिः ॥२५॥**

मोक्षाची इच्छा धरणाऱ्याकडून 'तत्' ह्या शब्दानें ज्ञान होणाऱ्या ब्रह्मासच उद्देशून यज्ञ, तप, दान आदि निरनिराळ्या प्रकारच्या क्रिया सुरू केल्या जातात. (२५)

**सद्भावे साधुभावे च सदित्येतत्प्रयुज्यते ।**
**प्रशस्ते कर्मणि तथा सच्छब्दः पार्थ युज्यते ॥२६॥**

सत्य ( अस्तित्व ), साधुत्व तसेंच उत्तम धर्मास अनुलक्षून, हे पार्था, 'सत्' शब्दाची योजना केली जाते. (२५)

**यज्ञे तपसि दाने च स्थितिः सदिति चोच्यते ।**
**कर्म चैव तदर्थीयं सदित्येवाभिधीयते ॥२७॥**

सात्विक यज्ञ, तप व दान यांच्या विषयींच्या तत्परतेला 'सत्' असें म्हणतात. तसेंच याकरितां केलेल्या कर्मासहि 'सत्' असें म्हणतात. (२७)

**अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत् ।**
**असदित्युच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह ॥२७॥**

हे पार्था, अश्रद्धेनें केलेलें हवन, दिलेलें दान, व केलेलें तप किंवा इतर कर्म, यांस 'असत्' असें म्हणतात. तें इहलोकीं किंवा परलोकीं लाभदायक होत नाहीं. (२८)

श्रीमद्भगवद्गीतेंतील श्रद्धात्रयविभागयोग नांवाचा सतरावा अध्याय समाप्त

---

# अथाष्टादशोऽध्यायः

अर्जुन उवाच

( सर्व गीतोपदेशाचें सार या अध्यायांत अलें आहे. पाहिला अध्याय उपक्रमात्मक व हा अध्याय उपसंहारात्मक आहे. )

**संन्यासस्य महाबाहो तत्त्वमिच्छामि वेदितुम् ।**
**त्यागस्य च हृषीकेश पृथक्केशिनिषूदन ॥१॥**

**अर्जुन म्हणाला—** हे केशिराक्षसांतका हृषीकेशा, संन्यास व त्याग यांतील तत्त्व वेगळें वेगळें नीट समजून घेण्याची मला इच्छा आहे.

श्रीभगवानुवाच

**काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः ।**
**सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः ॥२॥**

**श्रीभगवान् म्हणाले—**काम्य कर्मांचा त्याग करणें यास संन्यास असें पंडितजनांनीं जाणलें आहे, व कर्तव्य म्हणून केलेल्या सर्व कर्मांच्या फलांचा त्याग, यांस त्याग असें ज्ञानीजन म्हणतात. ( २ )

**त्याज्यं दोषवदित्येके कर्म प्राहुर्मनीषिणः ।**
**यज्ञदानतपः कर्म न त्याज्यमिति चापरे ॥३॥**

कांहीं विद्वान् जें जें कर्म आहे, तें सर्व बंधनकारक आहे म्हणून त्याज्य आहे, असें म्हणतात. कांहीं यज्ञ, दान व तपरूप कर्म त्याज्य नाहीं असें म्हणतात. ( ३ )

**निश्चयं शृणु मे तत्र त्यागे भरतसत्तम ।**
**त्यागो हि पुरुषव्याघ्र त्रिविधः संप्रकीर्तितः ॥४॥**

हे भरतश्रेष्ठा, या त्यागाच्या बाबतींत माझें निश्चित मत ऐक. हे पुरुषव्याघ्रा, त्याग तीन प्रकारचा आहे, असें म्हटलें आहे. ( ४ )

**यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यमेव तत् ।**
**यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम् ॥५॥**

यज्ञ, दान, व तपरूप कर्म सोडून देऊं नये, तें करावेंच; यज्ञ, दान व तप बुद्धिमान पुरुषास पवित्र करणारीं कर्में आहेत. ( ५ )

**एतान्यपि तु कर्माणि सङ्गं त्यक्त्वा फलानि च।**
**कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम् ॥६॥**

परंतु हीं कर्मेंदेखील, त्यावरील आसक्ति सोडून व त्यांची फलाशा सोडून कर्तव्यबुद्धीनें करावींत, असें माझें, हे पार्था, निश्चित व उत्तम मत आहे. ( ६ )

**नियतस्य तु संन्यासः कर्मणो नोपपद्यते।**
**मोहात्तस्य परित्यागस्तामसः परिकीर्तितः ॥७॥**

कारण शास्त्रविहित कर्मांचा त्याग योग्य ठरत नाहीं. बुद्धिच्यामोहानें त्याचा त्याग केला तर त्यास तामसी, असें शहाणे लोक समजतात. ( ७ )

**दुःखमित्येव यत्कर्म कायक्लेशभयात्त्यजेत्।**
**स कृत्वा राजसं त्यागं नैव त्यागफलं लभेत् ॥८॥**

जर कोणी सर्व कर्में कष्टदायक आहेत त्यायोगें आपल्या शरीरास कष्ट होतील, असें समजून तो कर्मांचा राजस त्याग करील, तर त्यास अशा त्यागाचें फळ मिळत नाहीं. ( ८ )

**कार्यमित्येव यत्कर्म नियतं क्रियतेऽर्जुन।**
**सङ्गं त्यक्त्वा फलं चैव स त्यागः सात्त्विको मतः ॥९॥**

हें कर्म करणें कर्तव्यच आहे असें समजून जें विहित कर्म आसक्ति व फलाशा सोडून केलें जातें, अशा कर्मांतील त्याग, हा सात्त्विक त्याग समजला जातो. ( ९ )

**न द्वेष्ट्यकुशलं कर्म कुशले नानुषज्जते।**
**त्यागी सत्त्वसमाविष्टो मेधावी छिन्नसंशयः ॥१०॥**

सत्त्वगुणांनीं युक्त होत्साता संशयरहित व ज्ञानी असा खरा त्यागी, कष्टदायक कर्मांचा द्वेषहि करीत नाहीं, व सुखदायक कर्मांत गढून जात नाहीं.

**न हि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माण्यशेषतः ।**
**यस्तु कर्मफलत्यागी स त्यागीत्यभिधीयते ॥११॥**

संपूर्णतया सर्व कर्मांचा त्याग करणें देहधाऱ्यांना शक्य नाहीं. म्हणून जो कर्मफलाचा त्याग करतो, त्यास त्यागी असें म्हणतात. ( ११ )

**अनिष्टमिष्टं मिश्रं च त्रिविधं कर्मणः फलम् ।**
**भवत्यत्यागिनां प्रेत्य न तु संन्यासिनां क्वचित् ॥१२॥**

सकामी पुरुषांना अशुभ, शुभ व मिश्र असें तीन प्रकारचें फल मरणानंतर मिळते. ज्यांनीं कर्मफलाचा त्याग केला आहे, अशा संन्याशांना कर्मफलाचें बंधन असत नाहीं. ( १२ )

**पञ्चैतानि महाबाहो कारणानि निबोध मे ।**
**सांख्ये कृतान्ते प्रोक्तानि सिद्धये सर्वकर्मणाम् ॥१३॥**

सर्व कर्मांच्या सिद्धीकरितां खालील पांच कारणें सांख्यतत्त्वज्ञानांत सांगितलीं आहेत तीं मजकडून जाणून घे. ( १३ )

**अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् ।**
**विविधाश्च पृथक्चेष्टा दैवं चैवात्र पञ्चमम् ॥१४॥**

ज्याच्या आश्रयानें कर्म केलें जातें तें शरीर, कर्म करणारी प्राणशक्ति, निरनिराळ्या प्रकारचीं कर्मे करण्यास साधनभूत ज्ञानेंद्रियें, त्यांच्या साहाय्याने केल्या जाणाऱ्या कार्यनिष्पत्तिकारक हालचाली व पांचवें म्हणजे दैव ( प्रारब्ध ). ( दैव याचा अर्थ चक्षुरादि इंद्रियांचा प्रेरक देवतासमूह, असा श्रीशंकराचार्यांनीं केला आहे. हेंच निराळ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे या इंद्रियांना प्रेरणा देणारी देवता मानवी कर्तृत्वशक्तीच्या पलीकडची आहे. याचाच अर्थ 'दैव' म्हणजे 'प्रारब्ध' 'पूर्वसंचित' असा होतो. आपण पुनर्जन्माची कल्पना मानीत नाहीं. अशा स्थितींत याचा अर्थ 'अनाकलनीय अशी कर्त्याची बुद्धि' असा होईल. ) (१४)

**शरीरवाङ्मनोभिर्यत्कर्म प्रारभते नरः ।**
**न्याय्यं वा विपरीतं वा पञ्चैते तस्य हेतवः ॥१५॥**

मनुष्यप्राणी शरीर, मन व वाणी यांच्या मार्फत जें कांहीं शास्त्रविहित वा त्याविरुद्ध कर्म करतो, त्यास हीं पांच कारणें आहेत. ( १५ )

**तत्रैवं सति कर्तारमात्मानं केवलं तु यः ।**
**पश्यत्यकृतबुद्धित्वान्न स पश्यति दुर्मतिः ॥१६॥**

असें असतांना जो मनुष्य जीवात्म्यालाच ( आत्म्याचें अलिप्तत्व न जाणतां ) केवळ कर्ता असें मानतो, अशा मूर्खाला अज्ञानीपणामुळें कांहींच समजत नाहीं असें म्हटलें पाहिजे. ( १६ )

**यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते ।**
**हत्वापि स इमाँल्लोकान्न हन्ति न निबध्यते ॥१६॥**

ज्याच्या ठिकाणीं ' मी कर्ता ' असा अहंभाव नसतो, व ज्याची बुद्धि कर्मफलासक्तीनें व्यापलेली नसते, त्यानें या सर्व पुरुषांना मारलें तरी तो मारणारा ठरत नाहीं किंवा त्या कर्मांच्या बंधनांनींहि जखडला जात नाहीं. ( १७ )

**ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता त्रिविधा कर्मचोदना ।**
**करणं कर्म कर्तेति त्रिविधः कर्मसंग्रहः ॥१८॥**

जाणणें, जाणावयाचें, व जाणणारा, हीं तीन कर्मप्रवृत्तीचीं अंगें आहेत. तसेंच साधन, साधावयाचें, व तें साधणारा हीं कर्मनिष्पत्तीचीं तीन अंगें आहेत. ( १८ )

**ज्ञानं कर्म च कर्ता च त्रिधैव गुणभेदतः ।**
**प्रोच्यते गुणसंख्याने यथावच्छृणु तान्यपि ॥१९॥**

ज्ञान, कर्म व कर्ता यांचेहि त्रिगुणात्मक तीन भेद आहेत, असें सांख्यशास्त्रांत सांगितलें आहे. तेंहि साग्रत ऐक. ( १९ )

**सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते ।**
**अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्त्विकम् ॥२०॥**

निरनिराळ्या प्राणिमात्रांचें ठिकाणीं एकच विभागरहित अविनाशी आत्मतत्त्व आहे, असें ज्यायोगें मनुष्य जाणतो, तें सात्त्विक ज्ञान होय. (२०)

**पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं नानाभावान्पृथग्विधान् ।**
**वेत्ति सर्वेषु भूतेषु तज्ज्ञानं विद्धि राजसम् ॥२१॥**

सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणीं निरनिराळीं स्वरूपें विविधत्वानें ज्यायोगें मनुष्य जाणतो, तें ज्ञान राजस आहे, असें जाण. ( २१ )

**यत्तु कृत्स्नवदेकस्मिन्कार्ये सक्तमहैतुकम् ।**
**अतत्त्वार्थवदल्पं च तत्तामसमुदाहृतम् ॥२२॥**

परंतु जें ज्ञान, या कार्यरूप शरीरासच सर्वस्व मानून त्याठिकाणींच आसक्त होतें, तें तत्त्वार्थरहित व तुच्छ ज्ञान तामस होय. ( २२ )

**नियतं सङ्गरहितमरागद्वेषतः कृतम् ।**
**अफलप्रेप्सुना कर्म यत्तत्सात्त्विकमुच्यते ॥२३॥**

जें शास्त्रविहित फलाशा धारण न करणाऱ्या पुरुषाकडून अनासक्त बुद्धीनें, रागद्वेषाचा विकार मनास शिवू न देतां केलें जातें, तें सात्त्विक कर्म होय.

**यत्तु कामेप्सुना कर्म साहंकारेण वा पुनः ।**
**क्रियते बहुलायासं तद्राजसमुदाहृतम् ॥२४॥**

परंतु जें सकाम पुरुषाकडून अहंबुद्धीनें व पुष्कळ परिश्रमानें केलें जातें, तें राजस होय. ( २४ )

**अनुबन्धं क्षयं हिंसामनपेक्ष्य च पौरुषम् ।**
**मोहादारभ्यते कर्म यत्तत्तामसमुच्यते ॥२५॥**

कर्मांचा परिणाम, हानि, हिंसा व स्वसामर्थ्याचा विचार न करतां जें कर्म अज्ञानानें आरंभिलें जातें, तें तामस होय. ( २५ )

**मुक्तसङ्गोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वितः ।**
**सिद्ध्यसिद्ध्योर्निर्विकारः कर्ता सात्त्विक उच्यते ॥२६॥**

अनासक्त, अनहंकारी धैर्य व उत्साह यांनीं युक्त, कार्याच्या यशापयशाविषयीं उदासीन, अशा कर्त्यास सात्त्विक म्हणतात. ( २६ )

**रागी कर्मफलप्रेप्सुर्लुब्धो हिंसात्मकोऽशुचिः ।**
**हर्षशोकान्वितः कर्ता राजसः परिकीर्तितः ॥२७॥**

आसक्त, सकाम, लोभी दुसऱ्यास कष्ट देण्याचा स्वभाव असलेला, अशुद्धाचारी, हर्ष व शोक यांस वश, अशा कर्त्यास राजस कर्ता असें म्हणतात. ( २७ )

**अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कृतिकोऽलसः ।**
**विषादी दीर्घसूत्री च कर्ता तामस उच्यते ॥२८॥**

चंचल बुद्धीचा, अशिक्षित, घमेंडखोर, धूर्त, कृतघ्न, आळशी, सदा शोक करणारा, चेंगट, अशा कर्त्याला तामस म्हणतात. ( २८ )

**बुद्धेर्भेदं धृतेश्चैव गुणतस्त्रिविधं शृणु ।**
**प्रोच्यमानमशेषेण पृथक्त्वेन धनंजय ॥२९॥**

हे धनंजया, बुद्धि व धारणाशक्ति यांचाहि त्रिगुणांच्यामुळें होणारा तीन प्रकारचा भेद, विशेषरीत्या व विभागपूर्वक सांगतों तो ऐक (२९)

**प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्याकार्ये भयाभये ।**
**बन्धं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्त्विकी ॥३०॥**

हे पार्था, प्रवृत्तिमार्ग ( गृहस्थाश्रमांतील निष्काम कर्मयोग ) व निवृत्तिमार्ग ( संन्यास धारण करून आचरिलेला निष्काम कर्मयोग ) तसेंच कर्तव्य अकर्तव्य, ऐहिक दृष्टया संकटकारक व संकटरहित, तसेंच बंधनकारक म्हणजे काय व मोक्ष म्हणजे काय, यांतील भेद जी तत्त्वतः जाणते ती सात्त्विक बुद्धि होय. ( ३० )

**यया धर्ममधर्मं च कार्यं चाकार्यमेव च ।**
**अयथावत्प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसी ॥३१॥**

हे पार्था, ज्या बुद्धीच्या द्वारा मनुष्यास धर्म व अधर्म, कर्तव्य व अकर्तव्य यांतील भेद यथार्थपणें समजत नाहीं, ती राजस बुद्धि होय (३१)

**अधर्मं धर्ममिति या मन्यते तमसावृता ।**
**सर्वार्थान्विपरीतांश्च बुद्धिः सा पार्थ तामसी ॥३२॥**

आणि हे अर्जुना, अज्ञान-अंधकारानें व्याप्त झालेली जी बुद्धि अधर्मालाच धर्म मानते व सर्व गोष्टींत उलटा अर्थ पहाते, ती तामस होय. (३२)

**धृत्या यया धारयते मनःप्राणेन्द्रियक्रियाः ।**
**योगेनाव्यभिचारिण्या धृतिः सा पार्थ सात्त्विकी ॥३३॥**

हे पार्था, पातंजल योगद्वारा ज्या अचंचल मनोधैर्यानें मन, प्राण व इंद्रियांच्या क्रिया नियमित होतात, ती धारणा (मनोधैर्य) सात्त्विक होय. (३३)

**यया तु धर्मकामार्थान्धृत्या धारयतेऽर्जुन ।**
**प्रसङ्गेन फलाकाङ्क्षी धृतिः सा पार्थ राजसी ॥३४॥**

हे अर्जुना, ज्या मनोधैर्यानें धर्म काम व अर्थ ह्या पुरुषार्थांची जोपासना केली जाते, व जें प्रसंगवशात कर्मफलाची इच्छा धारण करतें, तें मनोधैर्य राजस होय. (३४)

**यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदमेव च ।**
**न विमुञ्चति दुर्मेधा धृतिः सा पार्थ तामसी ॥३५॥**

हे पार्था, दुष्टबुद्धि मनुष्य ज्या धारणेच्या योगें निद्रा, भय, चिन्ता, दुःख व उन्मत्तता यांचा त्याग करीत नाहीं, ती तामसी धारणा होय.

**सुखं त्विदानीं त्रिविधं शृणु मे भरतर्षभ ।**
**अभ्यासाद्रमते यत्र दुःखान्तं च निगच्छति ॥३६॥**

**यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम् ।**
**तत्सुखं सात्त्विकं प्रोक्तमात्मबुद्धिप्रसादजम् ॥३७॥**

हे भरतश्रेष्ठा, आतां सुखाचेहि तीन प्रकार माझ्या कडून ऐक. भजन, ध्यान, सेवा इत्यादि प्रकारच्या अभ्यासानें ज्यांत अधिकाधिक गोडी निर्माण होते, (ज्याचा कधींहि कंटाळा येत नाहीं,) व ज्यायोगें सर्व दुःखाचा शेवट होतो, जें प्रथम (साधन काळामध्यें) विषासारखे वाटतें, पण परिणामीं अमृतासारखें गोड असते, तें मन व बुद्धि यांची प्रसन्नता उत्पन्न करणारें सुख, सात्त्विक सुख होय. (३६-३७)

**विषयेन्द्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम् ।**
**परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम् ॥३८॥**

इंद्रियांचे विषय व इंद्रियें यांच्या संयोगापासून उत्पन्न होणारें प्रथम ( भोगकालीं ) अमृतासारखें वाटते, पण परिणामीं विषतुल्य ( हानिकारक) ठरते, तें राजस सुख होय. ( ३८ )

**यदग्रे चानुबन्धे च सुखं मोहनमात्मनः ।**
**निद्रालस्यप्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम् ॥३९॥**

जें भोगकालीं व परिणामकालींहि मनुष्याच्या बुद्धीला भुरळ पाडतें व जें निद्रा, आळस व प्रमाद ( कर्तव्यकर्मांचा विसर ) यापासून उत्पन्न होतें, तें तामस सुख होय. ( ३९ )

**न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुनः ।**
**सत्त्वं प्रकृतिजैर्मुक्तं यदेभिः स्यात्त्रिभिर्गुणैः ॥४०॥**

या प्रकृतिजन्य तीन गुणांपासून मुक्त असा प्राणी पृथ्वीवर, स्वर्गांत किंवा देवलोकांतहि नसतो. ( ४० )

**ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परंतप ।**
**कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः ॥४१॥**

हे शत्रुतापना, ज्याच्या त्याच्या स्वभावजन्य म्हणजे प्रकृतिसिद्ध गुणांमुळें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांचीं कर्में वेगवेगळीं ठरून गेलीं आहेत. ( येथें स्वभावावर भर दिलेला आहे. एखाद्या ब्राह्मणकुळांत जन्मलेल्याचा प्रकृतिसिद्ध गुण क्षत्रिय कर्मास अनुकूल असेल तर, त्याच्या स्वभावामुळें त्याचें कर्तव्य कर्म क्षत्रियाचें असेल, हें सिद्धच आहे. जन्मसिद्ध जातीवर गीतेचा भर आहे, असा जो प्रचार सनातनी कर्मठाकडून केला जातो, तो फोल आहे, हें यावरून दिसून येईल. ) ( ४१ )

**शमो दमस्तपः शौचं क्षान्तिरार्जवमेव च ।**
**ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥ ४२ ॥**

मनोनिग्रह, इंद्रियदमन, पापाचरण, अंतर्बाह्यशुद्धि, शांति, स्वभावाचा सरळपणा, अध्यात्मज्ञान, विविध शास्त्रांचें ज्ञान व परमात्मतत्त्वाचा सार्थ अनुभव, हीं ब्राह्मणांचीं प्रकृतिसिद्ध कर्में होत. ( येथें ‘आस्तिक्य’ याचा

अर्थ 'ईश्वरनिष्ठा' असा केला जातो. 'ईश्वरनिष्ठा' म्हणजे सत्तत्वाचा अनुभव आपण ज्या तऱ्हेनें ईश्वराची कल्पना केली आहे, त्या 'ईश्वर-विषयक निष्ठा' असाहि अर्थ 'आस्तिक्य' याचा होतो, हें उघड आहे.)

**शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ।**
**दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥ ४३ ॥**

शूरवीरता, तेजस्विता, धैर्य, कर्तव्यदक्षता, युद्धांतून पळून न येणें, दातृत्व, स्वामीभाव म्हणजे आश्रितांचें पालनपोषण, प्रजाहिततत्परतेनें राज्यकारभार हांकणें, हीं क्षत्रियांचीं स्वभावजन्य कर्में होत. (४३)

**कृषिगोरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् ।**
**परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ॥ ४४ ॥**

शेती, पशुसंवर्धन व व्यापार हीं वैश्यांचीं स्वाभाविक कर्में होत आणि सेवा करणें (सांगून ठरवून दिलेलें कर्म) हें शूद्रांचें कर्म होय. (४४)

**स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ।**
**स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विन्दति तच्छृणु ॥ ४५ ॥**

आपापल्या स्वभावानुसार प्राप्त झालेलें कर्तव्यकर्म जो तत्परतेनें पार पाडतो, त्यास सिद्धि (मोक्ष) प्राप्त होते. स्वकर्तव्यनिष्ठ माणूस सिद्धि कशी मिळवितो तें ऐक. (४५)

**यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।**
**स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः ॥४६॥**

ज्या परमात्म्यापासून सर्व जगाची उत्पत्ति झाली, ज्यानें हें सर्व विश्व व्यापलें आहे, त्याची आपल्या स्वाभाविक कर्मद्वारा उपासना करून मनुष्यप्राणी मोक्ष मिळवितो. (ब्रह्मार्पणबुद्ध्या कोणतेंही समाजधारक स्वाभाविक कर्म केलें तर तोच खरा मोक्षप्राप्तीचा मार्ग, मोक्षप्राप्तीकरितां संसार सोडून वनांत जाण्याची जरूरी नाहीं, हें तात्पर्य.) (४६)

**श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।**
**स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥४७॥**

दुसऱ्याचा धर्म चांगल्या रीतीनें आचरितां येत असला तरी, स्वभावानुसार प्राप्त होणारा स्वतःचा कमी प्रतीचा धर्महि श्रेष्ठ होय. आपल्या स्वभावानुसार आपला निश्चित झालेला धर्म आचरित असतां त्यांत कसलेंहि पाप लागत नाहीं. ( या ठिकाणीं जन्मसिद्ध चातुर्वर्ण्यांप्रमाणें प्राप्त झालेलें कर्तव्यकर्म प्रत्येकानें आचरावें, असा अर्थ अभिप्रेत नसून, स्वतःचें स्वभावनियत कर्म करावें, असाच अर्थ गीताकारांस मान्य आहे. समजा, एखाद्याला शिक्षकाचा धंदा मनापासून आवडतो, परंतु त्यास एखादी बडी सरकारी नोकरी मिळाली तर तीहि तो चागल्या रीतीनें करूं शकतो. येथें कमी प्रतीची, कमी पगाराची शिक्षकाची नोकरी करणें बरें, मोठ्या पगाराची सरकारी नोकरी करणें बरें नव्हे, असा स्पष्ट अर्थ आहे. ज्यानें त्यानें आपल्या स्वभावधर्मानुसार आपलें कर्तव्य कर्म पसंत करावें, व तें कर्तव्यबुद्धीनें मनापासून आचारित असावें, असें केलें असतां समाज उन्नतिपथावर राहून प्रत्येकास मोक्ष मिळतो, असा गीतेचा संदेश आहे. ) [ श्लोक ३–३५ पहा. ] (४७)

**सहजं कर्म कौन्तेय सदोषमपि न त्यजेत् ।**
**सर्वारम्भा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः ॥४८॥**

हे कौंतेया, प्रकृतिसिद्ध कर्म तें सदोष असलें तरी सोडूं नये. कारण ज्याप्रमाणें अग्नि धुरानें व्यापलेला असतो, त्याप्रमाणें सर्वच कर्में कांहींना कांहीं दोषानें व्यापलेलीं असतात. [ अगदीं निर्दोष कर्म लोकव्यवहारांत मिळणें दुरापास्त. अतएव स्वभावसुलभ कर्में कर्तव्यबुद्धीनें करावीत, हें सांगण्याचा उद्देश. ] (४८)

**असक्तबुद्धिः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः ।**
**नैष्कर्म्यसिद्धिं परमां संन्यासेनाधिगच्छति ॥४९॥**

कोणत्याहि कर्मांच्या कर्तृत्वाभिमानाविषयीं अनासक्त, वासनारहित व संयमी असा पुरुष कर्मफलसंन्यासानें नैष्कर्म्यसिद्धि प्राप्त करून घेतो. ( लोकसंग्रहार्थ कर्मफलत्याग करून कर्तव्यकर्में करीत राहाणें, म्हणजे नैष्कर्म्यसिद्धि प्राप्त करून घेणें. ) (४९)

सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म तथाप्नोति निबोध मे।
समासेनैव कौन्तेय निष्ठा ज्ञानस्य या परा ॥५०॥

हे कौंतेया, अशा रीतीनें सिद्धि प्राप्त झालेला पुरुष, तत्वज्ञानाची परमावधीची निष्ठा जें ब्रह्म, तें कोणत्या प्रकारें तो प्राप्त करून घेतो, तें संक्षेपानें मजपासून ऐक. (५०)

बुद्ध्या विशुद्धया युक्तो धृत्यात्मानं नियम्य च।
शब्दादीन्विषयांस्त्यक्त्वा रागद्वेषौ व्युदस्य च ॥५१॥
विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानसः।
ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रितः ॥५२॥
अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम्।
विमुच्य निर्ममः शान्तो ब्रह्मभूयाय कल्पते ॥५३॥

विशुद्ध बुद्धीनें युक्त, ध्यान–धारणाशक्तीनें आत्मसंयमन करणारा, शब्द स्पर्शादि इंद्रियांच्या बाह्यविषयांचा त्याग करणारा, राग व द्वेष मनांतून निःशेष काढून टाकणारा 'एकान्तवासप्रिय' मिताहारी, वाणी, शरीर व मन यांचें नियमन करणारा, ध्यानयोगांत निमग्न असणारा, नित्य वैराग्यसंपन्न, अहंकार, मद, गर्विष्ठपणा, वासना, क्रोध व लोभ यांचा त्याग केलेला, ममत्वरहित व प्रशांत अंतःकरणाचा पुरुष ब्रह्मस्वरूप होण्यास पात्र होतो. (५१–५२–५३)

ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न काङ्क्षति।
समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम् ॥५४॥

असा ब्रह्मस्वरूप प्रसन्न अंतःकरणाचा पुरुष कशाचा शोक करीत नाहीं, किंवा कशाची अपेक्षा करीत नाहीं. असा सर्वाभूतीं समदर्शी झालेला पुरुष माझी पराभक्ति (नैष्कर्म्यसिद्धि) प्राप्त करून घेतो. (५४)

भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वतः।
ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनन्तरम् ॥५५॥

अशा भक्तीनें मी केवढा व कोण आहे, हें तो यथार्थदृष्ट्या जाणतो. तात्त्विकदृष्ट्या जाणल्यानंतर तो मत्स्वरूपीं लीन होतो. ( ५५ )

**सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः ।**
**मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम् ॥५६॥**

माझ्याच प्रीत्यर्थ सतत सर्वकर्में करीत असूनहि, तो माझ्या कृपेनें अविनाशी व शाश्वत असें पद प्राप्त करून घेतो. ( नैष्कर्म्यसिद्धि म्हणजेच परमभक्ति व तीच ज्ञानाची परानिष्ठा असें सांगून, गीताकारांनीं भक्तिमार्ग, ज्ञानमार्ग व कर्ममार्ग, हें तत्त्वतः एकच आहेत, असा आपला **सर्वसंग्राहक** दृष्टिकोन येथें व्यक्त केला आहे. ) ( ५६ )

**चेतसा सर्वकर्माणि मयि संन्यस्य मत्परः ।**
**बुद्धियोगमुपाश्रित्य मच्चित्तः सततं भव ॥५७॥**

मनानें सर्वकर्में मला अर्पण करून, मत्परायण होऊन, समत्वबुद्धिरूप कर्मयोगाचा आश्रय करून, आपल्या चित्ताचा सतत माझ्याच ठिकाणीं लय ठेव. ( ५७ )

**मच्चितः सर्वदुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि ।**
**अथ चेत्त्वमहंकारान्न श्रोष्यसि विनङ्क्ष्यसि ॥ ५८ ॥**

माझ्याच ठिकाणीं चित्ताचा लय ठेवल्यानें, माझ्या कृपेनें, तूं सर्व कर्मबंधनांच्या संकटांतून पार पडशील. अहंकारानें माझें हें म्हणणें न ऐकशील तर नाश पावशील. ( ५८ )

**यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे ।**
**मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ॥ ५९ ॥**

अहंकाराचा आश्रय घेऊन, मी लढणार नाहीं, असें जर तूं म्हणत असशील, तर तो तुझा निश्चय खोटा आहे. कारण तुझा प्रकृतिधर्मच तुला हें कर्म करण्यास भाग पाडीत आहे. ( ५९ )

**स्वभावजेन कौन्तेय निबद्धः स्वेन कर्मणा ।**
**कर्तुं नेच्छसि यन्मोहात्करिष्यस्यवशोऽपि तत् ॥६०॥**

हे कौंतेया, तूं आपल्या स्वभावजन्य कर्मानें बांधला गेला असल्यानें, तूं जरी मोहाला बळी पडून, तें स्वभावसिद्ध कर्तव्यकर्म करण्याची इच्छा केली नाहींस, तरी तेंच कर्म स्वभावधर्माच्या तावडींत सांपडून परवश होऊन तूं करशील. ( ६० )

**ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।**
**भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया ॥६१॥**

हे अर्जुना, सर्व प्राणिमात्रांच्या हृदयांत वास करणारा अंतरात्मा ( ईश्वर ) आपल्या मायेनें सर्व प्राणिमात्रांना जणूं यंत्रावर चढविल्याप्रमाणें फिरवीत असतो. ( ६१ )

**तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ।**
**मत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥६२॥**

हे भारता, तूं त्यालाच सर्वतोपरी शरण जा. त्याच्याच कृपाप्रसादानें तुला श्रेष्ठ शान्ति व शाश्वत पदाची प्राप्ति होईल. ( ६२ )

**इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया ।**
**विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु ॥६३॥**

याप्रमाणें मी तुला गुह्यापेक्षां अतिगुह्य ज्ञान सांगितलें आहे. याचा संपूर्णतया नीट विचार करून, तुला जें योग्य वाटेल तें कर. ( ६३ )

**सर्वगुह्यतमं भूयः शृणु मे परमं वचः ।**
**इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितम् ॥६४॥**

अतिशय गूढ असें माझें श्रेष्ठ वचन तूं पुन्हां ऐक. तूं मला अतिशय आवडतोस, म्हणून तुला हितकारक असें सांगतों. ( ६४ )

**मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।**
**मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ॥६५॥**

माझ्याच ठिकाणीं तूं आपलें अचल चित्त ठेव. माझाच भक्त हो. सर्व यज्ञकर्मं मदर्पणबुद्ध्या कर. मलाच नमस्कार कर. असें केलें असतां, तूं निश्चित मलाच येऊन मिळशील, असें वचन मी तुला देतों. कारण तूं माझा आवडता भक्त आहेस. ( ६५ )

**सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज।**
**अहं त्वा सर्वपापेभ्यः मोक्षयिष्यामि मा शुचः ॥६६॥**

सर्व धर्मांचा त्याग करून मला एकट्यालाच शरण ये. मी तुझी सर्व पापांतून मुक्तता करीन, तूं बिलकुल शोक करूं नकोस. (निरनिराळी लोकांचीं स्वतांचें कर्तव्य कोणतें याबाबत निरनिराळीं मतें असतात. तसेंच अमुक कर्म केलें तर त्याच्या दोषापासून मुक्त होण्याकरितां अमुक प्रायश्चित्तरूपी कर्म करावें, असेंहि दंडक निरनिराळ्या धर्मग्रंथांत असतात. गीताकार स्पष्टच सांगतात कीं, तूं अशा मतांमतांच्या गलबल्यानें किंवा कर्तव्याकर्तव्याच्या निरनिराळ्या श्रुतिस्मृतिच्या इतर धर्मवाक्यांनीं भांबावून जाऊं नकोस. तुझ्या स्वभावानुसार तुझें समाजधारणेच्या दृष्टीनें जें विहित कर्म आहे, तें तूं मदर्पणबुद्ध्या करीत रहा, तुला कसलेंहि कर्मबंधन लागूं पडणार नाहीं. अशा रीतीनें वागलास तर तुझीं सगळीं दुःखें नाहींशी करून, चित्तशांतिरूप मोक्षाची मी तुला प्राप्ति करून देईन. असा हा सरळ एकेश्वरी, सर्वधर्मसंग्राहात्मक **विश्वधर्माचा** निश्चित उपदेश आहे.)

**इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन।**
**न चाशुश्रूषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति ॥६७॥**

हा जो गुह्यतम उपदेश मी तुला केला, तो तपाचरण न करणाराला, माझी भक्ति न करणाराला, किंवा हा ऐकण्याची ज्याला इच्छा नाहीं त्याला, तसेंच जो माझा मत्सर करतो त्याला, कधींहि सांगूं नये. (६७)

**य इमं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति।**
**भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशयः ॥६८॥**

परंतु जो स्वतः संशयातीत पुरुष हा अति गूढ उपदेश माझ्या भक्तांना देईल, तो माझी परमभक्ति करतो व मलाच येऊन मिळतो. (६८)

**न च तस्मान्मनुष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तमः।**
**भविता न च मे तस्मादन्यः प्रियतरो भुवि ॥६९॥**

अशा पुरुषापेक्षां इतर कोणताहि पुरुष मला अधिक प्रिय नाहीं. व या पृथ्वीतलावर अशा पुरुषापेक्षां अधिक प्रिय पुढेंहि कधीं होणार नाहीं. (६९)

अनुक्रम .............
भाग .............
क्रमांक

**अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः ।**
**ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्टः स्यामिति मे मतिः ॥७०॥**

ह्या आपल्या सद्धर्म मार्गदर्शक संवादाचा जो अभ्यास करील, त्यानें ज्ञानयज्ञानें माझें हवन ( उपासना ) केलें असें मी समजेन. (७०)

**श्रद्धावाननसूयश्च शृणुयादपि यो नरः ।**
**सोऽपि मुक्तः शुभाँल्लोकान्प्राप्नुयात्पुण्यकर्मणाम् ॥७१॥**

जो श्रद्धावान व निर्मत्सरी पुरुष हें गीताशास्त्र श्रवण करील ( व त्याप्रमाणें आचरण करील ) तो देखील पापमुक्त होऊन पुण्यकर्म करणाऱ्या पुरुषांस प्राप्त होणाऱ्या शुभ लोकांस जाऊन पोहोंचेल. (७१)

**कच्चिदेतच्छ्रुतं पार्थ त्वयैकाग्रेण चेतसा ।**
**कच्चिदज्ञानसंमोहः प्रनष्टस्ते धनंजय ॥७२॥**

हे पार्था, हा उपदेश तूं एकाग्र चित्तानें ऐकलास कां ? अज्ञानाच्या योगानें उत्पन्न झालेला तुझा ( कर्तव्याकर्तव्यबुद्धिविषयक ) मोह नष्ट झाला कां ?

अर्जुन उवाच

**नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत ।**
**स्थितोऽस्मि गतसन्देहः करिष्ये वचनं तव ॥७३॥**

**अर्जुन म्हणाला**—हे अच्युता, तुझ्या कृपाप्रसादानें माझा मोह नष्ट झाला आहे व कर्तव्यधर्माची आठवण झाली आहे. मी आतां संशय रहित झालों आहे. तूं सांगितलेलें माझें कर्तव्य मी पार पाडीन. (७३)

संजय उवाच

**इत्यहं वासुदेवस्य पार्थस्य च महात्मनः ।**
**संवादमिममश्रौषमद्भुतं रोमहर्षणम् ॥७४॥**

**संजय म्हणाला**—याप्रमाणें श्रीकृष्ण व महात्मा अर्जुन यांच्यामध्यें झालेला अद्भूत व रोमांचकारी संवाद मी ऐकला. (७४)

**व्यासप्रसादाच्छ्रुतवानेतद्गुह्यमहं परम् ।**
**योगं योगेश्वरात्कृष्णात्साक्षात्कथयतः स्वयम् ॥७५॥**

प्र. क्र. ...६१४०

श्रीव्यासांच्या कृपाप्रसादामुळें ( संजयास दिव्यदृष्टि प्राप्त झाल्यामुळें ) मी परम गुह्य असा कर्मफलबुद्धिसंन्यासयोग प्रत्यक्ष योगेश्वर कृष्ण स्वतः सांगत असतां, त्यांच्यापासून ऐकला. (७५)

**राजन्संस्मृत्य संस्मृत्य संवादमिममद्भुतम् ।**
**केशवार्जुनयोः पुण्यं हृष्यामि च मुहुर्मुहुः ॥७६॥**

हे धृतराष्ट्रा, ह्या श्रीकृष्ण व अर्जुनामधील अद्भुत व कल्याणकारक संवादाची पुन्हां पुन्हां आठवण होऊन मला वारंवार हर्षाच्या उकळ्या फुटत आहेत. (७६)

**तच्च संस्मृत्य संस्मृत्य रूपमत्यद्भुतं हरेः ।**
**विस्मयो मे महान्राजन्हृष्यामि च पुनः पुनः ॥७७॥**

हे राजा, श्रीकृष्णाच्या त्या अद्भूत विश्वरूपाची पुन्हां पुन्हां आठवण होऊन मला आश्चर्य वाटते, व त्यायोगें वारंवार आनंदाच्या उकळ्या फुटतात.

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥७८॥**

हे राजा, ज्या बाजूस योगेश्वर कृष्ण व धनुर्धरश्रेष्ठ अर्जुन आहे, त्या पक्षास श्री ( लक्ष्मी ) विजय, राजेश्वर्य व स्थीर नीति लाभणार, असें माझें मत आहे. ( ७८ )

इति श्रीमद्भगवद्गीतासु उपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन-
संवादे **मोक्षसंन्यासयोगे** नामाष्टादशोध्यायः ॥१८॥

याप्रमाणें भगवंतांनीं गाईलेल्या उपनिषदांतील ब्रह्मविद्यात्मक नैष्कर्म्य-
सिद्धियोगशास्त्रावरील श्रीकृष्ण व अर्जुन यांच्या संवादांतील
**मोक्ष-संन्यासयोग** नांवाचा अठरावा अध्याय समाप्त झाला.

( श्लोक ६५–६६ यांत सर्व **गीताधर्म** म्हणजेच **विश्वधर्म** यांचें सार आलेलें आहे. त्यावरील टीप पाहा. )

**॥ इति श्रीमद्भगवद्गीताशास्त्रं संपूर्णम् ॥**

ॐ तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु !

# शुद्धिपत्र

| पान | श्लोक | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ६४ | १ | विषिदंत... | विषीदंत |
| ६४ | ३ | त्यक्त्वोतिष्ठ | त्यक्त्वोत्तिष्ठ |
| ६५ | ७ | ब्रुहि | ब्रूहि |
| ७५ | ५४ | किमासात | किमासीत |
| ७६ | ५६ | स्थिधी | स्थितधी |
| ८८ | ३९ | आवृत्तं | आवृतं |
| ९७ | ३२ | वितता | वितता |
| १०६ | २४ | ब्रह्मनिर्वाणं | ब्रह्मनिर्वाणं |
| ११२ | १९ | युज्ञतो | युञ्जतो |
| ११३ | २५ | चिन्तयेत् | चिन्तयेत् |
| ११४ | ३० | सर्वत्रे | सर्वत्र |
| ११७ | ४५ | सातव्या ओळींतील '(४५)' गाळावें. | |
| १२१ | १५ | नरधमाः | नराधमाः |
| १२३ | २६ | समतीतानी | समतीतानि |
| १२३ | २६ | वर्तमाननि | वर्तमानानि |
| १२४ | ३० | मा | मां |
| १२६ | ९ व १० श्लोकाचे अंक घालावेत. | | |
| १२६ | ११ | सग्रहेण | संग्रहेण |
| १२८ | १६ | ल्लोकाः | ल्लोकाः |
| १२९ | शीर्षक | अक्षरब्रह्मयोगो | अक्षरब्रह्मयोग |
| १३० | २७ | पाथ | पार्थ |
| १३१ | १ | ज्ञान | ज्ञानं |
| १३२ | ५ | मस्थानि | मत्स्थानि |
| १३७ | २६ | मश्नामि | मश्नामि |
| १३७ | २८ | संन्यस | संन्यास |
| १३८ | ३० | मामनन्यभाक | मामनन्यभाक् |
| १४४ | २२ | वेदनां | वेदानां |
| १५६ | [illegible] | सर्व | सर्वं |
| [illegible] | १ | प[illegible]पासते | पर्युपासते |
| [illegible] | [illegible] | प[illegible]दार | पुत्रदार |
| [illegible] | [illegible] | ग[illegible]श्चैव | गणांश्चैव |
| १७[illegible] | [illegible] | [illegible]नुय | |
| १८८ | ३ | रुप | |

संग्रहालय ... ग्रंथा.
३०-९-८५
अनुक्रम
विभाग
क्रमांक २३११४
दि.